# मॉडर्न

## १९९४-९५




२५

रौप्यमहोत्सवी वर्ष १९९४-९५

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

## मॉडर्न महाविद्यालय, पुणे ४११ ००५.

# 'मॉडर्न' नियतकालिक
# रौप्यमहोत्सवी वर्ष
# १९९४-९५

## – संपादक समिती –

- **अध्यक्ष**
  प्रभारी प्राचार्य प. स. चिरपुटकर
- **संपादिका**
  डॉ. कांचनगंगा गंधे
- **सदस्य**
  डॉ माधवी मित्र
  प्रा. बी. जी. वाणी
  प्रा. लीना पाटणकर
  प्रा. व्ही. बी. अल्हाट
  प्रा. सी. टी. प्रधान
  प्रा. व्ही. आर. चिटणीस
  प्रा. सुजाता गायतोंडे
  प्रा. आर. एन्. इंगोले

# Form IV

Statement about ownership and other particulars about

**PROGRESSIVE EDUCATION SOCIETY'S MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE AND COMMERCE PUNE - 411 005.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of Publication | : | Pune |
| 2. | Periodicity of its Publication | : | Annual |
| 3. | Printer's Name | : | R. G. Marathe<br>Surya Printers,<br>727, Sadashiv Peth, Pune 30 |
| 4. | Publisher's Name (Whether citizen of India) if foreigner state country of origin. | : | Off. Prin. P. S. Chirputkar<br>Modern College of Arts, commerce and Science, Pune - 5. Indian |
| 5. | Editor's Name (Whether citizen of India) if foreigner state country of origin. | : | Off. Prin. P. S. Chirputkar<br>Modern College of Arts, commerce and Science, Pune - 5. Indian |
| 6. | Name and address of individuals, who own the paper and partners or shareholders holding more than one percent of the total capital | : | Modern College of Arts, commerce and Science, Pune - 5. Indian<br><br>Not applicable |

I, P. S. Chirputkar hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**Off. Prin. P. S. Chirputkar**

Signature of Publisher

# संपादकीय

*हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविलें जी झाड*
*तरी अवधानामृतें वाड । सिंपौनि की जो ॥*
*मग हे रसभाव फुली फुलैल । नाना पळभरें भरैल ।*
*तुमचे नि प्रसादे होईल । उपयोगु जगा ॥*

*१९३४ साली कै. प्रा. शंकरराव कानिटकर यांची प्रो. ए. सोसायटीची स्थापना करुन एका शिक्षण वृक्षाचे रोपटे लावले. त्यांची दूरदृष्टी, ध्येयनिष्ठ आणि समर्पित वृत्ती आणि अद्ययावत दर्जेदार शिक्षण देण्याचा ध्यास यांच्या फलस्वरुप आज आपल्याला संस्थेचा वाढता व्याप दिसत आहे.*

*कै. प्रा. कानिटकर यांचे एक जेष्ठ सहकारी आणि निष्णात शिक्षक श्री. वि. त्र्यं ताटके यांनी १९६९ साली एक आणखी धाडसी पण दूरदर्शी असे पाऊल टाकले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीने कै. ताटके यांच्या कुशल नेतृत्त्वाखाली मॉडर्न महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतला आणि सर्व अडचणी, अडथळ्यांवर मात करुन १९७० साली मॉडर्न, कला शास्त्र आणि वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. शिक्षणक्षेत्रातील या दोन दिग्गजांनी लावलेला हा ज्ञानाचा वेल आता चांगलाच फोफावला आहे.*

*आज महाविद्यालयाचे रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना त्यांना आम्ही कृतज्ञपणे आदरांजली अर्पण करतो आणि त्यांचे हे काम तितक्याच जाणीवपूर्वक समर्पित वृत्तीने आणि आत्मविश्वासाने पुढे नेण्याची प्रेरणा आणि शक्ती आम्हाला लाभो अशी प्रार्थना करीत आहोत.*

*मॉडर्न महाविद्यालयाचे १९९४-९५ ह्या रौप्यमहोत्सवी वर्षाचें नियतकालिक आपल्या हाती देताना आम्हास अतिशय आनंद होत आहे. हा अंक वेळेत प्रकाशित करण्यासाठी सर्वच प्राध्यापक आणि कर्मचारी यांचे सहकार्य लाभले त्याबद्दल सर्वांचेच प्रथमतः आभार.*

*यंदाच्या वर्षी आपल्या महाविद्यालयाने २५ वर्षे पूर्ण केली आहेत. मागे वळून पाहता, गेल्या २५ वर्षात महाविद्यालयाने वेगवेगळ्या क्षेत्रात यशाची शिखरे गाठली आहेत. ही शिखरे गाठताना महाविद्यालयाला अनेक संकटांना तोंड द्यावे लागले. अनेक अडचणींचा मुकाबला करावा लागला. आपल्या कामावरील निष्ठेच्या सहाय्याने अडचणींतून मार्ग काढायचा असा आदर्श प्रथमपासूनच आपल्या महाविद्यालयाचे संस्थापक कै. वि. त्र्यं. ताटके यांनी घालून दिला असल्यामुळे महाविद्यालयातील प्रत्येक व्यक्तीने कठीण परिस्थितीतही न डगमगता यशाच्या शिखराकडे आगेकूच चालूच ठेवली. १९७० साली महाविद्यालयाची इमारत फक्त दोनच मजली होती. पण*

आता महाविद्यालयाचा पसारा वाढला, विद्यार्थ्यांची संख्या ५००० पर्यंत वाढली, त्यामुळे महाविद्यालयाची इमारतही चार मजली झाली. ग्रंथालय, प्रयोगशाळा जवळजवळ अद्ययावत होत आहेत. एवढेच नव्हे तर या वर्षी सात विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करून महाविद्यालयाच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा खोवला आहे. असं म्हटलं तर वावगं न ठरावं.

रौप्यमहोत्सवी वर्षाची सुरुवातही अनेक विद्वान व्यक्तींच्या आशिर्वादाने झाली. प्रसिद्ध वेदाचार्य घैसास गुरुजींनी वेदमंत्र पठण करुन महाविद्यालय प्रथम पुनीत केले. संस्थेचे अध्यक्ष श्री. विघ्नहरी देव महाराज यांच्या उपस्थितीत डॉ. रा. ना. दांडेकर, डॉ. वि. रा. करंदीकर यांनी ज्ञान, विज्ञान आणि प्रज्ञान यांची जोड असेल तर यश नक्की ठरलेलं असं आशिर्वचन दिलं. पण या यशाच्या मार्गावर अनेक अवघड वळणे होती. पण या अवघड वळणांवर आपले प्राचार्य प. स. चिरपुटकर यांनी सतत खंबीर मार्गदर्शन केल्यामुळेच आपल्या यशाचा मार्ग सुकर झाला.

रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त जवळजवळ सर्वच विभागांनी अनेकविध उपक्रम साजरे केले. स्पर्धा, चर्चा, भाषणे, प्रदर्शने यांनी सबंध वर्ष गजबजून गेले होते. प्रत्येक कार्यक्रम ठरलेल्या वेळात आणि योग्य व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली झाल्यामुळे प्रत्येक कार्यक्रमाला नाविन्याची झालर होती. प्रत्येक कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी अनेक ठिकाणी आपले कसब पणाला लावून लहान मोठी पारितोषिके, सांघिक यश आणि क्रीडाक्षेत्रातही नेत्रदीपक यश मिळविले हे त्यांना नक्कीच भूषणावह आहे. आम्हालाही त्यांचा रास्त अभिमान वाटतो. या सर्व कार्यक्रमांचे सविस्तर वर्णन या नियतकालिकात इतरत्र आलेले आहे. त्यामुळे त्यांचा या ठिकाणी थोडक्यात निर्देश केला आहे. काही विशेष कार्यक्रमांचा विशेष उल्लेख इथे केला पाहिडे. राष्ट्रीय छात्र सेना (एन. सी. सी.) नौदल आणि वायुदल यांनी एक संयुक्त प्रदर्शन आपल्या महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर घडवून आणले. हा कार्यक्रम सर्वांच्या डोळ्याचे पारणे फेडणारा झाला. विशेषत: विमानोड्डाणाच्या कार्यक्रमाने सर्वांना विस्मयचकित केले. याप्रमाणेच इलेक्ट्रॉनिक्स विभागाने 'सिम्पेक्स '९५', संगणक विभागाने 'कॉम्पशो', प्राणीशास्त्र विभागाने 'झूव्हिजन' आणि रौप्यमहोत्सवांतर्गत हिवाळी पुष्प प्रदर्शन असे वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम सादर केले. हे सर्व उपक्रम रौप्यमहोत्सवी वर्षापुरते मर्यादित न ठेवता दर वर्षी राबवावेत असा महाविद्यालयाचा मानस आहे.

शिक्षणक्षेत्रातही नेहमीप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनीही आघाडी कायम राखली आहे.

नियतकालिकांचे काम हे सांघिक स्वरुपाचे आहे. त्यातली मुख्य जबाबदारी संपादन समिती उचलतच असते. नियतकालिकाचे अध्यक्ष या नात्याने प्राचार्य प. स. चिरपुटकर यांनी अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या सहानुभूतीपूर्ण पाठिंब्यामुळे संपादक समितीला आपले काम

*निर्वेधपणे पार पाडता आले. त्याशिवाय उपप्राचार्य, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे हे काम पूर्णत्वाला नेता आले. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.*

*नियतकालिकासाठी विद्यार्थ्यांनी अनेक लेख, कविता, चुटके पाठविले होते. नियतकालिकाचा दर्जा कायम राखण्यासाठी निवडक लेख, कविता घेणेच योग्य होते. हे अवघड काम प्रा. लीना पाटणकर, प्रा. सी. टी. प्रधान आणि प्रा. डोईफोडे यांनी यशस्विरीत्या पार पाडले. रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त झालेल्या सर्व उपक्रमांचे संकलन प्रा. स्वाती कर्वे यांनी केल्यामुळे ह्या सर्व उपक्रमांचा वृत्तांत ह्या नियतकालिकात घेणं अतिशय सुलभ झाले. त्यांचे मनःपूर्वक आभार. नियतकालिकातील कार्टून्स ११ वी शास्त्र विभागाच्या सौरभ भिडे याने फार समर्पकपणे काढली आहेत. प्रुफं तपासणं हे जिकीरीचं काम प्रा. सी. टी. प्रधान आणि प्रा. सीताराम रायकर यांनी काळजीपूर्वक केलं. त्यामुळे ह्या नियतकालिकातील लेखांमध्ये बरीच अचुकता आली आहे. याशिवाय नियतकालिक समितीच्या सर्व सभासदांनी केलेले मार्गदर्शन आणि सूचना नियतकालिकेच्या अचुकतेसाठी फारच उपयोगी पडल्या. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. प्रा. सीताराम रायकर यांनी नियतकालिकेचे प्रकाशन योग्य आणि लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने अनेक प्रकारे सूचना देऊन बहुमोल सहाय्य केले. त्यांनी दाखविलेल्या या आस्थेबद्दल त्यांचे औपचारिकपणे आभार मानणे त्यांना आवडणारे नसले तरी तो एक कर्तव्याचाच भाग आहे असे मला वाटते. यंदाच्या नियतकालिकाचे खास वैशिष्ट्य म्हणजे नियतकालिकाचे रंगीत मुखपृष्ठ. महाविद्यालयाची आणि प्राचार्यांची रंगीत प्रकाशचित्रे आणि आतील कृष्णधवल प्रकाशचित्रे श्री. दाते यांनी अतिशय अचूकपणे टिपली आहेत. त्यांनी दाखलेलं कसब वाखाणण्यासारखं आहे. मुखपृष्ठ आणि मलपृष्ठाची मांडणी आणि आतील चित्रे डॉ. रवीन्द्र गंधे यांनी काढलेली आहेत. या अंकाचे मुद्रण अतिशय सुबकपणे आणि वेळेत करुन दिल्याबद्दल सूर्य प्रिंटर्सचे श्री. राजेंद्र मराठे यांचेही संपादक मंडळ आभारी आहे. यंदा कागदाचे भाव वाढले आणि पुरवठा बेभरवशाचा झाला. पण श्री. मराठे यांनी या अडचणी नियतकालिक प्रकाशनाच्या आड येऊ दिल्या नाहीत. या गोष्टीचा विशेष उल्लेख केला पाहिजे. हे नियतकालिक अधिकाधिक निर्दोष आणि आकर्षक व्हावे म्हणून नियतकालिक समितीने अत्यंत प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. तरीसुद्धा काही त्रुटी, उणिवा राहिल्या असण्याची शक्यता आहेच. या त्रुटींबद्दल उदार दृष्टिकोन ठेवून या अंकाचे आपण कौतुकाने स्वागत कराल असा आम्हास विश्वास आहे.*

**– डॉ. कांचनगंगा गंधे**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करताना | | १ |
| स्वच्छ पुणे ! सुंदर पुणे ! | मुग्धा सिधये | २ |
| कोचिंग क्लास : गरज की टूम? | निवेदिता देशमुख | ४ |
| विनोद | अभिजीत साबळे | ५ |
| दूरदर्शनचा प्रभाव | विद्या झाडे | ६ |
| आयुष्य : एक गणित (कविता) | सुनंदा कोतवाल | ७ |
| विनोद | गजानन गरडे | ७ |
| सरदार सरोवर : शाप की वरदान? | आरती राव | ८ |
| सरदार सरोवर : शाप की वरदान? | गीता जोगळेकर | १० |
| टेलिव्हिजनवरील बहुवाहिन्या | सुचेता वकिल | १२ |
| तरी पण (कविता) | जितेंद्र राजपूत | १३ |
| पर्यावरणविषयक शिक्षणाची आवश्यकता | विद्या कुदळे | १४ |
| अनेकदा वाटायचं (कविता) | संतोष मोरे | १६ |
| 'बंद' बंद व्हावा | किशोरी कासट | १७ |
| वळणावर (कविता) | वैशाली शेट्टी | १८ |
| विज्ञान युगात संत साहित्याचे स्थान | नीलाक्षी ताटके | १९ |
| राजकारण (कविता) | विद्या झाडे | २० |
| विज्ञान युगात संत साहित्याचे स्थान | सारिका गोकर्ण | २१ |
| ऋणानुबंध (कविता) | बिपिन इनामदार | २२ |
| तुझे शब्द व मी (कविता) | बिपिन इनामदार | २२ |
| दोस्ती निसर्गाशी | मुग्धा सिधये | २३ |
| मॉडर्नचं कलामंडळ | बिपिन इनामदार | २४ |
| महामानव विवेकानंद | सोनाली सुमंत | २५ |
| पु. ल. आणि त्यांचं साहित्यदर्शन परिसंवाद | मनस्विनी प्रभुणे | २९ |
| विनोद | अभिजीत साबळे | ३१ |
| अवघाची संसार | अपर्णा धावडे | ३२ |
| वाढती लोकसंख्या — एक समस्या | अजय आडसूळ | ३३ |
| गॅट आणि भारत | सोपान गाडे | ३५ |

| | | |
|---|---|---|
| विनोद | अभिजीत साबळे | ३७ |
| आजची भारतीय शिक्षण पद्धती | संतोष कारडकर | ३८ |
| तुझे प्रेम आहे (कविता) | पौर्णिमा काळे | ३९ |
| भारताचे नवे आर्थिक धोरण | नीना रणदिवे | ४० |
| महिलांविषयी आर्थिक धोरण | माधुरी नरगुंदकर | ४२ |
| स्त्री आणि प्रसारमाध्यमे | अंजली उमाप | ४४ |
| हुंडाबंदीसाठी समाज परिवर्तन हवे | सोपान गाडे | ४६ |
| युवाशक्ती | दशरथ भुजबळ | ४८ |
| चुटका | दशरथ भुजबळ | ४९ |
| सामर्थ्य मनाचे | अभिजीत साबळे | ४९ |
| आजचा युवक | अपर्णा जोशी | ५० |
| विनोद | गजानन गरडे | ५१ |
| आजच्या विद्यार्थ्यांच्या समस्या | अभिजीत साबळे | ५२ |
| विधिलिखित (कविता) | सुनंदा कोतवाल | ५३ |
| विनोद | अभिजीत साबळे | ५३ |
| एक सलग नाट्यानुभव | मनस्विनी प्रभुणे | ५४ |
| खेडेगावचा विकास करण्याची गरज | समीर खिरीड | ५६ |
| प्रेम | अजित गाढवे | ५७ |
| बासरी (कविता) | माधवी नडे | ५८ |
| कोकण : एक निसर्गरम्य परिसर | स्मिता गाडगीळ | ५९ |
| महाबळेश्वर ट्रेक | गीता जोगळेकर | ६२ |
| नातं (कविता) | माधवी नडे | ६५ |
| असे लागले शोध | नीना रणदिवे | ६६ |
| मत कोणाला द्यावे ? | दत्तात्रय वालकोळी | ६९ |
| श्रद्धांजली '१९४२ अ लव्ह स्टोरी'च्या निमित्ताने | बिपिन इनामदार | ७१ |
| क्षणभंगुर मी स्वप्न ठरते . . . (कविता) | वैशाली शेट्टी | ७२ |
| भोसला मिलीटरी स्कूल | शिल्पा राऊत | ७३ |
| राष्ट्रीय सेवा योजना — उत्साहाचे कारंजे | विशाखा पाटील | ७५ |
| हिरवा चुडा (कविता) | पौर्णिमा काळे | ७७ |
| रक्तदान शिबीर | | ७८ |

## English Section


| | | |
|---|---|---|
| Coaching Classes : Necessity or Fad ? | Sameer Ghurye | 80 |
| Scope of electronics in agriculture | Kishori Kasat | 82 |
| Life is (Poem) | Ambica Sadanand | 86 |
| Living Fossils | Manisha Sahasrabudhe | 87 |
| Some good thoughts | Pushkar Kulkarni | 91 |
| Happiness | Annonymous | 91 |
| Ozone depletion | Madhura Patwardhan | 92 |
| Ramanujan : His life's message | Archana Nakhe and Shilpa Gurjar | 96 |
| In harmony with our environment | Smruti Shah | 99 |
| Nataraja | Anagha Desai | 102 |
| My idea of happy life | Harshad Sangle | 104 |
| A lemony tale | Aruna Narayanswamy | 106 |
| Some tips for the interview | Hemant Nagpure | 107 |
| Maharashtra herald | Sachin Nirgurkar | 108 |
| Some good thoughts | Pushkar Kulkarni | 110 |
| A silent death | Khalid Mulla | 110 |
| A receipe for happiness | Ashish Malani | 110 |
| Learn the life | Ragi K | 112 |


## संस्कृत विभाग


| | | |
|---|---|---|
| स्वामी विवेकानंदः | मीनल नाईक | ११३ |
| नमो अहिल्ये नमो नमस्ते | रुचिरा क्षीरसागर | ११४ |
| श्रावण (मराठी कविता) | शुभांगी शिंदे | ११४ |
| व्यसने मित्रपरिक्षा | अजिता लोंढे | ११५ |
| छानसं स्वप्न (मराठी कविता) | सुरेंद्र कांबळे | ११६ |
| जाणीव (मराठी कविता) | माधवी नडे | ११६ |


## हिंदी विभाग


| | | |
|---|---|---|
| यदि जीवन में खुशियाँ ही खुशियाँ हो . . . | आरती पतकी | ११७ |
| लोग बात करते है (कविता) | महेश खुडे | ११८ |
| सुझाव (कविता) | रुपाली राजोपाध्याय | ११९ |
| एक अर्थपूर्ण सपना (कविता) | सुरेंद्र कांबले | ११९ |
| अहवाल | | १२० |

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक
आणि
मॉडर्न हायस्कूलचे पहिले मुख्याध्यापक
(१९३४ - १९४७)



कै. श्री. शंकरराव कानिटकर

## महाविद्यालयाचे संस्थापक



## कै. श्री. वि. त्र्यं. ताटके




## प्राचार्यांचे मनोगत

*१९९४-९५ हे मॉडर्न महाविद्यालयाचे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. वर्षभरातील विविध कार्यक्रमांच्या वेळी प्रभारी प्राचार्य प. स. चिरपुटकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यातील काही विचार येथे देत आहोत.*

.. बरोबर २४ वर्षांपूर्वी म्हणजे १५ जून १९७० या दिवशी वैदिक प्रार्थनांचे उच्चारण करून या महाविद्यालयाच्या कामकाजास सुरुवात झाली. आज आपण वेदाचार्य घैसासगुरुजी यांच्या आशीर्वादपर मंत्रोच्चाराने रौप्यमहोत्सवी वर्षास सुरुवात करीत आहोत.

•••

.. महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या संचालकांनी सर्वच अंगांनी गुणवत्तेवर विशेष भर दिला. आमच्या दृष्टीने 'प्रागतिक दृष्टिकोन' (Progressive Outlook) आणि 'आधुनिकतेचा स्पर्श' (Modern Touch) हे परवलीचे शब्द आहेत. त्यामुळेच थोड्याच काळात पुण्यातील मातब्बर व यशस्वी महाविद्यालयांमध्ये मॉडर्नची गणना होऊ लागली.

•••

.. मॉडर्नच्या सुरुवातीच्या काळात गुरुवर्य ताटके, प्राचार्य सुरु, डॉ. वि. ना. भावे, श्री. व. गो. मायदेव, श्री. भाऊसाहेब लिमये या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीमधील मातब्बर व धुरंधर व्यक्तींचे मार्गदर्शन लाभले. गुरुवर्य चाफेकरसरांचे मार्गदर्शन आजही मिळत आहे.

•••

.. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे अपार श्रम केले. मॉडर्न महाविद्यालयाला सध्याचा दर्जा प्राप्त करून देण्यात आमच्या कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा आहे.

•••

.. कोणत्याही शिक्षणसंस्थेच्या यशाचे मोजमाप करताना त्या शिक्षणसंस्थेने समाजाला विविध क्षेत्रांत किती कर्तबगार विद्यार्थी दिले, हा निकष गृहित धरावयास हरकत नाही. आमच्या महाविद्यालयाच्या राजकीय, क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पत्रकारिता इत्यादी क्षेत्रांतील विद्यार्थ्यांचे महत्त्वपूर्ण योगदान पाहिले की महाविद्यालयाने भरपूर यश मिळविले आहे असे आम्हाला वाटते.

•••

.. या रौप्यमहोत्सवी वर्षात विविध कार्यक्रमानिमित्त आपल्या अनेक माजी विद्यार्थ्यांच्या गाठीभेटी झाल्या. आपल्या विद्यार्थ्यांचे यश पाहून व त्यांची विविध क्षेत्रांतील कर्तबगारी पाहून कृतार्थ वाटले. आपल्या विद्यार्थ्यांचे यश आणि कर्तबगारी पाहण्यापेक्षा हाडाच्या प्राध्यापकाला अधिक आनंददायी काय असते?

•••

.. एस. एस. सी. परीक्षेत उत्तम यश मिळवून तुम्ही विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयात प्रवेश मिळवला आहे. येती काही वर्षे तुमच्या भावी जीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. तुम्हाला विलक्षण स्पर्धेला तोंड द्यावयाचे आहे व त्यातून करियर घडवावयाचे आहे. या महाविद्यालयीन जीवनात तुम्ही विविध भाषांवर प्रभुत्व मिळवा, पुष्कळ मित्र-मैत्रिणी जोडा, कला व क्रीडाविषयक कार्यक्रमांत भाग घ्या, तुम्ही निवडलेल्या विषयांत प्रावीण्य संपादन करा.

•••

.. सध्याच्या काळात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रांत पडझड झालेली दिसते. वातावरण उदास करणारे आहे हे खरे, पण तरीही उमेद सोडून चालणार नाही. के. पी. एस. गिलसारखी एखादी व्यक्ती पंजाबची जटिल समस्या आटोक्यात आणते, किरण बेदी वर्षभरात तिहार जेलमध्ये बदल आणून दाखवतात, या अगदी ताज्या घटना आहेत. आपणही आपले काम निष्ठेने, निश्चयाने व विशुद्ध हेतू ठेवून केले तर यश मिळेल हे निर्विवाद आहे.

•••



कलामंडळ १९९४-९५




वादविवाद मंडळ १९९४-९५



जिमखाना कार्यकारी समिती १९९४-९५



आंतरमहाविद्यालयीन कबड्डी (मुले) स्पर्धा १९९४-९५
वरिष्ठ महाविद्यालय, उपविजेता संघ



राष्ट्रीय सेवा योजना १९९४-९५



भूदल, नौदल, हवाईदल १९९४-९५




इंग्रजी, मराठी, हिंदी, जर्मन विभाग १९९४-९५




अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, जिमखाना विभाग १९९४-९५




व्यापारशास्त्र विभाग १९९४-९५




पदार्थविज्ञान विभाग १९९४-९५




इलेक्ट्रॉनिक्स, संगणक विभाग १९९४-९५




रसायनशास्त्र विभाग १९९४-९५




वनस्पतीशास्त्र विभाग १९९४-९५




प्राणीशास्त्र विभाग १९९४-९५




★ संख्याशास्त्र विभाग आणि गणित विभाग १९९४-९५



भूगोल विभाग १९९४-९५




शिक्षकेतर कर्मचारी




महाविद्यालयाच्या प्रथम दिवसापासून (१५ जून १९७०) सेवेत असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी



**प्रा. पी. डी. आपटे**
'बायोग्राफी इंटरनॅशनल'
इंडो-अमेरिका, इंडो-युरोपियन
हुज हू? या संदर्भ ग्रंथात नाव



**प्रा. एम. एम. राणे**
ज्योतिष विषारद
तृतीय पारितोषिक १९९४-९५



**प्रा. सुनिता गोसावी**
व्यापारशास्त्र - एम. फिल्. पदवी
'ओ' श्रेणी



**प्रा. व्ही. आर. आहिरराव**
पुणे विद्यापीठ भूगोल
अभ्यासमंडळ - विषयतज्ञ,
प्रो.ए.सो.से.स. पतपेढी-उपाध्यक्ष



**श्री. एस. बी. कवडे**
प्रो. ए. सो. से. स. पतपेढी अध्यक्ष



प्रा. वाय. आर. वाघमारे



प्रा. अनुराधा कुलकर्णी



प्रा. पी. डी. कुलकर्णी

## L. M. C. Members



**सेकंड लेफ्ट. डॉ. टी. डी. निकम**
नेमबाजी विशेष यश
प्री कमिशन कोर्स -
राष्ट्रीय स्तर - पाचवा क्रमांक



**सब लेफ्ट. ए. एम. व्हनकळस**
३, महाराष्ट्र-नेव्हल, एन. सी. सी.



**प्रा. व्ही. बी. आल्हाट**
३ महाराष्ट्र एअरविंग,
एन. सी. सी. ऑफिसरच्या
प्रशिक्षणाकरिता निवड



**स्वप्नील त्रिभुवन**
BUO, ३६ महाराष्ट्र बटालियन
अंडर ऑफिसर निवड,
राज्य सरकारची शिष्यवृत्ती



**धीरज दळवी**
U/O नवी दिल्ली RD Camp
पूर्ण, प्रजासत्ताक दिनी राजपथ
संचलनात सहभाग



**प्रशांत क्षीरसागर**
JUO वार्षिक प्रशिक्षण, शिबीर
नेमबाजी प्रथम क्रमांक



**प्रशांत चावला**
नौदल - बेस्ट कॅडेट
वीर सावरकर ढाल विजेता



**वनिता चव्हाण**
कॅडेट कॅप्टन - बेस्ट कॅडेट
प्री. सी.ए.सी.टी. शिबिरात
नेमबाजीत प्रथम क्रमांक



**वैशाली रेदासनी**
आय.सी.एस.आर, सर्वोत्कृष्ट
विद्यार्थिनी, मॉडर्न महाविद्यालय



मनोजकुमार फुलसुंगे 'मॉडर्न-श्री' १९९४-९५



**संभाजी तावरे**
बरेली नॅशनल तायकोंदो
चॅम्पियन - ६४ ते ७० किलो
गट सुवर्ण पदक विजेता



**सोमनाथ नलावडे**
पुणे विद्यापिठ कबड्डी संघात
निवड, एन. एस. यु. आय. तर्फे
सर्वोत्कृष्ठ खेळाडू पारितोषिक



**ऋषिकेश मद्रासी**
पुणे विद्यापीठ
कबड्डी संघात निवड



**अनिता पारवे**
पुणे विद्यापीठ संघात
आंतरविद्यापिठीय स्पर्धेसाठी
निवड, महाराष्ट्र राज्य महिला
कबड्डी संघात निवड



**पौर्णिमा बहिरट**
उत्कृष्ट खेळाडू, पुणे विद्यापीठ,
कबड्डी, फुटबॉल, सॉफ्टबॉल,
सहभाग



**मिलींद गुळवणी**
पुणे विद्यापीठ हॉकी संघात
आंतरविद्यापीठीय स्पर्धेसाठी
निवड



**विशाल पवार**
मुंबई-पुणे सायकल स्पर्धा ८ वा
मुंबई खोपाली ३ रा,
जळगाव सायकल स्पर्धा प्रथम



**स्मिता चिरपुटकर**
डी. बी. एफ. परीक्षा, सुवर्णपदक
- भारतात पहिली (डी.बी.एफ.
कोचिंग क्लासची विद्यार्थीनी)



**बिपीन इनामदार**
कल्याणी करंडक उपशास्त्रीय
गायन - उत्तेजनार्थ, द्वंदगीत व
कथाकथन - द्वितीय क्रमांक



**महेश शिंदीकर**
फिरोदिया करंडक, विविध
गुणदर्शन, अभिनय - प्रथम क्र.
पुरुषोत्तम करंडक सहभाग



**आदित्य इंगळे**
फिरोदिया करंडक विविध
गुणदर्शन दिग्दर्शन -
प्रथम क्रमांक



**जगदीश लांडे**
व्यक्तिमत्त्व विकास शिबिर,
रा. से. यो. जिल्हा स्तरीय कॅम्प
निवड



**नितीन साळुंके**
नेतृत्त्व विकास शिबिर, रा. से.
यो. पुणे विद्यापिठस्तरीय कॅम्प
निवड



**महेश दरेकर**
व्यक्तीमत्त्व विकास शिबीर, रा.
से. यो. पुणे जिल्हास्तरीय कॅम्प
निवड



**अजय अडसुळ**
विद्यापीठ स्तरीय शिबीर, रा. से.
यो. साठी निवड



**अंजली पवार**
राष्ट्रीय एकात्मता, प्रजासत्ताक
दिन संचलन समारोह पूर्वतयारी
शिबिरासाठी हैद्राबाद येथे निवड



**मनीषा पवार**
राष्ट्रीय स्तरीय शिबीर
रा. से. यो. निवड



**विशाखा पाटील**
जिल्हा स्तरीय शिबीर
रा. से. यो. निवड



**माधुरी मांडवे**
व्यक्तीमत्त्व विकास शिबीर
विद्यापीठस्तरीय रा. से. यो. निवड



**ओजस्विता बहिरट**
व्यक्तीमत्त्व विकास शिबीर
विद्यापीठस्तरीय रा. से. यो. निवड



**वृशाली दळवी**
विद्यापीठस्तरीय मुलींचे शिबीर
रा. से. यो. निवड

# रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करताना . . .

मॉडर्न महाविद्यालयाची नवी, अद्ययावत इमारत जून १९७० मध्ये पूर्ण झाली होती. महाविद्यालयाला परवानगी १९६९ सालीच मिळाली होती पण शिफारस करणाऱ्या विद्यापीठीय समितीने तेव्हा महाविद्यालयाला स्वतःची इमारत नाही, ती असावी असा अभिप्राय व्यक्त केला होता. संस्थेच्या तत्कालीन पदाधिकाऱ्यांना हा अभिप्राय म्हणजे 'प्रोग्रेसिव्ह'च्या कुवतीवरचाच अभिप्राय वाटला आणि त्यांनी तेव्हाच 'आधी संपूर्ण, सुसज्ज इमारत आणि मगच महाविद्यालय सुरु होईल' अशी प्रतिज्ञा केली आणि ती वर्षाच्या आतच खरी करुन दाखविली.

१५ जून १९७० रोजी महाविद्यालयाच्या वास्तूत तेव्हाचे प्राचार्य मो. भा. लिमये, संस्थेचे कार्यवाह श्री. वि. त्र्यं. ताटके, डॉ. भावे, श्री. मो. गो. चाफेकर, श्री. भाऊसाहेब लिमये आणि इतर सदस्य व कर्मचारी यांच्या उपस्थितीत अत्यंत गंभीर वातावरणात पवित्र वेदमंत्रांचे पठण करुन आणि विद्येच्या देवतांना आवाहन करुन महाविद्यालयाचे काम सुरु झाले.

बरोबर २४ वर्षानंतर रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना पुन्हा एकदा तोच वेदमंत्र गंभीर आणि वातावरण शुचिर्भूत करणारा समारंभ घडवून आणावा अशी प्राचार्य प. स. चिरपुटकर यांचा रास्त आग्रह होता आणि त्यानुसार १५ जून १९९४ या दिवशी पुण्यातील विख्यात वेदाचार्य घैसास गुरुजी यांना पाचारण करण्यात आले. रौप्य महोत्सवाची सुरुवात ज्ञानसंपन्न अशा आचार्यांच्या आशीर्वादाने व्हावी या हेतूने भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराचे प्रमुख अध्वर्यु डॉ. रा. ना. दांडेकर यांना आमंत्रित केले होते आणि मराठीचे नामवंत प्राध्यापक डॉ. वि. रा. करंदीकर यांनाही प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित केले होते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष श्री. विघ्नहरी देवमहाराज या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

वेदाचार्य घैसास गुरुजी यांनी 'मला भाषण करणे जमत नाही' असे सांगून वेदमंत्रांचे पठण आणि इष्ट देवतांना आवाहन लगेच सुरु केले. त्यांच्या गंभीर स्वरातील डौलदार पद्धतीचे उच्चारलेले वेद वचनांमुळे एक वेगळेच गांभीर्य आणि पावित्र्य संपूर्ण समारंभाला लाभले.

डॉ. रा. ना. दांडेकर यांनी या प्रसंगी एक अत्यंत औचित्यपूर्ण तसेच त्यांच्या दीर्घ व्यासंगाचा आणि चिंतनाचा प्रत्यय आणून देणारे भाषण केले. ते म्हणाले, ज्ञानाला विज्ञानाची जोड हवी हे जसे खरे आहे. तसेच ज्ञान-विज्ञान उपासनेला शीलसंवर्धनाची, प्रज्ञानाची जोडही हवीच. म्हणजे मग आपण प्रज्ञान, ज्ञान आणि विज्ञान या त्रिसूत्रींच्या आधारावर शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट गाठू शकू. आधुनिक विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर मानवी इतिहासाला कलाटणी देणाऱ्या विज्ञानातील काही विकास टप्प्यांवर टिप्पणी करताना ज्ञान आणि प्रज्ञान (म्हणजे शील) यांना विज्ञान कसे भयावह ठरु शकेल याचे अतिशय प्रत्ययकारी वर्णन केले.

डॉ. वि. रा. करंदीकर यांनी आधुनिक काळात संस्कृती आणि सुसंस्कारांच्या अभावी शिक्षण पद्धतीमध्ये जे हीण निर्माण होत आहे याविषयी चिंता व्यक्त केली. सामाजिक वास्तव झपाट्याने बदलत आहे. पण या वास्तवाला योग्य, सर्जनशील दिशा देण्याचे काम मागे पडले आहे. याचे एक प्रमुख कारण म्हणजे विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यापुढे मोठे आदर्श नाहीत हेच होय असेही प्रतिपादन त्यांनी केले.

श्री विघ्नहरी देव महाराज यांनी संस्कृत भाषेमध्ये रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करणाऱ्या महाविद्यालयास आशिर्वाद दिले.

संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. जी. आर. एकबोटे, प्राचार्य प. स. चिरपुटकर यांनीही प्रसंगोचित अशी भाषणे या प्रसंगी केली.

# स्वच्छ पुणे ! सुंदर पुणे !

## 'नियतकालिक समिति' निबंधस्पर्धेतील पारितोषिक विजेता लेख

मुग्धा सिधये
अकरावी शास्त्र

पावसाळ्याचे दिवस होते. संध्याकाळची प्रसन्न वेळ होती. मी सहजच फेरफटका मारायला बाहेर पडले होते. वाटेत टुमदार बंगल्यांची वसाहत लागली. चाळा म्हणून मी नावं वाचू लागले. 'हिमालय' (हिमालयाशी स्पर्धा करणारा ?) 'कांचन'. काय सुरेख बंगले होते एकेक ! समोर हिरवळ होती. भिंतींवर वेली सोडल्या होत्या. नाना फुलझाडे लावली होती. फुलांचे चित्ताकर्षक रंग पाहत मी जात होते तोच एक वास बाणासारखा माझ्या नाकात घुसला. कसला म्हणता? अहो जवळच्याच कचरापेटीत पडलेल्या सुंदर वस्तूंनी आपल्या अस्तित्वाची जाणीवच जणू वाऱ्यामार्फत मला करून दिली. या कचरापेटीचा (जिच्या आत नव्हे बाहेरच कचरा टाकायची प्रथा आहे) महिमा काय वर्णावा ? बंगलेवाल्यांपासून ते झोपटपट्टीवाल्यापर्यंत साऱ्यांजवळ तिचा वशिला ! अहो ती तर पुण्यनगरीला म.न.पा. कडून मिळालेली देणगीच आहे ! असा विचार करत मी जात आहे तोच माझ्या कपड्यावर चिखलाची सुरेख नक्षी उडाली.

खाली पाहून न चालल्याने खड्ड्यात पाय गेला ना ! आता नाकासमोर पाहून चालायचे नाही म्हणायचे ! पायाखालचे खड्डेही निरखले पाहिजेत ना ! पुणे आणि खड्ड्यांनी अलंकृत रस्ते यांचे अतूट नातं निर्माण झालं आहे. त्यांच्यामध्ये इतका जिव्हाळा निर्माण झाला आहे की खड्डेरहित रस्त्यावरून चालताना पुणेकरांना चुकल्याचुकल्या सारखं होतं. म्हणून तर पाइपलाइनवाले, वीजमंडळवाले अन टेलिफोनवाले पावसाळ्याच्या सुमुहूर्तावर दोघांची भेट घडवून आणतात. अर्थात गणपती जवळ आले की जनतेच्यावतीनं मांडववालेही त्याला हातभार लावतात ही गोष्ट निराळी ! तर असे हे रस्ते पुण्याची 'खासियत' होऊ पाहत आहेत.

पुण्याची आणखी एक 'खासियत' असलेल्या पर्वतीवर कधीतरी तुम्ही जाल. मेघडंबरीतून पुण्याचा अफाट विस्तार पाहून तुमचा ऊर नक्कीच भरून येईल. लवकरच सूर्यास्ताची वेळ होईल. 'कुठे बुडाला पलीकडे तो सोन्याचा गोळा' असं तुम्ही म्हणत आहात तोच रविराज अस्ताला जाईल. पश्चिमेच्या बाजूला गेलात तर हे विहंगम दृश्य नक्कीच पाहायला मिळेल. वारा भणाणत असेल. लवकरच सगळीकडे दिवे लुकलुकू लागतील. दिव्यांच्या झगमगाटात पुणं उजळून निघेल. पण जरा खाली उतरून आलात तर दिसेल झोपडपट्टी ! भाकरीच्या तुकड्यावरून रंगलेलं एखादं भांडण ! तो अस्वच्छ परिसर, ती घाण पाहून तुम्हाला वाटेल वर पाहिलेलं दृश्य इंद्रजाल होतं की मायानगरीतला भुलभुलैय्या ! पण हाच स्वप्न आणि वास्तव यातला फरक आहे !

जाल तुम्ही कधीतरी मुळामुठेच्या संगमावर ! पुलावरून नदी मोठी सुरेख दिसेल ! वळणं वळणं घेत जाणारी पुणेकरांच्या मनासारखीच विशाल पात्र असलेली ! पण खाली गेलात तर कचऱ्यांचे डोंगर, सांडपाण्याचे लोट

तुमचं स्वागत करायला हजर असतील. म्हणतात ना 'दुरून डोंगर साजरे, जवळ जाताच दरे-खोरे' याच प्रकारे बसस्थानक, रेल्वे स्टेशन, शनिवारवाडा, वस्तूसंग्रहालये या ठिकाणी जाताना जशा तुम्हाला 'स्वच्छ पुणे, सुंदर पुणे — महापौर पुणे' अशा पाट्या दिसतील, तसेच अस्वच्छ रस्ते, घाण, पान खाऊन टाकलेल्या पिचकाऱ्याही दिसतील अन मन विषण्ण बनेल.

'महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी', 'शैक्षणिक माहेरघर' असलेल्या पुण्याला अशी वेळ का यावी? आस्तिक पुणेकरांना Cleanliness is God हे सांगावं लागावं का? सारस बाग, पेशवे बाग यासारख्या बागा म्हणजे पुण्याचं वैभव! पण भेळ खाऊन हिरवळीवर फेकलेले कागद पाहिले की कसंसंच होतं. जागोजागी 'माझा खाऊ मला द्या' अशा पाट्यांचा दागिना ल्यायलेल्या पेट्या आहेत. पण चार पावलं चालायची तसदी घ्याल तर ना! पालकांनी, शिक्षकांनी, समाजानं मुलांच्या संस्कारक्षम मनावर लहानपणापासून स्वच्छता, टापटीप यांचे संस्कार केले पाहिजेत. मग पुण्याचा चेहेरा-मोहरा बदलणं अशक्य नाही.

एखादा पुणेकर परदेशात जातो तेव्हा सर्वप्रथम भारून जातो ते तिथले स्वच्छ, सुंदर रस्ते पाहून! शिवाय शहराची रचना, सुंदर बागा, वस्तूसंग्राहलये, मोठमोठी दुकानं, पुतळे, तलाव, क्रीडांगणं यासारख्या सुविधा शहराच्या सौंदर्यात भर टाकतात. पण ज्याला ज़ोड असते ती नागरिकांचं आपल्या शहराबद्दल प्रेम, अभिमान अन त्याला तळहाताच्या फोडासारखं जपायचं, त्यासाठी शिस्त पाळायची या गुणांची! प्रत्येक पुणेकरानं असं वागायचं ठरवलं तर 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे पुण्याचं नंदनवन व्हायला वेळ लागणार नाही. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांच्या निमित्ताने पुण्याला सुंदर करण्याचा प्रयत्न केला गेला. पण तो अपुराच आहे. अशा कामाला साथ हवी ती नागरिकांची!

पं. नेहरू आपल्या भाषणात एक मार्मिक गोष्ट सांगत. "एकदा एक भारतीय नागरिक परदेशात गेला होता. बसमधून उतरल्यावर त्याने सवयीने तिकिट फाडून रस्त्यावर फेकले. लगेच पोलिसाने त्याला दंड भरायला लावून पावती फाडून दिली. ती घेऊन त्याने मुकाट्यानं चालू पडावं की नाही! पण सवयीने परत पावती फाडून त्याने टाकली व पुन्हा दंड भरला!!" ही वृत्ती भारतीयांचा बेदरकारपणा, आळस बेपर्वाई यांचं द्योतक आहे. पण To err is human ही परिस्थितीही बदलू शकेल. कारण Impossible is a word found in the dictionary of fools.

रस्त्यावरची अतिक्रमणं हटवा, शनिवारवाड्यासारख्या इतिहासाच्या खुणा मिरवणाऱ्या वास्तूंचं जतन करा, भ्रष्टाचार थांबवा अन चांगल्या प्रतीचे रस्ते तयार करा. रस्ता रुंदीकरण करा. मुलांना रस्त्यावर खेळायची वेळ येऊ नये म्हणून क्रीडासंकुले उभारा! यासारख्या रास्त मागण्यांचा आग्रह पुणेकरांनी धरलाच पाहिजे. तसंच हक्कांबरोबर कर्तव्य-पालन केलं पाहिजे. वेळेवर कर भरणं, रहदारीचे नियम न तोडणं, परिसर अस्वच्छ न करणं हे प्रत्येक पुणेकरानं निग्रहानं केलं पाहिजे.

गाडगेमहाराजांसारखे स्वआचरणातून स्वच्छतेची महती शिकवणारे संत महाराष्ट्रात होऊन गेले. सेनापती बापटही स्वत: हातात झाडू घेऊन रस्ते साफ करत त्यांनी तर झाडुअष्टकेही लिहिली होती. चला तर, आपल्या परंपरेला अन संस्कृतीला उजाळा देऊ या. अन स्वच्छतेच्या निर्मल व्रताचा वसा घेऊ या!

चला तर मग पुण्याला 'सुंदर' घडवूया.

शुभस्य शीघ्रम!

# कोचिंग क्लास : गरज की टूम ?

## 'नियतकालिक समिती' निबंध स्पर्धेतील पारितोषिक विजेता लेख

निवेदिता देशमुख
बारावी, कला

'अमुक हा विद्यार्थी आमच्या व्हेकेशन बॅचचा विद्यार्थी गुणवत्ता यादीत सर्वप्रथम !' मंडळी हे वाक्य आपल्या परिचयाचे आहे, होय ना ? ही एका (म्हणजे सर्वच) कोचिंग क्लासची जाहिरात आहे. कोचिंग क्लास गरज की टूम ? या प्रश्नाच्या नाण्याप्रमाणे दोन बाजू आहेत. त्याचे गुण व दोषही आहेत.

प्रथम गुण बघू. आजचे युग हे विज्ञान युग आहे. म्हणजेच यांत्रिकीकरण. सर्वत्र घाईगर्दी. अशा वेळी पालकवर्गास मुलांचा अभ्यास घ्यायला, त्यांच्या अभ्यासाशी निगडीत अशा सवयी, छंद जोपासायला वेळ कुठुन मिळणार ? अशा वेळी मदतीस येतो तो 'कोचिंग क्लास'. कोचिंग क्लास हे अभ्यासासारखेच नसून इतर गोष्टींचेही असतात. उदा. शिवणकाम, चित्रकला इ. पण अलीकडे ह्या सर्वच क्लासचे पीक उदंड प्रमाणावर आले आहे. ज्या गृहिणींना नोकरीमुळे काही गोष्टी करायला मिळत नाहीत, त्या गोष्टी कोचिंग क्लास घेणारे विकततातही ! म्हणजे यातून फायदाच होतो.

अभ्यासाविषयीचा कोचिंग क्लास ही संकल्पना म्हटली तर नवी आहे, म्हटली तर जुनी आहे. पूर्वीच्या गुरुजींच्या शिकवणीचे आधुनिक रूप म्हणजे 'कोचिंग क्लास' होय. आजच्या युगात शाळा, महाविद्यालये ह्यांमधून दर वेळी नियोजित अभ्यासक्रम पूर्ण होतोच असे नाही. अशा वेळी विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासचा बराच फायदा होतो.

जे विद्यार्थी 'सुटीतील बॅच'ला जातात, त्याचा फायदा असा होतो की जेव्हा शाळा, महाविद्यालये सुरू होतात, तेव्हा तो विषय नवखा वाटत नाही व अध्ययनास सुलभ होते. तसेच ज्या विषयात विद्यार्थ्यांची गती कमी असेल तो क्लासेसद्वारा सतत निरनिराळ्या परीक्षांच्या मालिका घेतल्यामुळे पक्का होतो. जे विद्यार्थी वर्षभर असलेल्या बॅचला जातात, त्यांचा रोज २-३ तास नियमित अभ्यास होतो. कोचिंग क्लासमुळे हुषार विद्यार्थ्यांचा सराव होतो तर गती कमी असलेल्या विद्यार्थ्यांची सतत सरावाने अध्ययनाची छानशी बैठक जमते.

विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेची सुविधा क्लासमध्येही उपलब्ध असल्यामुळे त्यांना प्रयोग-परीक्षांचाही सराव होतो व महाविद्यालये व शाळांत त्यांना अध्ययनात अजिबात अडचणी येत नाहीत. काही वेळेस शिक्षणसंस्थेत मर्यादित वेळांमुळे सर्व गोष्टी नीटपणे समजावून दिल्या जात नाहीत, त्या क्लासमध्ये दिल्या जातात.

आता या कोचिंग क्लासची दुसरी बाजू पाहू. पूर्वीच्या काळी क्लास लावणे ही तसे म्हटले तर कमीपणाचीच बाब समजली जाई. आता ती काळाचीच गरज बनल्याने इलाज नाही. आता विद्यार्थ्यांचे क्लासशिवाय पानही हलत नाही.

पूर्वीची गुरुकुल पद्धत किंवा शिक्षक-विद्यार्थी संबंध हे नाते जणू आता तुटलेच आहे. क्लासेसमुळे विद्यार्थ्यांना शिक्षकवर्गाबद्दल आदर वाटेनासा झाला आहे. क्लासेसमध्ये भरपूर पैसे देऊन शिकण्यातच आजचा विद्यार्थी स्वत:ला धन्य मानून घेऊ लागला आहे.

पैसे दिल्यामुळे क्लासेसकडे आत्यंतिक ओढा; शाळा, महाविद्यालयात येऊन दंगा करणे; शिक्षकांना उगीचच काहीतरी प्रश्न विचारणे; त्यांची शिकवण्याची पद्धत, बोलणे याची टिंगलटवाळी करणे व मुख्य म्हणजे महाविद्यालय, शाळा यातील शिक्षकांपेक्षा आमचे क्लासचे सरच कसे छान शिकवतात हे दुसऱ्याला पटवून देणे असा प्रकार विद्यार्थी करताना दिसतात.

अलीकडे विद्यार्थी हा क्लासला नियमित जातो व महाविद्यालयाचा उपयोग फक्त परीक्षेचा फॉर्म भरण्यासाठीचे साधन म्हणून करतो.

पैसे भरून १०० ते १५० जणांच्या वर्गातील क्लासला जाण्याचे समाधान विद्यार्थी व त्याचे पालक मिळवतात; पण या सगळ्या भाऊगर्दीत विद्यार्थ्याला विषयाचे खरोखर आकलन कितपत होते हे तो विद्यार्थी व त्याचे पालकच जाणे !

क्लास लावलेली मुले, मुली ही क्लासमध्ये बसून २-३ तास अभ्यास करतात व शाळा, महाविद्यालयात येऊन जे नीट लक्ष देऊन शिकत आहेत अशांचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करतात. अन्यथा वर्गात न येता मैदानावर वा कॉलेजबाहेरच फिरत राहतात.

कोचिंग क्लास ही तसे म्हटले तर काळाची गरज, पण अतिप्रमाणात झाल्याने ती टूम झाली आहे. 'माझा मित्र जातो म्हणून मी पण जातो' अशीच वृत्ती दिसते.

आपली अत्यंत आदर्श अशी गुरुकुल पद्धती कुठे व ही अलीकडे शिक्षकांचा अनादर करणारी क्लास संस्कृती कुठे ? काय ही तफावत ? आपण कुठून कुठे चाललो आहोत ? ही प्रगती की अधोगती हे ज्याचे त्याने ठरवायचे. पण प्रयत्न केल्यास अजूनही हे कोचिंग क्लासचे बोकाळलेले खूळ आपण कमी करू शकतो. पण . . . लक्षात कोण घेतो ?

**टीप :**

प्रस्तुत लेखनशैली ही लेखिकेची स्वत:ची आहे. कोणाला त्याचा लाभ घ्यावयाचा असल्यास, लेखिकेने त्याचे ही क्लासेस काढलेले आहेत.

व्हेकेशन बॅचची सोय आहे. परगावच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय आहे.

सुसज्ज प्रयोगशाळा, वाचनालय यांचा समावेश आहे. प्रवेश मर्यादित ! ॲडमिशन चालू आहे.

त्वरा करा . . . . ■

## विनोद

"आमचे हे म्हणतात की या टोपीने मी दहा वर्षांनी लहान दिसते."

"मग तुमचे वय काय ?"

"तीस".

"नाही, मला टोपिशिवाय विचारायचे होते."

---

फॉरेनर (कुतुहलाने) : तुम्ही किती वेळ इथे काम करीत आहात ?

काम करणारा भारतीय : तुम्ही लांब दिसल्यापासून, सर.

**अभिजीत साबळे,** ११ वी.

# दूरदर्शनचा प्रभाव

**'नियतकालिक समिती' निबंध स्पर्धेतील पारितोषिक विजेता लेख**

कु. विद्या झाडे
बारावी, कला

आपण आपल्या गच्चीवर सृष्टीसौंदर्य पाहण्यासाठी किंवा सहजच फिरण्यासाठी गेलो तर आपल्याला जाणवते की, सगळीकडे अँटिनांचे जंगलच पसरले आहे. पूर्वीच्या काळी प्रत्येक घरासमोर तुळशीवृंदावन असे. हल्ली मात्र तुळशीवृंदावन नाही; पण प्रत्येक घरावर अँटिनाचे झाड उगवले आहे. झाडांवर निरनिराळ्या पक्ष्यांची गोड किलबिल ऐकायला मिळत असे. पण आता या अँटिनारूपी झाडावर कावळ्यासारखे पक्षी सारखे 'काव - काव' करीत असतात. त्यामुळे कसले कोकिळेचे गाणे व कसली ती पक्ष्यांची किलबिल ऐकायला मिळणार ?

दूरदर्शन जेव्हा भारतात आला तेव्हा त्याचे सर्वांनाच फार आकर्षण होते. घरबसल्या आपल्याला सर्व काही पाहायला मिळते याचे सर्वांना नवल वाटत असे. पण त्याची किंमत त्या काळी चार हजार रु. असल्यामुळे "आमचे पैसे काही वर आले नाहीत" अशी मध्यमवर्गीय व गरिबांची विचारसरणी होती. पण त्याचे महत्त्व व उपयोग पटल्यावर मात्र घरोघरी दूरदर्शनने आपले एक विशिष्ट वेगळे स्थान निर्माण केले. इतर देशात तर टी. व्ही. चा फारच उपयोग करून घेतला जातो. जपानसारख्या देशात त्याचा उपयोग माध्यमिक शाळांतील अभ्यासक्रमांसाठी केला जातो. इटलीमध्ये 'इट्स नेव्हर टू लेट' या शीर्षकाखाली प्रौढ साक्षरतेचा कार्यक्रम राबविला जातो. दूरदर्शन हे माणसाच्या जवळ पोहचण्याचे एक प्रभावी व गतिमान साधन आहे. याचा उपयोग आता भारतातही मोठ्या प्रमाणावर होत आहे. श्रीमंतांच्या घरात मात्र या करमणुकप्रिय वस्तूला 'Idiot Box' असे म्हणतात. शेती व खेळांसंबंधी यातून बरीच माहिती मिळते. कोणती शेती फायदेशीर आहे व ती कशी करावी ? कोणता खेळ कसा खेळावा यासंबंधी बरीच माहिती मिळते. काही करमणुकीचे कार्यक्रम असतात. त्यातूनही मानवाच्या मनावर अप्रत्यक्षपणे काही चांगल्या गोष्टी बिंबविल्या जातात.

लहान मुलांचेही छान कार्यक्रम दाखविले जातात. ज्ञानाच्या गंगोत्रीतून दूरदर्शन जन्म घेते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. वेगवेगळ्या प्रेक्षणीय स्थळांची माहिती मिळते व ज्यांना ते तिथे जाऊन पहाणे शक्य नसेल त्यांना आपल्या घरातूनच पाहायला मिळते. निरनिराळे शैक्षणिक अभ्यासविषयक कार्यक्रमही अतिशय चांगल्या प्रकारे दाखवितात व त्याचा फायदा निश्चितच सर्व विद्यार्थ्यांना होतो. आरोग्यविषयक माहिती, काही आपल्याला ज्ञात नसणाऱ्या गोष्टीही दाखविल्यामुळे खरेच असे वाटते की हा दूरदर्शन आपल्याला किती तऱ्हेने मदत करतो. अध्यापनातून मिळणारे शिक्षण हे शाब्दिक असते, पण अनुभवाने शिकल्याने ते चांगले परिणामकारक होते. अनुभव हा मोठा शिक्षक होय. अनुभवातून मिळणारे शिक्षण हे केव्हाही चांगले. अनाकलनीय, रुक्ष वाटणारे काही ज्ञान दूरदर्शनमुळे आकलनीय व रंजक स्वरूपात मिळते.

दूरदर्शनचे फायदे आहेत तसे तोटेही बरेच आहेत. सर्वात पहिला तोटा म्हणजे डोळे खराब होणे किंवा चष्मा

लागणे. कारण दूरदर्शनमधून बाहेर पडणाऱ्या किरणांमुळे डोळ्यावर व शरीरावरदेखील वाईट परिणाम होतो. काही कार्यक्रम हे लहान मुलांना बघण्यासारखे नसतात व बघितले तर त्याचा त्यांच्या मनावर काय परिणाम होतो, याबाबत विचार करावा लागेल. काहींच्या घरी मोजकेच कार्यक्रम बघितले जातात. त्यामुळे फारसा वाईट परिणाम होत नाही. पण काहींच्या घरी मात्र सतत दूरदर्शन चालू असतो. त्यामुळे त्या घरातील मुलांचे डोळे तर खराब होतातच, शिवाय ती अभ्यास करत नाहीत. त्यामुळे त्याचे वाईट परिणाम होतात.

घरात बसून राहिल्यामुळे निसर्गात फिरण्याचा व निसर्गातील निरनिराळ्या सुंदर गोष्टींचा आस्वाद घेण्याचा आनंद मानवाने हरविला आहे. घरात दूरदर्शनमुळे सुसंवाद साधला जात नाही. घरात खेळीमेळीचे वातावरण रहात नाही. शरीर जड होते व कशातही उत्साह वाटत नाही. त्यामुळे दूरदर्शनची ज्ञानगंगोत्री वाहिली पाहिजे असे या परिणामांवरून वाटते. आपण जर याचा चांगल्या पद्धतीने उपयोग करून घेतला तर अधिक चांगले होईल. नाहीतर असे वाटेल की दूरदर्शन हे माणसाच्या जीवनातील नित्याची गरज आहे की फॅशनचे फॅड ? मनोरंजनाचे साधन आहे की ज्ञान देणारा ग्रंथ आहे ? असे आपल्याला नक्कीच वाटते.

दूरदर्शनचा चांगला व वाईट असा दोन्ही प्रकारे मानवावर प्रभाव पडतो. म्हणूनच पुढील ओळी सार्थ वाटतात —

"मानवा घे फायदा करून याचा
उत्कर्ष होईल नक्कीच जीवनाचा
नाही फायदा घेतला याचा
नाश होईल तुझ्या जीवनाचा"

## आयुष्य : एक गणित

आयुष्याचं गणित अवघड असतं,
तरीही ते प्रत्येकाला सोडवावंच लागतं.

बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार,
पक्के असावे लागतात चारही प्रकार

आशांची बेरीज, निराशांची वजाबाकी करावी लागते,
सुखांचा गुणाकार, दुःखांचा भागाकार करावा लागतो.

ज्याला जीवनाचा खरा अर्थ कळलेला असतो,
तोच हे गणित सोडवण्यात यशस्वी होतो.

जो गणित सोडवण्यात अयशस्वी होतो,
त्याची स्थिती चक्रव्यूहातल्या अभिमन्यूप्रमाणे होते !

आयुष्य संपते तरीही,
तो मात्र चक्रव्यूहातच असतो !

**कु. सुनंदा कोतवाल,** प्रथम वर्ष, वाणिज्य.

## विनोद

एका गरीब माणसाने आपल्या श्रीमंत मित्राला म्हटलं, "काय रे, तुझ्या पुढच्या सात पिढ्या आरामात बसून खाऊ शकतील एवढी संपत्ती आहे तुझ्याजवळ ! मग तू चिक्कूपणा का करतोस ?"

श्रीमंत मित्र म्हणतो, " खरं तर, मला काळजी आहे ती माझ्या आठव्या पिढीची."

**गजानन गरडे,** तृतीय वर्ष, शास्त्र.

# सरदार सरोवर : शाप की वरदान?

## 'नियतकालिक समिती' निबंध स्पर्धेतील पारितोषिक विजेता लेख

आरती राव
तृतीय वर्ष, शास्त्र

"डुबेंगे पर नही हटेंगे", नर्मदा बचाव आंदोलन. लोकांना बुडवण्याचे राजकारण थांबवा, धरण थांबवा. मणिबेली : संघर्ष का आवाहन. चिमलखेडीवर पोलिसांचा हल्ला. मेधा पाटकरचे उपोषण. अशा अनेक बातम्या आपण हल्ली रोजच वर्तमानपत्रातून वाचत आहोत. पण यामागे सरकारचे उद्दिष्ट काय आहे हे आपण कधी जाणून घेतलंय का? आताच श्री. माधव चितळ्यांचे भाषण ऐकले व मनाने निर्णय घेतला की, नाही, भारताचा एक स्वतंत्र नागरिक या नात्याने मला यातलं गूढ कळायलाच पाहिजे. सरदार सरोवर, नर्मदा प्रकल्प काय आहे? याच्या शोधात मी खूप धडपड केली. खूप वाचन केलं. कित्येकांच्या भेटी घेतल्या व आज मला या विषयाबद्दल संपूर्ण माहिती मिळाली. मी यशस्वी झाले. आज माझं मत मांडण्याची संधी मला मिळाली. या प्रकरणामागे सरकारचे उद्देश, फायदे, तोटे काय आहेत हे मला उमजले.

नर्मदा सरोवर, सरदार सरोवर ही आज भारतासमोरची एक बिकट समस्या आहे. या प्रश्नाचे उत्तर अजूनही आपण शोधू शकलो नाही, याची लाज वाटते आम्हाला. पण तुम्हाला जर याची पुरेपूर माहिती हवी असेल; तर आपण जरा खोलातच जाऊ. या सरदार सरोवराच्या विरोधात अनेक मजूर, शेतकरी, आदिवासी संघर्ष करीत आहेत. ४५५ फूट उंचीचे हे धरण! यात ३००० छोटी, १३० मध्यम व ३० मोठी व २ महाकाय धरणे बांधण्याचा सरकारचा विचार! या २ महाकाय धरणापैकी एक सरदार सरोवर तर दुसरे नर्मदा सागर. पण या धरणामुळे २४५ गावे बुडणार. त्यात ३३ महाराष्ट्राची व १९२ मध्य प्रदेशाची. शिवाय जंगलेही नष्ट होतील, ज्यात निमाडमधील सर्वोत्कृष्ट जमीनही जाणार. ३६, ००० हेक्टर जमीन पाण्याखाली जाणार. १ लाख लोक विस्थापित होणार, ८०, ००० हेक्टर जमीन बुडणार, कित्येक लोक प्रकल्पग्रस्त होणार! हे सर्व मान्य आहे. पण नाण्याला दोन बाजू असतात. एक बाजू तुम्हाला दिसली पण दुसरी व महत्त्वाची बाजू तर समजून घेणं आवश्यकच आहे. तर आता आपण दुसऱ्या बाजूचा विचार करू!

नर्मदा प्रकरणात तीन सरकारांचा हात आहे : १) मध्यप्रदेश, २) महाराष्ट्र, ३) गुजरात आणि सरकारची ही बहुउद्देशीय योजना आहे. यात शेतीला भरपूर पाणीपुरवठा होईल, वीज निर्मिती अफाट होईल, पाणी व विजेमुळे उद्योगधंद्यांची वाढ होईल. आणि मला वाटतं आजचा प्रत्येक तरुण ज्या एका मोठ्या संकटाला, प्रश्नाला तोंड देत आहे, त्या प्रत्येक तरुणाची समस्या पण सुटेल व ते उत्तर म्हणजे या उद्योगधंद्यामुळे तिथे शहरे प्रस्थापित होतील व बेरोजगारी कमी होईल.

या सरदार सरोवरामागे सरकारचा जो हात आहे, सरकारची जी उद्दिष्टे, जे हेतू आहेत ते फारच उत्तम आहेत, असं मला वाटतं. या धरणाची उंची वाढवल्यामुळे लाखो

लोकांची घरं-दारं, खेडी उद्ध्वस्त होतील. जंगलं जातील पण एवढं धरण बांधून सरकार यांचे पुनर्वसन करून देणार आहे. आता या भागात आदिवासी लोक जास्त राहतात. त्यांचा उदरनिर्वाह हा पूर्ण जंगलातल्या झाडांवर, लाकडावर, डिंक, लाख, मेण यावर अवलंबून आहे. "झाडे लावा, झाडे वाचवा" असा नारा देणारे लोक आहेत. मग हीं झाडं तोडून, त्यांच्या लाकडावर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांना तसं न करता या धरणामुळे मिळणाऱ्या फायद्याचा उपभोग घ्यायला काहीच हरकत नाही. यामुळे निसर्गाचे योग्य संतुलन पण आपल्याला सांभाळता येईल.

आता हेच बघा ना ! भाक्रा-नांगल धरण बांधताना पण अनेक प्रश्न उभे राहिले होते. अनेक लोकांचा विरोध होता या धरणाला. पण आता स्थिती किती बदललेली आहे. हेच पंजाब, हरियाणामधले लोक या धरणाच्या मिळणाऱ्या पाण्यावर आपली पिके पिकवून "मक्के की रोटी और सरसोंका साग" खाऊन किती आनंदात नांदत आहेत. जे लोक या धरणाच्या विरोधात होते, तेच लोक आज याला दुवा देत आहेत. खरंच असंच जर नर्मदा प्रकल्पाच्या बाबतीत घडलं तर ! घडावे अशी आपण आशा करूया.

पण तुम्ही म्हणाल की मेधा पाटकर, अरुंधती धुरू यांचे जे उपोषण, जी खटपट चालली आहे ती काय व्यर्थ आहे का ? नाही, मुळीच नाही. कडाक्याच्या थंडीतसुद्धा भोपाळच्या मध्यवर्ती रोशपुरा गावात ठिय्या देऊन ही मंडळी बसली होती. २१ नोव्हेंबर १९९४पासून नर्मदा आंदोलनचा बेमुदत उपवास त्यांनी धरला होता. यात मेधा पाटकर, कमल यादव, लुवारियाभाई, सीतारामभाई हे उपस्थित होते. त्यांचे म्हणणे असे की धरणाचा पुनर्विचार करेपर्यंत धरणाचे काम थांबवावे. पण सरकार कायद्याचे पालन न करता, आदिवासींचा अवमान करत आहे. या धरणामुळे कित्येक आदिवासींची घरे बुडाली. पण "डुबेंगे पर नहीं हटेंगे" म्हणत शेवटपर्यंत यांनी आपली घरे व जमिनी सोडल्या नाहीत. गढूळ पाण्यामुळे गावात मलेरिया, गॅस्ट्रो सारखे आजार निर्माण झाले. पण या लोकांचा निश्चय पक्का होता. पण थोडा विचार जर केला तर उद्याचे उज्ज्वल भवितव्य आम्हा तुम्हांला सर्वांनाच बघायला मिळणार आहे.

या प्रकल्पामुळे नवजीवन मिळणार आहे. महाराष्ट्रातील धुळे हा जिल्हा अजूनही पाण्याच्या समस्येला तोंड देत आहे. अजूनही मागासलेला आहे. या धरणाच्या पाण्यामुळे तो प्रश्न कायमचा संपणार आहे. असं हे गुजरातमधील भडोच जिल्ह्यामधील नवाग्राम येथे बांधलं जाणारं धरण म्हणजे गुजरात, महाराष्ट्र व मध्य प्रदेशाला एक वरदानच ठरणार आहे. गुजरातमधील कच्छ, सौराष्ट्र व उत्तर गुजरातमधील दुष्काळी भागातील एक समस्या या सरदार सरोवरामुळे सुटणार आहे. या धरणासाठी सरकारने करोडो रुपये गुंतवले आहेत. परकीय चलन स्वीकारले आहे. जर आपण सर्वांनी याला उत्स्फूर्तपणे पाठिंबा दिला तर आज भारत एका मोठ्या समस्येतून मुक्त होईल. आणि भावनेपेक्षा कर्तव्य जास्त श्रेष्ठ असते. जरी या धरणांमुळे मणिबेली, सिंदुरी, चिमलखेडी यासारखी अनेक गावे बुडणार असली, तरी उद्याचे उज्ज्वल भविष्य याच गावाची वाट बघत आहे. शेवटी भारताची एक नागरिक या नात्याने मला एकच सांगावेसे वाटते,

सर्वेऽपि सुखिनः सन्तु ।
सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु ।
मा कश्चिद् दुःखितो भवेत् ।

■

# सरदार सरोवर : शाप की वरदान ?

## 'नियतकालिक समिति' निबंधस्पर्धेतील पारितोषिक विजेता लेख

गीता जोगळेकर

प्रथम वर्ष, शास्त्र

सध्या भारतात अनेक प्रश्नांनी अराजकता माजवलेली आहे. काश्मीर प्रश्न, उत्तराखंड आंदोलन आणि सरदार सरोवराचा प्रश्न. सध्याची परिस्थिती अशी आहे की सरदार सरोवराने काश्मिरच्या प्रश्नाला फार मागे टाकले आहे. ह्याचे कारण असेही म्हणता येईल की काश्मिरचा प्रश्न हा फार जुन्या काळापासून चालत आलेला आहे. तो फक्त काश्मिरचाच प्रश्न मानला जातो आणि या सरदार सरोवर प्रकल्पात एक नाही, दोन नाही तर चार राज्यांच्या शेपट्या अडकलेल्या आहेत. त्यामुळे भारतांतर्गत सगळ्याच प्रांतांचे लक्ष या प्रकल्पाकडे वेधले गेले आहे. शेवटी काय या प्रकल्पामुळे साध्य होणार आहे, कोणती गोष्ट अशी आहे की त्यामुळे या प्रकल्पाला मान्यता मिळत आहे आणि जर ही गोष्ट उपयोगाची आहे तर मग 'नर्मदा बचाओ' आंदोलनाला एवढा जोर का चढला आहे ? या गोष्टींचा विचार एक आवश्यक आणि खरं तर जीवनमरणाची बाब ठरली आहे. आता जर समाजात या प्रकल्पाबद्दल मत जाणून घ्यायचे झाले, तर बहुतांशी जण 'आपल्याला काय करायचे आहे' असे म्हणून मोकळे होतात. पण या सरदार सरोवराशी आपले सगळ्यांचे भवितव्य निगडित आहे हे कोणाच्या लक्षात येत नाही. सरदार सरोवराबद्दल जाणून घेणे ही अतिशय आवश्यक बाब झाली आहे.

गरुडेश्वर . . . . . कधीही न ऐकलेले नाव आणि ऐकणार तरी कशाला ? या गावाला कोणताही इतिहास नाही. आणि आता मात्र गुजरात सरकारने त्याला पर्यटनस्थळ म्हणून मान्यता दिलेली आहे. कारण काय तर याच ठिकाणी नर्मदा नदीवर प्रसिद्ध महत्त्वाकांक्षी योजना - सरदार सरोवराची योजना राबविली जात आहे. योजना आहे एका महाकाय धरणाची. १४६.६ मीटर उंच आणि जवळजवळ ३५६.५ मीटर लांब अशा एका अजस्त्र धरणाची. त्यातील जवळजवळ ७० मीटर धरण उंच बांधून झालेले आहे. या प्रकल्पाबद्दलची उत्सुकता जास्तच वाढत चालली आहे. अनेक मंत्री, खासदार तेथे येतात आणि दोन-तीन दिवस मजेत घालवून निघून जातात आणि गरुडेश्वरमधील लोक म्हणतात, 'या प्रकल्पामुळे आमच्या गावाला बरकत आली आहे.' एवढ्यावरच ते खूष आहेत. त्यांना यात काहीच गैर वाटत नाही. नर्मदा प्रकल्पाचे पुरस्कर्ते त्यांना सांगतात की या महत्त्वाकांक्षी योजनेत तुमच्या सगळ्यांचे हित आहे. त्यामुळे येथील सगळे रहिवासीच काय पण जवळजवळ पूर्ण गुजरातमधून या प्रकल्पाला पाठिंबाच मिळत आहे. गुजरातमधील एका दृष्टीने मागासलेला भाग म्हणजे उत्तर-गुजरात, कच्छ, सौराष्ट्र असा भाग. जिथे पाणीपुरवठ्याची खरी गरज आहे. आणि जिथे या प्रकल्पामुळे लोकांना उपयोग होऊ शकतो. त्यामुळे गुजरातमध्ये या सरोवराबद्दल आनंदाची भावना आहे. शिवाय आणखी एक गोष्ट म्हणजे येथे भूगर्भ-जलविद्युत केन्द्र बांधण्यात येत आहे. ही एक अतिशय साहसी योजना आहे. या भूगर्भ-जलविद्युत केंद्राचा निर्माता म्हणून गुजरात

राज्य नावाजले जाईल. म्हणजे तसं वरवर पाहिलं तर सरदार सरोवर म्हणजे गुजरात राज्याला मिळालेले वरदानच आहे. आणि मग या प्रकल्पाला विरोध करण्याची गरजच कशाला आहे ?

मेधा पाटकर, नर्मदा बचाओ आंदोलनाच्या सर्वेसर्वा, त्या प्रत्यक्ष महाराष्ट्रीय असूनही गुजरातच्या सरदार सरोवराच्या एवढ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाविरुद्ध का लढत आहेत ? या महत्त्वाकांक्षी आणि साहसी योजनेला कोणतीही डावी बाजू नसताना त्या का त्याला विरोध करत आहेत ? तर या साहसी योजनेत एक ग्यानबाची मेख अशी आहे की, फक्त गुजरातपुरताच विचार इथे केला गेला आहे. धरण बांधल्यामुळे ज्यांच्या डोक्यावरचे छप्पर जात आहे, ज्यांना या प्रकल्पानंतर जगायचे कसे हा प्रश्न पडणार आहे, त्यांचा विचार कोण करणार ? अर्थात गुजरात सरकारने त्यांना जी आश्वासने दिली आहेत, त्यावरून त्यांना खरं तर काही चिंता करायची गरज उरत नाही. राहायला घर किंवा ४ गुंठे जमीन, ८-९ एकर शेतजमीन, १०००० रुपये अनुदान, साडेचार हजार पुनर्वसनासाठी, म्हणजे वरवर पाहता आदिवासीपेक्षा सुखी माणूस दुसरा कुठे नसेलच. पण एक तर हे कागदोपत्रीच राहील अशी शंका आहे. कोयना भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या योजना अजूनही पूर्ण झाल्या नाहीत; तर या आदिवासींना हा फायदा मिळून पुन्हा सुरळीत आयुष्य जगायला किती काळ जाईल कोणास ठाऊक. 'धरणग्रस्त मोहीम' या नावाने सुरू झालेली चळवळ आता 'नर्मदा बचाओ आंदोलन' या नावाने जोर घेत आहे. मेधा पाटकर आणि इतर नेते अक्षरशः प्राण पणाला लावून या आदिवासींच्या बाजूने लढत आहेत. पण मेधा पाटकर या नावाबद्दल तिळमात्रही आस्था गुजरातमध्ये दिसून येत नाही. उलटपक्षी, महाराष्ट्रीय असल्यामुळे त्या या सरदार सरोवराला विरोध करत आहेत आणि गुजरातच्या विकासाला त्या सर्वात मोठा अडसर आहेत अशीच काही भावना गुजराती नागरिकांच्या मनात रुजली आहे किंवा रुजविली जात आहे.

आणखी एक मोठा धोका सरकारने लक्षात घेतलेला नाही, तो म्हणजे पर्यावरणाचा आणि आपल्या परंपरेचा. या प्रकल्पाखाली नर्मदेचा बराच भाग जाणार आहे. विंध्य पर्वताची शोभा या प्रकल्पामुळे नष्ट होणार आहे. तसेच आदिवासींना पुनर्वसनासाठी ज्या जमिनी दिल्या जाणार आहेत, त्या जंगलाच्या भूभागातील आहेत. त्यामुळे जंगल व्याप्ती कमी होणार हे तर साहजिकच आहे. ज्या जागतिक बँकेकडून नर्मदा प्रकल्पासाठी कर्ज घेतले आहे, त्यांना नर्मदा प्रकल्पांच्या पुरस्कर्त्यांनि असे आश्वासन दिले आहे की, आदिवासी पुनर्वसन प्रश्नापुढे जंगलतोड कायदा आड येणार नाही. त्यामुळे जंगलतोड तर अटळ आहे.

या सगळ्या गोष्टींचा विचार करता सरदार सरोवर प्रकल्प कितपत योग्य आहे याची शहानिशा करणे जरुरीचे आहे. सरदार सरोवराची उपयुक्तता कमी होऊ न देता आदिवासींचा प्रश्न सोडविण्याबाबत ज्या पर्यायी योजना आहेत, त्यांचाही विचार होणे गरजेचे आहे. सरदार सरोवर हा शेवटी देशाला लाभलेला शाप आहे का एक महत्त्वाकांक्षी व धाडसी योजना म्हणून मिळालेले वरदान आहे, ह्याचा विचार देशातल्या प्रत्येक नागरिकाने करायला हवा. कोणत्याही एका टोकाला न जाता दोन्ही गोष्टींचा सुवर्णमध्य साधता आला तर यापेक्षा आणखी आनंदाची गोष्ट कुठली असू शकेल ? जीवनात तडजोडीला फार महत्त्व आहे आणि ही तडजोड गुजरात सरकारने, नर्मदा प्रकल्पाच्या पुरस्कर्त्यांनि आणि 'नर्मदा बचाओ आंदोलन' खंबीरपणे लढवलेल्या नेत्यांनी केली; तर हा प्रकल्प कदाचित ऐतिहासिक मानला जाईल.

# टेलिव्हिजनवरील बहुवाहिन्या

**'नियतकालिक समिती' निबंध स्पर्धेतील पारितोषिक विजेता लेख**

सुचेता वकिल
तृतीय वर्ष, शास्त्र

'१९४२' हे वर्ष भारताच्या इतिहासात सुवर्णाक्षरात लिहिलं गेलं. पारतंत्र्याचे बंधन झुगारून भारतीय स्वातंत्र्य लढा एका नव्या क्रांतिकारी टप्प्यावर येऊन पोहोचला होता. हे वर्ष जगाच्या तांत्रिक इतिहासातही सुवर्णयुग ठरावं असंच महत्त्वपूर्ण आहे. ह्या वर्षी जे. एल. बायर्ड यांनी दूरचित्रवाणीचा आश्चर्यकारक व क्रांतिकारक असा शोध लावला. ह्या नव्या शोधामुळे जगाची व्याप्तीच जणू कमी झाली. ह्या शोधामुळे दोन शहरांमधलं, दोन देशांमधलं इतकंच काय दोन खंडांमधलं अंतरही अगदी कमी वाटू लागलं. आणि पाहता पाहता ह्या छोट्या पडद्याने साऱ्या जगालाच वेडावून सोडलं !

परंतु सुरवातीला ह्या दूरचित्रवाणीचं स्वरूप अगदी साधंच होतं. ना रंग, ना रूप ! फक्त चित्राचंच अपरूप ! ! जवळ जवळ मुकीच आणि श्वेत-शाम रंगाची ही दूरचित्रवाणी साऱ्या जगावर वर्चस्व गाजवेल असं तेव्हा कोणाला सांगूनही खरं वाटलं नसतं ! परंतु १९६२ मध्ये 'टेलस्टार' हा पहिला दळणवळण उपग्रह (Communication Satellite) किंवा कॉमसॅट (Comsat) सोडला गेला आणि सारं चित्रच पालटलं. आता महागड्या केबल्सची आणि रेडिओ-रिले स्टेशनांची दूरसंचाराकरिता गरजच राहिली नाही. कॉमसॅट ह्या सर्वांपेक्षा जास्त कार्यक्षम, सुलभ आणि साधा आहे. कारण ह्याच्या सहाय्याने पृथ्वीवरील कोणत्याही दोन भागांना जोडता येतं. कॉमसॅट पृथ्वीच्या कक्षेशी सिंक्रोन्स (Synchronous) असतो व जीओस्टेशनरी (Geostationary) देखील असतो. पृथ्वीवरील ग्राउंड स्टेशनहून ट्रांस्मिशन रिसीव करून ती ॲम्प्लिफाय (Amplify) करुन पुन्हा रिब्रॉडकास्टिंग (Rebroadcasting) करणे हे कॉमसॅटचे कार्य होय.

घरबसल्या मनोरंजन व ज्ञानरंजन होत असल्यामुळे टेलिव्हिजन अल्पावधीतच लोकप्रिय झाला होता. पूर्वी टेलिव्हिजन केंद्रांशी जोडल्या गेलेल्या ठराविक भागातच त्याचे कार्यक्रम दिसू शकत. परंतु ह्या अद्ययावत तंत्रज्ञानामुळे टी. व्ही. अगदी दुर्गम भागातही पोचू शकला. सर्व देशभर एकाच वेळी एकच कार्यक्रम प्रक्षेपित करणंही केवळ कॉमसॅटमुळेच शक्य होऊ शकलं.

ह्या बाबतीत भारताचंच उदाहरण अगदी बोलकं आहे. इनसॅटमुळे भारताच्या कानाकोपऱ्यात दूरदर्शनचे कार्यक्रम दिसू शकतात. एवढंच नव्हे तर अगदी जगाच्या पाठीवर घडणारी कुठलीही घटना आज आपण टी. व्ही.वर अगदी 'लाइव्ह' पाहू शकतो. १९६५ पासून दिल्ली केंद्रावरून कार्यक्रम नियमितपणे प्रक्षेपित होऊ लागले. हळूहळू मुंबई, कलकत्ता आणि मद्रास इथेही मुख्य केंद्रे सुरू झाली आणि दूरदर्शनचे दर्शन अवघ्या देशाला घडू लागले.

ह्या अद्ययावत तंत्रज्ञानामुळे रेडिओप्रमाणे टी. व्ही.वरही विविध वाहिन्या सुरू झाल्या. दूरदर्शनने केंद्रिय कार्यक्रम व राष्ट्रीय कार्यक्रम अशी विभागणी केली. केंद्रिय कार्यक्रम

त्या त्या प्रांतातल्या भाषेत प्रक्षेपित होतात तर राष्ट्रीय कार्यक्रम ठराविक वेळी हिंदीत संपूर्ण देशात दिसतात. ह्याचा उपयोग परदेशी कंपन्यांनीही सुरू केला. डिश अँटेनामुळे अगदी परदेशी वाहिन्याही आपल्याकडे आल्या. आणि ह्या बरोबरच पाश्चात्य संस्कृतीचाही मारा आपल्यावर सुरू झाला. पाश्चात्य गीत-संगीत-नृत्य धिंगाणा घालू लागले. ज्या घरातून पूर्वी शुभंकरोतिचे निर्मळ सूर ऐकू येत, त्याच घरातून कर्णकटू पाश्चात्य संगीताचा गोंगाट ऐकू येऊ लागला. टी. व्ही.वर दाखविल्या जाणाऱ्या जाहिराती व त्यांचे परिणाम हा तर एक स्वतंत्र विषयच होईल. हे कार्यक्रम दिवसातून २२ तास प्रक्षेपित होत असल्यामुळे निशाचर वाढले.

एवढं मात्र खरं की ह्या छोट्या पडद्यावरील बनावटी श्रीमंत जीवनाने, चकचकीतपणाने लहान-मोठ्या सर्वांनाच भुरळ घातली. नेहेमीच स्वप्नरंजनात दंग राहात असल्यामुळे व्यावहारिक जगात मुलं अपयशी ठरू लागली. ह्याचे लहान मुलांच्या मनावर होणारे परिणाम तर इतके घातक आहेत की, पुढे कदाचित त्याची परिणती मानसिक विकृतींमध्येही होऊ शकते !

दुसरं असं की भारतासारख्या विकसनशील आणि आर्थिकदृष्ट्या परदेशी देशांपेक्षा मागासलेल्या अशा देशाने असे खर्चिक प्रकल्प करणे कितपत योग्य आहे ? ज्या देशात आजही भूकबळी पडतात, जिथे गरिबी, निरक्षरता, वाढती लोकसंख्या, बेरोजगारी ह्यांच्या सारख्या जटिल समस्या आ वासून उभ्या ठाकल्या आहेत, तिथे केवळ मनोरंजनावर व ज्ञानरंजनावर अब्जावधी रुपये खर्च करावेत काय ?

परंतु नाण्यालाही दोन बाजू असतात. केवळ कॉमसॅटमुळेच म्हणजेच विविध वाहिन्यांमुळेच आज जग आपल्या अगदी नजरेत आलंय ! अक्षरश: जगातल्या कुठल्याही कानाकोपऱ्यात घडणारी घटना आपल्याला लगेच कळू शकते. कुठे जर पूर, भूकंपासारखी आपत्ती आली असेल तर तिची लगेच माहिती कळून तिथे तात्काळ मदतही पोहचू शकते. ह्यामुळे अनेक निष्पाप जीव वाचू शकतात व वित्तहानी टळू शकते.

एकंदरीत २१ व्या शतकात पदार्पण करत असताना टी. व्ही.वर बहुवाहिन्यांची सोय असणे ही काळाची गरज आहे. परंतु ह्याचा वापर मात्र मानवाच्या उन्नतीसाठी व जास्त संपन्न आयुष्यासाठी होणं अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा हे वरदानही शाप ठरू शकते !

■

## तरी पण . . .

असंही जीवन वाट्याला येतं
जिथं दीप उजळत नाही
तरीही प्रकाश शोधावा लागतो

अशी मोहक फुले असतात
ज्यांना मधुर सुगंध नसतो
तरीही ती उमलत असतात

अनंत स्वप्ने पडत असतात
इच्छापूर्ती तेथे होत नसते
तरी यत्न करावे लागतात

क्षणामागून क्षण निसटतात
ध्येयं सुंदर-अपुरीच राहतात
तरीपण पकडावेच लागतात

नि असा एक क्षण सापडतो की,
जिथं जीवन संपलेलं असतं.

जितेंद्र राजपूत, प्रथम वर्ष, कला

# पर्यावरणविषयक शिक्षणाची आवश्यकता

**'नियतकालिक समिती' निबंध स्पर्धेतील विजेता लेख**

विद्या कुदळे
तृतीय वर्ष, शास्त्र

पृथ्वीच्या निर्मितीनंतर कोट्यवधी वर्षांनी जीवसृष्टीचा उगम झाला. जीवसृष्टीचा विकास होऊन मानव निर्माण होण्यास बराच काळ गेला. अश्मयुग, लोहयुग अशी वाटचाल करीत आपण विज्ञानयुगात आलो. विज्ञानाने निसर्गावर मात करताना बऱ्याच वेळा निसर्गाचे संतुलनही बिघडले. आपण आपल्या सुखाचा शोध घेता घेता निसर्गाचे नियम मोडत चाललो आणि त्या उर्मीतच अफाट लोकसंख्या वाढ, प्रचंड जंगलतोड आणि औद्योगिकीकरण यामध्ये गुंतून गेलो आणि अनेक मानवनिर्मित समस्यांमध्ये पर्यावरणात प्रदूषणाची नवीन भर घालण्यात मात्र यशस्वी ठरलो.

पूर्वीच्या सुखी भारताचे वर्णन करताना असे म्हणतात की, पूर्वी पाऊस नियमित पडायचा. उन्हाळाही सुसह्य असायचा. धरित्री सदैव हिरव्या वसनाने नटलेली असायची. गाई-म्हशीसुद्धा भरपूर गोरस देत. त्यामुळे जमिनी अधिक सकस होत्या. धान्यही विपुल प्रमाणात होते. अशा भारतभूमीचे वर्णन करताना कविवर्य अभिमानाने सांगायचे,

"सुजलाम् सुफलाम् मलयजशीतलाम्
सस्यशामलाम् मातरम्."

नंतर कालपरत्वे मानवी-जीवनाचा विकास होत गेला. ज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये प्रगती झाली. विकासाच्या संकल्पनांना एक वेगळा अर्थ प्राप्त झाला. त्याबरोबरच लोकसंख्या वाढली. वाढत्या लोकसंख्येसाठी जास्त शेती पिकवावी लागली. जास्त शेतीसाठी जंगले नष्ट करण्यात आली. उद्योगधंदे आणि आधुनिकीकरण यांना गती मिळाली. विकासाच्या नावाखाली प्रचंड मोठी धरणे बांधण्यात आली. अशा तऱ्हेने पर्यावरणाचा समतोल बिघडला. पर्यावरणाचा विनाश होऊन सुसंपन्न आणि समृद्ध असलेल्या भूमीचे वाळवंटीकरण झाले आणि प्रदूषणाचे नवीन संकट मानवजातीसमोर उभे राहिले.

सध्या हे जग २१व्या शतकाकडे धावत आहे. सध्याचे युग विज्ञानयुग आहे. त्याबरोबरच मानव हा मानव राहिला नसून यंत्रमानव बनलेला आहे. म्हणूनच त्याचे राहणीमान आणि विकासाची संकल्पना सर्व आधुनिक बनलेले आहे. ह्या मानवाने फक्त देशावरच नव्हे तर पृथ्वीच्या वातावरणावर सुद्धा मात केली आहे. ह्या मानवाने वातविलेप तुषार (Aerosol Spray) निर्माण केले. त्यामुळे पृथ्वीला संरक्षक असणाऱ्या ओझोनच्या कवचावर विपरित परिणाम झाला. या वातविलेप तुषारांमध्ये क्लोरोफ्ल्युरोकार्बन यासारखे रसायन वापरलेले असते. हा क्लोरोफ्ल्यूरोकार्बन ओझोनवर रासायनिक अभिक्रिया करतो. त्यामुळे दिवसेंदिवस वातावरणातील ओझोनचे प्रमाण कमी होत चाललेले आहे. परिणामतः सूर्यापासून येणाऱ्या प्रखर किरणांपासून मानवाला त्वचारोग होण्याची शक्यता टाळता येणार नाही.

याखेरीज वातावरणाचा सुमारे ६५ टक्के भाग औद्योगिकीकरणामुळे असंतुलित झालेला आहे. याचे प्रमुख

कारण म्हणजे गेल्या काही दशकांत तंत्रज्ञानाची प्रगती अतिशय झपाट्याने झालेली आहे. त्यामुळे देशाची केवळ भौतिक प्रगती झाली आहे असे म्हणता येईल. परंतु त्यामुळे होणाऱ्या सर्वंकष परिणामांची जाणीव मात्र फारच धीम्या गतीने होत आहे.

वाढत्या तंत्रज्ञानाच्या विकासामुळे पर्यावरणात प्रदूषणाची मोठी भर घातली गेली. कारण यामुळे स्वयंचलित वाहने व कारखानदारी वाढली.

प्रदूषणाची तीव्रता जास्तीतजास्त वाढवली ती म्हणजे स्वयंचलित वाहने. आणि कारखाने व त्यातील आधुनिक यंत्रणेने. वाढत्या लोकसंख्येबरोबरच शहरातील रस्त्यांच्या क्षेत्रफळाच्या मानाने स्वयंचलित वाहनांचा अगदीच सुळसुळाट झालेला आहे. याचे कारण म्हणजे, त्यांनी सोडलेला धूर. या धुरामुळे वातावरणातील हवा ऑक्सिजन नव्हे तर कार्बनमोनोक्साइडमुळे बनली आहे की काय असा भास न झाला तर नवलच !

सुरुवातीला कारखान्यांमुळे होणारे प्रदूषण इतके भयंकर असेलसे वाटले नव्हते; परंतु आता मात्र त्याचे तोटे रोजच्या जीवनात नक्कीच जाणवत आहेत. या कारखान्यांद्वारे विविध रसायनांची वाफ, विषारी हवा, धूर वातावरणात सोडले जातात. ही हवा श्वसनासाठी अपायकारक आहे. हा धूर जेव्हा कणरूपांने जमिनीवर बसतो, तेव्हा तो वनस्पतीच्या वाढीला अडथळा निर्माण करतो. त्यामुळे वातावरणातील कार्बनडायऑक्साइड व ऑक्सिजन यांचा समतोल बिघडतो. एवढेच नव्हे तर, कारखान्यांमधील विषारी वायूंच्या गळतीमुळे काही गंभीर प्रकरणात मानवी जीवनाचा विनाशही घडवून आणतो. काही वर्षांपूर्वी भोपाळ येथे घडलेली घटना एक शोकांतिकाच म्हणावी लागेल.

त्याबरोबरच वाढत्या कारखान्यांच्या संख्येमुळे हवेतील सल्फरडायऑक्साइडचे प्रमाण तिपटीने वाढलेले आहे. हा सल्फरडायऑक्साइड पावसाच्या पाण्यात विरघळतो व त्यापासून सल्फ्युरिक ॲसिड तयार होते. परिणामी आम्ल वर्षा (Acid Rain) होऊ लागते. ही आम्ल वर्षा वनस्पतींना अपाय करते. त्यामुळे सागर-नद्या यांमधील पाणी दूषित तर होतेच; परंतु सर्वात मोठा परिणाम होतो, तो जलवनस्पती आणि जलचर यांच्यावर. परिणामतः प्रामुख्याने जलपरिसंस्थाच नष्ट होत चाललेल्या आहेत.

त्याचबरोबर कारखान्यांतील आधुनिक यंत्रणेमुळेसुद्धा वातावरणावर विपरीत परिणाम झालेला आहे. उदा. संगणक, झेरॉक्स मशीन, मायक्रोफिश ब्ल्यू प्रिंट आणि इलेक्ट्रोफोटोग्राफिक लेटर प्रिंटर यासारखी यंत्रे अंतर्गत प्रदूषणाची उगमस्थानेच म्हणावी लागतील. केवळ वातावरणाचे प्रदूषण लक्षात न घेता, तितक्याच झपाट्याने जलप्रदूषण आणि ध्वनीप्रदूषणसुद्धा वाढत आहे, हे समजून घेतले पाहिजे.

पाणी ही जगातील सर्वात मौल्यवान वस्तू आहे. ही राष्ट्रीय संपत्ती आहे. पाण्याची जागा इतर कोणतीही वस्तू घेऊ शकत नाही. परंतु मानवाने आपल्या स्वार्थानुसार त्याचीही विल्हेवाट लावली. मथुरा, ढारौनी येथे तेल शुद्धीकरण प्रकल्पातून नद्यात विषारी ॲसिड्स सोडण्यात आली. गंगाजलात नवीन अण्विकरणाचे उपकरण जोडण्यात आले. ह्या उपकरणाद्वारे गंगेच्या पाण्याचे किरणोत्सारी विघटन होऊ लागले आहे. असे हे गंगाजल एखाद्या आजाऱ्याच्या तोंडात जर दिले; तर काही क्षण जगणारा मनुष्य तात्काळ मृत्यू पावेल. अशी अवस्था देशातील सगळ्याच नद्यांची झालेली आहे.

ध्वनीप्रदूषणाचे हे एक नवीनच प्रकरण आपल्या देशात निर्माण झाले आहे. वाढती कारखानदारी, रहदारी त्याबरोबरच

विविध सणासुदीला वाजविली जाणारी वाद्ये यामुळे मानवी जीवनावर एक हानीकारक परिणाम झालेला आहे. त्यामुळे हृदयविकार, रक्तदाब, मानसिक असंतुलन यासारख्या रोगांची संख्या बळावत आहे.

ह्या सर्वांचा सखोलपणे विचार केला; तर मानव हाच प्रदूषण घडवून आणणारा सर्वात मोठा गुन्हेगार ठरतो. कारण पृथ्वीवरील अतिप्रगत मेंदू लाभलेला मानव हा एकमेव प्राणी आहे. परंतु मानवाची विचारसरणी ही केवळ भौतिक स्वरूपाची म्हणता येणार नाही. यासाठी प्रत्येक मानवाने निसर्ग, पर्यावरण व प्रदूषण याचा आवर्जून विचार केला पाहिजे. निसर्ग व त्याद्वारे होणाऱ्या पर्यावरणाचा नाश लक्षात घेता पर्यावरणाच्या अभ्यासाची नितांत गरज आहे. यासाठी केवळ विचारांची गरज नाही, तर प्रत्यक्षात कृतीची गरज आहे. यासाठी 'वृक्षदेवो भव' म्हणून वृक्ष-नारायणाची पूजा करणे आवश्यक आहे. कारण वृक्ष लावून, वृक्ष जगवून पर्यावरणाचा समतोल राखला जायला हवा. यासाठी धरणीमातेला हिरवा अलंकार प्रदान करणे आवश्यक आहे. असे झाले तर पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. केवळ वनीकरण, वनमहोत्सव साजरे करून किंवा वृक्षदिंड्या काढून पर्यावरणाचा समतोल राखला जाणार नाही. कारण आपण लोक उच्च तत्त्वांच्या आदर्शांचे कर्मकांडात रूपांतर करण्यात अगदी पटाईत आहोत. एकीकडे अमाप वृक्षतोड चालू ठेवायची आणि दुसरीकडे मात्र लहान कोवळी रोपे लावून वनीकरण करण्याच्या शपथा घ्यायच्या ! याने पर्यावरणाचा ऱ्हासच होईल. निसर्गातील अशा घटकांची उत्पत्ती करावयास हवी की, ज्याद्वारे पर्यावरणाचा समतोल तर राखला जाईलच परंतु त्यांचे संवर्धन व विकास सुद्धा योग्य रीतीने घडेल. असे झाले तरच निराशेच्या अंध:कारास रुपेरी कडा देण्याचे स्वप्न खरे होईल.

■

# अनेकदा वाटायचं

अनेकदा वाटायचं 'फुल' होऊन जगायचं,
दाह निर्माण करणाऱ्या 'ग्रीष्माला' नाही पटायचं.

अनेकदा वाटायचं 'सूर्य' होऊन जगायचं,
मर्यादा आणणाऱ्या 'ढगांना' नाही पटायचं.

अनेकदा वाटायचं 'जमीन' होऊन जगायचं,
तुकडे तुकडे करणाऱ्या 'भूकंपाला' नाही पटायचं.

अनेकदा वाटायचं 'दुसऱ्याचं' होऊन जगायचं,
दुरावा निर्माण करणाऱ्या 'आपल्यांना' नाही पटायचं.

अनेकदा वाटायचं 'सदाचारी' होऊन जगायचं,
भ्रष्टाचार करणाऱ्या 'व्यभिचाऱ्यांना' नाही पटायचं.

अनेकदा वाटायचं 'जगायचं' म्हणून जगायचं,
रोज रोज येणाऱ्या 'मरणाला' नाही पटायचं.

अनेकदा वाटायचं 'सुखी' होऊन जगायचं,
सुखास हादरा देणाऱ्या 'दु:खाला' नाही पटायचं.

अनेकदा वाटायचं 'माणूस' होऊन जगायचं,
पशू होत चाललेल्या 'मानवाला' नाही पटायचं.

अनेकदा वाटायचं 'मित्र' होऊन जगायचं,
वेळोवेळी संशय घेणाऱ्या 'जगाला' नाही पटायचं.

**संतोष मोरे**, तृतीय वर्ष, वाणिज्य

# 'बंद' बंद व्हावा

## 'साहित्य संघटना' निबंधस्पर्धेतील पारितोषिक विजेता लेख

कु. किशोरी कासट
द्वितीय वर्ष, शास्त्र

नुकताच नागपूरमध्ये झालेल्या गोवारी समाज हत्याकांड निषेधार्थ 'महाराष्ट्र बंद' पुकारण्यात आला. शेजारच्या स्वातीला रुग्णालयात ठेवले होते. रुग्णालय घरापासून खूपच दूर. नेमकी स्कूटर बिघडलेली. तसेच रिक्षा वगैरे सर्वच बंद. घरातील सर्वच जण मानसिक तणावाखाली होते आणि तो बिकट प्रसंग प्रत्यक्ष अनुभवताना प्रत्येकाच्या मनात एकच विचार येत होता — "बंद' बंद व्हावा."

'बंद' म्हणजे प्रगतीचा शेवट. उन्नतीची वाटचाल बंदमुळे बंद पडते. मनुष्याचे जीवन म्हणजे प्रवाह होय. तोच थांबला की सर्वच खुंटले. म्हणून बंद हा कधीही मानवाला हानीकारकच आहे.

बंदमध्ये सर्वात जास्त हानी विद्यार्थ्यांची होते. शाळा, महाविद्यालये यावर बंद पुकारणाऱ्यांचा डोळा असतो. अभ्यासाचे कामकाज बंद पडल्यामुळे विद्यार्थी निष्क्रिय बनतात. त्यांचा महत्त्वाचा अभ्यास बुडतो. अभ्यासात विनाकारण खंड पडतो. सर्व विद्यार्थी रस्त्यावर येतात व कित्येक वेळी वातावरणात गैरशिस्त निर्माण होते. हेच विद्यार्थी दंगलीत सामील होतात. कित्येकदा शाळा-कॉलेजच्या इमारतींचे विनाकारण नुकसान होते. दगडफेकीत निरपराध विद्यार्थी जखमी होतात. विद्यार्थी म्हणजे भावी नागरिक. म्हणून बंदमधून विद्यामंदिरांना सदैव दूर ठेवले पाहिजे.

बंदमुळे ज्यांचे हातावरचे पोट आहे, अशा गरीब जनतेचे बेसुमार हाल होतात. त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर बनतो. बहुधा बंदमुळे त्यांचा रोजगार बुडतो व त्यांना उपासमारीची वेळ येते. जर काही कारणांनी बंद बेमुदत झाला तर अशा भीषण प्रसंगी त्यांना प्राणांतिक उपोषणास तोंड द्यावे लागते. तसेच सर्वसामान्य नोकरवर्गासही बंदचा तडाखा बसतो. जे परगावचे लोक नोकरी-व्यवसायानिमित्त शहरात निवास करत असतात, त्यांना खानावळी व उपाहारगृहे बंद असल्यामुळे उपास घडतो. काही वेळा हातगाड्यांवरचे काही घेऊन खावे असे त्यांना वाटले; तर त्याही बंद पडल्यामुळे त्यांना कडकडीत उपास घडतो. त्यामुळे असे बंद कायमचे थांबावेत.

बंदमुळे उत्पादन थांबून देशाची कोट्यवधी रुपयांची हानी होते. कारखाने, गिरण्या बंद पडल्यामुळे उत्पादनास खीळ बसते. कामाची गती थांबते व पुन्हा पहिली गती प्राप्त होण्यास वेळ लागतो. ज्यांना रोजंदारीवर काम मिळते, त्यांचे साहजिकच आर्थिक नुकसान होते व त्यांना विनाकारण झळ सोसावी लागते. त्यांच्या कुटुंबियांचे आतोनात हाल होतात. आपल्या देशातून जो तयार माल परदेशात जातो व ज्यामुळे आपल्याला परकीय चलन उपलब्ध होते, ते या बंदमुळे थांबते व अशी आर्थिक हानी देशाच्या प्रगतीस खीळ निर्माण करते. म्हणून सर्वांनी मिळून हे 'बंद' देशहिताच्या दृष्टीने कायमचे बंद पाडले पाहिजेत. बंदमुळे दळवणळण थांबते व देशाच्या दैनंदिन जीवनावर विपरित

परिणाम होतो. रस्त्यावरील वाहतूक थांबते. रेल्वेमार्गावरील दळणवळण थांबते. विमान वाहतूक ठप्प होते. परदेशगमन व परदेशीयांचे आगमन बंद पडते. नागरिकांची व मालाची वाहतूक अडून राहते. विशिष्ट कार्यासाठी नागरिकांना कोठे परगावी जायचे असेल तर त्यांच्या कार्यक्रमावर पाणी पडते. नियोजित समारंभ रद्द होतात. त्यामुळे कित्येकदा संपूर्ण नियोजन कोसळते. वृद्ध व आजारी रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी दवाखान्यात वाहनाअभावी जाता येत नाही. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीस धोका होण्याचा संभव असतो. किंवा त्यांचा उपचाराअभावी आजार बळावतो व काही वेळा प्रकृती गंभीर होते. असे जिवाशी खेळणारे 'बंद' कायमचेच बंद होणे हे इष्ट होय.

वस्तुत: 'बंद' ही राजकारण्यांची खेळी आहे. ते त्यांचा स्वार्थ साधण्यासाठी नागरिकांना वेठीस धरतात. आपल्या पक्षाची, संघटनेची ताकद किती आहे याचे प्रदर्शन केले जाते. जनतेच्या प्रश्नांची तड आपण लावली पाहिजे असा देखावा असतो. मुळात घडलेल्या घटनांविषयी किंवा प्रश्नांविषयी फारशी आस्था कोणालाच नसते. 'बंद' हा बळजबरीने देशवासियांवर लादलेला असतो. अनिच्छेने लोक बंदमध्ये सामील होतात. दगडफेकीच्या भीतीने तसेच लुटालूट होण्याच्या भयाने दुकानदार आपली दुकाने बंद ठेवतात. वाहनांचे नुकसान होईल म्हणून बसेस, रिक्षा, टॅक्सी इ. वाहने रस्त्यावर धावेनाशी होतात. संस्थाचालक नुकसानीच्या भीतीने शाळा-कॉलेजेस बंद ठेवतात. नागरिक दंगल होईल या भयाने आपापले व्यवहार बंद ठेवून घराच्या बाहेर पडत नाहीत. तेवढीच एक दिवस सुट्टी अशीच अनेकांची भूमिका असते ! या सर्वांचा परिणाम होऊन बंदच्या दिवशी स्मशानशांतता पसरते. राजकारणी १०० टक्के बंद यशस्वी झाल्याचे जाहीर करून आपल्या विजयाची पताका फडकवतात. परंतु त्यासाठी ते नागरिकांना ओलिस धरतात. असले 'बंद' हे समाज-विघातक, प्रगतीला मारक, धोकादायक, देशाचे ऐक्य भंग करणारे, शांततेला मारक, विध्वंसक प्रवृत्ती निर्माण करणारे आहेत. म्हणून हे सारे 'बंद' आता कायमचे बंद करायला हवेत ! कोणीही कोणत्याही कारणासाठी बंदचे समर्थन करू नये. ■

## वळणावर

वळणावरून वळताना
मागे वळून पाहू नकोस
मागे वळून पाहिलेस तरी
गालात उगाचच हसू नकोस
गालात मिश्किल हसताना
पापण्या अलगद मिटू नकोस
धुंद गहिऱ्या डोळ्यात
माझे स्वप्न पाहू नकोस
तुझ्या स्वप्निल दुनियेत
मला मात्र बोलावू नकोस
आणि स्वप्नात बोलाविलेस तरीही
'तू माझी होशील का ?'
हा प्रश्न मात्र विचारू नकोस
का ? ते विचारू नकोस
उत्तर कधीही मागू नकोस
म्हणूनच —
माझ्या आयुष्याच्या वळणावर
पुन्हा कधी येऊ नकोस
आणि आलास तरीही
भूतकाळात पाहू नकोस !

**कु. वैशाली शेट्टी**, तृतीय वर्ष, वनस्पती शास्त्र

# विज्ञान युगात संत साहित्याचे स्थान

**'साहित्य संघटना' निबंधस्पर्धेतील पारितोषिक विजेता लेख**

कु. नीलाक्षी ताटके
द्वितीय वर्ष, शास्त्र

'ज्ञान' आणि 'ध्यान' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जीवनाच्या विविधांगी समृद्धीसाठी विज्ञानाची आवश्यकता आहे; तर 'ध्यान' हे माणसाला आत्मभान देऊन अधिक व्यापक बनवते. संत साहित्याचे विज्ञान युगातील स्थान हे यापेक्षा वेगळे नाही. जगातल्या सगळ्याच संत महात्म्यांनी आपापल्या साहित्यातून कसे जगायचे आणि कसे जगवायचे याचाच वस्तुपाठ दिलेला आढळून येतो.

ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम ह्यांसारखे संत काही चमत्कार होऊन आजच्या विज्ञान युगात आले, तर त्यांना काय वाटेल, याचा विचार केला तर त्यांच्या मनाला आत्यंतिक यातना देणारी परिस्थिती पाहावयास मिळेल. ज्ञानेश्वर म्हणतील, "सातशे वर्षापूर्वी मी विश्वात्मक देवाकडे 'पसायदान' मागितले होते, त्यात 'जो जे वांछिल तो ते लाहो' असा उत्कट भाव प्रकट केला होता. पण आजच्या या शास्त्रसंपन्न जगात मला हे दृश्य दिसत आहे, दुर्जनांच्या वांछा-आकांक्षा येथे संपन्न होत आहेत. सज्जनांच्या सदिच्छा मात्र काळवंडून जात आहेत. साधुत्व रानावनात वणवण करीत फिरत आहे आणि स्वार्थ-साधू मात्र सिंहासनावर डौलाने प्रतिष्ठित झाले आहेत. खळांची व्यंकटी सांडली नाहीच, उलट त्यांची दुष्कर्मी रती वाढत चालली आहे. माझ्या स्वप्नांची जगात अशी लक्तरे व्हावीत या वेदना असह्य आहेत. उदात्त स्वप्नांचे कोळसे होतात आणि बिभत्स, घृणास्पद वास्तव मात्र दिमाखाने मिरवत राहते !" असे विफलतेचे उद्गार ज्ञानेश्वरांनी काढले असते. जो 'आनंदाचा डोह' संत तुकारामांनी पाहिला आणि जगाला 'आंदण' दिला, त्या डोहाची आजच्या जगाने दुर्दशा करून टाकली. भौतिकवादाच्या भोवऱ्यात आध्यात्मिक वाद रसातळाला चाललाय.

भौतिकोपभोगवादी नवी संस्कृती जन्माला येऊ घातलीय. संत साहित्याची शिकवण केवळ 'टाइमपास' होऊ घातलीय. जीवनातला 'परतत्त्व' स्पर्श नाहीसा होऊ लागलाय.

संत साहित्य हे जीवनावर आणि मानवतेवर, मानवी मूल्यांवर प्रगाढ प्रेम करणाऱ्या, उन्नत अंत:करणाच्या व्यक्तींनी भूलोकावर निर्माण केलेला स्वर्ग आहे. माणसाच्या आचार-विचाराला, आयुष्याला, त्याच्या दृष्टिकोणाला, तो पाहात असलेल्या स्वप्नाला या संतसाहित्याचा परमस्पर्श असल्याशिवाय माणूस, माणूस म्हणून जगू शकणार नाही, तो विज्ञानाच्या चमत्कारात गुंतलेला एक क्षुद्र जीव राहील. प्रगतीच्या उंच शिखरावर विराजमान झालेल्या मानवाला, प्रगतीच्या विविधांगी, विविधढंगी वातावरणात संतांची शिकवण बोधप्रद ठरण्याऐवजी त्याकडे केवळ एक 'अभ्यासनीय' विषय एवढाच मर्यादित दृष्टिकोण ठेवून, या अमोल ठेव्याकडे पाहण्याची सवय जडली आहे. त्यातील जीवनसौंदर्याचा, पावित्र्याचा, सोज्वळ भावनांचा आस्वाद घेण्याची जाणीव या विज्ञानयुगात बोथट होऊ लागली आहे. आजच्या जीवन व्यवहाराला उदात्त मूल्यांचे अधिष्ठान

'विज्ञान' देऊ शकत नाही. ज्यात सत्प्रवृत्तीचा गंध सामावला आहे, असे संतसाहित्य वाल्मिकी, व्यासमहर्षी, ज्ञानेश्वर, रामदास या संत महर्षींनी क्षुद्रतम नीचतेला निरसून टाकण्यासाठी शब्दसामर्थ्याचा वापर केला. ते शब्द-सामर्थ्य आज खोटी आश्वासनं देण्यात; फसवणूक, भ्रष्टाचार करण्यात खर्ची होत आहे. सुखलोलुप आणि सत्तालोलुप खलजन संत वचनांचा महिमा, लोकांना भूलवण्यासाठी जिभेवर घोळवताना दिसतात.

आजच्या विज्ञानयुगातील मानव विकारातून विवेकाकडे जाण्याऐवजी विवेकाकडून विकाराकडे चाललाय. संतांची अमूल्य शिकवण त्याला एक 'थोतांड' वाटू लागलीय. अल्बर्ट आइनस्टाइनसारख्या विज्ञान महर्षींनाही शेवटी संतांची शिकवणूक ही विज्ञानापेक्षाही श्रेष्ठतम आहे, ही गोष्ट पटली. ते म्हणतात, 'विज्ञानाच्या प्रगतीला नीतीचं अधिष्ठान असल्याशिवाय खरी प्रगती होऊच शकत नाही.' मानवा-मानवाच्या अंत:करणातील प्रेमशक्तीचा सहज आविष्कार करून जीवनाला प्रीतीच्या आणि भक्तीच्या उंच पातळीवर नेण्याचे कार्य जगातल्या सर्वच धर्मग्रंथांनी केलेले आहे. म्हणूनच विज्ञानाच्या आविष्काराला संत साहित्यातून दिलेल्या शिकवणुकीचा भावस्पर्श असल्याशिवाय प्रगती परिपूर्ण होऊ शकत नाही.

आज नीतीमूल्यांची पायमल्ली होऊन विध्वंसकारी अण्वस्त्रं निर्माण करण्याकडे जगाचा कल आहे. 'प्रगती'चा विज्ञानरूपी राक्षस संपूर्ण मानवजात नष्ट करण्याच्या बेतात आहे. मग ज्ञानेश्वरांची शिकवण 'हे विश्वचि माझे घर' हे केवळ पाठ्य-पुस्तकांचीच शोभा वाढवतेय. यावरून विज्ञानयुगात संत-साहित्याचं स्थान कुणाही सुजाण माणसाला न सांगताही कळण्याएवढं सोपं आहे.

■

# राजकारण

राजकारण हेच खरं असतं महाकारण
ते समजण्यासाठी करावा लागतो
खोटेपणाचा बुरखा धारण

काय करत नाहीत हे लोक सत्तेसाठी
एकमेकांचा जीव घेतात केवळ पैशासाठी

आली निवडणूक की उभे राहतात
होत जोडून जनतेपुढे

पण जिंकल्यावर मात्र जनताच
हात जोडून उभी राहते नेत्यांपुढे

हाती सत्ता आली की
पहिला विचार असतो आप्तांचा

मग तेव्हा त्यांना वेळ नसतो
विचार करायला गरीबांचा

हिंडून येतात हे सर्व पॅरिस व चीन
पण कर भरते सामान्य जनता दीन

एकमेकांना टोप्या घालण्यात हे अगदीच पटाईत
कोणत्या वेळी काय करावे हे करण्यात सराईत

व्हायचा असेल देशाचा विकास
तर हवा आहे या सर्व गोष्टींचा विनाश

कु. विद्या झाडे,
बारावी

# विज्ञान युगात संत साहित्याचे स्थान

**'साहित्य स[illegible]' निबंधस्पर्धेतील पारितोषिक विजेता लेख**

कु. सारिका गोकर्ण

अकरावी

"हे विश्वचि माझे घर। ऐसी मति जयाची स्थिर
किंबहुना चराचर। आपण जाहला" (ज्ञानेश्वरी)

श्री ज्ञानराज माऊलींच्या संत साहित्यातील या एका ओळीची आजच्या विज्ञानयुगात सहजच आठवण येऊन जाते.

आजच्या विज्ञानयुगात आपल्या डोळ्यासमोर एकच यक्षप्रश्न उभा राहतो, तो म्हणजे विज्ञान हे मानवाला मिळालेला शाप किंवा वरदान आहे? या प्रश्नाचे उत्तर आपण त्या विज्ञान शक्तीचा उपयोग विधायक मार्गासाठी करतो की विध्वंसक मार्गासाठी करतो यावर अवलंबून आहे. आणि या विधायक किंवा विध्वंसक मार्गाची अचूक निवड करण्याचे ज्ञान आपल्याला संतसाहित्यातून मिळते. म्हणूनच आजच्या धावत्या युगात जेथे माणूस डोळ्याला झापड बांधून निरंतर धावत असतो, तेथेही हे संतसाहित्य आपले आगळे स्थान प्रस्थापित करतात.

वरील संतवचनांचा जर आपण सूक्ष्मपणे विचार केला, तर आपल्या सहजच लक्षात येईल की, फारच मोजक्या शब्दात संतसाहित्याने समाज-प्रबोधनाची कामगिरी यशस्वीपणे पार पाडली आहे. माणसाला सर्वप्रथम 'माणूस' बनण्याची शिकवण संत साहित्यातून मिळाली. स्वामी विवेकानंद म्हणतात —

*"All animals are temples too but man is the highest, the Taj of temples"*

या तत्त्वज्ञानाचा विचार करून, माणसाने मानव धर्मानुसार वागावे अशी संतसाहित्यात तळमळ व्यक्त केली होती. संतमहंतांनी केवळ शब्दपांडित्याचाच उपदेश केला नाही; तर जीवनव्यवहारात त्याचा वापर केला. म्हणूनच म्हटले जाते, "बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले !"

खरंच आजच्या पुढाऱ्यांनी या वचनातून काहीतरी बोध घेतला पाहिजे. केवळ भाषणांचेच डोंगर न रचता कर्तबगारीचे डोंगर उपसले पाहिजेत.

संतमहंतांच्या कर्तबगारीचे तर काय वर्णन करावे? निवडुंगाच्या काट्यात मंबाजीने तुकारामांना फेकले, तरीही त्याचा द्वेष न करणारे तुकाराम महाराज! तृषार्त आणि क्षुधार्थ हरिजनांच्या मुलाला कडेवर उचलून घेणारे संत एकनाथ! जनाबाईसारख्या अंत्यज स्त्रीला आपल्या घरात आश्रय देऊन राऊळाचे द्वार तिला सदैव खुले करणारे नामदेव महाराज! हे सर्वजण क्रांतीवादी होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मूर्तीत तर भगवंत आहेत; पण तो चराचरात व प्राणीमात्रांत देखील भरला आहे. मग द्वेष, मत्सर, तिरस्कार कोणाचा करायचा? अशी त्यांची उद्‌बोधक समाजधारणा होती. यावरून संतांचा आचार, विचार आणि सदाचार किती उच्च दर्जाचा होता हे सहजच लक्षात येईल.

समाजात समतावादाचे बीजारोपण करण्याचे महत्त्वाचे कार्य सर्व संतांनी मिळून कीर्तन, भक्तीच्या मार्गाने केले. जातिनिरपेक्ष धर्मद्रष्टीचा व सामूहिक एकतेचा मंत्र-आचार केला आणि म्हणूनच संतसाहित्य समतावादाचे द्योतक ठरले.

सामाजिक जीवनात कामांधता, बुवाबाजी, परस्त्रीगमन, व्यसनाधीनता इ. समाजविघातक व अनैतिक कृत्यांवर जबरदस्त टीका करणारे संतसाहित्य, आजच्या वाट चुकलेल्या तरुण पिढीला कल्याणाचा मार्ग दाखवण्यास खचितच उपयोगी पडेल. अशा प्रकारे अनेक संतांचा व त्यांच्या उपदेशरूपी अमृताचा जाणीवपूर्वक अभ्यास केल्यानंतर आपल्या सहजच लक्षात येते की, हे संतलोक अंधारात चाचपडणाऱ्यांना वाट दाखविणारे प्रकाशमय दीपक होते.

कसल्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता केवळ चंदनासारखे झिजून संतांनी धर्मसुधारणेची आणि लोकजागृतीची क्रांती केली. नि:सत्व जीवनाला अध्यात्माची सांगड घालून दिली.

"मी अविवेकाची काजळी। फेडूनि दीप उजळी।"

असे ज्ञानेश्वर महाराज मोठ्या अभिमानाने म्हणतात. अशा तऱ्हेने त्या त्या सामाजिक व राजकीय परिस्थितीला पूरक असे तत्त्वज्ञान संतांकडून मिळाले.

अशा या सर्व जाणिवेतून निर्माण झालेल्या विज्ञान युगात संतसाहित्याला योग्य ते स्थान देऊन त्याची तत्त्वे आपल्या आचरणात आणणे हीच तुमची, आमची आणि काळाची देखील गरज आहे.

■

## ऋणानुबंध

या जन्मी या जगती मी आलो मी जाईन
परंतु मी जाताना काही ठेवून काही
घेऊन जाईन

या जगी असतील कुणी जे दु:खी आणिक कष्टी
मी जाताना सोबत त्यांचे दु:ख घेऊन जाईन

आढळतिल जर नयन कधी मग अश्रूंनी भरलेले
मी जाताना त्या नयनातील ते अश्रू
घेऊन जाईन

जोडिन काही नाती जगती ऋणानुबंधही काही
मी जाताना त्या सर्वांची आठवण
घेऊन जाईन.

## तुझे शब्द व मी

तू म्हणालीस ते शब्द आजही आहेत उरी
आपण कमीच असतो आपण समजत नसलो तरी

सामान्यातून असामान्य व्हावे होती इच्छा माझी
पण हतबल मी झालो ऐकून समीक्षा तुझी

असामान्य होणे असते फार अवघड जगी
कारण आपण कमीच असतो आपण समजत नसलो तरी

एका क्षेत्रात मिळते यश, तर दुसऱ्यात मिळते अपयश
म्हणतात की नियतीच्याच हाती असते आपले यशापयश

क्षेत्र असो कोणतेही प्रयत्न करणेच ठरते महत्त्वाचे
पण या क्षेत्रात प्रयत्नच कमी पडले असतील माझे

प्रत्येक गोष्टीत यश काही नेहेमीच मिळत नाही
कारण आपण कमीच असतो आपण समजत नसलो तरी

एवढेच सांगणे तुजला 'होऊन दाखवीन पुरुषोत्तम मी'
कारण कोणीच कमी नसतो आपण समजत असलो तरी

**बिपिन इनामदार,** तृतीय वर्ष, कला.

# दोस्ती निसर्गाशी

**'साहित्य संघटना' निबंधस्पर्धेतील पारितोषिक विजेता लेख**

कु. मुग्धा सिधये
अकरावी, शास्त्र

निसर्ग ! ऋतुचक्राचा स्वामी ! मायावी जादूगार ! सर्वश्रेष्ठ दाता ! सृजनशील प्रतिभावान कलावंत ! निसर्गाचं अन मानवाचं फार पूर्वीपासून जिव्हाळ्याचं नातं आहे. प्राचीन काळच्या ऋषीमुनींनी पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचमहाभूतांना देवता मानून सुक्तांमधून त्यांची स्तुतीस्तोत्रं गायली आहेत. अशा या निसर्गाशी कुणाची बरं मैत्री नाही ? कितीही प्रतिभावंत कलाकार असला तरी निसर्ग त्याच्या दशांगुळे उरणारा आहे. त्यामुळे चित्रकार, शिल्पकार, छायाचित्रकार, साहित्यकार या साऱ्यांचाच निसर्ग हा प्रेरणास्रोत आहे. प्रेमी युगुलांना तर निसर्गाशिवाय जवळचा सखा कोणता? विरहिणींना आर्त बनवणारा घननीळ आषाढ ! श्रावणात बरसणाऱ्या रिमझिम धारांनी न्हाऊ घालावं म्हणून 'येरे घना येरे घना' असं आर्जव आपण सारेच करतो. एवढंच कशाला लहान मुलांनाही बरोबर खेळायला 'चांदोबा' हा सवंगडी लागतो.

"चांदोमामा चांदोमामा दमलास का,
ढगांच्या मागे आज लपलास का"

असा प्रश्न विचारायला, मोराबरोबर आंब्याच्या बनात थुई थुई नाचायला अन पावसाच्या पाण्यात होड्या सोडायला लहान मुलं गट्टी करतात ती निसर्गाशीच की !

मैत्री म्हणजे तरी काय ? गाढ विश्वास, सहजता अन उत्कट प्रेम यांचा सहजसुंदर मिलाफ ! रोजच्या जीवनातही नाना रूपांमध्ये आपल्याला अनेक मित्र भेटतात. पण या धकाकीच्या जीवनात कधी ना कधी एकमेकांमध्ये ताणतणाव, संघर्ष अन कटुता निर्माण होते. यामुळे जीवन गढूळ बनतं. अशा वेळी मदतीला येतो निसर्ग ! मनाला उत्फुल्ल बनविणारा, घडीभर सारं विसरायला लावून मनाला नवसंजीवनी देणारा निसर्ग ! त्याच्याशी अद्वैत साधताना आपली ब्रह्मानंदी टाळी लागते आणि मिळतो परमकोटीचा आनंद !

निसर्ग हा आपला सखा निरपेक्ष आहे. 'देता किती घेशील दो कराने' याप्रमाणे मुक्तपणे तो बरसात करतो. कसलाही भेदभाव न करता सर्वस्वाचं दान करतो. वृक्षराजींचंच उदारहरण घ्या.

"छाया यच्छन्ति पान्थाय तिष्ठति स्वयमातपे ।
फलान्यपि परार्थाय वृक्षाः सत्पुरुषा इव ॥"

चंदनाचं झाड तोडलं तरी त्याचा सुवास जात नाही. आपल्या धर्मापासून न ढळणारा असा एकनिष्ठ मित्र दुसरा कुठून मिळणार ?

हिमालयासारखे उत्तुंग पर्वत, अफाट सागर, नायगऱ्यासारखा प्रचंड धबधबा अशी निसर्गाची रूपं पाहिली की मानवाच्या क्षुद्रतेची जाणीव होते. अहंकार नाहीसा होतो. उदात्तता, भव्यतेची प्रचिती आली की आपले कर आपोआप जुळतात. वृत्ती नम्र होतात. अन बोरकरांनी म्हटल्याप्रमाणे

"जीवन त्यांना कळले हो.
'मी'-पण ज्यांचे पक्व फळापरि सहजपणाने गळले हो"

जीवनाचे पैलू आपल्यापुढे उलगडत जातात.

रवींद्रनाथ टागोर हे एक महान कवी होते. पण आधी तें एक निसर्गप्रेमी होते. लहानपणी त्यांना फारसे मित्र नव्हते. पण घराच्या खिडकीतून ते एकटक निसर्गाचं निरीक्षण करत. खरंच —

"You can never be alone when nature is with you." शिवाय,

"जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे
गाणे मनात सवेचि होय जागे"

अशा रसिक, बहारदार वृत्तीच्या लोकांची निसर्गाशी दोस्ती न झाली तरच नवल !

आजच्या विज्ञानयुगात मात्र परिस्थिती काहीशी खेदकारक आहे. मानवानं ज्ञान अन तंत्रज्ञानाचे पंख लेवून प्रगतीच्या प्रांगणात झेप घेतली. निरनिराळे शोध लावले. अवकाशयाने सोडली. पण निसर्गावर त्यानं अन्याय केला. आपल्या या मित्राला दगा दिला. वातावरणाचा तोल ढळला. प्रदूषण बळावलं. अवकाशाचे वेध लागलेल्या मानवाला आपल्या या मित्रावरच कुरघोडी करण्याची ईर्षा निर्माण झाली. पण यात त्याचाच नाश आहे. निसर्ग मात्र अनंत, अजिंक्य अन अवध्य आहे. मानवाला जर शाश्वत आनंद मिळवायचा असेल तर निसर्गाशी दोस्तीच करायला हवी, कुस्ती नव्हे !

दोस्ती म्हणजेच मैत्र हे जीवनातलं एक मूल्य आहे. दोस्ती जमवता येणं ही एक कला आहे. निसर्ग तर स्वत:च थोर कलावंत आहे. या कलावंताच्याच हातात हात घालून, त्याच्याशी दोस्ती करून जीवन जगण्याची कला, त्यातली उदात्तता आणि सौंदर्य अनुभवण्यात खूप खूप आनंद आहे. खरंच खूप खूप आनंद आहे.

■

# मॉडर्नचं कलामंडळ

असं म्हणतात की मॉडर्नचं कलामंडळ ही
स्पर्धांची एक खाण आहे.

मी देखील एक स्पर्धक असल्याने मलाही
त्याची जाण आहे.

'फर्ग्युसनमधे इन्सिक होतं', आपल्याला काय त्याचं ?
असं मी मुळीच म्हणणार नाही.

कारण एखाद्या वर्षी ते नाही झालं तरी ह्या स्पर्धा
व्हायचं काही थांबणार नाही.

कोंबडं कितीही आणि कसंही झाकलं तरी सूर्य
उगवायचा तो शेवटी उगवतोच.

आणि असेंब्ली हॉल नसला तरी या स्पर्धा लायब्ररीत
भरवायचा मार्ग कलामंडळाला सापडतोच.

प्रत्येकाला असं वाटतं की महाविद्यालयीन जीवनात
स्वरांची, शब्दांची, अभिनयाची
एक तरी माला गुंफावी.

आणि शेवटी कलामंडळाला एवढीच विनंती की
स्पर्धांची ही परंपरा अशीच चालवावी.

**बिपिन इनामदार,** तृतीय वर्ष, कला.

# महामानव विवेकानंद

कु. सोनाली सुमंत
प्रथम वर्ष, शास्त्र

विवेकानंदांचा जन्म कलकत्ता येथे १२ जानेवारी १८६३ मध्ये दत्त कुटुंबात झाला. ते लहानपणी नरेन्द्र या नावाने ओळखले जात. त्यांचे वडील निष्णात वकील होते. नरेन लहानपणी अतिशय खोडकर व तीक्ष्ण बुद्धीचा विद्यार्थी होता. परंतु त्याचप्रमाणे त्याला ध्यानधारणेतही स्वारस्य होते. ध्यानधारणेमुळे एकाग्रचित्तता व एकाग्रचित्ततेमुळे तीव्र स्मरणशक्ती त्याला प्राप्त झाली. नरेनमध्ये एक तपस्वी, द्रष्टा व संन्यासी ही सर्व रूपे सुप्तावस्थेत होती. दारी आलेल्या संन्याशाला पाहून त्याला आनंदाचे भरते येई. जरी नरेनचा कल अध्यात्मिक जीवनाकडे असला तरी तर्कबुद्धीवर त्याचा मोठा विश्वास होता. प्रत्येक गोष्ट तपासून पाहण्याची वैज्ञानिक मनोवृत्ती त्याच्या अंत:करणात होती.

अध्यात्मिक आकर्षणामुळे कॉलेजमध्ये असताना नरेन ब्राह्मो समाजाचा सभासद होता. ब्राह्मो समाजाच्या प्रभावामुळे तो मूर्तिपूजेच्या आवश्यकतेच्या व अवतार कल्पनेच्या विरुद्ध होता. मन:शांतीसाठी त्याला चांगल्या गुरुची आस लागली. नरेनला असा गुरू हवा होता जो परिपूर्ण ज्ञान देऊन मन:शांतीचा मार्ग दाखवेल. देहरुपाने समोर येणारा परंतु देहाची बंधने नसणारा परिपूर्ण असा गुरू-परमेश्वराचे अस्तित्व त्याला प्रत्यक्ष अनुभवायचे होते. त्यासाठी तो अनेकांना भेटला; परंतु त्याची मन:शांती कोणीही करू शकले नाही. हृदयातील तळमळ शांत करून घेण्यासाठी व जीवनध्येय साध्य करण्यासाठी नरेन्द्र दक्षिणेश्वरी आला. तिथे त्याला रामकृष्ण परमहंस भेटले. ते कालीमातेचे पुजारी होते. ते सांसारिक बंधनमुक्त होते. त्यामुळे सामान्यजनांचा त्यांच्याबाबत गैरसमज होत असे. नरेनला स्वत:ला आलेल्या विविध अनुभवांमुळे त्याच्याही मनात शंका उत्पन्न झाली. परंतु नंतर त्याची खात्री पटली की रामकृष्ण हे साक्षात्कारी, असामान्य उपदेशक आहेत. त्याने त्यांना गुरू मानले. परंतु त्याच्या मनात शंका होती ती म्हणजे निराकार ब्रह्माची उपासना करणारा ब्राह्मो समाज, तर दुसरीकडे सगुण साकाराची उपासना करणारा रामकृष्ण यांपैकी कोण खरे ते समजेना. त्याच्या मनाचा उडालेला गोंधळ पाहून रामकृष्णांनी त्याला अद्वैत साक्षात्कार घडविला. नंतर नरेनने कधीही अद्वैतवादाचे तत्त्वज्ञान नाकारले नाही. परंतु मूर्तिपूजा मात्र तो मानावयास तयार नव्हता.

नरेंद्र बी. ए. ला असताना अचानक त्याचे वडील वारले. घराची परिस्थिती पालटली. विपन्नावस्था आली. नोकरीसाठी तो वणवण भटकू लागला. नोकरी न मिळाल्याने कुटुंबाची उपासमार होऊ लागली. नरेनचा परमेश्वरावरचा विश्वास उडू लागला.

नरेन रामकृष्णांना एकदा म्हणाला, “कालीमाता जर रोज तुमच्याशी बोलते व तुमचे ऐकते तर मग तुम्ही तिला माझी विपन्नावस्था दूर करण्यास सांगा.” त्यावर रामकृष्ण म्हणाले, “मी खूप प्रयत्न केले, पण ती म्हणते नरेनचा कुठे माझ्यावर विश्वास आहे ? त्यामुळे तूच स्वत: जाऊन तिची प्रार्थना कर. तुझी मनापासून केलेली प्रार्थना माता जरूर

ऐकेल." नरेन शेवटी मंदिरात गेला. साक्षात कालीमातेचे दर्शन झाल्यावर तो परत परत मातेला साष्टांग दंडवत घालू लागला व म्हणाला, "माते, मला ज्ञान दे, वैराग्य दे, विवेकबुद्धी दे !" तीन वेळा मंदिरात जाऊनही नरेनने मातेजवळ ज्ञान, वैराग्य व विवेकबुद्धी मागितली. स्वतःच्या कुटुंबाविषयी काही मागावे असे त्याला अजिबात वाटले नाही. शेवटी रामकृष्णांनी त्याला वर दिला की, "जा आजपासून तुला जाड्याभरड्या अन्नवस्त्राला कधीही कमी पडणार नाही".

रामकृष्ण व नरेन हे गुरुशिष्य होते. रामकृष्णांनी नरेनला सर्व प्रकारचे ज्ञानभांडार खुले करून दिले होते. रामकृष्णांना घशाचा कॅन्सर झाला व त्यामुळे त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावू लागली. नरेनच्या मनात निर्विकल्प समाधी लाभावी अशी इच्छा होती तीही रामकृष्णांनी पूर्ण केली. महासमाधी घेण्याआधी ३-४ दिवस रामकृष्णांनी नरेनला शक्तिपात दीक्षा दिली. त्यांची सर्व शक्ती नरेनमध्ये संक्रमित झाली. गुरूचे संपूर्ण सामर्थ्य शिष्याला लाभले. ते परस्परांचे 'गुरु-शिष्य' न राहता 'बिंब-प्रतिबिंब' झाले. १६ ऑगस्ट १८८६ रोजी रामकृष्णांचा आत्मा अनंतात विलीन झाला.

रामकृष्णांच्या पश्चात सर्व गुरुबंधूंची जबाबदारी नरेनवर पडली. संन्यासधर्माची प्रतिज्ञा घेऊन रामकृष्णांनी त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी ते परिभ्रमण करू लागले. भगवी वस्त्रे धारण केलेल्या या संन्याशाची भारतभर भ्रमंती सुरू झाली. परिभ्रमण ही स्वामीजींसाठी शिक्षणाची संधी होती. समाजाची सुख-दुःखं, व्यथा-वेदना, हर्षोल्हास, सामान्य माणसाच्या अंतरंगातील स्पंदन यांच्याशी ते समरस झाले, आत्मपरीक्षण करू लागले. अद्वैताच्या अनुभवापर्यंत पोहोचूनही आपल्याकडून एखाद्या व्यक्तीची नकळत कशी अप्रतिष्ठा केली जाते, याची एक विदारक प्रचिती स्वामीजींना आली.

परिभ्रमण करताना स्वामीजी एकदा खेत्रीला आले होते. खेत्रीच्या राजेसाहेबांनी एका गणिकेचे गायन ठरवले होते. आपण संन्यासी, तेव्हा अशा कार्यक्रमात सहभागी होणे योग्य नाही, अशा विचाराने स्वामीजी उठून चालले, पण राजेसाहेबांच्या आग्रहाखातर बसले. हा सारा प्रकार त्या गायिकेने पाहिला व तिने संत सूरदासांचे भजन निवडले, "प्रभो मोरे अवगुण चित ना धरो." गीतातील एकेक चरण गायिका आपल्या आर्त स्वरात म्हणू लागली, तसा तो आशय स्वामीजींच्या मनात भरू लागला. अपराधीपणाची भावना त्यांच्या अंतःकरणात व्यापून राहिली. गाणे संपल्यावर त्यांनी गायिकेची मनःपूर्वक क्षमा मागितली.

परिभ्रमणाच्या काळात जनसामान्यांत वावरत असताना स्वामीजींची अध्यात्मिक धारणा एका कसोटीवर पारखली जात होती. त्यामुळे स्वामीजींना स्वतःच्या मनाची परीक्षा करण्याची संधी मिळत होती. जसजसा स्वामीजींचा प्रवास, दिवसांमागून दिवस होत राहिला तसतसा अगदी खालच्या थरापर्यंतचा समाज त्यांच्या दृष्टीस पडू लागला. दोन वेळचे पोटभर अन्न ज्यांना धडपणे मिळत नाही आणि ज्यांच्या अंगावर पुरेसे वस्त्र नाही, अशा कंगाल अवस्थेत आपल्या या देशातील फार मोठ्या संख्येचा समाज आहे, असे त्यांच्या दृष्टीस पडले. सर्वसामान्य माणसाचे दारिद्र्य पाहून त्यांचे अंतःकरण फाटून गेले. सर्वसामान्यांबद्दल वाटणारी करुणा त्यांचे सारे हृदय व्यापून राहिली. दारिद्र्य आणि अज्ञान हेच देशासमोरचे खरे प्रश्न आहेत, या निष्कर्षाप्रत ते येऊन पोहोचले.

स्वामीजी अंतर्मुख होऊन आत्मनिरीक्षण करू लागले. संन्यास स्वीकारून आपण स्वार्थाला तिलांजली दिली,

संन्यास घेतला आहे. याच्याच आधारावर आपण लोकांच्या दारात भिक्षा मागतो, ते जी भिक्षा घालतात त्यामुळे आपण आपल्या पोटात दोन घास घालू शकतो. त्या अन्नाच्या आधारे आपण संन्यस्त धर्माचे आचरण करू शकतो. परंतु ज्यांचे ऋण आपल्यावर आहे, त्या समाजासाठी संन्यासी म्हणवणारे आपण काय करतो हा प्रश्न त्यांना पडला. त्यामुळे त्यांचे अंत:करण आतून-बाहेरून हादरले. आपण या ऋणाची परतफेड तर काहीच करत नाही, उलट आपण संसाराकडे पाठ फिरवली आहे. साऱ्या ऐहिक सुखांपासून पूर्णपणे दूर झालो आहोत असा अहंकार मात्र आपल्या मनात उत्पन्न झाला हे जाणवल्यावर, मग त्यांना आपल्या जीवित कार्याची दिशा सापडली. त्यांच्या बुद्धीला झालेला सत्याचा कठोर साक्षात्कार आणि हृदयात जागी झालेली करुणा या दोन गोष्टी प्रामुख्याने त्यामागे उभ्या होत्या.

भारताच्या दक्षिण टोकाला कन्याकुमारी येथे स्वामीजी पोहोचल्यावर त्यांच्या हृदयात प्रकाश पडला.

शिकागोला जी धर्मपरिषद भरणार होती, त्यासाठी ते शिकागोला हिन्दूधर्माचे प्रतिनिधी म्हणून गेले. तिथे मिसेस जॉर्ज डब्ल्यू. हेल यांनी त्यांना सर्वतोपरी मदत केली. शिकागोस जाण्यापूर्वी स्वामीजींनी विवेकानंद हे नाव धारण केले. भारतीय समाजाविषयीचे प्रेम स्वामीजींच्या मनात जागृत झाले व त्यामुळे परिषदेतील पहिल्याच भाषणाने अपूर्व असे यश त्यांना मिळाले. सर्वधर्म परिषद संपल्यावर विवेकानंद ही व्यक्ती शिकागोत इतकी प्रसिद्ध ठरली की ज्या शहराच्या रस्त्यावर त्यांना भिकाऱ्यापेक्षाही वाईट वागणूक मिळाली तेथेच त्यांचा पदस्पर्श करण्यासाठी अमेरिकन जनता उत्साहाने त्यांच्यामागे लोटू लागली.

परिषदेनंतर अमेरिकेच्या कानाकोपऱ्यातून स्वामीजींना व्याख्यानासाठी बोलावणी येऊ लागली. तेव्हा हजारो वर्षांपूर्वी भारताने सर्व जगाला दिलेल्या वैदिक तत्त्वज्ञानाचा अमेरिकेत प्रचार करावा आणि आत्मविकासाचा मार्ग त्यांना खुला करून द्यावा, त्या बदली भारतातील दारिद्र्यावर फुंकर घालण्यासाठी अमेरिकेतून पैसा जमा करावा, या कल्पनेने रात्रंदिवस ते आपला प्रत्येक क्षण वेचण्यासाठी सिद्ध झाले. अनेक ठिकाणी त्यांची जाहीर भाषणे झाली. सर्व श्रोत्यांवर त्यांच्या राजबिंड्या रूपाचा, तेजस्वी नेत्रांचा, ओजस्वी वाणीचा, चेहेऱ्यावरील असामान्य बुद्धितेजाचा, इंग्रजीवरील प्रभुत्वाचा व पारंपरिक हिन्दू संन्याशाच्या पोशाखाचा प्रभाव पडत गेला. त्यांचे सहज वक्तृत्व, उदात्त विवेचनशैली, भाषेचा गोडवा पाहून अनेक अमेरिकन लोक त्यांच्या शिष्यसमुदायात येऊन मिळाले.

१५ जानेवारी १८९७ रोजी स्वामीजी मातृभूमीकडे परतले. भारतामध्ये त्यांचे स्वागत अतिशय उत्साहाने झाले. इथेही अनेक शहरातून त्यांना वक्तृत्वासाठी बोलावणी येऊ लागली. स्वामीजींचे प्रत्येक भाषण ज्वलंत राष्ट्रप्रेमाने भरलेले होते. विवेकानंदरूपी तुफानाने जनसामान्यांचे अंत:करण हादरवून सोडले. त्यांच्या गंभीर वाणीने जनतेच्या मनाचा ठाव घेण्यास सुरुवात केली. 'मातृभूमी हीच एक सर्वश्रेष्ठ देवता, तिच्यापुढे सारे काही तुच्छ' असे सांगून त्यांनी सारे राष्ट्र स्वातंत्र्यविचारांनी खळबळून सोडले. स्वामीजी कलकत्त्यात राहून समाजसेवेचे कार्य चिरस्थायी करण्याच्या मागे लागले. त्यासाठी १८९७ मध्ये त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. आपल्या सर्व संन्यासी बांधवांना स्वामीजी म्हणाले, "एकांतात राहून स्वत:च्या मोक्षाची चिंता वाहणे हा स्वार्थ आहे. त्यामुळे दुसऱ्यांना वाचवण्यासाठी जरूर तर नरकयातना-भोगण्यास तयार असणे हाच नवा प्रेरक संन्यासी धर्म आहे." अखंड परिश्रमामुळे त्यांचे शरीर क्षीण होत होते; पण कार्यरत राहण्याची इच्छा त्यांना स्वस्थ

बसू देत नव्हती. डॉक्टरी सल्ल्यावरून हवाबदल म्हणून ते अल्मोड्यास गेले. अडीच महिन्यांच्या काळातही अनेकजण त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी, सल्ल्यासाठी येत. इथेच 'मायावती अद्वैताश्रम' स्थापन करण्यात आला व बेलूरला रामकृष्ण मठ स्थापन करण्यात आला.

जुलैमध्ये भगिनी निवेदिता यांना घेऊन स्वामीजी अमरनाथच्या यात्रेसाठी गेले व तिथूनच क्षीरभवानीच्या दर्शनासाठी गेले. या पायी केलेल्या प्रवासाने त्यांची प्रकृती क्षीण झाली. ते बेलूर मठाकडे परतले. स्वामीजींच्या वृत्तीत एक प्रकारची अलिप्तता, उदासीनता आली होती. प्रकृतीसाठी डॉक्टरांनी त्यांना समुद्र प्रवासाची आवश्यकता प्रतिपादन केली.

अद्वैत प्रसाराचे आपण सुरू केलेले कार्य एकदा आपल्या डोळ्याखालून घालावे या हेतूने स्वामीजी पाश्चात्य देशातून फेरफटका मारू लागले. अनेक ठिकाणी त्यांची व्याख्याने झाली. इजिप्तमध्ये असताना एक दुःखद बातमी कळाली की, मायावती अद्वैताश्रमातील श्रीयुत सेव्हियर यांचे दुःखद निधन झाले. त्यामुळे श्रीमती सेव्हियर यांना भेटण्यासाठी स्वामीजी ताबडतोब भारतात परतले व मायावती अद्वैताश्रमात जाऊन श्रीमती सेव्हियर यांचे त्यांनी सांत्वन केले. हिमालयातील थंड वातावरणामुळे त्यांना दम्याचा त्रास सुरू झाला. त्यामुळे ते बेलूर मठाकडे परतले. तेथे निष्णात वैद्यांनी औषधोपचार सुरू केले. परंतु मधुमेह व जलोदराचा त्रास वाढतच राहिला.

प्रकृती नादुरुस्त असतानाही निरनिराळ्या जनकल्याणाच्या योजना स्वामीजी हाती घेत. शिष्यांना शास्त्राध्यापन करीत. उपनिषदे, ब्रह्मसूत्रे यावर मुख्यतः निरुपण करीत.

एके दिवशी स्वामीजी सकाळी उठल्यापासून प्रसन्नचित्त होते त्यामुळे आश्रमातील सर्वांनाही खूप बरे वाटले. स्वामीजी त्या दिवशी सर्व शिष्यांबरोबर जेवले. जेवण झाल्यावर लगेचच तीन तास त्यांनी शिष्यांना लघुकौमुदीवर निरुपण केले. अनेक उदाहरणे देत, चुटके सांगत विषय सोपा करून सांगण्याची उत्कृष्ट हातोटी त्यांच्याजवळ होती. सायंकाळी ते तासभर ध्यानाला बसले. एका शिष्याला आत बोलावून वारा घेत ते शांतपणे पडून राहिले व रात्री ९ वाजता त्या महामानवाचे पंचप्राण अनंतात विलीन झाले. तो दिवस होता ४ जुलै १९०२.

स्वामी विवेकानंद हे जरी देशभक्त संन्यासी असले, तरी राजकारणात ते कधीच पडले नाहीत. आधुनिक भारतावरील विवेकानंदांचा प्रभाव समाजवादी कल्पनांच्या विकासात दिसून येतो. स्वामीजींनी देशाला धर्म निरपेक्षतेचा दृष्टिकोन दिला. अस्पृश्यतेचा धिक्कार केला. त्यांनी आपल्या देशबांधवांना स्वाभिमानाने जगण्यास शिकविले. अनेक वर्षांपूर्वी ज्या समस्या सोडवण्यासाठी स्वामीजी झगडले, त्याच समस्या सोडवण्यासाठी आजही भारताचा संघर्ष चालू आहे. हिंदूंच्या धार्मिक कल्पना व वेदांत तत्त्वज्ञान यांचा पश्चिमी देशांना परिचय घडवून देणारे स्वामीजी हे पहिले संन्यासी होत. प्राचीन हिंदूधर्म ग्रंथांतून उगम पावलेल्या हिंदू वेदान्त तत्त्वज्ञानाचेच केवळ शिक्षण देऊन स्वामीजी थांबले नाहीत, तर व्यावहारिक वेदान्ताच्या आधारावर भारतीयांनी आपले वर्तन करावे, या हेतूने त्यांनी इतर धर्मातील उच्च विचारांची मदत घेतली.

विवेकानंद ह्या व्यक्तीची पूजा करीत राहणे किंवा आदरभाव व्यक्त करणे पुरेसे नाही. त्यांची सेवा करायची असेल तर त्यांनी दिलेल्या तत्त्वांशी एकरूप होऊन ती तत्त्वे आचरणात आणणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

■

# पु. ल. आणि त्यांचं साहित्यदर्शन : परिसंवाद

मनस्विनी प्रभुणे
द्वितीय वर्ष, कला

डिसेंबर, जानेवारी महिने महाविद्यालयीन जीवनात महत्त्वाचे असतात. कारण या दोन महिन्यांत महाविद्यालयामध्ये स्नेहसंमेलन, स्पर्धा, शिबीर, सहल, रोझ-डे, ट्रॅडिशनल डे असे भरगच्च कार्यक्रम असतात.

हिवाळ्यातल्या थंडीच्या दिवसातही सर्वत्र उत्साही वातावरण असते. विद्यार्थी ज्याची वर्षभर आतुरतेने वाट बघत असतात, ते म्हणजे 'एन. एस. एस.'चे 'शिबीर' याच महिन्यामध्ये पार पडते.

या वर्षी आपल्या कॉलेजचे 'राष्ट्रीय सेवा योजने'च्या विद्यार्थ्यांचे शिबीर भोसे या गावी झाले. लांबवर पसरलेले डोंगर, सर्वत्र कांद्यांची, हरभऱ्यांची, गव्हांच्या शेती बरोबर ॲस्टर आणि ग्लॅडिओलायसारख्या सुंदर, आकर्षक फुलांच्या वाफ्यांमुळे निसर्ग रंगीबेरंगी रंगाने नटल्याप्रमाणे दिसत होता. अशा निसर्गरम्य ठिकाणी शिबिराच्या निमित्ताने दहा दिवस राहण्याचा योग आला.

शिबीर हे विद्यार्थ्यांचा 'व्यक्तिमत्व विकास' व्हावा, सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी यासाठी असते. यात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, नेतृत्वगुणांनाही वाव मिळतो. शिबिरात सकाळी प्रार्थना, प्रार्थनेनंतर व्यायाम, श्रमदान, दुपारी जेवणानंतर व्याख्यान, संध्याकाळी ग्रामसंपर्क असा नित्यक्रम होता.

या दहा दिवसात वेगवेगळ्या विषयांवरील व्याख्याने ऐकण्यास मिळाली. दि. २६ डिसेंबर ९४ रोजी आपल्या कॉलेजमधील मराठी विभागप्रमुख, प्रसिद्ध ज्येष्ठ नाट्य समीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यावर परिसंवाद घेतला. या परिसंवादाचा काही भाग पुढीलप्रमाणे आहे :

परिसंवादाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी, ज्यांनी पु. लं. चं साहित्य वाचलं आहे, अशांनी आपली त्यावरील प्रतिक्रिया प्रगट केली.

**पु. लं.च्या साहित्याचा परिचय :**

पु. ल. देशपांडे हे महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व. पु. लं.च्या साहित्याने सर्व मराठी माणसांची मनं जिंकून घेतली. कोणाला ते पुलं, तर कोणाला भाई तर कोणाला पी. एल. या नावाने जवळचे वाटतात.

पु. लं. देशपांडेनी भरपूर लेखन केलं. त्यामध्ये प्रामुख्याने 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'व्यक्ती आणि वल्ली', 'असा मी असामी', 'बटाट्याची चाळ' आणि नाट्य लेखनात 'ती फुलराणी', 'तीन पैशाचा तमाशा', 'तुझे आहे तुजपाशी', 'सुंदर मी होणार', 'एक झुंज वाऱ्याशी' या नाटकांचा समावेश होतो.

पु. लं. ना प्रवास करायला आवडते. अशाच केलेल्या प्रवासाची वर्णने त्यांच्या 'अपूर्वाई' आणि 'पूर्वरंग' मध्ये आली आहेत. त्यांनी केलेली ही वर्णने 'चित्ररूपी' आहेत. वाचताना डोळ्यामोर परिसर उभा राहतो.

जीवनात अनेक व्यक्ती भेटतात. काही स्मरणात राहतात.

अशाच व्यक्तींच्यावर वर्णनात्मक पुस्तक लिहिले, ते म्हणजे 'व्यक्ती आणि वल्ली'. यातील अन्तू बर्वा, चितळे मास्तर, सखाराम गटणे अशी व्यक्तिचित्रे प्रसिद्ध आहेत. यातील अन्तू बर्वा हे कोकणी पात्र आहे. कोकणी माणसांच्या वैशिष्ट्यांप्रमाणे त्याच्याही तोंडी शिव्या आहेत. तो फणसाप्रमाणे आहे.

पु. लं. चं व्यक्तित्व अष्टपैलू मानलं जातं. कारण साहित्याबरोबर संगीत-गीत, चित्रपट, नाटक अशा अन्य क्षेत्रातही त्यांची विशेष आवड दिसून येते. पु. लं. संगीताचे चांगलेच जाणकार, शौकिन आहेत. गझल, दादरा, ठुमरी, शास्त्रीय संगीत अशा संगीत प्रकारांची त्यांना चांगलीच जाण आहे. गायनक्षेत्रातील आवडणाऱ्या कलाकारांवर, गायकांवर पुलंनी 'गुण गाईन आवडी' या पुस्तकात लेख लिहिले आहेत. केशरबाई, मल्लिकार्जून, कुमारगंधर्व, भीमसेन जोशी यांच्या अविस्मरणीय ठरलेल्या मैफलींबद्दल लिहिले आहे.

'मैत्र' या पुस्तकाचे लेखन पुलंनी खूप पूर्वी केलं होतं. तेव्हा पुलं 'अळूरपांडे' या टोपण नावाने लिहित असत. माणसाचा छंद-ध्यास त्यांच्यात रमणे पुलंना आवडते. अशाच विशेष असणाऱ्या माणसाशी त्यांचे मैत्रीचे धागे कसे जुळले, ते त्यांनी त्यातील लेखांमध्ये लिहिले आहेत. केसरबाई, नानासाहेब गोरे, पं. पलुस्कर, खानोलकर, ज्योत्स्ना भोळे सारखी बालमैत्रीण, अशा अनेक व्यक्तींशी असलेल्या मैत्रीवरून असे समजते की, पुलंच्या मैत्रीला वयाची मर्यादा नाही. त्यांच्यापेक्षा ज्येष्ठ वा कनिष्ठ असणाऱ्या व्यक्तींशी देखील त्यांचे मैत्रीचे कसे अतूट धागे आहेत ते !

### पुलंची नाट्यक्षेत्रातील कामगिरी :

जीवननाट्य समर्थपणाने आविष्कृत करण्याचे कसब फार थोड्यांमध्येच असते, ते पुलंकडे आहे. त्यांच्या नाटकांमध्ये विषयविविधता जशी आहे, तशीच व्यक्तिविविधता आहे. परंतु त्यांच्या एकूण नाटकांमध्ये त्यांच्या स्वतंत्र नाटकापेक्षा भाषांतरित नाटकांची संख्या जास्त आहे. नाटकं भाषांतरित असली तरी त्यांच्यातील पात्रं ही निकटच्या परिचयाची असतात. त्यांच्याशी जवळीक निर्माण होते.

'ती फुलराणी' हे नाटक रंगमंचावर अजूनही गाजतंय. हे नाटकदेखील भाषांतरित नाटक आहे. मूळ जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या नाटकावरून ते घेतलं आहे. 'तीन पैशाचा तमाशा' हेही पुलंचं रूपांतरित नाटक. आपल्याकडे काय आहे हे न जाणता आपण भलत्यांच्या पाठीमागे लागते हे त्यांनी या नाटकाच्या माध्यमातून दाखवले आहे. 'सुंदर मी होणार', 'वाऱ्यावरची वरात' या नाटकात त्यांनी त्यांच्या पत्नी सुनीताताईबरोबर काम केलं होतं. पुलंनी एक वेगळा कार्यक्रम केला तो म्हणजे 'बटाट्याची चाळ' एकपात्री प्रयोग. बटाट्याच्या चाळीतील मंगेशराव, हट्टंगडी, सोमण, गुप्ते इत्यादी सगळी मंडळी आपल्या ओळखीची नव्हे आपल्यातीलच वाटतात. या सर्वांच्या ठायी 'माणुसकीचा ओलावा' आहे. पुलं अगदी सहजपणे बटाट्याच्या चाळीतील व्यथांना वाचा फोडतात. 'बटाट्याची चाळ - एक चिंतन' यात डोळ्यात पाणी उभं करण्याचं सामर्थ्य आहे.

### नुसते लेखकच नाही . . .

पुलं नुसते लेखकच नाहीत तर त्यांच्या पिंडात संगीत, काव्य, साहित्य आणि नाट्य यांचे अद्वितीय मिश्रण झाले आहे. पुलंचे चित्रपट म्हणजे सबकुछ 'पी. एल.'. याचं उत्तम उदाहरण म्हणजे 'गुळाचा गणपती !' पटकथा, लेखक,

संवाद, लेखक, संगीत दिग्दर्शक, पद्यलेखक, दिग्दर्शन हे सगळे प्रकार समर्थपणे हाताळले आहेत. तत्पूर्वी 'वंदेमातरम्' मध्ये सुनिताबाईंबरोबर तसेच 'गोकुळ' या चित्रपटातही काम केलं. त्याच सुमारास त्यांनी 'दूधभात' या चित्रपटाचे संवाद अन संगीत दोन्ही ताकदीने पेश केले. 'नाच रे मोरा' हे 'देवबाप्पा' या चित्रपटातील गीतही त्यांनी लिहिली.

पुलंच्या आधी श्रीपाद कोल्हटकर, राम गणेश गडकरी, प्र. के. अत्रे, चिं. वि. जोशी असे विनोदी लेखक होऊन गेले. पुलंनी एक विशिष्ट अशी व्यक्तिरेखा उभी केली नाही; तर त्यांनी जीवनातील अनुभवातून त्या उभ्या केल्या आहेत. यात काही ठिकाणी अतिशयोक्ती, व्यंगपूर्ण मांडणी, अतिरिक्त कल्पनाविलास, कौतुकयुक्त थट्टाही दिसून येते. ज्याच्या संबंधी विनोद केलेला असतो, त्यालाही तो आवडतो. तो अश्लील नसतो. असा विनोद वाचायला, ऐकायला आवडतो. असा विनोद अभिरुचीसंपन्न असल्यामुळे तो कळण्यासही अनेकांना जड जातो.

पु. ल. देशपांड्यांनी मराठी साहित्याला जशी अनमोल देणगी दिली, त्याप्रमाणे त्यांनी अनेक संस्थांनाही देणग्या दिल्या. त्याला तर मोजमापच नाही. एका मुलाखतीत त्यांना विचारण्यात आले होते की - आयुष्याकडे मागे वळून पाहताना तुम्हाला असं वाटतं का काही कमी आहे ? अजून काही करायचं राहिलंय ? त्यावर पु. लं. म्हणाले - "मी जी काही साहित्यनिर्मिती केलीय ते फार मोठं काम केलंय असं नाही. जे जे मनात वाटत गेलं ते ते मी लिहित गेलो. मात्र अजूनही काहीतरी कमतरता आहे असे वाटते. बंगालमध्ये जशी रवींद्रनाथ टागोरांची लोकांच्या मनात प्रतिमा आहे, टागोरांप्रमाणे मला लिखाण करायचं आहे, त्यांच्याप्रमाणे प्रत्येक क्षेत्राला समजावून घेऊन त्याबाबत काम करायचं आहे."

भारतीयांच्या, बंगाली लोकांच्या मनात टागोरांना जेवढं स्थान आहे तेवढंच स्थान महाराष्ट्रीयन माणसाच्या मनात पु. लं. देशपांडे यांच्याबद्दल आहे. टागोरांच्याप्रमाणे त्यांच्या हातून साहित्यनिर्मिती व्हावी हीच त्यांच्या पंच्चाहत्तरी निमित्त शुभेच्छा ! ! !

## विनोद

प्रोफेसर : ही तुम्ही चिंपांझीची कवटी पाहात आहात तो एक फार विरळा असा स्पेसिमन आहे. अशा फक्त दोनच कवट्या आपल्या शहरात आहेत. एक राजा केळकर संग्रहालयात आणि दुसरी माझ्याकडे आहे.

---

"त्या मुलाचा त्याच्या शेवटच्या कॉलेजच्या परीक्षेत काय रिझल्ट लागला ?" "वा ! फारच छान लागला. तो नापास होणाऱ्याच्या लिस्टमध्ये अगदी टॉपला होता."

---

आजोबा : खोटं बोललं की दात लवकर पडतात.
राजू : तरीच तुमचे दात लवकर पडलेत ?

---

एक मनुष्य दुकानात गेला नि म्हणाला, "काल मी आपल्याकडून शाईचे डाग घालवणारं औषध नेलं होतं. ." दुकानदार म्हणाला, "होय, आपल्याला आणखी हवंय का ?" त्यावर तो मनुष्य म्हणाला, "नाही, त्या औषधाचे डाग घालवणारं औषध हवंय."

---

शिक्षक : दीपक, सांग बरं भारतात चहा कुठं कुठं होतो ?
दीपक : सगळ्या हॉटेलात

**अभिजीत साबळे,** अकरावी.

# पारमार्थिक सुखानंदाने भरलेला ज्ञानेश्वरांचा
# अवघाची संसार

अपर्णा धावडे
अकरावी

'सर्व सुखाचे आगर। बाप रखुमा देवीवर' हे ज्ञानेश्वरांचे दैवत. अध्यात्माचे अद्वैती तत्त्वज्ञान संस्कृतसारख्या गहन भाषेत होते, ते सुबोध प्राकृतात 'ज्ञानेश्वरी'द्वारा आणून, विठ्ठल भक्तीची परंपरा ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला लावून दिली. आज हीच विठ्ठलभक्तीची विठ्ठल दिंडी, वारकरी मंडळी आपल्या खांद्यावर वाहून ज्ञानोबा-तुकारामांच्या जयघोषात अध्यात्माची पताका नाचवीत, परंपरेने, श्रद्धेने चालवीत आहेत. दिंडी-पताकांच्या साक्षीने व टाळ मृदंगाच्या तालावर चालणाऱ्या जयघोषातच ज्ञानेश्वरांचा अवघाची संसार सामावला असून, तिन्ही लोक आनंदाने भरून टाकण्याची सत्वशील वृत्ती ही या संसारसरितेची दुथडी आहे. त्यातून 'विठ्ठल, विठ्ठल' म्हणत पैलतिरी जाण्याचा महामंत्र सर्व संतश्रेष्ठांनी आपापल्या परीने सांगितला आहे. ज्ञानेश्वरांनी ही आपल्या तत्त्वनिरुपणात हाच पारमार्थिक सुखाचा महामंत्र विशद केला.

ज्ञानेश्वरांनी पसायदानात 'खळांची व्यंकटी सांडो' असे मागणे विश्वात्मक देवाजवळ मागितले आहे. व्यंकटी म्हणजे वाकडेपणा. बोलण्याचालण्यातील, स्वभावातील वाकडेपणा संपला की, पृथ्वीवर स्वर्ग निर्माण होईल हे निःसंशय ! मनुष्य ऋजुतायुक्त व सज्जन होतो. काही अधिक गुण घेऊन सज्जन जन्माला येतो असेही दिसत नाही. उलट असे आढळते की सज्जनांपेक्षा दुर्जनांच्या ठिकाणी अनेक गुण अधिक असतात. केवळ त्यांचा उपयोग ते चुकीच्या मार्गाने करतात. वाल्याकोळ्याला कोणी तरी नारद भेटावा लागतो. गंगेला कोणीतरी भगीरथ लागतो. मग एकदम जीवनाची दिशा बदलते आणि साठ हजार सागरपुत्रांचा उद्धार होतो.

जगाच्या प्रारंभापासून आजपर्यंत या पृथ्वीतलावर जे संत आणि थोर विचारवंत पुरुष होऊन गेले, त्या सर्वांनी याच विषयाची चिंता वाहिली. "लोक कसे सुखी होतील? दुःखे कशी नाहीशी होतील?"

आपल्या 'पसायदाना'मध्ये अनेक प्रतिमांच्या सहाय्याने ज्ञानेश्वरांनी जिथे सर्व सुखी आहेत आणि दुरितांचा म्हणजेच दुःखाच्या उगमाचा नायनाट झाला आहे अशा आदर्श समाजाचे भावोत्कट वर्णन केले आहे. संताचे हृदय आणि कवीची प्रतिभा यांचा अप्रतिम संयोग झालेले 'पसायदान' जागतिक वाङ्मयात पहिल्या दर्जाचे दर्शन आहे.

■

# वाढती लोकसंख्या - एक समस्या

अजय आडसूळ
द्वितीय वर्ष, कला

देशाची खरी मालमत्ता ही त्या देशातील जनता असते. म्हणून अर्थशास्त्रामध्ये देशाच्या लोकसंख्येचा उल्लेख 'मानव साधन संपत्ती' असा केला जातो. देशाचे आर्थिक जीवन, देशाचा आर्थिक विकास आणि समृद्धी ही सर्व अखेर देशाच्या मानवी साधनसंपत्तीवर अवलंबून असतात. उत्पादनाच्या घटकापैकी ह्या घटकाचा पुरवठा देशाच्या लोकसंख्येवर अवलंबून असतो. श्रम हा उत्पादनाचा एक घटक असतो. एवढेच नव्हे, तर तो एकमेव क्रियाशील घटक असतो. परंतु नवी दिल्लीच्या 'अखिल भारतीय आंतरराष्ट्रीय आयुर्विज्ञान संस्थे'च्या कोपऱ्यावर असलेले लोकसंख्या दर्शविणारे घड्याळ सतत टिकटिक करीत असते. कोपऱ्यावरचा वाहतुकीचा लाल सिग्नल हिरवा होण्याइतक्या वेळात देशाच्या लोकसंख्येत ७० जणांची भर पडलेली आपल्यास आढळून येते.

दरवर्षी ११ जुलै हा दिवस 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून पाळला जातो. यावरून हे लक्षात येईल की वाढती लोकसंख्या ही काही केवळ भारताची नाही तर साऱ्या जगापुढील समस्या आहे. केवळ आजचाच आणि फक्त आपल्यापुरताच विचार करणारा माणूस या समस्येकडे लक्ष देत नाही. पण कोणत्याही नैसर्गिक आपत्तीहून भयंकर आपत्ती या समस्येतून मानवजातीपुढे लवकरच उभी राहणार आहे.

भारतात तर या समस्येने अगदी अक्राळविक्राळ स्वरूप धारण केले आहे. नुसत्याच १९९१ मध्ये झालेल्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या ८५ कोटीच्या वर पोहचली असून २०२५ साली ती चीनपेक्षाही अधिक असण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे भारताच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीवर याचे खूप दुष्परिणाम होत आहेत.

**भारताची लोकसंख्या**

| जणगणना वर्ष | लोकसंख्या (कोटी) | जनन दर (दर हजारी) | मृत्यू दर (दर हजारी) |
|---|---|---|---|
| १९५१ | ३६.१ | ४१.७ | २२.८ |
| १९६१ | ४३.९ | ४१.२ | १९.० |
| १९७१ | ५४.८ | ३७.२ | १५.० |
| १९८१ | ६८.४ | ३२.५ | ११.४ |
| १९९१ | ८४.४ | ३१.० | १०.० |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, सन १९५१ मध्ये भारताची लोकसंख्या ३६.१ कोटी होती. १९९१ मध्ये ती ८४.४ कोटी इतकी झाली. सुमारे ४० वर्षात भारताच्या लोकसंख्येत ४८.७ कोटीने भर पडली आहे. १९५१ मध्ये जननदर४१.७ व मृत्यु दर २२.८ होता व १९९१ मध्ये जननदर ३१.० व मृत्युदर १०.० होता. या आकड्यातील तफावतीवरून आपणास लोकसंख्या वाढ

दिसून येते. लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी जननदर झपाट्याने कमी करणे आवश्यक आहे.

भारतामध्ये लोकसंख्या वाढण्याची अनेक सामाजिक, राजकीय व आर्थिक कारणे दिसून येतात. भारतातील दारिद्र्यामुळे लोकसंख्या जास्त आहे. दारिद्र्यामुळे लोकांची प्रजननक्षमता वाढण्यास शरीरशास्त्रीय व मानसशास्त्रीय कारणेही जबाबदार आहेत, असे तज्ज्ञ मानतात. उपासमार होणाऱ्या लोकांची प्रजननक्षमता आपोआप वाढते. म्हणून न भागविली जाणारी अन्नाची भूक लैंगिक भुकेच्या रूपाने भागविली जाते हे मानसशास्त्रीय कारण होय.

जरी कायद्याने अल्पवयात विवाह करण्यास बंदी आणली असली, तरी प्रत्यक्षात आजही बालविवाह होतात. तसेच आपल्या समाजामध्ये विवाहाची सार्वत्रिकता आढळून येते. अविवाहित स्त्री-पुरुषांबद्दल अनेक प्रवाद पसरतात. त्यामुळे विवाह आवश्यक होऊन बसला आहे. कुटुंब नियोजनाचा शिक्षणाशी निकटचा संबंध आढळून आला आहे. १९९१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण ५२.१ टक्के होते आणि स्त्रियांमध्ये हे प्रमाण ३९ टक्के पेक्षाही कमी होते. मुलांच्या संख्येचा स्त्री शिक्षणाशी असलेला संबंध लक्षात घेता भारतातील ६१ टक्के स्त्रिया निरक्षर आहेत. यामुळे कुटुंब नियोजनाबद्दलचे अज्ञान निर्माण होते. तसेच आजही पुरुषप्रधान संस्कृतीमुळे मुलगा व मुलीकडे वेगळ्या दृष्टिने पाहिले जाते. परिणामी मुलगा होईपर्यंत मुली होऊ दिल्या जातात. तसेच मुस्लिम धर्मातील बहुपत्नीत्वामुळेही मुलांच्या संख्येत वाढ होते.

अतिरिक्त वाढलेल्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण होतात. लोकंख्येच्या वाढीमुळे राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ व दरडोई उत्पादनातील वाढ ही अतिशय अल्पशीच असते. त्यामुळे राहणीमान सुधारत नाही. उलट ते घसरत जाते. ह्या वाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, वस्तूंच्या वाढणाऱ्या किंमती, निवाऱ्याच्या समस्या, अन्नधान्यांचा प्रश्न, रांगेत उभे राहावे लागणे त्यामुळे होणारा कालापव्यय, झोपडपट्ट्यांचा प्रश्न, बेकारी, शिक्षणासाठी होणारी गर्दी, गुन्हेगारी प्रवृत्ती, आरोग्यविषयक सुविधांची टंचाई इ. जीवनमानासंबंधी समस्या निर्माण होतात.

वाढत्या लोकसंख्येच्या ह्या राक्षसाला आळा घालण्यासाठी समाजप्रबोधनाची मोठी निकड आजही भासत आहे. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे व रुग्णालयांद्वारे, संपर्क माध्यमांद्वारे लोकांना माहिती पुरविली पाहिजे. लोकसंख्येचे शिक्षण शाळा, महाविद्यालयातून सक्तीने केले पाहिजे. भारतीयांचे जीवन सुखमय, समृद्ध व उन्नत करण्यासाठी कुटुंब नियोजन हे राष्ट्रीय कर्तव्य मानून या कार्यक्रमाचा सर्वांनी स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. जनजागृतीसाठी आंतरराष्ट्रीय संघटनांची मदत घेतली पाहिजे. खाजगी व स्वयंसेवी संघटनांचा सहभाग वाढविला पाहिजे. सर्व जातींना व धर्मियांना लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे सक्तीचे केले पाहिजे. राजकीय पक्षांनीही या गोष्टीकडे भरपूर लक्ष दिले पाहिजे.

भारतातील लोकसंख्या वाढीचा वेग भीतिदायकच आहे. भविष्यकाळात भारताने हा दर झपाट्याने खाली आणण्यासाठी भारतात युद्धपातळीवरील प्रयत्न करण्याची नितांत गरज दिसून येत आहे.

■

# गॅट आणि भारत

सोपान गाडे
द्वितीय वर्ष, कला

गॅट (General Agreement on Trade and Tarrifs) म्हणजे व्यापार व जकातविषयक सार्वत्रिक तहनामा. दुसऱ्या महायुद्धानंतर पुढारलेल्या पाश्चिमात्य देशांनी हा अस्तित्वात आणला. पुढारलेल्या देशांमधील व्यापारवृद्धी हा या तहनाम्याचा प्रमुख हेतू. १९४८ साली गॅटची स्थापना झाल्यापासून गॅट करारनाम्यात प्रामुख्याने कारखान्यातील उत्पादित वस्तूंचे व्यापार व जकातविषयक प्रश्न विचारात घेतले जात. १९८६ साली सुरू झालेल्या वाटाघाटीच्या आठव्या फेऱ्यात मात्र गॅटची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढविण्याचा प्रस्ताव पाश्चिमात्यांनी मांडला. कृषी उत्पादन व व्यापार, बौद्धिक मालमत्तेवरील हक्क, सेवा-व्यवहार व गुंतवणूकविषयक प्रस्ताव या सर्वांचा समावेश गॅटखाली करावा असा आग्रह पुढारलेल्या देशांनी धरला. भारतातील बडे उद्योग आणि त्यांचे प्रवक्ते डंकेल प्रस्तावाची भलावण करतात. कारण ते बहुराष्ट्रीय कंपन्यांशी हातमिळवणी करून नफा वाढवण्याचे मनसुबे रचत आहेत. भारत सरकार डंकेल प्रस्तावाचे खरे स्वरूप लपवून डंकेल प्रस्तावाला होणारा विरोध बोथट करण्याचा प्रयत्न करत आहे.

भारतामध्ये परकीय कंपन्यांना गुंतवणूक करायची असल्यास कोणत्या क्षेत्रात गुंतवणूक करायला मुभा द्यायची, परकीयांचे भागभांडवल किती प्रमाणात असावे, याबाबत नियमन होते. तसेच निर्यात व मालाचा स्थानिक वापर याविषयी अटी होत्या. ही सर्व बंधने दूर करून परकीय उद्योगांना मुक्त प्रवेश द्यावा असे डंकेल प्रस्ताव सुचवतो. जुलै १९९१ मध्ये 'नाणेनिधी'च्या आदेशाखाली भारताचे आर्थिक धोरण आखायला सुरवात झाल्यावर परकीय गुंतवणुकीवरची बरीच बंधने सरकारने रद्द केली. आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा अनुनय करून त्यांना नफ्याची हमी देण्यापर्यंत मजल गेली. समान वागणुकीच्या पलीकडे जाऊन परकीय कंपन्यांबाबत झुकते माप टाकले जात आहे. अशा रीतीने गुंतवणुकीचे निर्बंध दूर करून बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांना खास किफायतशीर क्षेत्रातच पसारा वाढवत आहेत. मग भारतीयांच्या दृष्टीने ते उत्पादन कसे का असेना! त्यासाठी भारतातील साधनसंपत्तीची उधळण होते. प्रदूषण वाढवणारे कारखानेही भारतात हलवायला त्यांना मोकळीक आहे. कारण सरकारला आज आकर्षण आहे ते परकीय भांडवल गुंतवणुकीचे. आता विचार करण्याजोगी साधी गोष्ट अशी आहे की, या बहुराष्ट्रीय कंपन्या भारतात कशासाठी येणार? असा तर विचार त्यांच्या मनात नाही ना, की चला भारतामध्ये जाऊन ८० कोटी भारतीयांची सेवा करू! त्यामुळे त्या फक्त नफा मिळवण्याचाच प्रयत्न करणार आणि तो कोणत्याही मार्गाने.

गॅटसाठी भारतातील परिस्थिती अनुकूल आहे का? याचा विचार महत्त्वाचा आहे. उदा. ज्या वेळी अमेरिकेत 'कॅमी' साबण तयार होतो, त्या वेळी तेथे 'Quality Control Board' तर्फे ग्राहकांच्या घरापर्यंत सुरक्षितपणे जाऊ शकतो आणि भारतात एखादा ऑफिसर किराणा मालाच्या दुकानात त्याचा दर्जा तपासायला गेला, तर शंभर

रुपयांची नोट घेऊन येतो. एवढेच नव्हे तर येथील महत्त्वाची कागदपत्रे सुद्धा विकली जातात ! म्हणजे भारतीय लोकांत देशाभिमान नाही. याचाच अर्थ आपली परिस्थिती गॅटसाठी अनुकूल नाही.

मुक्त अर्थव्यवस्था, स्पर्धा, मुक्त व्यापार यामधून आपल्याला मोठा फायदा होईल असे भारताला वाटते. पण वस्तुस्थिती वेगळी आहे. आपल्या देशाकडून आधुनिक यंत्रसामग्री, विमाने, इलेक्ट्रॉनिक वस्तू कोणीही विकत घेणार नाही. कारण अनेक देशांना आपल्या फसव्या दर्जाचा अनुभव आहे. अहो आपली वस्तू आपणच विकत घेत नाही तर परकीय कशी घेणार ? आपल्याला तर व्हिडिओकॉन टीव्ही पाहिजे, हिरो होंडा पाहिजे.

परकीयांना आपल्याकडून फक्त फळे, फुले व कांदा, लसूण पाहिजे. त्यामुळे त्याचाच व्यापार फक्त आपल्याला करावा लागेल. अगोदरच अन्नधान्याच्या बाबतीत देशाची दुर्दशा ! त्यात त्याच त्याच पिकांमुळे जमिनी व देशाचा तोटा होईल.

परकीय देश काही आपल्या देशात रेल्वेचे डबे तयार करणार नाहीत किंवा लोहपोलादाचा कारखाना काढणार नाहीत. ज्या सेवाउद्योगांमध्ये पाश्चिमात्य देश वरचढ आहेत अशा सेवाउद्योगांबाबत शिथिलीकरणाच्या शिफारशी डंकेल प्रस्तावात केलेल्या आहेत. विमा, बँकिंग, दळणवळण, दूरसंचार असे भांडवली सेवाउद्योग स्थापण्यास व त्यांना राष्ट्रीय उद्योगाचा दर्जा देण्यास सुचवले आहे. भारतीयांच्या बचतीचा वापर आज राष्ट्रीयीकृत बँका, विमा व इतर सहकारी वित्तसंस्था यांच्याद्वारा काही प्रमाणात तरी सामाजिक उद्दिष्टांसाठी केला जातो.या क्षेत्रात परकीय व खाजगी कंपन्या पसरल्या की भारतीयांच्या बचतीचा वापर केवळ नफेखोरीसाठीच केला जाईल. मोठा नफा देणाऱ्या चैनीच्या वस्तू व सेवाउद्योग, वित्तव्यवहार याकडे अधिक गुंतवणूक वळवून अत्यावश्यक शेती व कुटिरोद्योग क्षेत्राला पतपुरवठ्याची अधिकच चणचण निर्माण होईल. आज शेतीक्षेत्र व लहान उद्योगव्यवसाय यांना सवलतीच्या दराने कर्जपुरवठा केला जातो, तो बंद करण्याचा प्रस्ताव आहे. परिणामी शेतकरी अधिकच अडचणीत येईल आणि जीवनावश्यक अन्नधान्याचा जरूर तेवढा पुरवठा चालू ठेवणेही कठिण होईल.

डंकेल प्रस्तावातील धोरणांशी भारताने स्पर्धा करणे इतके सोपे नाही. कारण बहुराष्ट्रीय वित्तसंस्था महाकाय आहेत. जगातल्या सर्वात मोठ्या 'दा-इची-कानुओ' या जपानी बँकेतली ठेवींची रक्कम भारतातल्या सर्वात मोठ्या राष्ट्रीयीकृत बँकेच्या ठेवींच्या दहापटीहून अधिक आहे. प्रचंड आर्थिक ताकद, वित्त व्यवहारांचे जागतिक जाळे आणि अत्याधुनिक तंत्र यामुळे बहुराष्ट्रीय बँकांची वर्चस्व गाजवण्याची ताकद मोठी आहे. 'बँक ऑफ कॉमर्स अँड क्रेडिट इंटरनॅशनल' या आखाती बँकेच्या उदाहरणावरून आखाती बँका काय काय उद्योग करतात आणि लाखो ठेवीदारांना कशा बुडवतात हे लक्षात येते.

अशा रीतीने ट्रिमस् व गॅट्स मार्फत बहुराष्ट्रीय उद्योग, सेवा, वित्तसंस्था, यांना भारतात मुक्त प्रवेश मिळेल. बड्या जागतिक उद्योग व सेवांच्या हल्ल्यामुळे भारतीय उद्योगांना टिकाव धरणे कठीण होऊन बेकारी वाढेल. काही परकीय उद्योग नव्याने सुरू झाले तरी ते कॉम्प्युटर आणि स्वयंचलित तंत्र वापरत असल्याने फारसा रोजगार उपलब्ध होणार नाही. परिणामी बेकारांची संख्या आजच्या दुप्पट होऊन सुमारे २०० लाखांवर जाईल. असा हा शिथिलीकरणाचा धोका ओळखून भारताने योग्य वेळी योग्य ती पावले उचलली पाहिजेत.

भारत हा शेतीप्रधान देश आहे. येथे ७० टक्क्यांपेक्षा

जास्त लोक शेती करतात. म्हणून त्यांच्या दृष्टीने गॅटकडे बघणे महत्त्वाचे आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत धान्याच्या किमती वाढल्याने तांदूळ, गहू, सोयाबीन यांची निर्यात करायला भारतीय शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळेल असा दावा केला जातो. भारतात असे गृहीत धरले जाते की, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत किंमत वाढली तर त्याचा फायदा भारतीय शेतकरी कमावू शकेल. पण प्रत्यक्षात आजघडीला धान्याच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेवर ५-६ बड्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे नियंत्रण आहे. एकट्या कारगिल कंपनीच्या ताब्यात २५ टक्के धान्यबाजार आहे. धान्य, पशुखाद्य, बियाणे यांच्या व्यापारावर कारगिल कंपनी ३० ते ४० टक्के नफा कमवते. अधिकारी व राजकीय पुढाऱ्यांशी संधान बांधून ती नवी क्षेत्रे पादाक्रांत करते आणि आता भारतामध्येही या कंपनीने चांगले बस्तान बसवले आहे. तिचे जाळे जगभर पसरले आहे, त्यातून भारतीय गरीब शेतकऱ्यांच्या हाती काय लागणार ?

शेतीव्यवसायाचा खोलवर विचार करता विकसित देशात मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरण झाले आहे. धान्य-कापणी, कापूस-वेचणी, ऊस-तोडणी, धार काढणे ही कामे यंत्राने केली जाता. कॉम्प्युटरवर यंत्रांना आदेश सोडणे हे माणसाचे मुख्य काम. याउलट भारतात शेती हे महत्त्वाचे उपजीविकेचे साधन आहे. देशातील निम्मे उत्पादन शेतकरी घरीच खातात. व्यापारी पद्धतीने केवळ नफ्यासाठी थोडीच शेती चालते. शेतीचे आकारमान लहान आहे, उत्पादकता कमी आहे. तसेच बरीचशी शेती कोरडवाहू आहे. आणि दुष्काळ, पूर यांचे संकटही वारंवार येत असते. हे टाळण्यासाठी अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता टिकवणे आवश्यक आहे. तसेच भारतीय शेतकऱ्यांस बाजारातील किमतीतील चढउतारापासून संरक्षण देणे महत्त्वाचे आहे.

भारतातील सर्वसामान्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार केला तर अहोरात्र शेतावर काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला भाकरीबरोबर चटणीवर तेल पाहिजे, सामान्यांना दोन वेळचे अन्न पाहिजे असते. बहुराष्ट्रीय कंपन्याच्या कॉस्मेटिक्सच्या व्यापाराची चर्चा करायला त्यांना वेळ नाही. 'कॅमे' व 'लक्से' ह्या त्यांच्या मूलभूत सवयी नाहीत. कोलगेट किंवा कॅडबरीवाचून तो आनंदाने जगू शकतो. कारण ती देशाची सत्य आणि सद्य परिस्थिती आहे.

जागतिक आर्थिक संबंधांपासून आपण एकटे राहू शकत नाही हे सत्य आहे. कारण जग जवळ येत आहे. आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढत आहे, परंतु हेही तितकेच सत्य आहे की आपल्या देशातील लोकांच्या आर्थिक समस्या, लोकांचे आर्थिक हित यांचे महत्त्व परम आहे. अशा हिताच्या आड येणाऱ्या किंवा त्यावर अधिक प्रभाव टाकणाऱ्या धोरणांना प्राणपणाने विरोध केला पाहिजे. कारण आपल्याला हत्तीचा बळी देऊन त्याच्या कानातील मुंगी वाचवायची नाही. किंवा स्पष्ट शब्दात सांगायचे म्हटल्यास कष्टकरी शेतकऱ्यांच्या, जनसामान्यांच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्या व त्यांच्या अंगाखांद्यावर पोसणाऱ्या बांडगुळांनाच जगवायचे नाही; तर जनसामान्यांचा, कष्टकऱ्यांचाही विचार करायचा आहे. ■

**खोली कशासाठी हवी ?**

एका कंपनीचे शेअर्स अचानक गडगडले. तेव्हा त्या कंपनीच्या मालकाने, हॉटेलच्या मालकाला सतराव्या मजल्यावर खोली मागितली. तेव्हा हॉटेलचा मालक म्हणाला, "सर, तुम्हाला खोली झोपायला हवी आहे की उडी टाकायला ?"

**अभिजीत साबळे, ११ वी.**

# आजची भारतीय शिक्षणपद्धती

संतोष कारडकर
तृतीय वर्ष, वाणिज्य

आजचा तरुण हा अनेक समस्यांमुळे त्रासलेला आहे. जेव्हा आपण तरुणांबद्दल बोलतो तेव्हा सर्वात जास्त चिंतेचा विषय असलेला वर्ग म्हणजे विद्यार्थीवर्ग. त्यांना भेडसावणाऱ्या शैक्षणिक समस्येमुळे विद्यार्थी फार त्रस्त झाले आहेत.

शालान्त परीक्षा उत्तीर्ण होऊन महाविद्यालयात प्रवेश करणारा युवक कोणत्या हेतूने उच्च शिक्षणाकडे वळतो ? उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट विद्यापीठाने कोणते मानले आहे ? शासनाला काय मान्य आहे ? नोकरी मिळविण्यासाठी पदवी आवश्यक आहे, या एकाच कारणामुळे युवक उच्च शिक्षण घेतात. तर आपल्याला चांगले लग्नाचे स्थळ मिळावे म्हणून तरुणी उच्च शिक्षणाकडे वळतात.

जेव्हा आपण भारत या विकसनशील देशाबद्दल बोलतो, तेव्हा आपणास दिसून येईल की येथे शिक्षण आणि समाज यामध्ये फार मोठे अंतर आहे. शिक्षणाची पद्धत आणि देशाच्या गरजा यांच्यात मेळ नाही. शिक्षण पद्धतीत बदल करण्यासाठी शिक्षण पद्धती समाजाभिमुख करणे हेच पहिले पाऊल असायला हवे.

आमच्या उच्च शिक्षणाने जो 'सुशिक्षित' वर्ग निर्माण केला, तो स्वत:ला बुद्धिजीवी हे विशेषण लावून घेतो. त्याच्या मनात श्रमजीवींविषयी आपुलकी व प्रेमभावना अजिबात नसते. असा वर्ग राष्ट्रविकासासाठी मुळीच उपयोगी ठरू शकणार नाही.

जीवनातून शिक्षणाचा उगम होतो. परंतु आजचे शिक्षण म्हणजे आजची बेकारी उद्यावर ढकलण्याची योजना असा अर्थ होत आहे.

'शिक्षण पद्धतीत परिवर्तन करा' असे म्हटले की, केंद्रसरकार राज्यसरकारकडे आणि राज्यसरकार केंद्राकडे बोट दाखविते. जिल्हा परिषद म्हणणार 'राज्यशासन आम्हाला पुरेशी मदत करीत नाही'. आणि राज्यशासन केंद्रसरकारवर आरोप करीत राहणार. विद्यापीठे आणि महाविद्यालये आपण किती दरिद्री आहोत हे व्यवस्थित पटवून देणार. मग हे सर्वजण एकत्र येऊन एकमताने ठरविणार की जे काही परिवर्तन करावयाचे असेल ते जादा आर्थिक बोजा न घेता करावे. त्यामुळे बदल हा फक्त अभ्यासक्रमामध्ये होतो, पद्धतीत नाही.

शिक्षणाचा हेतू नोकरी, व्यवसाय मिळवून देण्यास पात्र होणे हा असावा. परंतु शिक्षणानंतर आपण खरोखरच नोकरी, व्यवसाय करण्यास योग्य होतो का ? प्रत्यक्ष नोकरी, व्यवसाय करताना आपले ज्ञान अपूर्ण आहे असे आढळून का येते ? केवळ विद्यापीठाच्या पदव्या जीवनात नोकरी, व्यवसाय मिळविण्यास अपुऱ्या ठरत असतील तर अशा शिक्षणाचा उपयोग काय ?

विद्यापीठाचे शैक्षणिक धोरण आणि त्याची अंमलबजावणी यात विद्यार्थ्यांची अवस्था 'आज्ञा पाळणाऱ्या' गुलामासारखी होते. शिक्षण म्हणजे साचेबंद व मर्यादित

ज्ञान देणारे साधन नव्हे. या शिक्षणातून माझ्या व्यक्तिमत्त्वाचा किती विकास होतो आहे, असा जेव्हा मी विचार करतो, तेव्हा मला निराशाजनक उत्तर मिळते.

आजची परिक्षापद्धती ही सुद्धा शिक्षण-व्यवस्थेच्या अध:पतनास कारणीभूत आहे. ज्या विषयाचा वर्षभर अभ्यास केला, त्याचे दोन-तीन तासात मूल्यमापन करणारी ही पद्धत अजबच आहे ! स्वतंत्र विचार व संशोधन करण्यास अवसर न देणारी ही पद्धत विद्यार्थ्यांना गाइड पद्धतीची उत्तरे तयार करण्यास प्रवृत्त करते. बुद्धिमान आणि अभ्यासू विद्यार्थ्यांवर हा फार मोठा अन्याय आहे.

महाविद्यालयातील प्रवेशासाठी असलेली झुंबड-गर्दी हा दर वर्षीचाच अनुभव आहे. यातूनच लाच देणे ही पद्धत अस्तित्वात येते. ज्या शिक्षणाने आपल्याला 'लाच घेऊ नये' असे शिकवायला हवे, तेच शिक्षण काही 'विद्यार्थी' लाच देऊन घेत असतात ! यांना विद्यार्थी म्हणणे म्हणजे संपूर्ण विद्यार्थीवर्गाचा अपमानच ठरेल.

विद्यार्थ्यांची संख्या खूप वाढल्यामुळे प्राध्यापक त्यांना दुरावले आहेत. प्राध्यापकांनी दुर्लक्ष केल्यामुळे विद्यार्थी बेशिस्त होतात, भवितव्याची शाश्वती न देणारा अभ्यासक्रम, व्यायामासाठी आवश्यक असलेल्या साधनांचा अभाव, शिक्षणाचा वाढता खर्च आणि त्यामुळे पालकांची असमर्थता ह्या सर्व समस्या अयोग्य शिक्षण व्यवस्थेमुळे निर्माण झाल्या आहेत.

आजचे हे शिक्षण भारताला योग्य, 'सु'-शिक्षित तरुण देण्यास असमर्थ ठरत आहे. त्यात योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत.

■

# तुझे प्रेम आहे !

बंधनातून मुक्त होण्यासाठी,
तू आली होतीस, पण मग काय झाले ?
शब्दांना तुझ्या वाचा का दिली नाहीस,
वळणावर येऊन का वळली नाहीस ?
कारण - तुझे माझ्यावर प्रेम आहे.

अग वेडे ! तुझ्या मनात अजूनही मी आहे,
केव्हाच मी ते जाणले होते;
नाहीतर तुझी पावले अशी थबकली नसती
पापण्या तुझ्या अशा झुकल्या नसत्या
कारण - तुझे माझ्यावर प्रेम आहे.

तुझ्या डोळ्यात चलबिचल दिसते,
पण मी माझी प्रतिमा त्यात स्पष्ट पहाते आहे,
तू सूर गात असलीस दुसरे,
तरी ताल-मृदुंग माझाच आहे
कारण - तुझे माझ्यावर प्रेम आहे

तू कुठलीही फुले वेचलीस,
तरी तुझा सोनचाफा मीच आहे,
नाहीतर तू मला तुझ्या अंगणात एवढे
जपले नसतेस
मनाच्या कुंपणात असे बांधले नसतेस,
कारण - तुझे माझ्यावर प्रेम आहे !

**पौर्णिमा काळे,** तृतीय वर्ष, शास्त्र

# भारताचे नवे आर्थिक धोरण

कु. नीना रणदिवे
अकरावी

१९९५-९६ चे भारताचे नवीन आर्थिक धोरण आपले सध्याचे अर्थमंत्री श्री. मनमोहन सिंग यांनी जाहीर केले.

नव्या आर्थिक धोरणात चार प्रमुख बाबी अनुस्यूत आहेत : पहिली म्हणजे व्यापक अर्थसंकल्पीय तूट मर्यादित करणे, दुसरी उदारीकरण, तिसरी अंशतः खासगीकरण आणि चौथी गोष्ट म्हणजे अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण. बहुतेक आर्थिक उपाययोजना यापैकी एका सदरात मोडते. सरकारची व्यापक अर्थसंकल्पीय तूट मर्यादित ठेवून, निर्बंधाचे शिथिलीकरण आणि जागतिकीकरण यावर प्रामुख्याने, तर खासगीकरणावर काही प्रमाणात भर देत, आर्थिक प्रगतीला चालना देऊन सर्वसामान्य भारतीयांचे जीवनमान सुधारणे, हे नव्या आर्थिक नीतीचे मूलसूत्र आहे. नवे आर्थिक धोरण मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करीत नसून खुल्या रचनेचा आग्रह धरते.

नव्या आर्थिक धोरणामुळे गेल्या साडेतीन वर्षात नेमके काय साध्य झाले, ते जाणून घेण्यासाठी त्या वेळची आर्थिक अवस्था आणि आजची आर्थिक स्थिती याची तुलना करणे क्रमप्राप्त आहे. जर याची तुलना केली तर पुढील बाबी स्पष्ट होतात —

- विदेशी चलनाची गंगाजळी आटत जाऊन त्या वेळी केवळ एक अब्ज डॉलरवर येऊन ठेपली होती, ती आता २० अब्ज डॉलरपर्यंत पोचली आहे.
- आर्थिक विकासाचा दर १९९०-९१ साली १.२ टक्के एवढा कुंठित झाला होता; तो सध्या चार टक्क्यांच्या आसपास असून १९९४-९५ सालात ५.५ टक्क्यांपर्यंत वाढेल, असा अंदाज आहे.
- भाववाढीचा दर ऑगस्ट १९९१ मध्ये १७ टक्क्यांवर जाऊन धडकला होता, तो आता १० टक्क्यांपर्यंत सीमित झाला आहे.
- व्यापक अर्थसंकल्पीय तूट बऱ्याच प्रमाणात आटोक्यात आली आहे.
- विदेशी व्यापाराची चालू खात्यावरील तूट १९९०-९१ साली राष्ट्रीय उत्पन्नाच्या तीन टक्क्याएवढी अवाजवी प्रमाणात होती, ती कमी होऊन १९९३-९४ साली राष्ट्रीय उत्पादनाच्या ०.१ टक्के एवढ्या नाममात्र पातळीपर्यंत कमी झाली आहे.

ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहेच, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे साऱ्या जगाचा आपल्या देशाविषयी बदललेला दृष्टिकोण ! १९९१ साली भारतीय अर्थव्यवस्था म्हणजे 'हाताबाहेर गेलेली केस' असा सार्वत्रिक समज होता. त्यात संपूर्ण बदल होऊन आज भारत देश म्हणजे पुढे-मागे आर्थिक महासत्ता होण्याची कुवत असलेले एक अत्यंत प्रगतशील, विकसनशील राष्ट्र अशी प्रतिमा सर्वदूर होऊ लागलेली आहे. संख्यात्मक बदलाइतकाच हा गुणात्मक बदलदेखील महत्त्वाचा आहे.

नव्या आर्थिक धोरणाबद्दल अत्यंत गैरसमज आहेत,

त्यांचा आता परामर्श घेणे जरुरीचे आहे.

नव्या आर्थिक धोरणाबद्दलचा पहिला मोठा गैरसमज म्हणजे ते गरिबांच्या विरोधात आहे हा ! खुली अर्थव्यवस्था गरिबांना मारक आहे. याउलट सर्वांगाने सरकारीकरणाचा पुरस्कार करणारी पूर्वीची आर्थिक नीती गरिबांना उपकारक आहे, असा समज हेतुतः पसरविण्यात येत आहे. हा सिद्धान्त खरा असेल तर १९९१ पूर्वी भारतात अवलंबण्यात आलेल्या आर्थिक नीतीमुळे आपल्या देशातील गरिबांचे जीवनमान खूप उंचावयाला हवे होते; त्याउलट खुल्या अर्थव्यवस्थेचा पूर्वीपासून पाठपुरावा करणाऱ्या दक्षिण-पूर्व भागातील विकसनशील देशांतील गरिबांची स्थिती अत्यंत दयनीय असायला हवी.

खुल्या अर्थव्यवस्थेमुळे विषमता वाढते. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावते, हा असाच आणखी एक भाबडा समज ! १९८०-९० या दशकात दारिद्र्यरेषेखाली असलेल्यांचे प्रमाण भारतात ४० टक्के एवढे होते. खुल्या आर्थिक धोरणामुळे गरिबांवर अन्याय होत असेल तर खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या देशांमध्ये हे प्रमाण भारताच्या मानाने खूप प्रचंड असायला हवे नाही का ? मग हे प्रमाण थायलंडमध्ये ३० टक्के, इंडोनेशियात २५ टक्के आणि मलेशियात १६ टक्के हे कसे ?

मुक्त अर्थव्यवस्थेमुळे स्वदेशीच्या चळवळीवर घाला पडेल, बहुराष्ट्रीय कंपन्यांची भरभराट होईल आणि गरिबांचे शोषण होईल, असाही युक्तिवाद केला जातो. स्वदेशीमुळे स्वावलंबनाला प्राधान्य द्यावे; आपण इतर देशांवर अवलंबून राहू नये, अशी भूमिका आपल्याकडे घेण्यात आली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंधने घालून, आयातकर प्रचंड प्रमाणावर वाढवून येथील बाजारपेठ संरक्षित करण्यात आली.

बदलत्या जागतिक प्रवाहाच्या संदर्भात स्वावलंबनाचा अर्थ आंतरराष्ट्रीय व्यापारापासून आपण अलिप्त राहावे असा नसून आपल्या आयातीसाठी लागणारे परकीय चलन आपल्या निर्यातीतूनच मिळविण्याचा आग्रह धरावा, असा असायला हवा.

परकीय चलनाबाबत सांगायचे म्हटले तर या नवीन आर्थिक धोरणाने खूपच सुधारणा केलेली आहे. १९८८ या वर्षापासून तुलना करता, भारतात सध्या परकीय चलन येण्याचे प्रमाण अधिक वाढले आहे. परकीय चलन येण्याचे प्रमाण हे १९८८-८९ या वर्षी सर्वसाधारणपणे ८.२ दशलक्ष डॉलर्स होते तर १९९०-९१ या वर्षात ते घटून २ दशलक्ष डॉलर्स एवढे झाले, तर १९९३-९४ या वर्षाकरिता ते १०.९ दशलक्ष इतके विक्रमी झाले आहे. अर्थातच ही समाधानाची बाब आहे.

आठ पंचवार्षिक योजनांतून गेल्या ४०-४५ वर्षात औद्योगिकीकरणाचा पाया घातला गेला आहे. त्यामुळे नव्या आर्थिक धोरणात शासनाने आर्थिक उत्पादकाची भूमिका खासगी क्षेत्राकडे सोपविली आहे आणि मार्गदर्शकाची भूमिका स्वतःकडे ठेवली आहे. खासगी उपक्रमशीलतेतून जास्तीतजास्त उत्पादन वाढ व्हावी म्हणून पायाभूत सोयी उपलब्ध करून देण्यावर शासनाने भर दिला आहे. तसेच शिक्षण, आरोग्य, निवारा यासारख्या सामाजिक अर्थकारणातील समस्यांवर आपले लक्ष केंद्रित केले आहे.

आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम रद्दबातल करावा, असे म्हणणाऱ्यांना धृतराष्ट्राच्या एका वचनाचा दाखला द्यावासा वाटतो — "जे लोक भूतकाळ विसरतात, त्यांना भविष्यकाळ क्षमा करीत नाही." या वचनाचा आपण विसर पडू देऊ नये हे उत्तम !

■

# महिलांविषयी आर्थिक धोरण

माधुरी नरगुंदकर
तृतीय वर्ष, वाणिज्य

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री माननीय शरद पवार यांनी जून १९९४ रोजी जाहीर केलेला महिलांविषयक आर्थिक धोरण हे इतर राज्यांना महिलांच्या प्रगतीसाठी काय करावे यासाठी एक माहितीपत्रकच ठरावे. महाराष्ट्रात हे पाऊल प्रथम उचलले गेले ही आपल्यासाठी एक अभिमानाची गोष्ट आहे. निव्वळ घोषणा, जयजयकार, आश्वासने आणि न पाळली जाणारी वचने यांनी काही महिलांच्या लढ्याला आपण उत्तर देऊ शकत नाही. यासाठी कायद्यात त्यांच्यासाठी आर्थिक तरतुदी करणे हे एक ठोस पाऊल ठरते. कोणतीही व्यक्ती जेव्हा आपल्या स्वतःच्या पायावर उभी राहते व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनते, तेव्हाच ती मानसिकरीत्या पूर्णपणे समाधानी होते. नोकरीत महिलांना ३० टक्के आरक्षण, तसेच प्रशासकीय (IAS, IPS, MPS) सेवेतही महिलांना नोकरीसाठी काही जास्त जागा आरक्षित केल्या गेल्या आहेत. परित्यक्ता स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या पोटगीची रक्कमही वाढवली आहे. महागाईच्या या काळात या रकमेचा त्यांना एक आधार मिळू शकतो. शिवाय ज्या कुटुंबात पालकांना फक्त मुलीच आहेत, अशांनाही नोकरीत आरक्षित केलेल्या जागेचा लाभ होईल. नोकरी मिळाल्याने या मुली पालकांवर अवलंबून न राहता स्वतःच्या पायावर लवकरात लवकर उभ्या राहतील. त्यामुळे पालकांची ओढाताण कमी होईल. पण यासाठी आर्थिक निकष (कुटुंबाचे) लावणेही उचित ठरेल.

खेडेगावात असणाऱ्या अंगणवाडी, बालवाडी यातील कर्मचाऱ्यांच्या पगारातही वेळोवेळी वाढ देण्याची तरतूद या धोरणात केली गेली आहे. त्यामुळे यातील कर्मचारी जास्त गंभीरतेने संस्थेचे काम करतील.

घटस्फोट मागणाऱ्या स्त्रियांची कोर्ट-फी, वकिलांची फी ही जवळजवळ पूर्णपणे माफ करण्यात आली आहे. त्यामुळे जेव्हा या स्त्रिया सासरचे घर सोडून माहेरी येतात, तेव्हा या स्त्रिया कोर्टाची पायरी चढण्याचा खर्च माहेरच्यांवर व त्या स्त्रीवरही न पडता, ती खंबीरपणे केस लढू शकेल.

दूरदर्शन, चलचित्रे, जाहिराती, सिनेमा यात दाखविल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या प्रतिमेतही सुधारणा करण्यासाठी 'लेखी आदेश' ही या धोरणात आहे. त्यामुळे स्त्रियांची एक वस्तू म्हणून होणारी अवहेलना तरी थांबेल, नाहीतर दाढी करण्यासाठी लागणाऱ्या ब्लेडसाठीच्या जाहिरातीत स्त्रिया दाखवून जाहिरातदार काय साधतात ते देव जाणे !

पोलिस दलात ही महिलांची पहिली तुकडी (३०० महिला पोलिस) सामील झालेली आहे. हा बदल पुढे लक्षणीय ठरेल. अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रियांना या महिला पोलिसांपुढे रिपोर्ट दाखल करायला येतील, तेव्हा त्यांच्यापुढे विश्वासाने सत्य कथन करतील.

प्रशासकीय सेवेत स्त्रिया आल्याने काही प्रमाणात तरी 'स्वच्छ कारभार' दिसेल. कारण लाच, भ्रष्टाचार करण्याइतपत मानसिक दुष्टता स्त्रियांमध्ये नाही. जेव्हा एक स्त्री साक्षर होते, तेव्हा सर्व कुटुंब साक्षर होते. तसेच जेव्हा एक स्त्री

जिल्हाधिकारी होईल तेव्हा तो जिल्हाही चांगली प्रगती करेल अशी आशा धरायला काय हरकत आहे ?

नोकरीतही बढती देताना महिलांना ती देण्याची तरतूद या धोरणात आहे. त्यामुळे लग्न झाल्यावर नोकरी सोडण्याचं स्त्रियांचं प्रमाण कमी होईल आणि कंपन्याची लेबर टर्न-ओव्हरची टक्केवारी कमी होऊन, जास्त प्रमाणात काम होऊन कंपनीचं उत्पादन वाढेल व तसंच राष्ट्राचंही. पण कितीही आर्थिक, सामाजिक सुधारणा करून स्त्रीची जर मानसिक गुलामी हटणार नसेल, तर हे धोरणही उपयोगी ठरणार नाही, यासाठी स्त्रियांची मानसिक उन्नती होऊन या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी होणंही महत्त्वाचं ठरत नाही; तर ही धोरणं फक्त कागदावर शोभून दिसतील.

पण आजच्या पिढीला शरद पवार यांनी उपलब्ध करून दिलेली एक नाहीतर अनेक क्षेत्रे आहेत, ज्यात स्त्रियांना आपलं योगदान देता येईल. पण या सर्वात स्त्रियांची मानसिक दुर्बलता नष्ट झाली तरी खूप आहे.



# स्त्री आणि प्रसारमाध्यमे

सौ. अंजली उमाप
तृतीय वर्ष, शास्त्र

पिता रक्षति कौमार्ये । भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्राः । न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥

पित्याने कौमार्यात रक्षण करावे नवऱ्याने यौवनात रक्षण करावे आणि म्हातारपणी मुलाने सांभाळावे, अशा प्रकारे 'स्त्रीला स्वातंत्र्य देऊ नये'. हा पूर्वीच्या काळी मनूने सांगितलेला विचार पुढे समाजात कायम राहिलेला असतानासुद्धा आज स्त्री समाजातील सर्व क्षेत्रात कर्तबगारी गाजवताना दिसत आहे. इंदिरा गांधी, किरण बेदी, पी. टी. उषा अशा कित्येक स्त्रियांनी कर्तबगारी गाजवलेली आहे. पण मासिकं, कादंबऱ्या, दूरदर्शन, रेडिओ, वृत्तपत्रं ह्या प्रसारमाध्यमांनी स्त्रीला जे स्थान दिलं आहे, ते दुय्यम दर्जाचं तसंच भ्रष्ट आहे. त्यामुळे लोकांच्या जाणिवेच्या, अभिरुचीच्या आणि आकलनाच्या मर्यादा संकुचित करून स्त्रीची प्रतिमा अतिशय बटबटीत, ढोबळ, दिखाऊ आणि भ्रष्ट केली आहे. प्रसारमाध्यमं ही ज्ञान, मनोरंजन, करमणूक मिळावी म्हणून वापरली जातात. पण कला, समीक्षा, ज्ञान, गुणवत्ता यातला गर्भितार्थ या माध्यमांनी संकुचित करून टाकला आहे. प्रसारमाध्यमांतून जी स्त्री दाखवली जाते, ती एक तर पारंपरिक स्त्री असते किंवा सौंदर्याने परिपूर्ण असलेली भोगवस्तू असते. आधुनिक प्रसारमाध्यमांनी तर आता एक नवं धाडसी पाऊल उचललं आहे. आधुनिक आणि मोकळे विचार, परपुरुषाशी विनासंकोचपणे घनिष्ठ संबंध ठेवणे आणि कमावलेल्या शरीराचं प्रदर्शन करण्याचे सर्वच धडे या माध्यमातून सहजासहजी दिले जातात.

भारतीय संस्कृतीत परस्त्रीकडे वाईट नजरेनं पाहणे असभ्यपणाचे लक्षण मानलं आहे. पण कित्येक मासिकांवर, मुखपृष्ठावर अश्लील छायाचित्रं छापली जातात. भारतात साडी हा स्त्रीचा पारंपरिक पोशाख तिला जास्त शोभणारा आहे हे कितीही खरं असलं तरी हल्लीचे हिंदी सिनेमे पाहता, हिंदी सिनेमासृष्टीनी याकडे जवळजवळ दुर्लक्षच केलं आहे असंच म्हणावं लागेल. सिनेमात सेन्सॉरच्या कात्रीतून सुटण्यास आवश्यक तेवढ्या कमीत कमी कपड्यात वावरणाऱ्या नट्या दाखवल्या जातात, यास स्पष्टीकरण काय देतात, तर ही कथेची गरज आहे. पण प्रियकर-प्रेमिका बागेत हिंडत असताना किंवा गाणी म्हणत असताना प्रेमिकेला कमी कपड्यात दाखवायची गरज असते का ? खलनायक, दुलारा, दलाल अशा चित्रपटातून द्वयर्थी गाणी दाखवली जातात आणि यातूनच स्त्रीची विपर्यस्त प्रतिमा पुढच्या पिढीच्या मनावर कोरली जाते व वास्तवापासून दूर जाते. एका प्रकारे स्त्रीच स्वतःची प्रतिमा स्वतः डागाळते आहे, हे तिच्या ध्यानात येत नाही आणि इतर माध्यमं त्याला लाभ उठवून प्रतिमेला अधिक भडक रीतीनं डागाळत आहेत.

कॉमिक्स म्हणजे लेखक आणि चित्रकार यांच्या कौशल्याचा समन्वय. पण कॉमिक्सचे नायक साधारणपणे पुरुषच असतात आणि स्त्रिया ह्या त्यांच्यावर अवलंबून असलेल्या सुंदर, निरुपद्रवी बाहुल्या असतात. स्त्रीची प्रतिमा तर अबला म्हणूनच दाखविली जाते. नवरा कोणत्याही क्षुल्लक कारणावरून स्त्रीला सोडतो; पण नवऱ्याच्या घरात कितीही त्रास झाला तरी स्त्रीला नवऱ्याचं घर सोडायला परवानगी नसते. कारण तिच्यावर पातिव्रत्याची कल्पना पहिल्यापासूनच बिंबवली आहे. समाजात खालच्या मानेनं वावरणारी मुलगी ही आदर्श ठरते. तिनं एखादं धाडसी

पाऊल उचलायचं म्हटलं तर तिच्यावर परंपरेची बंधने लादली जातात. दूरदर्शननेही ह्यास हातभार लावला आहे. दूरदर्शनच्या जाहिरातींनी स्त्रीला दिवसभर राबणारी किंवा बाजारू वस्तू व मुलांना वाढवणारी आई दाखवली आहे. लहान मुलांच्या खाण्याच्या गोळयांच्या जाहिरातीतील शिक्षिकेचे रूपांतर तर शेळी, कोंबडी असल्या प्राण्यात करून स्त्रीची प्रतिमा विकृत केली आहे. साबणाच्या जाहिरातीत मॉडेलची आंघोळच आकर्षक रीतीनं चित्रीत केलेली असते. मॉडेलच्या शरीरावरील जेवढे कपडे कमी तेवढी जाहिरात आकर्षक आणि लोकप्रिय होते. सेक्स विषयावर चर्चा, अश्लील पुस्तकांचे वाचन, झी टीव्हीचे दर्शन - यातून स्त्री देहाचे दर्शन, मुक्त संबंध ह्याची वारंवार उजळणी होतच असते. दूरदर्शनच्या केबल सॅटेलाइटने सेक्सदर्शन स्वस्त करून स्त्रीची प्रतिमा उद्ध्वस्त केली आहे.

स्त्रीची प्रतिमा उद्ध्वस्त होण्याचे परिणाम समाजावर दिसून येतात. त्याचं ताजं उदाहरण - जळगाव वासनाकांड. पण समाजावर एवढा मोठा आघात करणाऱ्या या प्रकरणाचा सामाजिक अंगाने कुणीच विचार केला नाही. विचार केला गेला तो निखळ गुन्हेगारी दृष्टिकोणातूनच. स्त्री चारित्र्याबद्दलच्या कल्पना आणि ही कोंडी फोडण्यासाठी काय करावं याविषयी कुणीच विचार केला नाही आणि अजूनही करत नाहीत. जळगावचं प्रकरण हे वासनाकांड एवढंच मर्यादित नाही, तर ब्ल्यू फिल्म्स्, अश्लील साहित्य या प्रकारांनी स्त्रियांवर झालेला हा लैंगिक हिंसाचार आहे. स्त्रीच्या आर्थिक विवंचनेतून शरीर विक्रय होते आणि भोगवादी रंजनासाठी अश्लील साहित्याची निर्मिती केली जाते. आणि त्यामुळेच स्त्रीचं स्वत्वच उधळून टाकलं जातं. समाजातल्या प्रत्येक थराची दडपलेली लैंगिक भूक भागविण्यासाठी सतत काही ना काही जन्माला येत असतं. कधी अश्लील पुस्तकांच्या स्वरूपात तर कधी परदेशी चित्रपटांच्या स्वरूपात, कधी जळगाव कॅसेटच्या रूपानं स्वत:चं रंजन करताना त्यासाठी अनेक मुली बळी पडतात, हे वास्तवही पुरुषजात विसरते ही अत्यंत निंद्य गोष्ट आहे.

आपल्या महाराष्ट्रात अशी-कैक उदाहरणं आहेत. मुंबई नगरीत रिंकू पाटील हत्येसारखा गुन्हा घडला. एल्फिस्टन महाविद्यालयात बलात्कार घडला आणि तो दडपून टाकण्यात आला. आजरा, अकलूज, परभणी ह्या ठिकाणी झालेलं स्कँडल दडपून टाकण्यात आलं. राजस्थान, बिहार या ठिकाणी बालविवाह, सतीप्रथा आदींचे थैमान चालू आहे. अल्पसंख्यांक मुसलमान स्त्रीचे तलाकपीडित जीवन तसेच चालू आहे. पण बलात्कार, अत्याचार होणाऱ्या स्त्रियांचं आणि आपलं नातं काय ? हे शोधायच्या दु:खदायक प्रक्रियेतून जाण्यापेक्षा प्रसारमाध्यमांचा प्रयत्न या प्रश्नांना वळसा घालून पुढे जाण्याचा असतो. नव्या नव्या अत्याचाराच्या, छळाच्या बातम्या छापायला मोठमोठी वर्तमानपत्रे खुषीने तयार असतात. कारण या कहाण्यांमुळे त्यांचा खप वाढतो. येनकेनकारेण प्रसिद्ध भवेत् असाच प्रकार चालू असतो. म्हणजेच ही प्रसारमाध्यमे अश्रू टिपत नाहीत तर अश्रू विकत घेतात.

महाराष्ट्रात गेल्या पिढीत अहिल्या रांगणेकर, मृणाल गोरे, गोदूताई परुळेकर, प्रमिला दंडवते अशा स्त्रिया राजकारणात समर्थपणे उभ्या राहिल्या. त्यांनी आपल्या बाईपणाचे अवडंबर कधीन न माजवता, स्त्रीचे विकृत दर्शन न घडविता, पुरुषांच्या बरोबरीनेच संघर्ष केला. तसेच स्त्रीची डागाळलेली प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पण तरीही सर्वसामान्य स्त्रियांच्या दुहेरी कामाचं ओझं त्यांच्या वाट्याला आले होते ! का ? त्याला त्यांनी कसं तोंड दिलं ? त्यात जरी यश मिळवलं असलं तरी त्याची फारशी नोंदही ह्या प्रसारमाध्यमांनी घेतली नाही ही अत्यंत खेदाचीच गोष्ट मानावी लागेल.

एकूण काय, तर ही प्रसारमाध्यमं स्त्रीची प्रतिमा उज्ज्वल करायची असल्यास मागे असतात तर उद्ध्वस्त करण्यात पुढे असतात.

■

# हुंडाबंदीसाठी समाजपरिवर्तन हवे

सोपान गाडे
द्वितीय वर्ष, कला

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' या उक्तीतून स्त्री-जातीचा किती सन्मान होतो ! 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' हे वचन काय सांगते ? ज्या समाजात स्त्रियांना मान दिला जातो, त्या ठिकाणी प्रत्यक्ष देवतांचा वास असतो. स्त्रीच्या पायाने घरात लक्ष्मीच वास करीत असते. स्त्री ही पिढ्यांची उद्गाती, आदिशक्ती, नवनिर्मितीचा स्रोत असते. एवढंच नाही तर 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' एवढ्या उच्च पातळीपर्यंत स्त्रीची महती वर्णिली जाते. परंतु स्त्रीच्या जीवनाची जेव्हा शोकांतिका होते किंवा सगळ्या बाजूने स्त्रीची कोंडी होते, तेव्हा मात्र आपण नाइलाजाने म्हणतो की, 'स्त्रीजन्मा ही तुझी कहाणी !' ही स्त्रीजीवनाची कहाणी होण्यामागे आजच्या समाजामध्ये काही रूढी, परंपरा व समज-गैरसमज आहेत. त्यापैकी हुंडा हा एक

हुंडा ही एक सामाजिक रूढी आहे. या रूढीमुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात. या गंभीर प्रश्नामुळे मुलींचे लग्नाचे वय वाढत जाते. हुंडाबळींचे प्रमाण वाढत जाते. गुन्हेगारीचे प्रमाण वाढत जाते आणि समाजात हिंसेचे वातावरण निर्माण होऊन समाजस्वास्थ्य बिघडते. यात मुख्य म्हणजे मुलीचा बाप दिवाळखोरीत निघाल्याने अक्षरश: वेडापिसा होतो.

आजच्या समाजाकडे जरा डोळस नजरेने पाहिले तर असे दिसून येईल की, स्त्रीच स्त्रीचा खरा शत्रू आहे. हुंड्याची खरी सुरुवात स्वयंपाकघरातून होते. स्वयंपाकघरातून हळूच आवाज येतो, 'अहो ऐकलंत का ? मी काय-काय सांगितलं ते ध्यानात आहे ना ?' अशा एक ना अनेक माध्यमातून एक स्त्री ही दुसऱ्या स्त्रीचा सतत छळ करते. त्या वेळी तिला कळत नाही की आपणही सून म्हणून घरात आलो आहोत, आपली सूनही उद्या सासू होणार आहे आणि मुख्य म्हणजे आपल्या मुलीचाही प्रश्न असाच आहे. त्या वेळी ती स्वार्थी भावनेने पछाडलेली असते.

कोणत्याही वर्तमानपत्राचे पान आपण उघडले की हुंडा प्रकरणात स्वत:ला जाळून घेणाऱ्या कित्येक दुर्दैवी स्त्रियांच्या करुण कहाण्या वाचायला मिळतात. पूर्वी मेलेल्या नवऱ्याबरोबर बायका सती जायच्या; पण हल्लीच्या बायकांना नवऱ्याच्या जिवंतपणीच सती जावं लागतं. गुरांच्या बाजारांत ज्याप्रमाणे व्यवहार चालतो किंवा सौदेबाजी चालते, तशीच आज लग्नाच्या बाजारातून बघायला मिळते. या हुंडा प्रकरणात अनेक मुलींच्या संसाराचा होम होत आहे, अनेकांचे संसार नष्ट होत आहेत. लक्ष्मीच्या रूपाने घरात पाऊल ठेवणारी मुलगी हाच खरा हुंडा असतो. पण आमच्या पुरुषसत्ताक समाजात, आजही हुंड्याची आवश्यकता लागते हे मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. आज प्रत्येक क्षेत्रात मुली आघाडीवर आहेत. पराक्रमाची सारी क्षेत्रे त्यांनी पादाक्रांत केली आहेत. परंतु आजचा समाज इतका कोडगा आणि गेंड्याची कातडी असणारा आहे की, तो परिवर्तनापासून दूर राहू इच्छितो.

अशा या हुंडा प्रकारामध्ये कोणताही एक पक्ष जबाबदार नसून, वधू-वर हे दोन्ही पक्ष जबाबदार असतात. डॉक्टर, इंजिनिअर यासारखे उच्चभ्रू शिक्षणाचा पैसा वसूल करण्याचे साधन म्हणून याकडे बघतात, तर मुलीचे वडील याला विरोध करायचा सोडून हुंडा देतात. कारण त्यांना

वाटते की माझी लाडकी मुलगी ही २४ तास पलंगावर मासिक वाचत लोळत पडलेली असावी, तिच्या दिमतीला नोकर-चाकर असावेत आणि याच सुखसमाधानापोटी ते हुंड्याची वाट्टेल ती रक्कम मोजायला तयार असतात.

इथेच हुंड्याचा गाडा थांबतो असे नाही. लग्न झाल्यावर सुरवातीचे दिवस गेल्यानंतर सासू-सासरा, नणंदा, दीर हे सर्वजण नवरीमागे हात धुऊन लागतात. मग त्यांची मजल टी. व्ही., स्कूटरपासून ते फ्रीज आणि दागिन्यांपर्यंत जाते. त्यासाठी मुलीला माहेरी पाठवले जाते आणि मग शेवटी मुलीला जाच फार असह्य झाला की एक दिवस ती स्वत:ला जाळून तरी घेते किंवा तिला जाळण्यात येते. अशा प्रकारे माया-ममत्वाच्या ओलीखाली, सुख-दु:खाच्या ऊनसावलीमध्ये जिला अंगाखांद्यावर वाढवलं, तिचं भयाण प्रेत आईवडिलांना पाहावं लागतं ! ही मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.

हुंडा घेणार नाही अशी प्रतिज्ञा करणारे मुलगे लग्नाच्या बोहल्यावर मात्र वडिलांच्या इच्छेचा मान राखण्यासाठी अशी ढोंगीपणाची भूमिका घेऊन लग्नाचा चक्क बाजार मांडतात. एवढंच नाही तरी काही जाती-जमातींमध्ये हुंडा घेणं प्रतिष्ठेचं समजलं जातं. जितका हुंडा जास्त तितका समाज मोठा. याचाच अर्थ असा की हुंडा हा पैसा कमवण्याचा 'शॉर्ट कट' आहे. पण खरं तर तो भयानक आहे.

ही सर्व भयानक परिस्थिती बघितल्यानंतर हुंडाबंदी ही किती महत्त्वाची आहे याची प्रचिती सर्वांनाच येईल. म्हणून हुंडाबंदी हा कार्यक्रम वेगवेगळ्या पातळीवर राबवण्याची आवश्यकता आहे आणि या सर्वांचं मूळ समाजपरिवर्तनात आहे. जोपर्यंत समाजपरिवर्तन होत नाही, तोपर्यंत कुठलीही गोष्ट शक्य नाही. समाजपरिवर्तन हे तीन माध्यमांद्वारे मुख्यत: घडत असतं. यामध्ये क्रांती, कायदा आणि प्रबोधन यांचा समावेश होतो.

क्रांती ही शेवटची अवस्था आहे. क्रांतीमध्ये हिंसा असते. म्हणून हुंड्याच्या बाबतीत क्रांतीचा विचार शक्य नाही. दुसरी अवस्था म्हणजे कायदा. हुंडाबंदीच्या बाबतीत अनेक कायदे झाले. त्यात अनेक सुधारणाही झाल्या; पण त्या फक्त कागदोपत्री. शेवटी कायद्यालाही पळवाटा असतात. म्हणजेच हुंडाबंदी आपण कायद्याने रोखू शकलो नाही, नाहीतर शैला लाटकर, ममता आगरवाल यांनी कोणी जाळलं नसतं किंवा त्यांनीही स्वत:ला जाळून घेतलं नसतं आणि आजही दररोज वर्तमानपत्रांचे रकाने हुंड्याच्या रक्तरंजित बातम्यांनी झळकले नसते.

समाजपरिवर्तनाची महत्त्वाची अवस्था म्हणजे प्रबोधन. आणि समाजप्रबोधन हेच माध्यम हुंड्याच्या सैरावैरा सुटलेल्या घोड्याला लगाम घालू शकेल असा विश्वास वाटतो. कारण समाज परिवर्तनामध्ये मनपरिवर्तन महत्त्वाचे असते. ज्यावेळी मनपरिवर्तन आणि मतपरिवर्तन होते, त्यावेळी कुठलीही गोष्ट अशक्य राहत नाही. कारण मतपरिवर्तन, मनपरिवर्तन, व्यक्तिपरिवर्तन आणि समाजपरिवर्तन झाल्याने हुंड्यासारखी अनिष्ट रूढी आपण बंद करू शकू. यासाठी हुंडाबंदी ही संकल्पना समाजातील सर्व थरापर्यंत पोहचणे जरुरीचे आहे. आणि जेव्हा हुंडाविरोधी सामाजिक जाणीव निर्माण होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने स्त्रीचे समाजातील स्थान पुरुषांबरोबर येईल.

मुख्य म्हणजे आजच्या तरुण-तरुणींमध्ये ही जाणीव निर्माण व्हायला पाहिजे. तरुणांनी ठामपणे सांगितले पाहिजे की 'मी कोणत्याही परिस्थितीत हुंडा घेणार नाही.' तरुणींनीही असे निक्षून सांगितले पाहिजे की 'हुंडा घेणाऱ्या तरुणाशी मी लग्न करणार नाही.' आणि असे झाले तरच सर्व तरुण तरुणी घेत असलेल्या शिक्षणाचा उपयोग झाला असे म्हणता येईल.

■

# युवा-शक्ती

दशरथ भुजबळ
तृतीय वर्ष, कला

आपले राष्ट्र एकेकाळी वैभवसंपन्न होते. जगाच्या गुरुस्थानी होते, परंतु मध्यंतरी देशावर अनेक परकीयांनी अनेक आघात केले. आपले स्वातंत्र्य गेले आणि देश परकीयांचा गुलाम झाला. या दुरवस्थेला कारणीभूत झालेले दोष नाहीसे करून हिंदू समाज सुसंघटित व सामर्थ्यशाली व्हावा आणि पुन्हा आपली ही पवित्र मातृभूमी वैभवाच्या शिखरावर तळपावी, म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांपासून स्वा. सावरकर, वासुदेव बळवंत फडके, सुभाषचंद्र बोस, राजगुरु अशा शेकडो क्रांतिकारकांनी स्वातंत्र्यासाठी आपल्या जीवनाचे बलिदान केले. यापैकी बहुतांशी क्रांतिकारक हे युवक वयोगटातीलच होते. अशी ही देशभक्तीची उज्ज्वल परंपरा याच भारत देशामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात आपणाला आढळते.

आपल्याला स्वातंत्र्य मिळून आज ४७ वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्योत्तर काळातील तरुणांचा विचार केल्यास विविध चांगले-वाईट गुण आपणाला आढळून येतात. प्रामुख्याने १५ ते ३५ या वयोगटातील प्रत्येक घटक हा युवावर्गात मोडतो. युवक म्हणजे आपल्या कर्तृत्वाने जीवनाची उभारणी करणारा घटक. त्याच्या जीवनात ठिकठिकाणी निष्ठेचा आविष्कार दिसून येतो. जीवनात यशस्वी होण्यासाठी त्याची जीवन जगण्याची एक वेगळीच ऐट आपणास जाणवते. अशा युवकाने घेतलेला निर्णय हा अत्यंत खंबीरपणे आणि धैर्याने घेतलेला असतो. त्यामुळे समाज-जीवनामध्ये आज अशा युवकांची अत्यंत गरज आहे.

दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर समाजजीवनाचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, जे कधीही अपेक्षित नव्हते अशा प्रकारचे दिशाहीन जीवन. आमच्या पुढे उभे राहिले आहे. या सर्व परिस्थितीचा अभ्यास केल्यानंतर, असे आढळते की दिशाहीन, ध्येयहीन, कुठल्याही प्रकारचे साध्य डोळ्यासमोर नसलेला, गोंधळाचे थैमान मनात असलेला अशा विचित्र उंबरठ्यावर उभा असणारा युवक आज आढळून येतो. व्यसनाधीन युवकांचे प्रमाण फार मोठ्या झपाट्याने वाढत आहे. अनेक सुकुमार युवक-युवती या व्यसनाधीनतेला बळी पडत आहेत.

भारतातील युवकाला पुन्हा त्याच्या उच्च, उज्ज्वल परंपरेची जाण करून दिली पाहिजे आणि म्हणूनच आजच्या युवा पिढीला योग्य संस्कारांची जोड देणे फार गरजेचे आहे. त्यामध्ये बालपणात होणारे संस्कार हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. या वयात होणारे संस्कार एक प्रकारचा ठसा माणसाच्या जीवनावर उमटवत असतात. हे संस्कार होण्याचे मुख्य ठिकाण म्हणजे आपले घर व घरातील व्यक्ती. घरातील होणाऱ्या संस्काराबरोबरच शिक्षणसंस्थांच्या माध्यमातून होणारे संस्कार देखील तितकेच महत्त्वाचे असतात. गुरुशिष्याचे नाते आजही महाविद्यालयात आढळून येणे आवश्यक आहे. वैभवशाली राष्ट्र उभारणीमध्ये खऱ्या अर्थाने सर्वात मोठा वाटा शिक्षण संस्थांचा असतो. कोणत्या पद्धतीची समाजव्यवस्था उभी करावयाची आहे ? याचा सखोल विचार आजच्या शिक्षणसंस्थांमध्येच घेणे गरजेचे

आहे.

जगाच्या इतिहासात एक दीर्घकाळ संस्कृती लाभलेला वैभवसंपन्न देश म्हणून भारताचे नाव घेतले जाते. परंतु आज आपली ही मातृभूमी विविध समस्यांनी जखडली गेली आहे. तिला या सर्व समस्यांमधून मुक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. पण हे सर्व करावयाचे कुणी ? हा मोठा प्रश्न आहे आणि या प्रश्नाचे उत्तरदेखील एकच आहे आणि ते म्हणजे या देशातील सुसंस्कृत, राष्ट्रनिष्ठेने प्रेरित झालेली 'युवाशक्ती'.

आज आपला देश ज्या परिस्थितीमधून जात आहे, या सर्व परिस्थितीमध्ये बदल घडवून आणण्याचे काम फक्त युवकांमध्येच आहे. म्हणून प्रत्येक युवकाने आज आपल्या मातृभूमीच्या रक्षणासाठी, तिचे ढासळू लागलेले वैभव तिला पुन्हा प्राप्त करून देण्याची गरज आहे. आपल्यातील अस्मिता, राष्ट्रनिष्ठा, स्वाभिमान, सुसंस्कृतपणा याने प्रेरित झालेला युवकच या देशाला पुन्हा त्याची वैभवसंपन्नता प्राप्त करून देईल.

■

## चुटका

शेवंतीलाल टेलिफोनवरून आपल्या मित्राला सांगत होता. "नितीन, आज तू माझ्या घरी येऊ नकोस. पप्पा भलतेच गरम झालेले आहेत. काल रात्री आपण त्यांची मोटार गुपचुप फिरवली हे त्यांना कळलंय."

"ते कसं काय ?" नितीनने विचारले.

"रात्री आपण घाईत घरी परतताना एका माणसाला मोटारीचा धक्का दिला ना, ते पप्पाच होते."

**दशरथ भुजबळ,** तृतीय वर्ष, कला

## सामर्थ्य मनाचे

जगात नाही कुणी कुणाचे
सगळे आहेत एकटे ॥

नैराश्य सगळीकडे वसे,
यशाचा मात्र पत्ता नसे ॥

सर्वजण असे म्हणतात,
नाही आणित शुभ विचार मनात ॥

सुख, दुःख मानणे,
हे काम न आपुले,
. . . . ते काम मनाचे ॥

तुकाने मनाची महती वर्णियली,
'जे न देखे रवि ते मन दाखवी' ॥

ठेवा मन आनंदात,
व्हा स्वर्ग सुखास पात्र ॥

मनच तुम्ही, आम्ही, मी,
मनच निराशा, दुःख शांती ॥

जळू द्या मनामनातील हेवा, दावा, मत्सर,
होऊ द्या विशाल मनास सत्वर ॥

पिळा अन्यायाची मान,
पळू द्या मनांमनांतील घाण ॥

येऊ द्या तनातनावर घाम,
करू द्या मनासि जे न करी दाम ॥

**अभिजीत साबळे,** ११ वी.

# आजचा युवक

अपर्णा जोशी
प्रथम वर्ष, शास्त्र

आजचा युवक हा एक समाजाचा टीकेचा विषय बनलेला आहे. कित्येकांना तो बेजबाबदार वाटतो. कित्येकांना तो ध्येयशून्य वाटतो. पण खरोखरीच तो तसा आहे का?

आपल्या देशातील आजच्या युवकाचा विचार केला तर हा युवक स्वतंत्र भारतात जन्माला आला आहे. स्वातंत्र्यलढ्यात त्याने काही कार्य केलेले नसले, तरी स्वतंत्र लोकशाही राष्ट्राचा नागरिक या नात्याने समाजाकडून त्याच्या काही अपेक्षा आहेत आणि त्या पूर्ण होत नाहीत हे समजताच त्याचे युवारक्त सळसळते. दंगेधोपे होतात आणि मग या युवकांवर टीका केली जाते, 'आजचा युवक बेशिस्त आहे.'

आजचा युवक अनेकदा संतप्त होतो तो बेकारीमुळे, त्याच्यावर होणाऱ्या अन्यायामुळे. या युवकांना अनुभव नाही म्हणून नोकरी नाही आणि नोकरी नाही म्हणून अनुभव नाही. कित्येक वयोवृद्ध लोक जागा अडवून बसलेले आढळून येतात. या अनुभवसंपन्न लोकांनी आजच्या युवकाला संधी दिली पाहिजे. त्यांचे कोठे काही चुकत नाही ना याकडे लक्ष ठेवून त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले पाहिजे.

आजचा युवक हा कर्तृत्वाला परमेश्वर मानतो. जातपात, धर्मपंथ यांना महत्त्व देत नाही. पण राखीव जागांच्या सदराखाली त्याची संधी हिरावून घेतली जाते तेव्हा मात्र तो अतिशय संतप्त होतो आणि मग वैफल्याने आत्मदहनाचा आततायी मार्ग स्वीकारतो. तेव्हा उच्च शिक्षणात वा नोकरी व्यवसायात जातीय तत्त्वावर आधारित अशा राखीव जागांचे अडसर असता कामा नयेत. तर युवकाला त्याच्या कर्तृत्वानुसार, कोणत्याही वशिल्याशिवाय नोकरी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. ही आजच्या युवकाची खरी महत्त्वाची मागणी आहे.

आजचा युवक घरातील पूर्वापार चालत आलेल्या परंपरा जपण्यास तयार नाही. अनेकदा या गोष्टीवरून घरात वादंग माजतात आणि शेवटी "हा दोन पिढ्यांतील खोल दरीचा (जनरेशन गॅप) परिणाम आहे." या निष्कर्षाप्रत वडीलधारी मंडळी येतेच. कदाचित या युवकांची श्रद्धास्थाने वेगळी असतील. एक गोष्ट निश्चित की आजचा युवक हा परंपरावादी नाही. त्याला जे पटेल ते तो करतो. केवळ आई, बाबा, काका करीत आले म्हणून एखादी गोष्ट तो आंधळेपणाने करणार नाही. नाहीतरी केशवसुतांनी सांगितलेच आहे,

"जुने जाऊ द्या मरणालागुनि, जाळुनी किंवा पुरूनी टाका."

देवळातील मूर्तीत आजच्या युवकाला देव दिसत नाही, तर "कर्तव्य हाच परमेश्वर" असे तो मानतो. गरीब जनतेची सेवा हीच खरी ईश्वरसेवा अशी त्याची श्रद्धा आहे. गुढीपाडव्याला घरावर गुढी उभारण्याऐवजी तो त्या दिवशी कर्तव्याचे नवे संकल्प सोडतो. युवकांच्या मते सर्वश्रेष्ठ धर्म आहे तो 'मानवताधर्म'. दानाच्या त्याच्या कल्पनाही आगळ्या-वेगळ्या आहेत. श्रमदान, समयदान, रक्तदान याला तो महत्त्व देतो. कुणाही नेत्याचे पुण्यस्मरण करताना तो

रक्तदानासारखे कार्यक्रम आयोजित करतो. अशा या समाजोपयोगी कार्यातून त्याला फार मोठे समाधान लाभते.

आजच्या युवकांना बुवाबाजी तसेच चमत्काराविषयी तिटकारा आहे, कारण ते त्यांच्या शास्त्रीय दृष्टीला पटत नाही. त्यांचे आदर्श वेगळे आहेत. प्रत्येक क्षेत्रांतील कर्तबगारीचा उच्चांक गाठणाऱ्या व्यक्ती हेच त्यांचे आदर्श असतात. मग संगीताच्या क्षेत्रातील लता मंगेशकर असो, वा क्रिकेटच्या क्षेत्रातील सुनिल गावसकर असो किंवा चित्रपट क्षेत्रातील अमिताभ असो — ती त्यांची असीम श्रद्धास्थाने असतात. या युवकांना उत्कृष्ट चारित्र्याचा ध्यास असतो, म्हणूनच बाबा आमटे ह्यांच्या समाजकार्यात हजारो युवक स्वत:ला झोकून देतात.

जे दिव्य आहे, भव्य आहे, उदात्त आहे, उत्तुंग आहे, अथांग आहे अशा सर्व गोष्टींविषयी आजच्या युवकांना विशेष कुतूहल आहे, आकर्षण आहे. अशा भव्य, उत्तुंग, उदात्त गोष्टींचा ध्यास घेतलेल्या व्यक्तींविषयी त्यांना नितांत श्रद्धा वाटते. ध्येयासक्त पराक्रमी माणसे आजच्या युवापिढीची श्रद्धास्थाने आहेत.

"दिव्यत्त्वाची जेथ प्रचिती
तेथे कर माझे जुळती"

अशांपुढे आजचा युवक आदराने नतमस्तक होतो.

आजचा युवक हा अधिक प्रगल्भ आहे, कर्तबगार आहे, विचारवंत आहे. पूर्वीसारखे 'मुकी बिचारी कुणी हाका !' असे त्याचे स्वरूप राहिलेले नाही. त्याला आपल्या हक्कांची जाणीव आहे. आपले हक्क अबाधित राखण्यासाठी तो जागरूक असतो.

आज समाजाने युवकांपुढे किती चांगले आदर्श ठेवले आहेत? किती चांगली ध्येये ठेवली आहेत? मागच्या पिढीपुढे निश्चित ध्येय होते स्वातंत्र्याचे. त्यांच्यापुढे आदर्श होते एकाहून एका त्यागी ध्येयनिष्ठांचे. असे निश्चित ध्येय आजच्या युवकांपुढे ठेवले, त्यांना समाजात आदर्श दिसले, तर आजचे युवक अफाट कर्तृत्व गाजवून दाखवतील. फक्त समाजाने त्यांच्यापुढे आदर्श ठेवले पाहिजेत. नाहीतर आज आपण समाजात बोकाळलेला भ्रष्टाचार पाहतोच आहोत. त्यामुळे आपल्या गुणांचे, कष्टांचे चीज होत नाही असे पाहिल्यावर हे युवक प्रक्षुब्ध होतात आणि शेवटी वेगळ्याच मार्गाने जातात. तेव्हा आजच्या समाजाने अनेक मोहांपासून दूर राहून युवापिढीपुढे आदर्श ठेवले पाहिजेत. तरच हे युवक योग्य मार्गाला लागतील. फक्त त्यासाठी समाजाने स्वार्थत्याग करून क्रांती करणे आवश्यक आहे आणि अशा समाजबदलाची आज नितांत आवश्यकता आहे. तरच युवापिढी योग्य त्या मार्गाने जाऊन इतरांपुढे आदर्श ठेवेल. परंतु ही गोष्ट समाज बदलल्याशिवाय शक्य नाही.

## विनोद

विदेशी पर्यटकाने दिल्लीचा दौरा करत असताना लाल किल्ला पाहून गाइडला प्रश्न विचारला : हा किल्ला बांधायला किती वर्षं लागली? गाईड म्हणला : २० वर्षं. त्यावर पर्यटक म्हणाला, "आमच्या इथे तर हा किल्ला १० वर्षात बांधून तयार झाला असता."

पुढे कुतुबमिनार पाहून पर्यटक म्हणाला, "हे काय आहे?" त्यावर गाईड म्हणाला, " मला काय माहित? सकाळी मी आलो तेव्हा तर इथे काहीच नव्हतं."

**गजानन गरडे,** तृतीय वर्ष, शास्त्र.

# आजच्या विद्यार्थ्यांच्या समस्या

अभिजीत साबळे
अकरावी, कला

वर्तमानपत्रात नेहेमी बातम्याच बातम्या असतात. 'विद्यार्थ्यांचा विद्यापीठावर मोर्चा', 'विद्यार्थ्यांचा कुलगुरुंना घेराव', 'विद्यापीठाच्या निर्णयावर चिडून जाऊन विद्यार्थ्यांकडून गैरप्रकार' अशा अेक ना दोन . . . वृत्तपत्रे अशा बातम्यांशिवाय जणू चालूच शकत नाहीत. मग आमच्या जुन्या पिढीचा रोल सुरू होतो. 'हे कसले विद्यार्थी? हे तर नुसते गुंड आहेत गुंड!' म्हणजे आमच्या जुन्या पिढीतील लोकांना आजच्या विद्यार्थ्यांचे कसलेच वागणे पसंत नाही. त्यांना त्यांचे आधुनिक कपडे आवडत नाहीत, त्यांची आधुनिक पद्धतीची केशरचना आवडत नाही. त्यांना त्यांचे चित्रपटाचे वेड, टी. व्ही. चे वेड पसंत नाही. पुरुषी वेश परिधान करण्याची मुलींची फॅशन त्यांना रुचत नाही. ह्या त्राग्याची सुरवात पण अशी असते, 'आमच्या वेळी असं नव्हतं बाई. आम्ही शिकलो नाही का? पण ही थेरं नव्हती हो.' मग शेवटी ही बाई मंडळी या निष्कर्षाप्रत येतात, 'या कार्ट्यांनी अगदी ताळतंत्र सोडले आहे. कोण आवरणार यांना? काय शेवट होणार काही कळत नाही!'

पण आजच्या विद्यार्थ्याला काय सोसावे लागते याचा विचार कोणी करते का? शिक्षण क्षेत्रातसुद्धा भ्रष्ट असा आचार फोफावला आहे. कॉलेजव्यतिरिक्त मुलाला कोचिंग क्लासला (नवीनच निघेलेले फॅड) घातले जाते. डबल तणाव सुरू होतो. कोचिंग क्लासला घातल्याचा पाढा त्याला पदोपदी ऐकवला जातो. महाप्रचंड अभ्यासाने तर शैक्षणिक जगताचं पुरतं वाळवंट केलं आहे. मध्ये एकदा कोणत्या तरी व्यंगचित्रकाराचं व्यंगचित्र पाहिलं. एक किडमिडीत मुलगा व त्याच्या डोक्यावरचे अभ्यासाचे ओझे! असे हे चित्र पुरेसं बोलकं आहे. विद्यार्थ्यांचा कल कोठेही असो, त्याने घेतलेल्या विषयात त्याला रुची असो वा नसो, अमुक टक्के पडले की त्या लायकीप्रमाणे ती शाखा निवडावीच लागते.

No man can serve two masters अशी एक म्हण आहे. इथे तर एकाएका वेळेला १०-११ मास्टर्सना तोंड द्यावं लागतं. (क्लासचे आणखी दोन-चार वेगळेच)

त्यानंतर म्हणजे आमची जुगारी परीक्षापद्धती. संपूर्ण अभ्यासक्रमावर परीक्षकाची लहर लागेल त्या भागावर विचारलेले प्रश्न! त्या प्रश्नांची उत्तरे ठराविक तीन तासात कशीतरी उरकायची! मग परीक्षक दहा पंधरा मिनिटात त्यांची परीक्षा करणार, त्या मुलाचं भविष्य ठरणार बरं! पेपर तपासणारा परीक्षकसुद्धा माणूसच असतो. पेपरांची (भरपूर) संख्या व हातात असलेला कमी वेळ यांचा समतोल बसविण्याकडे त्यांचे लक्ष असतेच. त्यामुळे तो त्या एखाद्या विद्यार्थ्याच्या ज्ञानाचे मूल्यमापन करू शकला नाही, तर दोष त्याला तरी कसा द्यायचा?

शिवाय परीक्षेच्या काळात एखादा विद्यार्थी आजारी असेल, त्याचे डोके दुखत असेल, तर बोर्डाच्या परीक्षेत त्याला कमी मार्क्स पडतात . . . म्हणजेच काय, वर्षभर अभ्यास करूनही असा हुषार विद्यार्थी शेवटी नालायक

ठरवला जातो.

आणखी एक खटकणारा मुद्दा म्हणजे राखीव जागांचा. राखीव जागा जरूर ठेवाव्यात. पण एवढ्या नकोत की ज्यामुळे ९० टक्केवाला रडत बसावा व ६० टक्केवाला त्याच्या पुढे जावा !

शिवाय टक्केवारीच्या आकड्यांची सुद्धा आता हद्द झाली आहे ! जिकडे-तिकडे कॉम्पिटेशनचा जमाना आला आहे. त्यामुळे विद्यार्थी अभ्यास ज्ञानार्जनासाठी करत नाहीत, परीक्षेत जास्तीत जास्त मार्क्स मिळविण्यासाठी करतो. आज ९५ टक्के मिळूनही जिथे एम. बी. बी. एस.ला ॲडमिशन मिळत नाही ! तिथे आमच्यासारख्या विद्यार्थ्यांना आजकाल कोण विचारतो ?

नंतर म्हणजे गगनचुंबी लोकसंख्या ! आजकाल लोकसंख्या एवढी वाढली आहे; पण शासनाने तेवढी महाविद्यालयांची संख्या वाढविलेली नाही. पूर्वी विद्यार्थ्याला खूप वर्षे गुरुंचा सहवास लाभत असे. आज वर्गात विद्यार्थी शंभर आणि तास ४५ मिनिटांचा ! मग शिक्षक एका विद्यार्थ्याला अर्धा मिनिटसुद्धा वेळ देऊ शकत नाहीत, तर मग हे वेळेचे गणित जमणार तरी कसे ?

खरं तर आजचा विद्यार्थी उद्याचे भविष्य आहे. त्याच्याकडे जास्त लक्ष दिलं गेलं पाहिजे ही काळाचीच गरज आहे. थोडक्यात सांगायचे तर विद्यार्थी वाईट वागतात म्हणूनच त्यांच्या नावाने केवळ हाकाटी करून किंवा त्यांना नुसते उपदेशाचे डोस पाजून भागणार नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या विविध समस्या लक्षात घेऊन त्यावर कौशल्याने उपाययोजना करणाऱ्या कुशल विचारवंतांची आज आम्हा विद्यार्थ्यांना गरज आहे. असा विचारवंत जेव्हा लाभेल तो सुदिन आमचा आणि देशाचाही !

■

## विधिलिखित

प्रत्येकाला आयुष्यात
सगळं काही मिळत नसतं,
मिळालं नाही सगळं म्हणून,
नेहेमीच रडत बसायचं नसतं !

जेवढं असेल आपल्या नशिबात
तेवढंच आपल्याला मिळत असतं,
काय द्यायचं ? काय ठेवायचं ?
ते देवाने ललाटी लिहिलेलं असतं !

मिळाले जरी विष तरी,
अमृत समजून प्यायचं असतं,
जे काही मिळेल ते,
चांगलं समजून स्वीकारायचं असतं !

डोळ्यातील अश्रू आपल्या,
विधिलिखित पुसू शकत नाहीत,
मग कशासाठी बसायचं,
उगाचच अश्रू गाळीत ?

**कु. सुनंदा कोतवाल,** प्रथम वर्ष, वाणिज्य.

## विनोद

एका निराश झालेल्या गृहस्थाने उंच इमारतीवरून उडी टाकली. दवाखान्यात शुद्धीवर आल्यावर त्याने डॉक्टरांना विचारले, "डॉक्टर, मला का वाचवलेत ? माझ्या जीवनाचा अंत का थांबविलात ?"

डॉक्टर म्हणाले, "मी नाही तुम्हाला वाचविले. पण तुम्ही ज्या दोघांवर पडलात ते दोघे मात्र वर गेले !"

**अभिजीत साबळे,** अकरावी.

# एक सलग नाट्यानुभव

कु. मनस्विनी प्रभुणे
द्वितीय वर्ष, कला

'वाडा चिरेबंदी' - 'भग्न तळ्याकाठी' - 'युगान्त' - त्रिनाट्यधारा; एक सलग नाट्यानुभव.

मराठी माणूस नाटकवेडा आहे. त्याच्या या नाट्यवेडामुळेच मराठी रंगभूमी टिकून आहे. ही नाट्यगंगा अनेक चढउतारांमधून वाहते आहे. तिथे प्रवाह बदलले, नव्या जाणिवा, मानवी मनाचे कल्लोळ; सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तन येत असले; तरी वळणावळणाने अखंड वाहते आहे. या परिवर्तनातून तिने स्वत:चेही रूप बदलले आहे. माणसाला जीवनात तोचतोचपणा नको असतो. माणसाची ही प्रवृत्ती जाणून इथे रोज नवनवे प्रयोग उदयास येत असतात.

मराठी रंगभूमीच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित 'वाडा चिरेबंदी' - 'भग्न तळ्याकाठी' - 'युगान्त' हा त्रिनाट्यधारेतील एक सलग नाट्यानुभव 'आविष्कार' मंचाने गेल्या वर्षी रंगभूमीवर आणला. या त्रिनाट्यधारेबद्दल सुरुवातीपासूनच मनात उत्सुकता होती. या नाटकाच्या निमित्ताने मराठी रंगभूमीवर नवा प्रवाह सुरू झाला आहे. याचे लेखक आहेत महेश एलकुंचवार. तीन नाटकांना एकत्रित करून एक सलग नाट्यानुभव प्रेक्षकांना मिळाला आहे.

या नाटकाचा पहिला टप्पा 'वाडा चिरेबंदी' या नाटकाने सुरू होतो. एलकुंचवारांचे 'वाडा चिरेबंदी' हे नाटक महत्त्वाचे मानले जाते. हे नाटक तसे १९८५ साली प्रथम रंगभूमीवर आले होते. या नाटकाद्वारे जुन्या सरंजामदारांपैकी एका वर्गाचा गुदमरलेल्या जीवनस्थितीचा प्रत्यय मराठी प्रेक्षकांना आणून दिला आहे. या संस्कृतीतील मानवी नातेसंबंध त्यांचा द्वेष-मत्सर-लोभ या प्रवृत्तींचे आणि नितळ माणुसकीचे दर्शन या नाटकातून होते. हे नाट्य धरणगावकर - देशपांड्यांच्या घरात घडते. एकत्र कुटुंब. एकत्र कुटुंबातील व्यक्तींचे वेगवेगळे पैलू, दोन पिढ्यांतील अंतर, कालाप्रमाणे बदलत जाणारी कुटुंबप्रमुखाची व्यक्तिरेखा, कुटुंबप्रमुख झाल्यावर व त्याआधी असणारे त्याचे वर्तन. यातच कुटुंबातील एका व्यक्तीचे शहराकडे स्थलांतर - गावाकडे परत न येण्याचा त्याचा निर्णय - अशा एका घरात घडणाऱ्या घटनांनी हे नाटक वेग घेते.

मनात वेगळीच उत्सुकता निर्माण होते. परंतु या नाटकाचा हा प्रवास इथेच थांबत नाही, तर तो 'भग्न-तळ्याकाठी' या दुसऱ्या भागाच्या रूपाने पुढे चालतो. आता हे नाट्य धरणगावकर-देशपांड्यांच्या पुढच्या पिढीत घडते. पुढची पिढी म्हटल्यावर 'दोन पिढीतल्या अंतरामधील संघर्ष' हा साहजिकच आला. नाटक पाहताना मागच्या पिढीचे प्रश्न आणि पुढच्या पिढीच्या वाट्याला आलेल्या नव्या समस्या यांची तुलना नकळत मनात सुरू होते. भारतीय खेड्यांतील जीवनामध्ये 'शक्ती-वृत्ती-प्रवृत्ती' प्रभावी आणि प्रबळ ठरल्या आहेत. सामाजिक, आर्थिक, समस्यांबरोबर यांनाही सामोरे जावे लागत आहे. एकूणच माणसाचं आयुष्य समस्याप्रधान बनलेलं दिसतं. या सर्वांतून तो आपले

नातेसंबंध जपू शकतो का? असा प्रश्न पडतो. मागच्या पिढीतील आणि या पिढीतील दोन भावांचे नातेसंबंध, समज-गैरसमज, मनात असणारी गावाकडची ओढ; परंतु आधुनिकीकरणामुळे नित्यक्रमात झालेला बदल आणि त्यामुळे आलेली बंधनं याचे वास्तववादी नाट्यमय जीवनदर्शन या भागात घडते.

या सर्वातून माणसाच्या होणाऱ्या फरफटीचा अंत होणार की नाही? आहे हे असंच चालू राहणार का? या कुतूहलातून 'युगान्त' या अंतिम टप्प्यावर नाटक येऊन पोहोचते. 'युगान्त' या नावातच त्याचा अर्थ दडलेला आहे. माणसाच्या स्वभावातील दृढविश्वास, अनेक समस्यांनी अध:पतित जीवन जगत असताना देखील आत्यंतिक सुखलालसेची लागलेली आशा-ओढ. त्यातूनही निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न, त्याच्याशी संवाद साधण्याच्या प्रयत्नातून जीवनाचे सत्य प्रकट होते आणि यातूनच एका युगाचा अन्त होतो.

मानवी अनुभवांचा प्रत्यय देणारी ही त्रिनाट्यधारा एकाच वेळेस वास्तववादी - अस्तित्ववादी - अभिव्यक्तीवादी स्वरूपाचे अनुभव देते. असा अनुभव सगलपणेच अनुभवणे योग्य आणि तोच यातून आठ तास अनुभवण्यास मिळतो. पूर्वीच्या संगीत नाटकांमध्ये अशा प्रकारचे वातावरण बघण्यास मिळायचे. परंतु तो काळ वेगळा होता. सध्याची परिस्थिती - धकाधकीचे जीवन या सर्वातून नाटकासाठी आठ तासांचा वेळ देणं सामान्य प्रेक्षकाला जमत नाही. तिकिटाचा दरही जास्त असल्यामुळे सामान्य प्रेक्षक या नाटकाला दुरावलेले दिसतात. नाटक जर सामान्य प्रेक्षकांपर्यंत पोहचले नाही तर त्याचं फलित काय?

नाटकाच्या इतर जमेच्या बाजू लक्षात घेतल्या, तर नाटकातील वातावरणाच्या वास्तवतेत भर घालण्याचे काम 'नेपथ्य' हा घटक करतो. 'वाडा चिरेबंदीतील' - प्रशस्त वाडा त्यातील बाहेरची ओसरी, बसण्याचा झोपाळा. पाय धुण्याचा छोटा हौद_या सर्व गोष्टींमुळे वास्तवता दिसून येते. तेच नंतर बदलेलं चित्र तेवढ्याच ताकदीने उभं केलेलं दिसतं 'युगान्त' मध्ये. जुन्या रीतीला तडा गेलेला दिसतो. वाड्याची पडझड झालेली दिसते. निसर्गाची सर्वत्र झालेली अवकृपा या दोन विरोधी प्रवृत्ती याच माध्यमातून दिसून येतात.

सुलभा देशपांडे, दीपा श्रीराम, प्रशांत सुभेदार, दिलीप कुलकर्णी, वंदना गुप्ते, किशोर कदम, सचिन खेडेकर या अभिनेत्यांच्या अभिनयामुळं तर नाटक यशस्वी होऊ शकलं. दादीला (पणजी) - (शरयू भोपटकर) खरं तर एक दोन संवाद परत परत तेच म्हणण्यापलीकडे काहीच काम नाही. तरी देखील तेवढ्या वेळांतील अभिनयाने संवाद फेकीत ती सर्वांच्या लक्षात राहते.

खरं तर हे नाटक तीन टप्प्यांत दाखविण्यापेक्षा 'तीन-अंकी' तीन तासांचं दाखविता आलं असतं. परंतु जो परिणाम आठ तासात साधतो तो तीन तासात झाला नसता. टी. वाय. बी. ए. च्या विद्यार्थ्यांना 'वाडा चिरेबंदी' हे नाटक अभ्यासक्रमात असल्यामुळे नाटकाचे तिकिट विद्यार्थ्यांसाठी सवलतीत ठेवले आहे. जेव्हा हे नाटक लागेल तेव्हा विद्यार्थ्यांनी जरूर पाहावे व 'एक सलग नाट्यानुभव' अनुभवावा.

■

# खेडेगावांचा विकास करण्याची गरज

समीर खिरीड
११ वी, वाणिज्य

सध्या खेड्यांतील युवक-युवतींचा लोंढा शहराकडे वेगाने येत आहे. प्रत्येक युवक-युवती शहरांकडे आकर्षित होत आहे. कोणी नोकरी-धंद्यामुळे शहरांकडे येत आहे, तर कोणी आपल्याला सर्व सोयी-सुविधा उपलब्ध होतील, उच्च शिक्षण मिळेल, या आशेने येत आहेत. शहरांत गेल्यावर कुठे ना कुठे नोकरी मिळेल असे त्यांना वाटते. अर्थात त्यांना वाटणारी आशा चुकीची आहे. शहरांत आल्यावर नोकरी मिळण्याबाबत त्यांचा अपेक्षाभंग होतो व ते बेकार होतात.

खेड्यांतून आलेल्या लोकांच्या प्रचंड ओघामुळे शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस फुगत चालली आहे. शहरं गजबजून जात आहेत. लोकसंख्येची कोंडी होत आहे. शहरांत आधीच बेकार असतात. त्यात ही भर पडते. त्यामुळे शहरांत बेकारांची संख्या अधिकाधिक वाढत चालली आहे. ह्या बेकारांना योग्य संगत मिळाली नाही तर ते गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळू शकतात. जागेचा प्रश्न बिकट होत आहे. झोपडपट्ट्यांची संख्या वाढत चालली आहे. त्यातून तेथे दारिद्र्य निर्माण होत आहे. शहरांत प्रचंड लोकसंख्या वाढल्यामुळे विद्यालये, महाविद्यालयांच्या प्रत्येक वर्गात खूप मुले येतात. बसण्यास अडचण होते. प्रत्येकाकडे लक्ष देणे अवघड जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीला, ज्ञानाला आडकाठी निर्माण होते. वर्गात लक्ष न लागणे, तास बुडविणे अशा अपप्रवृत्ती निर्माण होण्याचा संभव असतो.

ह्या गोष्टीला आळा घालण्याचे काम सरकारनेच केले पाहिजे. रोजगाराच्या वाटा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. शेती विकासासाठी उच्च तंत्रज्ञान दिले पाहिजे. शेतकऱ्यांना योग्य त्या सवलती दिल्या पाहिजेत. दळण-वळणाची सोय झाली पाहिजे. विविध वस्तूंच्या, बी-बियाण्यांच्या बाजारपेठा व्हायला पाहिजेत. त्यामुळे त्यांना सारखेसारखे शहराकडे यावे लागणार नाही. तेथील विद्यालयांत प्रभावी शिक्षकांची नेमणूक झाली पाहिजे. त्यांच्या पगारातही वाढ केली पाहिजे. विविध क्षेत्रातील मार्गदर्शन केंद्रे उघडली पाहिजेत. अशा सर्व सोयी-सुविधा त्यांना मिळाल्या तर कोण कशाला आपले गाव सोडेल ?

या सर्व सोयी-सुविधा, विकासाचे कार्य सरकारने केले तर खेडी स्वयंपूर्ण होतील. शहरांचे आकर्षण कमी होईल. शहरांकडे जाणारे खेड्यांतच राहतील. आपल्या देशात शहरांपेक्षा खेडीच जास्त आहेत. त्यामुळे खेड्यांचा विकास झाला की, देशाचा विकास होणार यात दुमत नाही.

■

# प्रेम

अजित गाढवे
१२ वी, वाणिज्य

*"Love is God"* "प्रेम हाच परमेश्वर" असे आपण वाचतो, ऐकतो. पण प्रेम म्हणजे नक्की काय हे कोणी अजूनपर्यंत सांगितले नाही व कदाचित सांगूही शकणार नाही. चित्रपटात किंवा वास्तवात "मी तुझ्यावर प्रेम करतो, मी तुझ्याशिवाय जगू शकणार नाही." असे प्रेमवीर म्हणतात. पण कोणाशिवाय जगू न शकणे यालाच प्रेम म्हणतात. "माझे तुझ्यावर प्रेम आहे" असे म्हणणाऱ्या प्रेमवीरांना प्रेम म्हणजे काय हे तरी माहीत असते का? हे मात्र माहीत नाही.

प्रेम म्हणजे एक बहार आहे. ही सर्वांच्या आयुष्यात एकदा तरी येते. ज्याप्रमाणे वसंत ऋतू येऊन सर्वांना उल्हसित करतो, झाडांना नवी पालवी फुटते, त्याप्रमाणे आपल्या आयुष्यात प्रेमाचा बहर असलेला काळ येतो व आपले आयुष्य एक सुखद वळण घेते. प्रेम साधारणतः महाविद्यालयीन काळात व्हावे असे जास्त वाटते. कारण हा काळ आपल्याला सुखद अनुभव देतो. याच काळात आपले भवितव्य घडवण्याची संधी मिळते. प्रेमाविषयी ओढ असताना आपल्याला एखादी व्यक्ती भेटते. आपण तिच्याशी बोलतो. अशा वेळी प्रत्येकाला वाटते की आपल्याला कोणीतरी जोडीदार हवा, ज्याच्याशी आपण आपली सुखं, दुःखं सांगू शकू, बोलू शकू. मग आपल्याला भेटलेल्या व्यक्तीशी भेटण्याचा, बोलण्याचा तिच्या सान्निध्यात राहण्याचा प्रयत्न करतो आणि एक वेळ अशी येते की त्या व्यक्तीशिवाय आपण थोडा वेळही राहू शकत नाही. त्या वेळी आपल्याला कळते की आपण त्या व्यक्तीवर मनोमन प्रेम करू लागलो आहोत. त्या व्यक्तीवर आपण जे प्रेम करतो ते मनातून निर्माण होते. प्रेम कधी सांगून होत नाही व ते कधी होते हेही कळत नाही.

हल्ली प्रेम करणे ही एक फॅशन झाली आहे. दुसरे लोक प्रेम करतात म्हणून आपणही प्रेम करणे किंवा प्रेम करण्याचा दावा करणे चुकीचे आहे. इतरांप्रमाणे आपणसुद्धा प्रेम केलेच पाहिजे ही समजूत चुकीची आहे. प्रेम कधी करावे लागत नाही. प्रेम नेहेमी होत असते. प्रेम म्हणजे प्रेमच राहावे. प्रेमाचा कधीही खेळ करू नये. प्रेम असफल झाले तर त्या व्यक्तीचा संशय घेऊन त्या व्यक्तीची हत्या करणे हा केवळ कायद्याने गुन्हा नसून त्यांच्या प्रेमाचा, त्यांच्या नात्याचा व प्रेम या गोष्टीचा, प्रेमावरील विश्वासाचा अपमान आहे. प्रेम करताना आपण त्याच्या फळाचा विचार करू नये. प्रेम म्हणजे जगालाच नव्हे तर स्वतःला विसरून केलेले एकनिष्ठ प्रेम.

प्रेमात त्यागाला फार महत्त्व आहे. कारण आपण ज्या व्यक्तीवर प्रेम करतो ती आपल्याला योग्य प्रतिसाद देईलच असे नाही. त्यामुळे कदाचित आपल्याला त्या व्यक्तीचा त्यागही करावा लागतो. पण त्या व्यक्तीनें प्रतिसाद दिला नाही म्हणून त्या व्यक्तीची हत्या करणे योग्य नाही.

प्रेम अमर्याद आहे. प्रेमाची सीमा अजूनपर्यंत ठरलेली नाही. प्रेम हा एक निखारा आहे. त्याला स्पर्श करणारा

नेहेमी त्याच्यातच विलीन होतो. प्रेम कधी शरीरावर करू नये. ते प्रेम होत नाही. प्रेम होण्यासाठी दोन जिवंत शरीरेच नव्हे तर दोन मने एकत्र यावी लागतात. तेव्हाच खरे प्रेम निर्माण होते. प्रेम कधी विकत मिळत नाही. ते जिंकून घ्यावे लागते.

कोणत्याही गोष्टीच्या निरागसपणाला आपण निर्मळ पाण्याची उपमा देतो. पण प्रेमाला ही उपमा देऊ शकत नाही. कारण पाण्यात जो रंग टाकू तो रंग पाण्याला येतो. प्रेम हे स्वच्छच राहते. यात काही मिसळता येत नाही.

गुलाबाचे फूल हे प्रेमाचे प्रतिक मानले जाते, ते केवळ त्याच्या सौंदर्यामुळे किंवा त्याला फुलांचा राजा म्हणतात म्हणून नव्हे, तर गुलाबाचे फूल काटेरी असले तरी ते सर्वांना सारखाच सुगंध देत राहते व मोहित करते म्हणून.

प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी प्रेम केलेच पाहिजे. गुलाबाच्या फुलाला काटे आहेत म्हणून त्याच्या सुगंधाचा आस्वाद घेणे सोडून चालणार नाही. त्याप्रमाणे प्रेमात अडथळे आहेत म्हणून प्रेम करणे सोडून चालणार नाही. प्रेम करणे वा प्रेमात पडणे हा एक सुखद अनुभव आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांबरोबर प्रेमसुद्धा माणसाची गरज आहे. आपण ज्या व्यक्तीवर प्रेम करतो, त्या व्यक्तीची सोबत मात्र सोडू नये.

प्रेम करणे हा गुन्हा नाही. त्यामुळे त्याच्यातील अडथळ्यांना घाबरून प्रेम करणे सोडून चालणार नाही. प्रेम ही एक पूजा आहे. नास्तिक माणूसही ही पूजा करतो.

■

# बासरी

बांबूच्या बनात
अगदी सहजच शिरले होते.
अगदीच अचानकपणे,
'बनानं' मला दिल्याप्रमाणे,
ती 'बासरी' हाती आली.
सुरांची आणि माझी,
थोडीही ओळख
पूर्वी कधीच नव्हती.
पण ती 'बासरी' जणू
मनोगत सांगितल्याप्रमाणे,
माझ्याशी बोलत
कधी सुरात न्हाऊन गेली,
मलाही समजलंच नाही.
जिवाभावाच्या मैत्रिणीसारखी
अगदी अलगद - अलगद
मी मनसोक्त वाजवत होते,
अगदी 'सुरामध्ये' !
तेवढ्यात तू आलीस,
त्या 'बासरी'ला ओढून घेऊन
तिचे दोन तुकडे करून
दूर बनात भिरकावून दिलेस,
तेही वेगळ्या दिशेला.
असं का केलंस ?
निदान हा तरी विचार करायचास,
की तिच्यासारखे 'माझे सूर'
कोण्या दुसरी बरोबर जुळतील का ?
आणि जुळले तरी,
आता बनाकडे मला द्यायला,
दुसरी 'बासरी' तरी राहिलीय का ?
माझ्या नाही तर नाही,
पण निदान-
'बनाच्या' दुःखाचा तरी
विचार करायचा होतास ना ?

**माधवी नडे,** तृतीय वर्ष, शास्त्र

# कोकण : एक निसर्गरम्य परिसर

स्मिता गाडगीळ
प्रथम वर्ष, शास्त्र

त्या दिवशी मी खूप आनंदात होते. त्याला कारणही तसेच होते. आम्ही सर्वजण आज कोकणात जाणार होतो. रात्री ११-३० ची एस. टी. होती. आम्ही दुपारीच सर्व बांधाबांध करून ठेवली होती. संध्याकाळी आम्ही घरातून निघालो व ११ वाजेपर्यंत स्वारगेटला पोहोचलो. मला तर कधी एकदा ११-३० वाजताहेत अन कधी मी एस. टी.त बसते असे झाले होते.

एकदाचे ११-३० वाजले. एस. टी. थांब्यावर येऊन थांबली. एस. टी. वेळेवर आल्यामुळे जरा धक्काच बसला. नंतर सगळ्यांची चढण्यासाठी धक्काबुक्की झाली. आम्ही कसेबसे कोणाला ढकलत, कोणाला तुडवत, कोणाकडून धक्के खात आमच्या आरक्षित जागांवर येऊन ठेपलो.

गाडी सुरू झाली. अर्ध्या-पाऊण तासातच सर्वजण पेंगू लागले, पण मला मात्र झोप येत नव्हती. कारण मला बाहेरील दृश्यं पाहायची होती. घाटातील ते वळणावळणाचे रस्ते, तसेच रात्री सर्वत्र लागलेले दिवे. असंख्य दिव्यांच्या प्रकाशाने दरी प्रकाशमान होऊन गेली होती. मला तर वाटत होते की चंद्राला सोडून सर्व चंद्रिका त्या दरीतच समाविष्ट झाल्या आहेत. पण तेवढ्यातच निद्रापरी आली व मला ती तिच्या सुमधुर सुरांनी झोपवू लागली. जिच्या बरोबर वाराही सुरेख पावा वाजवत होता. पण रातकिड्यांची किरकिर मात्र खटकत होती. या निद्रापरीमुळे मला कधी झोप लागली हे कळलेच नाही.

डोळे उघडले तेव्हा गाडी थांबली होती. आमचे स्टेशन आले होते. 'गुहागर' स्टेशनचे नाव, पण आमचा प्रवास संपला नव्हता. आमचे ठिकाण गुहागरपासून १ तास पुढे प्रवास केल्यावर येणार होते. म्हणूनच आम्ही सर्वजण तोंड धुऊन, चहा पिऊन पुढील प्रवासाला सज्ज झालो.

पुन्हा एकदा प्रवास सुरू झाला; पण तो रात्रीच्या प्रवासाहून वेगळा होता. कारण रात्र सरून पहाट होऊन गेली होती. आता मला दिसत होते, ते तांबड्या मातीतील कौलारू घरे व त्याच्या परिसरात डौलात उभी असलेली उंचच उंच ताडामाडाची, नारळी-पोफळीची झाले. प्रत्येक घराला एक स्वतंत्र मोठेच्या मोठे अंगण, त्यात उभे असलेले तुळशीवृंदावन व त्यासमोरील सुंदर रांगोळी. आम्ही शहरात राहणाऱ्या, फ्लॅट संस्कृतीत वाढलेल्या मुलांना, कोकणातील घरे व त्याभोवतीची हिरवीगार बाग पाहावयास मिळणे म्हणजे इंद्राच्या नंदनवनातच फेरफटका मारणे होय.

त्यानंतर आम्ही वेळणेश्वरला उतरलो. तिथे आमच्या राहण्याची सोय गोखले यांच्याकडे करण्यात आली होती. हे गृहस्थ व त्यांची पत्नी हे दोघेही फारच चांगल्या मनाचे होते. आम्ही आमच्याच घरी आहोत असे आम्हाला वाटत होते. कोकणातील माणूस गरीब जरूर आहे; पण मनाने तो फारच श्रीमंत आहे. त्याला तो शहरातील लोकांप्रमाणे माणुसकी विसरला नाही व विसरणारही नाही; कारण त्याला अजून पैशांची आसक्ती नाही.

तिथेच असलेल्या आमच्या कुलदैवताचे 'वेळणेश्वर'चे दर्शन घेणे हा आमच्या प्रवासाचा मुख्य हेतू होता. दुसऱ्या दिवशी पहाटे उठून, आंघोळी वगैरे उरकून आम्ही देवाचे दर्शन घेतले. देऊळ तसे सुंदर नाही; पण कित्येक हजार वर्षापूर्वी बांधलेले त्याची पडझड फारशी झालेली नाही. आम्ही देवळाच्या गाभाऱ्यात गेलो. देवाचे दर्शन घेतले. तो देवळाच्या मागील बाजूकडून समुद्राच्या लाटांचा आवाज येऊ लागला. आम्ही सर्वजण पळतच मागे गेलो. समुद्राचे ते दृश्य पाहून डोळ्यांचे पारणे फिटले. आमच्या डोळ्यासमोर होता अथांग निळा समुद्र. जिथपर्यंत नजर पोहचत होती तिथपर्यंत पाणीच पाणी निळेशार. असे वाटत होते, जणू काही पाणी व आकाश यामधील क्षितिजच हरवले आहे. समुद्रातील लाटा प्रचंड वेगाने काठाकडे धावत येत होत्या. जसे एखादे लहान मूल आईच्या भेटीला चालले आहे. प्रत्येक लाट म्हणजे निळ्या पाण्यातून वर येणारी असंख्य शुभ्रधवल तुषारांची, फेसाची फुले वाटत होती. जणू काही प्रत्येक लाट देवाला अर्पण करण्यासाठी म्हणून फुलांचा हार घेऊन येत आहे. त्या समुद्रातील बोटी व जहाजे किनाऱ्यावरून पाहिली असता खेळण्यातल्याप्रमाणेच वाटत होती. तेवढ्यात आम्ही पाहिले की, दर्याचे राजे ते कोळी लोक आपल्या जाळ्याबरोबर होडीवर चढले व नंतर त्यांच्या काही साथीदारांनी होडी ढकलली व ते त्यावर आरुढ झाले. कोळीणी त्यांना निरोप देत होत्या.

तेवढ्यातच गोखले काकांनी आम्हाला बोलावले व म्हणाले, "मी तुम्हाला ह्या 'वेळणेश्वराच्या देवालयाची' गोष्ट सांगतो. गोष्ट म्हटल्यावर आम्ही सर्वजण त्यांच्याभोवती जमलो. माणूस लहान असो वा मोठा, त्याला केव्हाही गोष्ट ऐकायला आवडते. ते सांगू लागले : "वेळणेश्वर हे नाव या देवाला पडले, कारण हा देव आपण कोठलीही गोष्ट मागितली असता आपली इच्छा तो वेळ न लावता पूर्ण करतो. पूर्वी येथे एक सावकार राहायचे. त्यांनी एका माणसाला बरेच कर्ज दिले होते व ते तो परत करणेही शक्य नव्हते. तेव्हा असेच एका संध्याकाळी देवळात सगळे बसले असता ते म्हणाले की मला माझे पैसे जर परत मिळाले तर मी त्यातल्या एका पैशाला हात लावणार नाही, तो मी देवळावर खर्च करीन ! आश्चर्य म्हणजे दुसऱ्या दिवशी तो मनुष्य पैसे घेऊन आला. मग त्या सावकाराने नवे देऊळ व तीन मजली धर्मशाळा बांधली. पुढे ते म्हणाले की कुणी विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण आम्ही ही गोष्ट आमच्या वाडवडिलांकडून ऐकली आहे. त्याच दिवशी आम्ही तेथून निघालो, मनात इच्छा होती की अजूनही रहावे, पण अजून आम्हाला बराच प्रवास करायचा होता.

तेथून आम्ही पावसला आलो. पावसचे देऊळ पाहण्यासारखे आहे. ते पूर्णतः संगमरवरी आहे. देवळाच्या गाभाऱ्यावर चांदीचा मुलामा आहे. आत विठोबा रखुमाईची, सावळी, गोजिरवाणी मूर्ती आहे. देवळाच्या मागील बाजूला एक आवळ्याचे मोठे झाड आहे. त्याचे नवल म्हणजे त्याच्या बुंध्यावर गणपतीची मूर्ती आपोआप उमटली आहे व जसा त्या बुंध्याचा आकार वाढतो, तशी ती मूर्तीही वाढत आहे. पावसवरून अम्ही गणपतीपुळ्याला आलो. देवाचे दर्शन घेणे ही आमच्या दृष्टीने महत्त्वाची बाब नव्हती. देवाचे दर्शन ही आई-बाबा व इतर वडील मंडळी यांना अत्यंत महत्त्वाची गोष्ट होती. आम्हाला लुटायचे होते ते तिथले निसर्गसौंदर्य. तरी पण आम्ही देवाचे दर्शन घेतले व डोंगरातून गेलेल्या प्रदक्षिणा मार्गावरून प्रदक्षिणा घातली.

संध्याकाळ व्हायची होती. आम्ही सर्वजण समुद्रकिनाऱ्यावर उभे राहिलो होतो. समुद्राच्या तिन्ही बाजूला डोंगर होते. डोंगर आपल्या इथल्यासारखे बोडके नव्हते;

तर ते पूर्णत: हिरवेगार होते. जणू काही डोंगरावर पाचूंची खाणच आहे असे वाटत होते. आम्ही आता पाण्यात उभे होतो. पायावर येऊन आदळणाऱ्या लाटांमुळे आमचा तोल जात होता. पाण्यात भिजण्याची आणि भिजवण्याची मजा काही औरच आहे. सागराच्या लाटेबरोबर विविध प्रकारचे जीव काठावर येत होते. त्यात वेगवेगळ्या प्रकारचे कीटक होते, शंख-शिंपलेही होते. तसेच खेकडेही होते. पाण्याच्या लाटेबरोबर किनाऱ्यावर येणारे खेकडे पाणी ओसरते न ओसरते तोच रेतीत शिरून पुन्हा पाण्यात जात होते. त्या वेळी त्यांच्या चपळाईचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. ते खेकडे त्यांच्या पाठीमागे त्या रेतीत पाऊलखुणा ठेवून जात होते. तिथे आम्ही चकतीच्या आकाराचा पांढरा भोके असलेला एक सागरी जीव पाहिला, त्याला तेथील लोक 'तारामासा' म्हणत होते. तसेच लाटांबरोबर येणारे शंख-शिंपले विविध आकारांचे व रंगांचे होते. इतके सुंदर व मोहक शंख-शिंपले मी कधीच पाहिले नव्हते. तेवढ्यात सूर्य हळूहळू खाली जाऊ लागला. त्या निळ्या आकाशात आता विविध रंगांच्या छटा दिसत होत्या. केशरी, शेंदरी रंगांनी भरलेले ते आभाळ फारच मोहक दिसत होते. त्याच वेळी त्या भास्कराचे पाण्यात पडणारे प्रतिबिंब तर फारच मोहक होते. जणू काही तो स्वत:चाच मुखडा त्या आरसपाणी पाण्यात बघत होता. बघता बघता त्या हसऱ्या सूर्याने दिवसाला निरोप दिला व संध्याकाळचे आगमन झाले. तो सूर्य आपल्या समुद्ररूपी घरात गेला होता. आता आमचीही घरी परतायची वेळ आली होती. तेवढ्यातच आईने हाक मारली. मी आईला म्हणाले, "जरा थांब आई, हे दृश्य जरा डोळ्यात साठवून तर घेऊ दे. न जाणो पुन्हा आपण इथे केव्हा येऊ अगर येऊच शकणार नाही." ■



# महाबळेश्वर ट्रेक

गीता जोगळेकर
प्रथम वर्ष, शास्त्र

आज 'महाबळेश्वर ट्रेक' संपून तीन महिने झाले, पण अजूनही त्या आठवणी तेवढ्याच ताज्या आहेत. नव्हे, आज त्या पुन्हा पुन्हा जाणवत आहेत. पुन्हा एकदा तिथे जावं आणि त्याच उत्साहाने, त्याच जोषात महाबळेश्वरच्या दऱ्याखोऱ्यातून आणि जावळीच्या जंगलात मनसोक्त भटकावं, अशी प्रबळ इच्छा होत आहे. आज मन भूतकाळातून बाहेर यायला तयारच होत नाही. आणि कसं येणार ? निसर्गसान्निध्याची ओढ एकदा माणसाला लागली की त्याच्यावाचून त्याला राहवत नाही. महाबळेश्वरला न गेलेला माणूस खरं तर विरळाच. पण जेव्हा आम्ही ट्रेक पूर्ण करून परत आलो, तेव्हा ह्या गोष्टीची जाणीव झाली की, पूर्वी आम्ही महाबळेश्वर पाहूनसुद्धा काहीच पाह्यलं नव्हतं. टॅक्सीमधून हिंडत पॉइंट्स पाहायचे, वेण्णा लेक मध्ये बोटीतून हिंडायचं, हॉटेलमधल्या मसालेदार पदार्थांवर ताव मारायचा आणि स्ट्रॉबेरी खात खात परत यायचं, एवढ्यावरच समाधान मानलं होतं आपण. पण खरं महाबळेश्वर दडलं आहे घनदाट जावळीच्या जंगलात, त्यातल्या पाऊलवाटांमध्ये, अजस्र वृक्षांमध्ये आणि त्यात लपून राहिलेला प्राणीपक्ष्यांमध्ये. हिरवेगार गवती गालिचे, धबधबे, लाल माती याचा अमूल्य ठेवा महाबळेश्वरमध्ये दडलेला आहे. आणि अशा वातावरणात आठ दिवस रमून जाण्याची ही जी संधी आम्हाला 'युवाशक्तीने' दिली, त्याबद्दल मी त्यांची शतशः ऋणी राहीन.

अजूनही आठवतो तो पहिला दिवस, ज्या दिवशी आम्ही या उपक्रमाला सुरुवात केली होती. पहिल्या दिवशी ज्या कार्यक्रमाची आम्हाला ओळख करून देण्यात आली, त्या कार्यक्रमाने तर आम्हाला वेड लावले होते. पहिल्याच दिवशी आम्ही ज्याला मिनी काश्मिर म्हटलं जातं, अशा तापोळ्याला गेलो. दुसऱ्या दिवशी आम्हाला वासोटा किल्ल्यावर जायचं होतं. पहाटे चार वाजताच आम्ही सर्वजण तयार होतो. खरं तर दुसऱ्या दिवशीच्या ओढीमुळे खरी झोप लागलीच नव्हती. लाँचमधून बरोबर पावणेसहा वाजता आम्ही निघालो. चारी बाजूला लाला मातीचे आवरण आणि त्यातून नागमोडी वळणाने निघालेले आम्ही. वाटत होतं की असंच या पाण्यातून फिरत राहावं. आम्हाला वासोट्याच्या पायथ्याशी पोचायला बरोबर दोन तास लागले. वासोट्यावर खूप जळवा आहेत. व्यवस्थित लक्ष देऊन चाला असं सारखं सगळे सांगत होते, पण एवढ्या दाट गवतामध्ये जळवा कशा काय दिसणार होत्या कोण जाणे ! पण आम्हाला फारसा त्रास झाला नाही. वासोटा किल्ला पाहिल्यावर खूप वाईट वाटले ते या किल्ल्याकडे झालेले दुर्लक्ष पाहून. किल्ल्यावर एका ठिकाणी गोड्या पाण्याची विहीर आहे. माणसाने दुर्लक्षिले असले तरीही निसर्गाने या किल्ल्याला मुक्त हस्ताने हे वरदान दिले आहे. जवळ जवळ दोन तास लागले आम्हाला वर पोचायला. पण खाली जळवांकडे लक्ष देण्यात आम्ही वर कधी आलो ते कळलंही नाही. सगळ्या किल्ल्यावर मनसोक्त भटकून, त्यानंतर आम्ही लाँचने पुन्हा तापोळ्यावर परत आलो. येताना दिवसभरच्या

पायपिटीमुळे सगळेजण बेसकँपवर येताना बसमध्ये झोपले होते.

त्यानंतर आमचा पुढचा मुक्काम होता प्रतापगड. एकदम वरच्या पायऱ्यांशी उतरून एक पन्नास-साठ पायऱ्या चढल्या की प्रतापगडावर पोहचता येते. पण महाबळेश्वर बेसकँप ते प्रतापगडावरील अफजलखानाची समाधी हे अंतर होते पंधरा किलोमीटर. तेवढे आम्हाला चालून जायचे होते. एरवी आम्हाला चालून जायचं म्हणजे अगदी जिवावर आलं असतं. पण त्या वातावरणात आणि त्या धुंदीत सकाळी सव्वासातला आम्ही अगदी उत्साहात तयार होतो आणि तेही पाठीवर आपलं सर्व सामान सांभाळत, 'शिवाजी महाराज की जय' या गजरात आम्ही बेसकँप सोडला आणि आता आम्ही परत येणार होतो ते एकदम शेवटच्या दिवशी. जसजसा वेळ जायला लागला. तसतसा उन्हाचा त्रास जाणवायला लागला. आम्ही पारगाव येथे पाच-दहा मिनिटांची विश्रांती घेतली. आता कुठे आम्ही खऱ्या ट्रेकला सुरुवात केली होती. प्रतापगड चढून जायला अजून दीडतास लागणार होता. डोक्यावर ऊन, पाठीवर प्रचंड ओझं आणि रखरखीत डोंगर ओलांडत अखेर तब्बल सहा तासांनी आम्ही अफजलखान समाधीपाशी येऊन पोहचलो. तिथल्या सावलीत सगळेजण खाली बसले, ते कोणी उठायलाच तयार नव्हते. पण अजून आम्हाला आमच्या मुक्कामावर पोहोचायला पन्नास-साठ पायऱ्या चढून जायच्या होत्या. तिथे पोहचल्यावर गरम जेवण घेऊन आम्ही सर्व निद्राधीन झालो. घरी असलो म्हणजे आपण जेवणाच्या बाबतीत किती नाटकं करतो आणि आता एवढे श्रम झाल्यावर काहीही खाल्लं तरी आम्हाला गोडच लागत होते.

संध्याकाळी आम्हाला सगळा प्रतापगड पायी हिंडायचा होता आणि हा फेरफटका कायमचा अविस्मरणीय करून ठेवला तो आमच्या कँपलीडरने - अजित मोडक याने. अफजलखान वधाचा इतिहास आम्ही शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला साक्षी ठेवून त्याच्याकडून ऐकला. सगळेजण दीड-दोन तास एका जागी स्तब्ध बसून होते. त्याच्या जोषामुळे आणि मनातील कळकळीमुळे त्याने ती घटना पुन्हा एकदा जिवंत केली. प्रतापगड मुक्काम आणखी एका दृष्टीने अविस्मरणीय ठरला तो कँपफायरमुळे. कडाक्याच्या थंडीत गरम पेय घेत जागवलेल्या रात्रीची मजा काही औरच होती. जवळजवळ दोन वाजेपर्यंत आम्ही सर्व गाणी म्हणणं आणि नाचणं यात रंगून गेलो होतो. दुसऱ्या दिवशी पहाटे उठून लवकर निघायचं हे कोणाच्या गावीही नव्हतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता आम्ही निघालो आणि आश्चर्य म्हणजे रात्रीच्या जागरणाचे चिन्हही नव्हते. आजचा एकूण प्रवास होता तो १४ कि मी.चा; पण कालच १५ किमी चालल्यामुळे याचं आम्हाला काहीच वाटलं नाही. पण जेव्हा आमचा प्रवास सुरू झाला तेव्हा असं जाणवायला लागलं की आज आपण जास्तच दमलो आहोत. वाटेत एका ठिकाणी शिवाजी महाराजांच्या काळात, म्हणजे अडीचशे वर्षापूर्वी बांधलेला पूल आहे आणि महाराजांनी स्थापन केलेले गणपतीचे मंदिर. हा पूल अजूनही तेवढ्याच चांगल्या स्थितीत आहे. आम्हाला आधी उमरठेला जायचे होते. हे गाव वीर तानाजी मालुसऱ्यांचं गाव आहे. पण करंजखिंड ओलांडताना जो उन्हाचा त्रास झाला तेव्हा प्रथमच असं वाटलं की आपण परत बेसकँपवर जावं. पण एकमेकांना सांभाळून घेत, थांबत थांबत अखेर आम्ही करंजखिंड ओलांडली, तेव्हा काहीतरी भव्यदिव्य करून आपण आलो आहोत ह्याचे समाधान सगळ्यांच्या चेहेऱ्यावर जाणवत होते. उमरठे येथे तानाजी मालुसऱ्यांचा पूर्णाकृती पुतळा

आहे. व त्या काळची शस्त्रेही आहेत. त्यानंतर आमचा रात्रीचा मुक्काम होता तो ढवळ्या गावात. हा मुक्काम तुम्ही कधीही विसरू शकणार नाही असं कँपलीडरकडून सारखं सांगण्यात येत होतं. त्यामुळे त्याची उत्सुकताही आम्हाला होती. आणि खरोखरच ढवळ्याचा मुक्काम तेथील गावकऱ्यांनी आणि कँपलीडरनी अजूनही ताजा ठेवला होता. रात्रीच्या कँपफायरला तर तोड नव्हती. ढवळ्या गाव अगदीच छोटं आहे. जेमतेम दहा-पंधरा घरांचे, तेथील लोकांना बसेसचे अप्रूप आहे. पण या खेडवळ व ग्रामीण संस्कृतीतील लोकांनी आमच्यासाठी जो सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला, तो फार सुरेख होता. आणि त्याला जोड मिळाली होती ती आमच्या कँपलीडर - शेखरची. तो भीमसेन जोशींचा शिष्य आहे. आम्ही त्या रात्री झोपलोच नाही. हा कार्यक्रम संपूच नये असंच सारखे सगळे म्हणत होते. त्याशिवाय आमच्या ग्रुपमधील जितेंद्र राठोड हा उत्तम गायक व नकलाकार होता. व्यवसायाने केमिकल इंजिनिअर असलेला हा माणूस आमच्यामधीलच एक होता. खरं तर ग्रुपमध्ये पन्नास वर्षांपासून ते दहा वर्षांपर्यंत सगळ्या वयाचे लोक होते, पण हे अनुभवच असे होते की, वयामधील अंतरं केव्हाच पुसली गेली होती. एकाच समान वेडापायी आम्ही सगळे एकत्र आलो होतो आणि एक कुटुंब असल्याप्रमाणे राहत होतो.

आज ट्रेकचा सगळ्यात अवघड टप्पा, तो म्हणजे महाबळेश्वरमधील आर्थर सीट पॉइंट. हा टप्पा आम्हाला गाठायचा होता तो जावळीच्या निबिड अरण्यातून. जवळ-जवळ चार हजार फूट आम्हाला पादाक्रांत करायचे होते. हा अवघड टप्पा गाठायला आम्हाला जवळ जवळ तब्बल आठ तास लागले. पण सूर्यकिरणे पोहचणार नाहीत एवढं दाट जंगल आणि मध्ये मध्ये वाहणारे झरे यात आम्ही अक्षरशः हरवून गेलो होतो. आणि वाटेत वनस्पतींची एवढी विविधता होती की वेगवेगळे नमुने गोळा करत आम्ही सहज वर निघून आलो. ऑर्थरसीट पॉइंट चढायला जास्त अवघड होता. एका बाजूला खोल दऱ्या व एका बाजूला डोंगर यातून एका वेळी एकच माणूस जाऊ शकेल अशी पायवाट. येथून जाणे हा खरोखरच थरारक अनुभव होता. वरती पोहचल्यावर जेव्हा इतर सगळे पर्यटक आश्चर्याने पाहात होते, तेव्हा आम्हाला आमच्या ट्रेकचा खूप अभिमान वाटला. जिथे सगळेजण गाड्यांमधून येतात आणि वरून खालचे घनदाट अरण्य पाहतात, त्याच अरण्यामधून यशस्वीपणे आम्ही वरती पोहचलो होतो. आपण काहीतरी वेगळे केले आहे ही भावना आम्हाला सुखावत होती. तसेच मग आम्ही क्षेत्र महाबळेश्वरला गेलो. आज आम्ही १८-१९ कि. मी. चाललो हे कळल्यावर कोणाचाच त्यावर विश्वास बसत नव्हता.

आता हळूहळू सर्वांना परतीचे वेध लागले होते. परत जायचा दिवस हळूहळू जवळ येत होता. दुसऱ्या दिवशी मग आमचा शेवटचा मुक्काम होता तो 'लिंगमळा वॉटरफॉल्स'जवळ रेस्ट हाऊसवर. प्रथमच पुन्हा आम्ही कृत्रिम वातावरणात परत येत होतो. तेथील धबधब्यावर जवळजवळ दोन तास आम्ही मनसोक्त भिजलो. एवढ्या कडक थंडीमध्येही सगळेजण त्या थंड पाण्याची मजा अनुभवत होतो. रात्री तिथे आम्हाला वेगवेगळे स्लाइड-शो दाखविले गेले आणि मग आमचा शेवटचा कँपफायर झाला, प्रत्येकाने त्याची पुरेपूर मजा लुटली. उद्या काही आपण इथे एकत्र नसणार याची जाणीव प्रत्येकालाच होती व त्यामुळेच प्रत्येकजण या कँपफायरचा आपापल्या परीने आस्वाद घेत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी कँपवर एक प्रकारची खिन्नता

पसरलेली होती. आठ दिवसांचा उत्साह एकदम नाहीसा झाला होता. आम्ही पुन्हा एकदा बेसकँपवर परत आलो. तिथे आमचे स्वागत करायला सगळेजण हजर होते. त्यानंतर नको वाटणारा असा निरोपसमारंभ. घरी जायची ओढ तर सगळ्यांना लागलीच होती पण त्याबरोबर निसर्गसहवासातून पुन्हा त्याच चाकोरीबद्ध जीवनात जाणंही कोणाला पटत नव्हतं. प्रत्येकाच्या मनात अजूनही आठ दिवसांच्या आठवणीं तेवढ्याच नव्या होत्या. शब्दच सुचत नव्हते भावना व्यक्त करायला. आमच्या सर्वांतर्फे मनोगत व्यक्त करताना जितेंद्र म्हणाला, "या ट्रेकमुळे मला जीवनभर आठवणीत राहतील असे एकतीस मित्र मिळाले आहेत." त्यानंतर आम्ही सगळे आपापल्या तयारीत गुंतून गेलो. जाताना आम्ही सर्वांनी मिळून "चलते चलते मेरे ये गीत याद रखना" हे गाणं म्हणत एकमेकांचा निरोप घेतला.

या ट्रेकमुळे मला काय नाही मिळालं? वेगवेगळे मित्र मिळाले, निसर्गाचं वेड लागले, चालण्याची सवय लागली. आणखी असं बरंच काही. आम्हाला चांगल्या सवयी पण लागल्या. निसर्गाच्या अनमोल संपत्तीची जोपासना करण्याची. या महाबळेश्वर ट्रेकने ग्रामीण संस्कृतीचा खूप जवळून परिचय झाला. आणि मनातल्या भावना त्या शब्दात कशा उतरवणार? एवढं वर्णन केलं पण अजूनही वाटतं की बरंच लिहायचं राहूनच गेले. काय करणार . . . शब्दच अपुरे पडतात.

■

## नातं

बहरलेल्या चाफ्याचं
अन् पायाशी पसरलेल्या मातीचं,
एकमेकांशी 'नातं' एकच . . . .
'सुगंधाचं' !

**माधवी नडे,** तृतीय वर्ष, शास्त्र



# असे लागले शोध

नीना रणदिवे
अकरावी, वाणिज्य

'Necessity is the mother of invention', असे म्हटले जाते, यात काही तथ्य नाही असे नाही. परंतु बरेचसे शोध केवळ योगायोगानेच लागतात. आर्किमिडीस पाणी भरलेल्या टबात स्नानासाठी उतरतो काय आणि त्याला एका महान शोधाचे गुपित उलगडावे काय - हा एक अजबच योगायोग म्हणावा लागेल. परंतु शोध लावण्याची जिद्द माणसाला असायला पाहिजे. जगाला उपकारक ठरणारे वैद्यक शास्त्रातले अनेक शोध योगायोगाने लागले आहेत.

१९२८ चा लंडनमधील एक हिवाळी दिवस. बाहेर थंडीचा कडाका चांगलाच असला तरी, सेंट मेरी इस्पितळातल्या एका प्रयोगशाळेत सुखद उबदार तापमान होते. स्टॅफायलोकॉक्कस जातीच्या जीवाणूंना थंडीची बाधा होते म्हणून, अलेक्झांडर-फ्लेमिंग यांच्या उबदार प्रयोगशाळेत, या जंतूंच्या वसाहती लहान लहान काचेच्या ताटल्यांवरच्या (Petri dishes) माध्यमांवर वाढवीत होता. खरचटल्यासारखी एखादी लहानशी जखम असू द्या की माणसाच्या शरीरात शिरण्यासाठी या जंतुंना ऐसपैस वाट मिळते. त्यांची लागण रक्तातून शरीरभर होते. या जीवाणूंच्या अस्तित्वाने जखमा चिघळतात. अंगावर फोड येतात, इत्यादी. या जीवाणूंच्या अनेक वसाहती फ्लेमिंगच्या प्रयोगशाळेत होत्या. त्यांच्यात काय काय फरक पडत जातो याचे निरीक्षण चालले असताना एक विवक्षित काचेची बाटली पाहताच 'अरेच्चा' असा आश्चर्योद्गार फ्लेमिंगच्या तोंडातून बाहेर पडला. तो जे बघत होता तो संपूर्ण जगाला आश्चर्यचकित करणारा शोध होता. परंतु फ्लेमिंगला त्या क्षणी तरी त्याची जाणीव नव्हती. त्याच बरोबर पुढे जगावर उपकारक ठरणाऱ्या ज्या अनेक शोधांची मालिका निर्माण होणार होती याची ती नांदी होती, याचीही त्याला यत्किंचितही जाणीव नव्हती.

फ्लेमिंगला त्या ताटलीत जंतूभोवती हिरव्या, निळ्या बुरशीचे किडे दिसून आले. आपण घरात पान किंवा मिठाई उघडी ठेवली तर अशी बुरशी त्याच्यावरही दिसते. चुकून फ्लेमिंगच्या प्रयोगशाळेत या बुरशीच्या बीजांनी एक महान कामगिरी नकळत केली होती. त्याचे सगळ्या जगावर महान उपकार झाले. फ्लेमिंगला आश्चर्य वाटले ते त्याने पाहिलेल्या बुरशी भोवतालच्या एका पारदर्शक कड्याचे. याचा अर्थ असा होतो की स्टॅफायलोकॅक्कस या जंतूंचा कोण्या अनामिक शत्रूने फडशा पाडला होता. तेव्हा फ्लेमिंगने असा तर्क काढला की या बुरशीमुळेच जंतूंचा नाश झाला असावा. या बुरशीचे नाव होते 'पेनिसिलियम नोटॅटम' (Penicilium notatum). फ्लेमिंगने ही बुरशी त्याच्या प्रयोगशाळेत वाढविली व तिच्या पासून एकप्रकारचा काढा तयार केला. त्याने त्याच्या प्रयोगशाळेतल्या उंदरांच्या एका गटात स्टॅफायलोकॉक्कस जंतू सोडले आणि दुसऱ्या गटातल्या उंदरांना त्याने तयार केलेल्या काढ्याची इंजेक्शन्स दिली. सर्व उंदीर जे एरव्ही या जंतूंची लागण झाल्याने मेले असते, ते या इंजेक्शनमुळे खडखडीत बरे झाले. जीव वाचवणाऱ्या पेनिसिलीनचा अशा रीतीने जन्म झाला. फ्लेमिंगने जेव्हा हा शोध प्रसिद्ध केला, तेव्हा त्याच्याकडे

कोणीच फारसे लक्ष दिले नाही. एवढा महान शोध; परंतु त्याची उपेक्षाच झाली. काळ सरकत राहिला आणि सहा वर्षांनंतर ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या काही संशोधकांचे फ्लेमिंगने लावलेल्या शोधाकडे लक्ष गेले.

त्यानंतर पुन्हा बारा वर्षांचा काळा लोटला. एका इस्पितळात एक रोगी चेहेऱ्यावरच्या जखमांमुळे अत्यवस्थ होता. त्याच्या अंगात १०५ डिग्री ताप होता. एका कुप्रभाती नेहेमीप्रमाणे दाढी करती असतांना त्याच्या चेहऱ्यावर काही जखमा झाल्या. त्यातून स्टॅफायलोकॉक्कसचे शत्रूसैन्य त्याला नकळत त्याच्या शरीरात शिरले आणि त्यानी धुमाकूळ घातला. डॉ. हॉवर्ड फ्लोरी आणि अर्न्स्ट चेन या ऑक्सफर्ड विद्यापीठातल्या संशोधकांनी तोपर्यंत शुद्ध स्वरूपात अल्पप्रमाणात पेनिसिलिन तयार करण्यात यश मिळविले होते. एक शेवटचा प्रयत्न म्हणून त्यांनी हे पेनिसिलिन, शेवटच्या घटका मोजीत असलेल्या वरील रोग्याला देऊन पाहण्याचे ठरविले. या पेनिसिलिनचे इंजेक्शन मिळताच रोग्याचा ताप उतरला; त्याला थोडे बरेसुद्धा वाटायला लागले होते. परंतु 'देव मारी त्याला कोण तारी !' त्याच्या शरीरातल्या लक्ष लक्ष जंतूंचा नाश करण्यात पेनिसिलिन अपुरे पडले आणि रोगी ख्रिस्तवासी झाला. मात्र या प्रयोगाने पुन्हा एकदा सिद्ध झाले होते की, पेनिसिलिनमुळे मृत्यूवर मात करता येणे शक्य आहे.

केवळ पेनिसिलिन अपुरे पडले म्हणूनच रोगी दगावला होता. या नंतर मात्र पुरेसे पेनिसिलिन तयार करण्यात आले. त्या इस्पितळात एक १५ वर्षांचा मुलगा स्ट्रेप्टोकॉकस (Streptococcus) ची लागण झाल्याने मृत्यूपंथाला लागला होता. त्याला पेनिसिलिनची इंजेक्शनं देण्यात आली आणि तो खडखडीत बरा झाला. पेनिसिलिनने मृत्यूवर मात केल्याचा पहिला विजय नोंदविला गेला.

पहिल्यांदांच मृत्यूला हात हालवीत परत जावे लागले. पेनिसिलिनच्या खऱ्याखुऱ्या व्यापारी उत्पादनाला सुरवात झाली ती दुसऱ्या महायुद्धात डॉ. प्लोरी अमेरिकेत गेला आणि सोबत पेनिसिलीनचे शुद्ध स्वरुपात असलेले माध्यम घेऊन गेला. अमेरिकेतले धनिक कारखानदार मोठ्या हिरीरीने पुढे सरसावले आणि पेनिसिलीनचे फार मोठे उत्पादन व्हायला लागले. हजारो, नव्हे लाखो सैनिकांचे प्राण या औषधाने युद्धकाळात वाचविण्याची महान कामगिरी केली. दुसऱ्या महायुद्धानंतर पेनिसिलीन सर्व सामान्य जनतेसाठी उपलब्ध झाले. या औषधाने जगभर जी जादू केली तिला औषधांच्या जगात तोड नाही.

पेनिसिलीन प्रमाणेच स्ट्रॅप्टोमायसिन या अतिशय प्रभावी अन्टिबायोटिकचा शोधही असाच योगायोगानेच लागला आहे. १८८८ साली रशियाच्या युक्रेनमधल्या बर्फाच्छादित उघड्या बोडक्या माळरानावरच्या एका लहानशा गावात सेलमन बॉक्समनचा जन्म झाला. लहानपणीच सेलमनची बहीण घटसर्पाच्या रोगाने दगावली होती. सेलमन गावातले आजारी लोक पाहायचा, त्यांची सेवा-शुश्रुषा करायचा. होईल तेवढी मदत द्यायचा. हा गबाळा, काहीसा बावळट दिसणारा २२ वर्षांचा तरुण १९१० मध्ये अमेरिकेत आला. तेथे त्याच्या तल्लख बुद्धीचे चीज होऊन न्यूजर्सी राज्यातल्या रुटजर्स विद्यापीठात त्याला स्कॉलरशिप मिळाली. येथेच त्याच्या आयुष्याला स्थैर्य आणि दिशा मिळाली आणि पुढची अनेक वर्षे त्याने याच विद्यापीठात काढली. येथेच त्याच्या संशोधनाला गती आली. या काळात बॉक्समन जीवाणूंवरच्या संशोधनात मग्न होता. त्याने माती, नद्या, तलाव आणि समुद्रातल्या पाण्यांमधल्या जीवाणूंचा अभ्यास केला. माणसाच्या घशातल्या आणि कोंबड्यांच्या घशातल्या जीवाणूंचे परीक्षण केले. त्याचा एक तर्कशुद्ध विचार होता. जर निरनिराळ्या प्रकारचे जंतू एकाच ठिकाणी राहात असतील तर त्यातले काही दुसऱ्यांशी लढतच असतील. अशाच लढणाऱ्या जंतूंपैकी काही माणसात रोग निर्माण करणाऱ्या जंतूंशी सुद्धा लढू शकतील. या विचाराने त्याने थोड्याथोडक्या नाही, तर १०,०० जीवाणूंचे

परीक्षण केले. आणि त्यातूनच त्याचे जे ध्येय होते ते साध्य झाले. झाले असे की एका कुक्कुटपालन केंद्राच्या शेतकऱ्याने आजारी पडून मेलेल्या कोंबडीच्या अन्ननलिकेतली पेषणी (Gizzard) आणून दिली. पक्ष्यांच्या अन्न नलिकेतला हा अवयव जात्यासारखा अन्नाला बारीक करण्याचे कार्य करतो. बॉक्समनला हे एक वरदानच मिळाले. कारण या अवयवातल्या जीवाणूंमुळे एका नव्या अँन्टिबायोटिक्सचा शोध लागला. याचे नाव होते स्ट्रॅप्टोमायसिन. या नव्या औषधाच्या अनेक प्राण्यांवर बऱ्याचशा चाचण्या घेतल्यानंतरच ते आजारी माणसासाठी वापरण्यात आले. आणि ते अतिशय प्रभावी असल्याचे दिसून आले. ज्या जीवाणूंवर पेनिसिलिनचा फारसा उपयोग होत नव्हता, त्यावर स्ट्रॅप्टोमासिनचा चांगला उपयोग व्हायला लागला. विशेषत: क्षयाच्या जंतूवर तर स्ट्रॅप्टोमायसिन अगदी रामबाण ठरले. त्याच ऑस्टिओ - मायलायटिस या हाडांच्या रोगावरही ते अतिशय प्रभावी ठरले. यानंतर अनेक प्रकारची अँन्टिबायोटिक्स बाजारात आली आणि त्यात नवनवीन भर पडतच आहे. अलेक्झांडर फ्लेमिंग प्रमाणे बॉक्समनलाही नोबेल पारितोषिक मिळाले.

हृदयरोग हा हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात मानवाला मिळालेली देणगी. परंतु काही अभागी लोकांना अगदी लहानपणीच सदोष हृदय लाभलेले असते. पूर्वी अशा कोवळ्या कळ्या काळ मोठ्या निर्दयतेने खुडून घेत असे. येथेही काळावर डॉक्टरांनी मात केली. आता याही बाबतीत लागलेला शोध तसा योगायोगच म्हणावा लागेल. पूर्वी कॅथेटर या रबरी नळीचा उपयोग मूत्रपिंडाच्या तपासणीसाठी केला जात असे. परंतु यानेच हृदयाची तपासणी करण्याची अफलातून कल्पना एका डॉक्टरला सुचली. जर्मनीतल्या बर्नर फॉर्समन या पंचविशीतल्या डॉक्टरने रेशमी धाग्यांची एक बारीक कॅथेटर किंवा पोकळ नळी तयार करून घेतली आणि आपल्याच मोठ्या शिरेतून हळूहळू सारायला सुरवात केली. हळूहळू ही नळी हातातल्या मोठ्या नीलेतून सरकत हात आणि खांद्याच्या मुख्य नीलेत शिरली. डॉक्टर ती नळी हळूहळू पुढे सरकवीत राहिला. नळी उजव्या बाजूकडे वळून एक महानीला जी हृदयाच्या उजव्या कप्प्यात उघडते, तेथपर्यंत पोहचली. तेथून ती सरळ हृदयाच्या उजव्या कप्प्यातच शिरली. ही एक अद्‌भुत आणि विलक्षण घटना होती. डॉक्टरांनी एक समाधानाचा सुस्कारा सोडला आणि ते जिना चढून क्ष-किरणांच्या कक्षात गेले. तेथे त्यांनी क्ष किरण फोटो काढून घेतला. त्या चित्रात हृदयाच्या उजव्या कप्प्यात शिरलेली नळी स्पष्ट दिसत होती. त्या नंतर डॉक्टरांनी ती नळी सावकाश बाहेर काढून घेतली आणि जखन बांधून टाकली. ही एक अविस्मरणीय करामत डॉक्टरांनी करून दाखविली होती. या विलक्षण यशाचा त्यांना रास्त आनंद झाला. त्यांनी त्यांचा क्ष-किरण फोटोसह सर्व वृत्तांत प्रसिद्ध केला. परंतु नेहेमीप्रमाणेच त्यांचे कोणी कौतुक तर केले नाहीच. परंतु एक मूर्ख माणूस म्हणून त्यांनी अवहेलना केली. असे असले तरी डॉ. बर्नरचे श्रम अगदीच काही वाया गेले नाहीत. कारण कोलंबिया विद्यापीठातल्या डॉ. अॅन्ड्रे कोरनॅन्ड आणि डॉ. डिकिन्सन रिचर्डस् ज्युनिअर या दोन डॉक्टरांना या प्रयोगाने प्रभावित केले होते. पुढल्या जवळपास दहा वर्षाच्या कठोर परिश्रमानंतर त्यांनी 'हार्ट कॅथेटरायझन', म्हणजे हृदय चालू आणि नैसर्गिक अवस्थेत ठेवूनच त्यात बारीक नळी सारून त्याची तपासणी करायची त्यांनी विकसित केलेली पद्धत इतकी परिणामकारक होती की, त्यामुळे हृदयात असलेले दोष जे इतके दिवस बाहेरून तपासून पाहता येत नव्हते, त्याचा छडा या पद्धतीने सहज लावता आला. तब्बल २७ वर्षांनंतर डॉ. बर्नर आणि त्यांचे दोन सहकारी डॉ. अॅन्ड्रे आणि डॉ. डिकिन्सन यांना नोबेल पारितोषिकाने भूषविण्यात आले. ■

# मत कोणाला द्यावे ?

दत्तात्रय वालकोळी
अकरावी, शास्त्र

आपली राज्य-घटना सन १९५० मध्ये अस्तित्वात आली. त्यानुसार भारताने लोकशाहीचा स्वीकार केला. ही लोकशाही म्हणजे 'लोकांचे, लोकांच्या हितासाठी, लोकांनी चालविलेले राज्य !' खरोखर किती चांगली कल्पना आहे ही ! परंतु काळ आणि वेळ इतक्या झपाट्याने बदलला की लोकशाहीचा पूर्ण अर्थच बदलला आहे. लोकशाहीत लोक आपले प्रतिनिधी निवडून देतात आणि ते देशाचा कारभार पाहतात. परंतु आजच्या या राजकारणाने या लोकशाहीचा रंगच बदलून टाकला आहे. जो पुढारी येतो तो लंब्याचौड्या बाता मारतो. नोकरीचे आमिष दाखवतो आणि मत मलाच द्या अशी विनंती करतो. योजनांचे कागदी डोंगर उभे केले जातात. प्रतिस्पर्ध्याच्या इभ्रती चव्हाट्यावर मांडल्या जातात. लाखो रुपये फुकट जातात. पदयात्रेचे सोंग नाचविले जाते. मिरवणूक, सभा-एक ना दोन. परंतु यात मात्र सामान्य जनता भरडली जाते. विचार पडतो, मत कोणाला द्यावे ?

प्रत्येक पुढारी प्रचाराला निघाला की त्याच्या मागे पाच-पन्नास कुत्री शेपट्या हलवीत निघतात. काय पडते त्यांच्या पदरात ? दोन-चार नोटा आणि ढोसायला बाटली. परंतु याचा विचार कुणी करीत नाही की घटनेने हा अधिकार दिला आहे, याचा सदुपयोग करून आपल्या देशाचे कल्याण करून घ्यावे. प्रत्येकजण म्हणतो, 'मी हे करीन, मी ते करीन.' परंतु निवडून आल्यावर कुठे तोंड काळे करतो कुणास ठाऊक ! निवडणूक खर्चाच्या कित्येक पटींनी पैसा त्याच्या घशात पडतो. गरीब राहतो उपाशी अन राज्यकर्ता खातो तुपाशी. सर्वच राज्यकर्ते असे आहेत हे मात्र निश्चित नाही. काही धडाडीचे कार्यकर्तेही आहेत. परंतु ते मात्र लाखात एक. परंतु त्यातील काही समाजापुढे येत नाहीत; कारण ते निःस्पृहपणे काम करतात. गाजावाजा करून स्वतःचे प्रदर्शन करीत नाहीत. म्हणून ते निवडून येत नाहीत. परंतु तेच खरे देशसेवक. म्हणूनच प्रश्न पडतो मत कोणाला द्यावे ?

एखादा कर्णाचा अवतार घेऊन भांडी दान करतो. तर दुसरा गरीब बाया-बापड्यांना वस्त्रदान करतो. कुणी अन्नदान करतो; तर कुणी धन दान करतो. परंतु हा पैसा ना श्रमाचा ना सत्याचा ! हा सर्व काळा पैसा असतो. एखादा आडदांड समोर उभा राहून मते आपल्या बाजूला वळवतो. प्रत्येक गावातून ठराविक आकडेवारी नेऊन आपले भवितव्य आपल्या हातात घेतात. एखाद्या गावातून आपल्याला बहुमत मिळाले नाही, म्हणून त्यांच्या सुधारणा बंद. फक्त दोन महिनेच पाटाचे पाणी, वीज पुरवठाच खंडीत करणे, त्यांच्या शेतमालाला भावच कमी देणे - अशा कुरापती चालूच असतात. त्याला मत देऊनही आपली सुधारणा होत नाही आणि न देऊन त्रास सोसावा लागतो. अशा परिस्थितीत प्रश्न पडतो, मत द्यावे कोणाला ?

असा हा भ्रष्टाचार बोकाळला आहे. सत्तेचा दुरुपयोग केला जात आहे. साम्राज्यवादाला लाजवील अशी कृत्ये केली जात आहेत.

जो जो येई तो पुढारी होई
पण हुल्लडीचा नियंता कोणी नाही !

आपली कर्तव्ये सर्वजण विसरून गेले आहेत. एकाच कुटुंबात आई काँग्रेसमध्ये तर बाप भा. ज. पा. मध्ये. मुलगा शिवसेनेत, तर सून जनता दलात इत्यादी प्रकारे निरनिराळे वेश धारण करून जो तो आपले गाठोडे भरत आहे. विरोधी पक्ष टीकेची झोड उठवत आहेत तर राज्यकर्ते अनेक युक्त्या शोधून आपला स्वार्थ साधून घेत आहेत. कुणाचाही कुणाला ताळमेळ नाही. जो तो आपल्या मनाचा राजा. म्हणतात ना, "गावाची जत्रा अन कारभारी सतरा." लोकसभेच्या निवडणुकीतही हाच कित्ता गिरवला जाणार आहे.

"धूर्त शोषकांच्या ओठी घोष संस्कृतीचा". याप्रमाणे केवळ व्यर्थ बडबड होणार आहे.

खरे आदर्श म्हणजे स्व. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री. ज्यांनी देशाची एक कवडीसुद्धा वापरली नाही. याचा पुरावा म्हणजे त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्यावर कर्ज होते. खरे आदर्श दुर्मिळ झाले आहेत व खोट्या आश्वासनांचा पाऊस पडतो आहे. हे सर्व होऊनही पदरात काहीच नाही. आता तुम्हीच सांगा मत द्यावे तरी कोणाला ?

■



# श्रद्धांजली

## '१९४२ अ लव्ह स्टोरी'च्या निमित्ताने . . .

बिपिन इनामदार
तृतीय वर्ष, कला

भारतीय चित्रपटसृष्टीत, अर्थात हिंदी चित्रपटसृष्टीत रोज नवे चेहरे उदयास येतात व अस्ताला जातात. यात अभिनेते, गायक, दिग्दर्शक व संगीतकारही असतात. १९९३ साली 'रोजा' गाजला आणि मणिरत्नमचा व कोवळ्या रेहमानचा बॉलिवूडने धसकाच घेतला. १९९४ साल उजाडले आणि अचानक प्रत्येकाच्या तोंडी गाणे गुणगुणले जाऊ लागले . . . 'एक लड़की को देखा तो ऐसा लगा' — प्रत्येक शिळेमध्ये बासरीचा अभास निर्माण करण्याचा प्रयत्न होऊ लागला. सर्वांना पुनश्च: एकदा 'पंचम'ने वेड लावले. 'पंचम' परत गाजू लागला; पण हे सर्व बघायला 'पंचम' इथे थांबलाच नव्हता. सुरांची उधळण करून तो अनंताच्या प्रवासासाठी निघून गेला होता.

'राहुलदेव' या 'सचिनदेव' बर्मनांच्या अपत्याला लहानपणापासूनच संगीताचे वेड होते. लहानपणीच 'राहुलदेव'ने 'बापसे बेटा सवाई'ची चुणुक एसडींना दाखवली होती. 'पंचम' ह्या स्वराचा हमखास उपयोग व त्यावर असलेले प्रेम यामुळेच राहुलदेव 'पंचम' म्हणून ओळखला जाऊ लागला. त्याला 'पंचम' हे नाव 'दादामुनी' अर्थात अशोककुमार यांनी पाडले होते. ह्या आधी पंचमने त्याच्या वडिलांकडे सहाय्यक संगीत दिग्दर्शक म्हणून काम केले. मेहमूद या विनोदवीराने आपल्या मैत्रीखातर पंचमला 'भूतबंगला'त ब्रेक दिला. पंचमने या चित्रपटात एक छोटी भूमिकाही केली होती. या चित्रपटातील 'आओ ट्विस्ट करे' या गाण्याने सर्वांना झुलवले. त्यानंतर आला 'तिसरी मंझिल'. पण तिसरी मंझिलच्या बाबतीत अतर्क्य घडले. या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन शंकर-जयकिशन यांनाच द्यावे असा या चित्रपटाच्या नायकाचा, शम्मीकपूरचा आग्रह होता. शम्मीकपूरला संगीताची बरीच जाण होती. जेव्हा शम्मीकपूरला पंचमने तिसरी मंझिलसाठी बांधलेल्या चाली ऐकवल्या तेव्हा त्याने तात्काळ होकार दिला. खास आर. डी. 'टच' असलेल्या तिसरी मंजिलने तुफान लोकप्रियता मिळवली व पंचम हे हिंदी चित्रपटसृष्टीतील चलनी नाणे म्हणून गणले जाऊ लागले.

पंचमने मन्ना डे, लता, मुकेश, रफी व इतर बऱ्याच जणांकडून गाणी गाऊन घेतली; पण पंचमच्या सुरेल सुरावटीच्या त्रिकोणाचे तीन कोन ठरले ते आशा, किशोर व स्वत: पंचम. आजवर सर्वात यशस्वी चित्रपट 'शोले'ने तर पंचमला गायलाही लावले. किशोर आणि पंचम ह्यांवर लिहावे तितके थोडेच होईल. पंचम व किशोरने 'बॉम्बे टू गोवा' पासून अमिताभ बच्चनला एक सुरेख सुरवात करून दिली. पंचमच्या प्रत्येक गाण्यात त्याची स्वत:ची खासियत आढळते. उदा. 'सीता और गीता'मधील 'हवाके साथ साथ' या गाण्यात एकाने 'चल' लांबवायचे व दुसऱ्याने यूंही मेरे साथ चल तू . . . वगैरे म्हणायचे, हा खास आर. डी. टच

होता. याशिवाय पंचमच्या बऱ्याच गाण्यांत बेस गिटारचा वापर हा तालासाठी केला जाई. 'मेरे जीवन साथी' मधील 'चला जाता हूँ' मध्ये किशोरचा आठवा स्वर (योडलिंग) हेरून, तर आशा भोसलेच्या आवाजातील नखरा हेरून त्यांना पंचमने पूर्ण न्याय दिला.

याखेरिज 'गुलजार' व 'पंचम' यांचा मिलाफ म्हणजे तर पर्वणीच. यांचा मिलाफ असणारी गाणी अत्यंत श्रवणीय ठरली आहेत. उदा. 'मासूम'मधील 'तुझसे नाराज नहीं' किंवा 'घर' मधील 'फिर वही रात है' किंवा अजून प्रदर्शित व्हायच्या मार्गावर असलेल्या 'लिबास' चित्रपटातील 'भीगी हवा . . . '

'सागर' नंतर पंचमची गणना बुजुर्ग म्हणून केली जाऊ लागली. त्याला फार कमी चित्रपट मिळू लागले. तशातच त्याने काही सुमार, लो बजेट चित्रपट स्वीकारले जे कधी आले व कधी गेले ते कळलेच नाही. पंचमच्या 'गर्दिश', 'गुरुदेव' या चित्रपटांना बॉक्स ऑफिसवर म्हणावे तेवढे यश मिळाले नाही, पण जेव्हा बॉलिवुडला दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीने आव्हान दिले तेव्हा मदतीला धावला तो पंचम. '१९४२ ए लव्ह स्टोरी' संगीताचे उत्कृष्ट गायक, गायिकेसाठीचे फिल्मफेअर पुरस्कार पटकावले. नवीन गुणी संगीतकार 'रेहमान'ला फिल्मफेअरने नवोदित संगीतकारांसाठीचा 'आर. डी. स्मृती' पुरस्कार दिला. आज आर. डी. आपल्यात नाहीत; पण त्यांचे स्वर, त्यांचा खास टच, त्यांचा आवडता 'पंचम' स्वर सर्वांच्या आठवणीत राहील.

'झाले बहू, आहेत बहू, होतीलही बहू, परंतु यासम हा' ही माझ्या वतीने 'पंचम'ला श्रद्धांजली.

■

## क्षणभंगुर मी स्वप्न ठरते . . .

जेव्हा जेव्हा तू दिसतोस, दुःखात झिरपून जाताना
आयुष्य माझं व्यर्थ ठरतं, तुझीच म्हणवून घेताना !
जेव्हा जेव्हा तू दिसतोस, भयानं व्याकुळ होताना
बाहू माझे व्यर्थ ठरतात, तुला आधार देताना
क्षणभंगुर मी स्वप्न ठरते, तुझं हृदय समर्पित होताना !

जेव्हा जेव्हा तू दिसतोस, अंधारात चाचपडताना
प्रयत्न माझे व्यर्थ ठरतात, मार्ग तुला दाखवताना !
जेव्हा जेव्हा तू दिसतोस, स्वतःचंच अस्तित्व शोधताना
प्रेम माझं व्यर्थ ठरतं, तुझी जोडीदार होताना
क्षणभंगुर मी स्वप्न ठरते, तुझं हृदय समर्पित होताना !

सङ्कटसमये एव कः सुहृद इति वयं जानिमः। अत्र अहम् एकां कथां स्मरामि। एकदा महमदशहाबंगशेन बुन्देलखण्डस्य राजा छत्रसालः आक्रान्तः। नैके राजानः साहायार्थं आहूताः किन्तु न कोऽपि आगतः। तदा तेन छत्रसालेन 'थोरले' बाजीरावाय पत्रं लिखितम् –

"बाजी नात बुन्देलकी
बाजी, तुम राखो आज। इति।"

तदा तत्रगतेन बाजीरावेण युद्धे बंगशः पराभूतः।

किन्तु दुर्जनमित्रस्य सहवासः न संकटानि निवारयति, किन्तु आपदि पातयति, मानहानिः ददाति। यथा कविकलशेन सम्भाजीमहाराज दुर्वृत्ताय प्रेरितः। येषां चित्ते, वाचि, क्रियांच एकरुपता दृश्यते ते सन्मित्राणि। तैः मैत्री सुखकारका।

*"A friend in need is a friend indeed."*

यस्य जिव्हाग्रे मधु किन्तु हृदये हलाहलंतद् कुमित्रम्। किन्तु परहितनिरतं सज्जनमित्रम् विनाशकालेऽपि वैरं न याति। यथा चन्दनतरुः हन्तुः कुठारस्य मुखमपि सुरभीकरोति।

सागरप्रदेशे यथा दीपस्तंभः मार्गदर्शकः तथा सन्मित्रम्। राम-सुग्रीव, वसुदेव-नन्दः, कृष्ण-पाण्डवः एतेषां मैत्री सङ्कटनाशिनी भूता।

सङ्कटसमये यः सुहृद्, अर्थप्रार्थनशङ्कया संभाषणमपि न कुरुते, न तद, मित्रम्। मनुजस्य बुद्धिः, तस्य ज्ञानमपि मित्रं भूत्वा तं व्यसनात् तारयति। तर्हि कथयतु भवान्, शीता, परमानन्ददायिनि, सङ्कटहारिणी मित्रसङ्गतिचन्द्रिका कं न आनन्दयति?

■

## छानसं स्वप्न

एकदा मी पाहिली
गोष्ट अगदी छान,
अतिरेकी गात होते
शांततेचं गान.

समाजसेवक करीत होते मद्यपान,
पिणाऱ्यांनी घेतली त्यांस रोखण्याची आण.
चोरांच्या खांद्यावर होते स्टार,
आणि पोलिस खात होते लॉकअपमध्ये मार

माझ्या गळ्यात फुलांचा हार
सॅम्प्रासच्या नशिबात नुसतीच हार.
मुले ठेवताहेत आई-वडिलांची जान.
त्यांच्या सल्ल्याशिवाय त्यांचं हलत नाही पान

काळाबाजारूंना नव्हता समाजात मान,
सज्जनांची मात्र भलतीच शान.
नंतर आला ध्यानात सर्व प्रकार,
मला आहे स्वप्न पाहण्याचा विकार.

**सुरेंद्र कांबळे,** द्वितीय वर्ष, वाणिज्य

## जाणीव

एक सुंदर कादंबरी वाचता वाचता
एखाद्या नाजुक वळणावर
वळलेली ती कथाच
तुला आवडली नाही म्हणून

मोठ्या त्वेषानं
ते पानच फाडून काढल्यावर
त्या पुस्तकाच्या
चिघळलेल्या जखमेविषयी
विचारलंस कधी ?

नसेल ना विचारलंस —
तर खरंच विचारून पहा,
पुढे कधी असं नको व्हायला
की त्या जखमेविषयी
तुला जाणीव झाल्यावर

त्या पुस्तकाकडे
तुला सांगण्यासारखं
तेव्हा काहीच उरलं नसेल . . .

**माधवी नडे,** तृतीय वर्ष, शास्त्र

# यदि जीवन में खुशियाँ ही खुशियाँ हो . . .

कु. आरती पतकी
द्वितीय वर्ष, कला

"खुशियाँ ही खुशियाँ हो दामन में जिसके
क्यो न खुशी से वो दिवाना हो दाये"

कितना सच कहा है इस मितकार ने। यदि जीवन में खुशी के शिवाय कुछ न हो तो सच आदमी पागल हो जायेगा। जीवन की हर खुशी उसे दु:ख, पीडा के समान लगेगी। वह खुशी से मुँह मोड़ लेगा।

आनंद, मोद, सुख, हर्ष सभी शब्द खुशी से जुड़े है। हर आदमी सुख चाहता है। वह भगवान से प्रार्थना करता है कि, मुझे दु:ख कभी न दे। मैं हमेशा आनंदित रहूँ। लेकिन कोई सोचता नही; जीवन के सभी दु:ख खत्म हुए और चारों ओर खुशियाँ फैल गयी तो उसे कितनी पिड़ा होगी।

हमारे जीवन में दु:ख है। इसलिए दु:ख के बाद आनेवाली छोटीसी खुशी भी हमे बहुत प्रसन्न बना दैती है। किसी बुरी घटना के बाद, मिलने वाला छोटासा आनंद हमे बहुत बड़ होता है। मुझे कवि सुमित्रानंद पन्त की 'सुख दु:ख' कविता याद आती है। वे अपनी कवीता में भगवान से कहते है।

"मैं नही चाहता अविरत सुख
चाहता नही चिर दु:ख"

वे भी भगवान से यही प्रार्थना करते है कि, मुझे अविरत दु:ख मत दे, किन्तु अविरत सुख भी न दे। चिर सुख उत्पिड़न है। दु:ख के बाद आनेवाली खुशी ही मिझे दो।

खुशी जादा होने पर भी मनुष्य की आँखोंमें पानी आ जाता है। यह इसी बात का प्रतिक है कि, जादा खुशी आदमी सह नही सकता। कोई भी बात जब हद से जादा हो जाती है तो उसके दुष्परिणाम सामने आ जाते है।

महलों में रहनेवाली रानी को कितना सुख होता है किन्तु उसे फुलों के सेज़ पर भी आराम कि निंद नही आती, और दिन भर काम करके थका हारा मनुष्य पत्थरपे माथा टिकाकर खर्राटे भरी गहरी निंद ले सकता है।

"अति सर्वत्र वर्जते"

इस उक्ती के नुसार कोई भी बात मर्यादा तक ठिक है। किसी भी बात का अतिरेक हो यह बात बहुत बुरी है। आज मैं अध्ययन कर रही हूँ। पढ़ाई करके अच्छे गुण प्राप्त करना मेरा कर्तव्य है। इसके बजाय मैं मुझे खुशी मिलती है इसलिए सहेलियोंके साथ घुमती ही रही तो उसका अन्जाम ठिक नही होगा।

जन्म लेते ही हर खुशी हमारे कदम चुमने लगेगी मानव इन्सानियत भूल जायेगा। वह एक दुसरे के साथ पशु जैसा व्यवहार करने लगेगा। मानव अपनी तरक्की के प्रती उदासिन हो जायेगा। अपनी प्रगती करने की बात उसके मन को छू नही सकेगी। आदमी दु:खी होने पर वह खुशी की खोज़ करता रहेगा। और खुशी पाने के लिये हम क्या क्या प्रयत्न करते है उसी में खुशी है।

कामयाबी पाने के बाद वह खुशी खत्म होती है। आगे बढ़ते रहने में ही खुशी है। और हमे खुशी बैठे बिठाये मिल जाये तो आदमी सुख कि निंद पा न सकेगा।

सुमित्रा नंद पंत कविता के अंत में कहते है कि,

"चिर हास अश्रुमय आनन
रे इस मानव का!"

खुशी और खुशी ही मिलने पर मानव, मनुष्य का चेहरा अश्रुमय याने दुःख पीड़ामय हो जायेगा। वह चैन की साँस भी न ले सकेगा।

■

## लोग बाँत करते है . . .

एक साँस भी नही लै पाया हूँ
लोग मरने की बात करते हैं।

मुझे निंद नहीं आती,
लोग सपने की बात करते हैं।

घुटने मेरे टूट चुके है,
लोक उठने की बात करते हैं।

एक बूँद को तरस गया हूँ, मैं,
लोग सागर की बात करते हैं।

मैं फूल का महकना तक नहीं जानता,
लोग चमन की बात करते हैं।

मुझे खेलने के लिए खिलौने नहीं मिले,
लोग दिल से खेलने की बात करते हैं।

चिंताओं ने जलाकर राख कर दिया हैं मुझे,
लोग चिंता की बात करते है।

पहले कदम पे लडखडा गया हूँ,
लोग मंजिल की बात करते हैं।

**महेश खुडे,** बारावी, शास्त्र 'डी'

— सच्चाई एक ऐसा दिया है जो पहाडी पर रखा जाएँ तो सबको तो रोशनी नहीं दे सकता। पर जितनी भी इससे देखा जाएँ तो दिखाई देता है।

## सुझाव

गले में खराश आयी,
सुझाव भी हजार लायी।
अंकल आए, आंटी आयी,
साथ में पड़ोसी लायी।

सुझाव था यह पहला,
जिससे मन भी बदला।
किसी ने कहा 'विक्स' खाओ,
थोडी देर फिर सो जाओ।

सुझाव दूसरा आया,
मुँह में पानी लाया।
कोई बोला, "बेटा हॉल्स खाओ",
बाद में खूब शोर मचाओ।

अंत में सुझाव आया,
इसको तुम संगीत सुनाओ।
पढ़ा है कि संगीत से,
बड़ी-बड़ी बीमारियाँ दुर होती हैं।

सुन सुनकर मैं तंग आ गयी,
गले की खराश तो गयी,
लेकिन एक नयी झंझट ले आयी –
सिरदर्द।

**रुपाली राजोपाध्याय,** अकरावी 'सी'

## एक अर्थपूर्ण सपना

अधीनता चली गई,
लगा अनधीनता आई।
जब बहाया फूलोंने खून,
तभी यह हरियाली छाई।

स्वाधीनता है आई,
लगा नाखून बढने बंद हुए।
सिर्फ मानवता धर्म रहा,
जातीयता चली गई।

आजादी है मिली,
लगा बरबादी चली गई।
न्याय-व्यवस्था है फूली-फली,
शिक्षण व्यवस्था भी है उससे मिली-जुली।

स्वतंत्रता है आई,
लगा हर एक नेता बापू है।
जो माता भारती के लिए जान देगा,
अब राजा और रंक मे फर्क न होगा।

अचानक मेरी आँख खुली,
लगा यह एक सपना था।
चारों ओर सूखा था,
और हरियाली का तो पता न था।

देखा नाखून बढ रहे है,
लगा आत्मा भी सड रही है।
तब ही मुझे पता चला,
यह सपने क्यों आते है।

**सुरेंद्र कांबले,** द्वितीय वर्ष, वाणिज्य

# कार्यालयीन अहवाल

- भारत सरकारची मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी फी सवलत –
  कनिष्ठ महाविद्यालय ८६ विद्यार्थी वरिष्ठ महाविद्यालय १०० विद्यार्थी.
- भारत सरकारची मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती –
  कनिष्ठ महाविद्यालय ९६ विद्यार्थी वरिष्ठ महाविद्यालय १६५ विद्यार्थी.
- श्री. गणेश मनोहर दाते व शंकर गणेश दाते यांचे धर्मदाय संस्था, पुणे यांचे आर्थिक सहकार्य –
  १) नीता श्रीपाद कुलकर्णी २) भाग्यश्री नामदेव पाटेकर
- सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत –
  कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालय – ११ विद्यार्थी.
- माजी सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत –
  कनिष्ठ महाविद्यालय १९ विद्यार्थी वरिष्ठ महाविद्यालय ९३ विद्यार्थी.
- इ. बी. सी. फी सवलत घेणारे विद्यार्थी –
  कनिष्ठ महाविद्यालय ८० विद्यार्थी वरिष्ठ महाविद्यालय ४७५ विद्यार्थी.
- प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत –
  कनिष्ठ महाविद्यालय ४३ विद्यार्थी वरिष्ठ महाविद्यालय ७० विद्यार्थी.
- मुलींना मिळणारी मोफत शिक्षण योजना –
  फक्त कनिष्ठ महाविद्यालय १०७७ विद्यार्थींनी.
- एस. एस. सी. डी. एड्. फी सवलत घेणारे विद्यार्थी –
  कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालय २ विद्यार्थी.
- राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती –
  १) मनिषा आत्माराम पाटील द्वितीय वर्ष, शास्त्र
  २) स्मिता वसंत पारखे द्वितीय वर्ष, शास्त्र
- राज्य सरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती –
  सुमित्रा सिद्द शेट्टी तृतीय वर्ष, शास्त्र

- राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती —

| | |
|---|---|
| १) प्रकाश सागर बाहेती | १२ वी, शास्त्र |
| २) नरेन्द्रसिंग गोविन्दसिंग भदौरिया | १२ वी, शास्त्र |
| ३) योगिता रमेश कब्रे | द्वितीय वर्ष, वाणिज्य |

- कार्यालयात घेतलेल्या संगणकामुळे कार्यालयीन कामकाजामध्ये सुसूत्रता, सुलभता आणि अचुकता आलेली आहे. गेल्या वर्षभरात संगणकामुळे खालील गोष्टीत सुधार करण्याचा प्रयत्न केला —

१) कनिष्ठ आणि वरिष्ठ (विशेषत: प्रथम वर्ष) महाविद्यालयीन परीक्षा - वर्गवार, विषयाप्रमाणे, विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था, कनिष्ठ पर्यवेक्षक अहवाल, विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, निकालपत्रके, गुणवत्ता यादी वगैरे.

२) कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयांची मासिक पगार पत्रके, वैयक्तिक वार्षिक पगार रजिस्टर, पे-स्लिप आणि त्या अनुषंगाने येणारी इतर माहिती.

३) इन्कमटॅक्स संबंधातील सर्व माहिती, आकडेमोड, वार्षिक विवरण पत्र, फॉर्म नंबर १६ (टी. डी. एस. फॉर्म) इत्यादि गोष्टी वेळेत आणि अचुकपणे करणे शक्य झाले आहे.

४) बँकेचा संपूर्ण पत्रव्यवहार; शिक्षक, प्राध्यापक नेमणुकांच्या मुलाखतींसाठी मोठ्या प्रमाणात करावा लागणारा पत्रव्यवहार आणि इतरही कार्यालयीन कामासाठी संगणकाचा वापर होतो.

५) कनिष्ठ, वरिष्ठ महाविद्यालय आणि पदव्युत्तर विभागासंदर्भातील (अनुदानित, विना-अनुदानित) सर्व बजेट्स, अकौंटन्स मधील सर्व स्टेटमेंटस्, रिपोर्टस् इत्यादि.

६) यंदाच्या वर्षी प्री-प्रिंटेड स्टेशनरी वापरुन विद्यार्थ्यांची गुणपत्रके तयार करण्यात आली.

या सर्व कामात सुधारणा, अधिक सुलभता आणि सुसूत्रता आणण्यासाठी सर्व कार्यालयीन कर्मचारी, काही प्राध्यापक यांचे सहकार्य वर्षभर लाभले.

# क्रीडा विभाग अहवाल

## कनिष्ठ महाविद्यालय

परंपरागत क्रीडा क्षेत्रातील यशोध्वज सदैव फडकत ठेवण्याचे व त्या परंपरेत भर घालण्याचे कार्य रौप्य महोत्सवी वर्षीसुद्धा आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी केले हे नमूद करताना अतिशय आनंद होत आहे.

**उल्लेखनीय कामगिरी –**

उपविजेते आंतरशालेय (महाविद्यालयीन गट) कबड्डी (मुली) स्पर्धा ९४-९५

उपविजेते आंतरशालेय (महाविद्यालयीन गट) हॉकी स्पर्धा ९४-९५

**मुली उपविजेते –**

| | |
|---|---|
| रुपाली पंडित : | आंतरशालेय (जिल्हा स्तर) ३००० मी. धावणे प्रथम क्रमांक<br>आंतरशालेय (विभागीय स्तर) ३००० मी. धावणे तृतीय क्रमांक |
| रुपा मुखेडकर : | आंतरशालेय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्यातर्फे निवड. |
| प्रतिभा मेघे : | आंतरराज्य सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी निवड |

**आंतर-वर्गीय क्रीडास्पर्धेतील यशाचे मानकरी खालीलप्रमाणे :**

| खेळ | विजयी संघ | उपविजयी संघ |
|---|---|---|
| कबड्डी (मुले) | ११ वी वाणिज्य 'आय' | ११ वी शास्त्र 'डी' |
| व्हॉलीबॉल (मुले) | १२ वी वाणिज्य 'आय' | ११ वी शास्त्र 'डी' |
| **वैयक्तिक खेळ** | **विजयी खेळाडू** | **उपविजयी खेळाडू** |
| बॅडमिंग्टन (मुले) | आदित्य साठे - ११ वी | परेश चव्हाण - १२ वी |
| टेबल टेनिस | महेंद्र गवळी - १२ वी | शैलेंद्र खरे - १२ वी |
| बुद्धिबळ | संतोष टिकेकर | समिर खिरीड |

सर्वसाधारण विजेतेपद (सांघिक) ११ वी 'डी' शास्त्र या वर्गाने मिळविले.

**प्रा. पी. डी. कुलकर्णी**
कार्याध्यक्ष, जिमखाना समिती.

## वरिष्ठ महाविद्यालय

* **"श्री शिवछत्रपती पारितोषिक विजेता"** श्री. सुरेश गायकवाड (माजी विद्यार्थी)

महाराष्ट्र राज्य सरकारने व्हॉलीबॉल खेळाचे सन १९९२-९३ चे "शिव छत्रपती पुरस्कार" देऊन आपल्या महाविद्यालयाच्या ह्या माजी व्हॉलीबॉल खेळाडूचा गौरव केला आहे. महाविद्यालयात असताना व्हॉलीबॉल संघाचे कर्णधार, विद्यापीठ, आंतर विद्यापीठ; तसेच अखिल भारतीय संयुक्त विद्यापीठाचे; तसेच महाराष्ट्र राज्य संघाचे प्रतिनिधित्व करून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर टाकली.

* **"इंटरनॅशनल मास्टर"** श्री. जयंत गोखले (माजी विद्यार्थी)

कलकत्ता येथे जानेवारी '९५ मध्ये झालेल्या गुडरीक बुद्धिबळ स्पर्धेत "इंटर नॅशनल मास्टर" या किताबाचा मानकरी ठरलेला हा आमचा संगणकशास्त्राचा माजी विद्यार्थी. महाविद्यालयात असताना आंतरमहाविद्यालयीन, आंतरविभागीय, आंतरविद्यापीठीय, राज्यस्तरीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये आपल्या खेळाने अनेकांना मंत्रमुग्ध केले. याशिवाय श्री.

गोखले यांनी रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या बुद्धीबळ स्पर्धेत एकाच वेळी महाविद्यालयातील अनेक खेळाडूंशी बुद्धिबळ खेळून आपले कसब दाखविले.

श्री. चंद्रशेखर गोखले यांनीही कलकत्ता येथे झालेल्या अखिल भारतीय बुद्धिबळ स्पर्धेत भाग घेऊन महाविद्यालयाचे नाव भारतीय पातळीवर गाजविले.

**दरवर्षीप्रमाणे या वर्षी विद्यार्थी खेळाडूंमधून विविध खेळांसाठी निवडलेले क्रीडा प्रतिनिधी :**

संजय काळोखे : मैदानी स्पर्धा — सेक्रेटरी, अनिल मोने : बॉक्सिग — सेक्रेटरी, विजय परदेशी : व्हॉलीबॉल— सेक्रेटरी, योगेश तांबट : कबड्डी — सेक्रेटरी, शंतनू थोटे : हॉकी — सेक्रेटरी, वैशाली रेदासनी : विद्यार्थिनी प्रतिनिधी, राजेश वर्मा : विद्यार्थी प्रतिनिधी.

आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धांमध्ये पुरुष व महिला संघाने अत्यंत चुरशीने खेळून उपविजेतेपद संपादिले. प्रविणसिंग राजपूत, एस. वाय. बी. कॉम.च्या विद्यार्थ्याने शरीरसौष्ठव स्पर्धेत ६५ ते ७० किलो गटात दुसरा क्रमांक मिळविला. तर पराग जोशी या विद्यार्थ्याने वजन उचलण्याच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळविला.

एन. एस. यू. आय. विद्यार्थी संघटनेने भरविलेल्या आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत पुरुष संघाने विजेतेपद संपादिले.

श्री. विशाल पवार : एफ. वाय. बी. कॉम. च्या विद्यार्थ्याने सायकलिंग स्पर्धा गाजविण्याचे श्रेय मिळविले. जळगाव येथील सायकलिंग स्पर्धा : ३ रा क्रमांक, मुंबई ते खोपोली सायकलिंग स्पर्धा : प्रथम क्रमांक, मुंबई ते पुणे (प्रॉमिस) सायकलिंग स्पर्धा : ८ वा क्रमांक. २५, २६ फेब्रुवारी '९५ रोजी झालेल्या स्पर्धांसाठी (नॅशनल सिलेक्शन ट्रॅक सायकलिंग) साठी त्याची निवड झाली.

श्री. संभाजी पवार : टी. वाय. बी. कॉम. च्या विद्यार्थ्याने नॅशनल तायकोंदो स्पर्धा '९४ बरेली, येथे झालेल्या स्पर्धेत ६४ ते ७० किलो गटामध्ये गोल्ड मेडल मिळविले.

**पुणे विद्यापीठ आयोजित आंतरविभागीय स्पर्धेसाठी पुणे शहर विभागातर्फे खालील खेळाडूंची निवड झाली.**

| | | |
|---|---|---|
| श्री. सोमनाथ नलावडे | एम. कॉम. भाग २ | कबड्डी |
| श्री. हृषिकेश मद्रासी | टी. वाय. बी. कॉम. | कबड्डी |
| कु. नंदिनी गोखले | एम. कॉम. भाग २ | कबड्डी, फुटबॉल, सॉफ्टबॉल |
| कु. सविता जोशी | टी. वाय. बी. कॉम. | सॉफ्टबॉल |
| कु. पौर्णिमा बहिरट | एस. वाय. बी. कॉम. | फुटबॉल, सॉफ्टबॉल, कबड्डी |
| कु. अनिता पारवे | टी. वाय. बी. ए. | कबड्डी |
| श्री. लक्ष्मीकांत शिंदे | | कबड्डी |
| श्री. आदित्य पंडित | एफ. वाय. बी. सी. एस. | पोहणे |

| | | |
|---|---|---|
| श्री. राजेश वर्मा | टी. वाय. बी. सी. एस. | स्क्वॅश रॅकेट |
| श्री. राम राजमाने | एम. कॉम. | व्हॉलीबॉल |
| श्री. मिलींद गुळवणी | एस. वाय. बी. कॉम. | हॉकी |
| कु. भारती कुलकर्णी | एस. वाय. बी. कॉम. | क्रिकेट, सॉफ्टबॉल |
| कु. ऋता म्हसकर | एस. वाय. बी. कॉम. | सॉफ्टबॉल |
| कु. वैशाली रेदासनी | टी. वाय. बी. एस. सी. | फुटबॉल |
| कु. सुनिता गजरमल | एस. वाय. बी. कॉम. | सॉफ्टबॉल |
| कु. अपर्णा जोशी | एम. कॉम. भाग १ | ज्युदो |

**आंतरविद्यापीठ स्पर्धेत पुणे विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधित्व करून, महाविद्यालयाच्या व पुणे विद्यापीठाच्या नावलौकिकात भर टाकणारे खेळाडू :**

| | | |
|---|---|---|
| श्री. चंद्रशेखर गोखले | टी. वाय. बी. एस्सी. | बुद्धिबळ |
| कु. अनिता पारवे | टी. वाय. बी. ए. | कबड्डी |
| कु. नंदिनी गोखले | एम. कॉम. | कबड्डी, सॉफ्टबॉल |
| कु. सविता जोशी | टी. वाय. बी. कॉम. | सॉफ्टबॉल |
| कु. पौर्णिमा बहिरट | एस. वाय. बी. कॉम. | फुटबॉल, सॉफ्टबॉल, कबड्डी |
| श्री. सोमनाथ नलावडे | एम. कॉम. | कबड्डी |
| श्री. हृषिकेश मद्रासी | टी. वाय. बी. कॉम. | कबड्डी |
| श्री. राजेश वर्मा | टी. वाय. बी. सी. एस. | स्क्वॅश रॅकेट |
| श्री. मिलींद गुळवणी | एस. वाय. बी. कॉम. | हॉकी |
| कु. भारती कुलकर्णी | एस. वाय. बी. कॉम. | क्रिकेट, सॉफ्टबॉल |

**दरवर्षीप्रमाणे या वर्षीही आंतर-वर्गीय सांघिक व वैयक्तिक स्पर्धा भरविण्यात आल्या.**

**वैयक्तिक खेळ –**

| | खेळाचे नाव | विजयी | उपविजयी |
|---|---|---|---|
| १) | बॅडमिन्टन (एकेरी) | मिलिंद रणपिसे | अद्वैत अष्टेकर |
| २) | बॅडमिन्टन (दुहेरी) | रविमोहन शहा | अद्वैत अष्टेकर, ऋषिकेश कानिटकर |
| ३) | टेबल टेनिस (एकेरी) | शैलेश मुळे | [illegible]नश तहसिलदार |
| ४) | टेबल टेनिस (दुहेरी) | शैलेश मुळे | प्रितम शेट्टी |
| | | समीर देसले | शाम शिंदे |
| ५) | बुद्धिबळ | अभिजित जोशी | संतोष माने |

**सांघिक खेळ –**

| | खेळाचे नाव | विजयी संघ | उपविजयी संघ |
|---|---|---|---|
| १) | बास्केट बॉल | एस. वाय. बी. एस्सी. 'अ' | एफ. वाय. बी. एस्सी. 'ब' |
| २) | व्हॉलीबॉल | एफ. वाय. बी. ए. | एफ. वाय. बी. एस्सी. 'ए' |
| ३) | कबड्डी | टी. वाय, बी. कॉम. 'सी' | एफ. वाय. बी. कॉम. 'ए' |

"कै. वासुदेव बळवंत फडके पारितोषिक" व **"मॉडर्न श्री"** : १९९४-९५ चा किताब, श्री. मनोज फुलसुंगे, एस. वाय. बी. कॉम. यास मिळाला.

वरील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सर्व कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंचे मन:पूर्वक अभिनंदन.

या सर्व खेळाडूंच्या यशात मा. प्राचार्य, मा. उपप्राचार्य, क्रीडा शिक्षक, कार्याध्यक्ष, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, मार्गदर्शक आणि सल्लागार यांचे विशेष सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले.

**प्रा. पी. डी. कुलकर्णी**
कार्याध्यक्ष, जिमखाना

**श्री. राजेश वर्मा**
विद्यार्थी प्रतिनिधी

**कु. वैशाली रेदासनी**
विद्यार्थिनी प्रतिनिधी

# वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

१९९४-१९९५ ह्या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक शैक्षणिक व क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक ४ मार्च १९९५ रोजी पार पडला. ह्या समारंभाचे अध्यक्षस्थान केसरी-मराठा संस्थेचे सरव्यवस्थापक व संचालक डॉ. दीपक टिळक ह्यांनी भूषविले. शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्ता मिळविणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. प. स. चिरपुटकर व संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष डॉ. ग. र. एकबोटे ह्यांच्या शुभहस्ते पारितोषिक देण्यात आली. क्रीडा क्षेत्रात गुणवत्ता मिळविणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना डॉ. दीपक टिळक ह्यांच्या शुभहस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

रौप्य महोत्सवी वर्षानिमित्ताने काही गुणी माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. ह्यात यंदाचा 'इंटरनॅशनल मास्टर' हा किताब मिळविणारा जयंत गोखले, छत्रपती ॲवॉर्ड मिळविणारा सुरेश गायकवाड, प्रतिथयश उद्योगपती श्री. राजीव बोडस व व्हेपर एनर्जी सिस्टिम्सचे कार्यावाही संचालक श्री. शाम वाघ यांचा खास सत्कार करण्यात आला. प्रा. प. स. चिरपुटकर ह्यांनी महाविद्यालय व त्यात चालणाऱ्या उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. डॉ. ग. र. एकबोटे ह्यांनी संस्थेसंबंधी माहिती उपस्थितांना दिली. डॉ. दीपक टिळक ह्यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांचे परदेशातले अनुभव सांगून मार्गदर्शनात्मक भाषण केले.

**प्रा. अनुराधा कुलकर्णी**
अध्यक्षा, पारितोषिक वितरण समिती

# राष्ट्रीय छात्र सेना (एन. सी. सी.)

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील १११ विद्यार्थी आणि २४ विद्यार्थिनी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विविध युनिटस्मध्ये दाखल झाले होते. त्यांची युनिटनुसार विभागणी खालील प्रमाणे –

| Name of NCC Unit | Number of Cadets |
|---|---|
| 36 MAH BN (ARMY) | 53 |
| 3 MAH NAVAL Unit | 52 |
| 3 MAH AIR WING | 08 |
| 3 MAH GIRL BN (ARMY) | 19 |
| 3 MAH ARMD SQN. | 01 |
| 1 MAH SIGNAL COY | 02 |
| TOTAL | 135 |

**विशेष उल्लेखनीय –**

U/o धिरज दळवी : 3 MAH Armd Sqn याची नवी दिल्ली येथील प्रजासत्ताक दिन संचलनासाठी निवड, आर डी. कँप पूर्ण करून राजपथ संचलनात भाग.

स्वप्नील त्रिभुवन : ३६ महाराष्ट्र बटालियनचा अंडर ऑफिसर म्हणून निवड.

मनोज फुरसुंगे : ३ महाराष्ट्र नाविक दलाचा कॅडेट कॅप्टन म्हणून निवड.

महाराष्ट्र डायरोक्टोरेटने घेतलेल्या एन. सी. सी. 'बी' व 'सी' सर्टिफिकेट परीक्षेची १०० टक्के निकालाची परंपरा या वर्षीही कायम ठेवली.

बी यु ओ स्वप्नील त्रिभुवन आणि सी पी एल लक्ष्मीकांत कुलकर्णी यांना राज्य सरकारची शिष्यवृत्ती मिळाली.

राष्ट्रीय छात्रसेना पुणे ग्रुपने पोलिस विभागाच्या मदतीने आयोजित केलेल्या वाहतूक नियंत्रण प्रशिक्षण शिबिरास आपल्या महाविद्यालयातील आर्मी विंगच्या १० छात्रांनी प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले.

३६ महाराष्ट्र बटालियनचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर आण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर येथे भरले होते. या शिबिरात झालेल्या संचलन व नेमबाजी स्पर्धात आपल्या महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला. यात बी यु ओ स्वप्नील त्रिभुवन, जे यु ओ प्रशांत क्षीरसागर, एस जे टी. कात्रे अजय, सी पी एल जितेंद्र राजपूत आणि सीपीएल विरेंद्रसिंह परमार यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

३ महाराष्ट्र नाविक दलाचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर फुरसुंगी येथे भरले होते. या शिबिरात संचलन स्पर्धेत प्रथम क्रमांक

आणि प्रश्न मंजुषा स्पर्धा मध्ये द्वितीय क्रमांक आपल्या महाविद्यालयास मिळाला. या स्पर्धेत रोहित चौधरी व योगेश चौधरी यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

वैयक्तिक स्तरावर आपल्या महाविद्यालयातील खालील कॅडेट्सनी विविध प्रशिक्षण शिबिरात भाग घेऊन यश संपादन केले.

**३६ महाराष्ट्र बटालियन**

१) प्रशांत क्षीरसागर वार्षिक प्रशिक्षण शिबिरात नेमबाजीत प्रथम क्रमांक

२) राज्यस्तरीय आर्मी अटॅचमेंट कँप मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमात विनोद परदेशी याने प्रथम क्रमांक आणि संचलनात पराग जोशी याने तृतीय क्रमांक मिळविला.

३) राष्ट्रीय स्तरावर केरळ (मारडू) राज्यात झालेल्या ॲडव्हान्स लीडरशीप कँपमध्ये महाराष्ट्र कॉंटिजेंटला संचलनात प्रथम क्रमांक मिळवून देण्यात दिनेश ताशीलदार यांचा सहभाग.

४) Sqt. अजय कात्रे, CPL वैशाली जगताप, Sqt. जतींदर कौर, CPL अर्चना सितापुरे Pre-BLC आणि BLC-I मध्ये सहभाग.

५) Sqt. संतोष थोरात, Cdt. समीर नाखरे, Cdt. शैलेश लेले, CQMS मनिषा गाडेकर, आणि CPL प्रीती सावंत Pre-CATC आणि CATC-I मध्ये सहभाग.

**3 MAH NAVAL Unit**

१) वार्षिक प्रशिक्षण शिबिरात Ld. Cdt. रोहित चौधरी वाद-विवाद स्पर्धेत द्वितीय क्रमांक आणि Cdt. एस. जी. दुबे ट्रॅकिंग कॉंपेटिशनमध्ये प्रथम क्रमांक

२) भोसला मिलिटरी प्रशिक्षण शिबिरात Cdt. शिल्पा राऊत अश्वारोहण स्पर्धेत प्रथम क्रमांक

३) Pre Vayu Sainik आणि Vayu Sainik Camp मध्ये Po. Cdt. योगेश नाडकर्णींचा सहभाग.

या वर्षी महाविद्यालयात दोन फेब्रुवारीला राष्ट्रीय छात्र सेना दिवस साजरा करण्यात आला. संचलनाची मानवंदना 2 MAH NAVAL Unit चे कमांडिंग ऑफिसरांनी स्विकारली. कर्नल एस. जी. जोशी, कमांडिंग ऑफिसर 36 MAH BN (Army wing) यांच्या हस्ते यशस्वी छात्रांचे कौतुक करण्यात आले. अध्यक्षस्थानी मा. प्राचार्य प. स. चिरपुटकर होते. या दिवशी AIR WINGच्या छात्रानी Aeromodelling चे, Army wingच्या छात्रांनी मंकी रोप व युद्ध प्रसंगाचे प्रात्यक्षिक दाखविले आणि Naval wing च्या छात्रांनी Ship modelling चे प्रदर्शन मांडले होते.

नियमित प्रशिक्षणाबरोबर आपले छात्र सामाजिक बांधिलकी विसरलेले नाहीत. या वर्षी ५२ छात्रांनी रक्तदान केले. तसेच गणेशोत्सव, दुर्गापुजा, आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धा, आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा, विधानसभा निवडणुका या समयी पुणे शहरातील वाहतूक नियंत्रण करण्यासाठी पोलिस यंत्रणेबरोबर सहभागी झाली.

प्रा. व्ही. एम. व्हनकळस यांनी राष्ट्रीय स्तरावरील Pre-Commission course कोचीन येथे यशस्वीपणे पूर्ण केला व त्यांची नाव्हल युनिटचे असोसिएटेड एनसीसी ऑफिसर म्हणून महाविद्यालयात नेमणूक झाली. त्यांनी नाव्हल युनिटच्या छात्रांना मार्गदर्शन केले.

प्रा. व्ही. बी. अल्हाट यांनी AIR wing च्या छात्रांना मार्गदर्शन केले. त्यांची एअरविंग एन. सी. सी. प्रशिक्षणासाठी यंदा निवड झाली.

डॉ. टी. डी. निकम यांनी राष्ट्रीय स्तरावरील Pre-Commission course (PRCN - 113) Officers Training School - Kamptee येथे यशस्वीपणे पूर्ण केला. त्यात ते पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले आणि नेमबाजीत विशेष यश संपादन केले. त्यांची आर्मी विंगचे असोसिएटेड एन. सी. सी. ऑफिसर आणि एन. सी. सी. प्रमुख म्हणून महाविद्यालयात नेमणूक झाली. त्यांनी आर्मी विंगच्या छात्रांना मार्गदर्शन केले.

एन. सी. सी. उपक्रमांना माननीय प्राचार्य, तसेच कार्यालयीन कर्मचारी व सेवक यांचे उत्तम सहकार्य मिळाले. त्याबद्दल त्या सर्वांचे आभार.

**2/Lt. टी. डी. निकम**
ऑफिसर-इन-चार्ज

# राष्ट्रीय सेवा योजना

**सिंहावलोकन -**

"समाजसेवेतून व्यक्तिमत्त्व विकास" या ध्येयाने, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग १९७२ पासून कार्यरत आहे. सध्या या विभागात २०० विद्यार्थी सहभागी आहेत. महाविद्यालयाच्या तसेच रा.से. योजनेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त मागे वळून पाहता, या उपक्रमांची फलश्रुती लक्षात येते व उपयुक्तता पटते. अनेक विद्यार्थी रा.से. योजनेतून चांगले संस्कार घेऊन भावी आयुष्यात सेवाभावी वृत्तीने काम करीत आहेत. श्री. विक्रम शिंदे (मंचर), श्री. चंद्रमणी जावळे, कु. वृंदा तांबोळी, कु. कविता देशपांडे, श्री. संजय पिरंगुटे, कु. शैलजा पिरंगुटे हे माजी विद्यार्थी सामाजिक कार्यात आहेत. तसेच श्री. जयंत जोगळेकर, श्री. राजेश बाढे, कु. स्नेहल पाठक हे माजी विद्यार्थी नोकरी-व्यवसाय सांभाळून सामाजिक कामात रस घेतात. कु. वृंदा तांबोळी, श्री. राजेश बाढे, कु. शैलजा पिरंगुटे, कु. अनिता भोसले, श्री. अमोल लाळे, कु. योगिनी नरवणे, इ. माजी विद्यार्थी पुणे विद्यापीठातील रा.से.यो. विभागात काम करण्याची संधी मिळवू शकले. अनेक माजी विद्यार्थी सामाजिक कार्य करीत आहेत. महाविद्यालयाने आजपर्यंत लेप्रेसी हॉस्पिटल कोंढवा, कुष्ठरुग्णमुक्तांचे पुनर्वसन केंद्र वीर, महंमदवाडी, खानापूर, फुलगांव, मांडकी, भोसे या ठिकाणी शिबिरे घेतली व अनेक समाजोपयोगी कामे केली. खानापूर येथे पक्की गटारे बांधली.

मांडकी येथे शोषखड्डे घेतले व दारूबंदी कार्यक्रमात उल्लेखनीय यश मिळविले. ही ठळकपणे नमूद करावीत अशा कामांपैकी काही कामे आहेत. ह्या कामांबद्दल माजी कार्यक्रमाधिकाऱ्यांनीही केलेले योगदान मोलाचे आहे.

**विशेष कार्यक्रम-**

दि. २५ ऑगस्ट ९४ रोजी **"कोशसाहित्याचा परिचय"** हा नवीन कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम पुणे जिल्हा सामूहिक कृती कार्यक्रम म्हणून पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने घेण्यात आला. यामध्ये पुणे जिल्ह्यातील रा.से.यो. विभाग चालविणाऱ्या ३९ महाविद्यालयातील ११२ विद्यार्थी सहभागी झाले होते. शब्दकोश, विज्ञानकोश, समाजविज्ञानकोश, मराठी विश्वकोश, म्हणींचा कोश, व्यायामकोश इ. ३५-४० प्रकारचे कोश विद्यार्थ्यांना हाताळता आले व त्यांच्या ज्ञानकक्षा रुंदावण्याची संधी उपलब्ध करून दिली. या कार्यक्रमात श्री. वरुणराज भिडे, श्री. वा.ल. मंजूळ, डॉ. वि.भा. देशपांडे यांनी व्याख्याने देऊन कोशसाहित्य कसे अभ्यासावे हे समजावून सांगितले.

**एड्स -**

एड्स ह्या महाभयानक रोगाने जगभरातील सर्वांना बेचैन केलेले आहे. त्यामुळे रा.से. योजनेने गेल्या काही वर्षापासून एड्सविषयक कार्यक्रम घेतले. या कार्यक्रमातून एड्सची कारणे, उपाय, संभाव्य धोके याबाबतची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविली. यावर्षी दि. ११ ऑगस्ट रोजी नॅशनल एड्स रिसर्च संस्थेच्या मदतीने डॉ. अरुण दिवेकर, डॉ. सौ. गोखले, सौ. तिलकवत्ती यांची व्याख्याने, चर्चासत्र, स्लाइड शो हे कार्यक्रम झाले. शिबीरकाळात डॉ. जीवन मोहाडीकर यांनी एड्स वरील फिल्म विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना दाखविली व त्यावर चर्चा घडवून आणली. दि. ३० सप्टेंबर ९४ रोजी इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव येथील एड्स विषयक शिबिरात ३ विद्यार्थी सहभागी झाले. दि. ३ ते ६ फेब्रुवारी ९५ काळात "युनिव्हर्सिटी टॉक एड्स" यांच्यातर्फे आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गात प्रा. प्रकाश दीक्षित व प्रा. एच्.एम्. पाटील हे सहभागी झाले. त्या संलग्न दि. १८ व १९ फेब्रुवारी ९५ रोजी १३ विद्यार्थी एड्सप्रशिक्षण वर्गात सहभागी झाले. हे विद्यार्थी यापुढे "Pre group educator' म्हणून काम करणार आहेत. दि. २४ फेब्रुवारी ९५ रोजी सेवाधाम ट्रस्टकडून एड्स विषयक भित्तीचित्रे आणून त्यांचे महाविद्यलयात प्रदर्शन भरविले. दि. २५ फेब्रुवारी ९५ रोजी प्रा. राम गायकवाड यांनी एड्स बाबत विद्यार्थ्यांनी काय काम करावे याची माहिती दिली. दि. १ मार्च ९५ रोजी नॅशनल एड्स रिसर्च संस्थेतर्फे एड्स बाबत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कितपत माहिती आहे हे पहाण्यासाठी १६० विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेण्यात आली. दि. ७ मार्च ९५ रोजी एड्स या विषयावर भित्तीचित्र, घोषवाक्य व निबंधस्पर्धा आयोजित केल्या.

**शिबीरे -**

दि. २४ डिसेंबर ९४ ते २ जानेवारी ९५ या काळात भोसे येथे हिवाळी शिबीर घेतले. शिबीरकाळात येथील प्राथमिक शाळेच्या नियोजित वास्तूच्या कॉलमसाठी खड्डे घेतले. जलसंवर्धन बंधारा बांधला. ग्रामसफाई, प्राथमिक शिक्षणातील गळतीमागील कारणे शोधण्यासाठी सर्वेक्षण केले. अनेक अनुभवी व्यक्तींची व्याख्याने चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम, पदयात्रा, दारूबंदी हे उपक्रम घेतले. उद्घाटन प्रसंगी मा. उत्तमराव भोईटे व समारोपप्रसंगी मा. उद्धवजी कांबळे हे मान्यवर पाहुणे

लाभले. शिबीरकाळात श्री. प्रशांत कोठडिया, सौ. विजयाताई लवाटे, डॉ. वि.भा. देशपांडे, डॉ. अविनाश अरगडे, श्री. अशोक वैद्य यांची व्याख्याने झाली. श्री. माधव पावगी यांचा गायनाचा व श्री. हरीष धोंगडे यांचा महाराष्ट्राची लोकधारा हा मनोरंजनपर कार्यक्रम झाला.

दि. १४ व १५ ऑगस्ट ९४ रोजी भोसे येथे निवासी शिबीर घेऊन वृक्षारोपण कार्यक्रम घेतला. तसेच शाळेचे कुंपण दुरुस्त केले.

दि. २५ सप्टेंबर ९४ रोजी दिघी येथे शिबीर घेऊन १ किमी. लांबीचा रस्ता तयार केला.

दि. १ व २ ऑक्टोबर ९४ रोजी मॉडर्न हायस्कूल, निगडी येथे श्रमसंस्कार शिबिरात क्रीडांगण-सपाटीकरण कार्यक्रम घेतला.

## वृक्षारोपण

दि. २५ जुलै रोजी पुणे विद्यापीठात, दि. १४ व १५ ऑगस्ट रोजी भोसे येथे व दि. २३ ऑगस्ट रोजी निगडी येथे व दि. ४ सप्टेंबर रोजी पुणे विद्यापीठात वृक्षारोपण कार्यक्रम घेतले.

## रक्तदान

दि. २४ सप्टेंबर रोजी रा.से. योजना दिनानिमित्त ७६ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

## वर्षभरातील कार्यक्रमांचा आढावा पुढीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| दि. १६ ते १८ एप्रिल | : | कार्यक्रमाधिकाऱ्यांच्या शिबीरात प्रा. प्रकाश दीक्षित व प्रा. नरेंद्र नायडू सहभागी. |
| दि. २४ जुलै | : | प्रा. धनंजय लोखंडे यांचे प्रौढसाक्षरता विषयावर व्याख्यान |
| दि. २७ जुले | : | पुणे विद्यापीठात मा. राज्यपालांच्या उपस्थितीमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम. ४३ विद्यार्थी सहभागी. |
| दि. ३१ जुलै व ८ ऑगस्ट | : | परिसर स्वच्छता. |
| दि. ११ ऑगस्ट | : | एड्स बाबत व्याख्याने, स्लाइड शो, चर्चासत्र, |
| दि. १३ ऑगस्ट | : | जिल्हा समन्वय समितीची सभा |
| दि. १४, १५ ऑगस्ट | : | भोसे येथे शिबीर, वृक्षारोपण, कुंपण दुरुस्ती कामे केली, प्रा. अ.गो. गोसावी व डॉ. अविनाश अरगडे यांची व्याख्याने. |
| दि. २१ ऑगस्ट | : | मुलांचे निरीक्षण गृह, शिवाजीनगर येथे रक्षाबंधन. |
| दि. २३ ऑगस्ट | : | मॉडर्न हायस्कूल निगडी येथे वृक्षारोपण. |

| | | |
|---|---|---|
| दि. २५ ऑगस्ट | : | सामूहिक कृती कार्यक्रम "कोशसाहित्याचा परिचय" (दै. सकाळ, विद्येच्या प्रांगणात सदरात प्रसिद्धी दि. ३०-८-९४) |
| दि. ३,४ सप्टेंबर | : | टिळक स्मारक मंदिरात पुष्प प्रदर्शनात स्वयंसेवक म्हणून १४ विद्यार्थी सहभागी |
| दि. ४ सप्टेंबर | : | वृक्षारोपण विषयक कार्यक्रमात, पुणे विद्यापीठात २ विद्यार्थी सहभागी. |
| दि. ५ सप्टेंबर | : | शिक्षकदिनानिमित्त डॉ. वि.य.कुलकर्णी यांचे व्याख्यान. |
| दि. ९ ते १८ सप्टेंबर | : | गणेशोत्सव काळात पोलिस बंदोबस्तास मदत. |
| दि. १५ सप्टेंबर | : | लेप्रेसी हॉस्पिटल, कोंढवा येथे गणेशोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम. |
| दि. २४ सप्टेंबर | : | रा.से. योजना दिनानिमित्त रक्तदान शिबीर, ७६ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. नवजीवन रक्तपेढीने स्मृतीचिन्ह प्रदान केले. (दै. सकाळ ४-१०-९४ रोजी प्रसिद्धी). |
| दि. २५ सप्टेंबर | : | दिघी येथे रस्ता तयार करण्यासाठी शिबीर (दै. सकाळ ४-१०-९४ रोजी प्रसिद्धी) |
| दि. २८ सप्टेंबर | : | जुन्नर येथील सामूहिक कृती कार्यक्रमात २ विद्यार्थी सहभागी. |
| दि. ३० सप्टेंबर | : | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगांव येथील एड्स विषयक शिबिरात ३ विद्यार्थी सहभागी. |
| दि. १, २ ऑक्टोबर | : | म. गांधी जयंती निमित्त क्रीडांगण सपाटीकरणासाठी मॉडर्न हायस्कूल, निगडी येथे श्रमसंस्कार शिबीर. |
| दि. २ ऑक्टोबर | : | सुराज्य निर्धार पदयात्रेत सहभाग. |
| दि. ८ ते १७ ऑक्टोबर | : | प्रजासत्ताकदिनपूर्व संचलन शिबिरात हैद्राबाद येथे कु. अंजली पवार सहभागी. |
| दि. ९ ऑक्टोबर | : | सी.टी. बोरा महाविद्यालय, शिरुर येथील कार्यक्रमात २ विद्यार्थी सहभागी. |
| दि. २१ नोव्हेंबर | : | निरामिष-दिन पदयात्रेत सहभाग. |
| दि. १७ डिसेंबर | : | "बातमीच्या जगात" या विषयावर सौ. शारदा शिंत्रे यांचे व्याख्यान. |
| दि. २४ डिसेंबर ते २ जानेवारी | : | भोसे येथे विशेष हिवाळी शिबीर. |
| दि. १२ जानेवारी | : | फर्ग्युसन महाविद्यालय पुणे येथे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रमात सहभाग. |
| दि. १७ ते २३ जानेवारी | : | कळंब येथील जिल्हा पातळीवरील शिबिरात श्री. महेश दरेकर व कु. विशाखा पाटील यांचा सहभाग. |
| दि. १९ जानेवारी | : | शाहू महाविद्यालयातील वक्तृत्व स्पर्धेत ४ विद्यार्थी सहभागी. |

| | | |
|---|---|---|
| दि. २१ ते २५ जानेवारी | : | बारागाव पिंपरी (सिन्नर) येथील विद्यापीठ स्तरीय शिबिरात श्री.अजय अडसुळ व श्री. नितीन साळुंखे सहभागी. |
| दि. २१ व २२ जानेवारी | : | टिळक स्मारक मंदिरात पुष्पप्रदर्शनासाठी १२ विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून सहभागी. |
| दि. २२ जानेवारी | : | आर्टस्, सायन्स, कॉमर्स महाविद्यालय, पौडरोड येथील स्पर्धा परीक्षा कार्यक्रमात २ विद्यार्थी सहभागी. |
| दि. २६ जानेवारी | : | स्वातंत्र्यदिनानिमित्त मा. प्राचार्यांचे भाषण. |
| दि. २७ ते ३१ जानेवारी | : | कुकडेश्वर (जुन्नर) येथील विद्यापीठ स्तरीय शिबिरात कु. वृषाली दळवी व कु. ओजस्विता बहिरट यांचा सहभाग. |
| दि. २९ जानेवारी | : | उद्योजकता विकास शिबिरात टी.जे.महाविद्यालय खडकी येथे ३ विद्यार्थी सहभागी. |
| दि. ३ ते ६ फेब्रुवारी | : | एड्स प्रशिक्षण वर्गासाठी प्रा. प्रकाश दीक्षित व प्रा. एच्.एम्.पाटील सहभागी. |
| दि. १० फेब्रुवारी | : | विद्यापीठ दिन साजरा केला. |
| दि. १८. फेब्रुवारी | : | बा.रा.घोलप महाविद्यालयातील नेतृत्व विकास शिबिरात २ विद्यार्थी सहभागी. |
| दि. १८, १९ फेब्रुवारी | : | एड्स प्रशिक्षण वर्गात १३ विद्यार्थी सहभागी. |
| दि. १९ फेब्रुवारी | : | आ. आवटे महाविद्यालय, ओतूर येथे महिला उद्योजकता शिबिरात दोन विद्यार्थिनी सहभागी. |
| दि. २० फेब्रुवारी ते ४ मार्च | : | अहमदनगर येथील कार्यक्रमाधिकारी प्रशिक्षणासाठी प्रा. अमृता ओक सहभागी. |
| दि. २४ फेब्रुवारी | : | एड्स विषयावर भित्तीचित्रांचे प्रदर्शन. |
| दि. २५ फेब्रुवारी | : | स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन शिबिरात प्रा. म.आ. कुलकर्णी, प्रा. राम गायकवाड, प्रा. अ. गो. गोसावी यांची व्याख्याने. |
| दि. १ मार्च | : | एड्स वरील प्रश्नावली भरून घेतली. |
| दि. ७ मार्च | : | एड्स विषयावर भित्तीचित्र, निबंध व घोषवाक्य स्पर्धा, निरोपसमारंभ, वार्षिक कामाचा आढावा, अहवाल लेखन. |
| दि. १२ मार्च | : | म.फुले महाविद्यालय, पिंपरी येथे अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रमात ३ विद्यार्थी सहभागी. |

**पारितोषिके**

श्री. शंकर सेवा पारितोषिक : श्री. बिपीन इनामदार

कै. बाबुराव काशिनाथ सातपुते पारितोषिक : श्री. दिलीप जगताप

या सर्व कार्यक्रमांना मा. प्राचार्य प.स. चिरपुटकर, मा. निकम नंदकुमार (संयोजक, रा.से.यो., पुणे विद्यापीठ), उपप्राचार्य प्रा. अ. गो. गोसावी यांचे बहुमोल मार्गदर्शन व उत्तम सहकार्य मिळाले. तसेच प्रा. एस्. आर. रायकर, डॉ. ए. के. पांडे, प्रा. गीताराम गायकवाड, डॉ. माधवी मित्र, प्रा. जगदीश चिंचोरे, प्रा. म. आ. कुलकर्णी, श्री. एस्. वाय. कुलकर्णी, श्री. डी. एस्. खोपकर, श्री. एस्. एन्. इनामदार, श्री. एस्. जी. मनोली, श्री. व्ही. के. खरे, कल्याणी वैद्य, अन्य प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी या सर्वांचे खूप सहकार्य मिळाले. त्याबद्दल त्यांचे आभार.

या समितीमधील प्रा. ए. व्हनकळस, प्रा. एम्. एस्. साळुंके, प्रा. व्ही. बी. आल्हाट, प्रा. एच्. एम्. पाटील, प्रा. एन. नायडू, प्रा. एम्. जी. गोहेल, प्रा. चिटणीस यांच्या सहकार्यामुळेच सर्व कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाले. सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**श्री. संतोष पायस**
**कु. विशाखा पाटील**
(विद्यार्थी प्रतिनिधी)

**प्रा. प्रकाश दीक्षित**
**प्रा. अमृता ओक**
(कार्यक्रमाधिकारी)

## साहित्य संघटना

**विविध कार्यक्रम –**

- साहित्य संघटना उद्घाटन हस्ते — श्री. मधुकर टिल्लू, २१ सप्टेंबर १९९४
  विषय — 'विनोद',
  संयोजक — प्रा. व्ही. जी. जोशी, अध्यक्ष साहित्य संघटना
  अध्यक्ष — प्रा. प. स. चिरपुटकर
- २४-९-९४ रोजी 'केसरी' चे संपादक श्री. अरविंद गोखले यांचे 'परदेश दौऱ्यातील रोचक अनुभव' या विषयावर भाषण. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. म. आ. कुलकर्णी, इतिहास विभागप्रमुख यांनी केले.
- ५-१०-९४ रोजी मानसशास्त्र विभागातर्फे प्रा. आशा परुळेकर यांचे 'स्त्रियांचे मानसशास्त्र' या विषयावर व्याख्यान.
  अध्यक्ष — प्रा. अ. गो. गोसावी, उपप्राचार्य
  आभारप्रदर्शन — प्रा. अमृता ओक

● निबंध स्पर्धेचे आयोजन — कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालय मिळून ६५ विद्यार्थ्यांचा सहभाग.

परीक्षक — प्रा. धर्माधिकारी आणि डॉ. विद्या मराठे.

संयोजन — डॉ. मेधा सिधये

निबंध स्पर्धेचा निकाल —

| | | | |
|---|---|---|---|
| कनिष्ठ गट — | क्रमांक १ | सुजाता पवार, अकरावी 'डी' | रु. १२५/— |
| | क्रमांक २ | सारिका गोकर्ण, अकरावी 'डी' | रु. १०१/— |
| | क्रमांक ३ | मुग्धा सिधये, अकरावी 'एफ' | रु. ७५/— |
| | क्रमांक ३ | नीना रणदिवे, अकरावी 'जी' | रु. ७५/— |
| उत्तेजनार्थ — | | कविता जाधव, अकरावी 'सी' | रु. ५१/— |
| | | जयश्री जैन, अकरावी 'इ' | रु. ५१/— |
| वरिष्ठ गट — | क्रमांक १ | किशोरी कासट, प्रथम वर्ष, शास्त्र | रु. १२५/— |
| | क्रमांक २ | नीलाक्षी ताटके, द्वितीय वर्ष, शास्त्र | रु. १०१/— |
| | क्रमांक ३ | शीतल कुलकर्णी, द्वितीय वर्ष, शास्त्र | रु. ७५/— |
| | क्रमांक ३ | सचिन निरगुडकर, द्वितीय वर्ष, वाणिज्य | रु. ७५/— |

● ७-३-९५ रोजी वरील स्पर्धेचा बक्षीस समारंभ आणि साहित्य संघटनेचा समारोप झाला. याच दिवशी नियतकालिक निबंध स्पर्धा, हिंदी विभाग आणि प्लॅनिंग फोरम यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ साजरा झाला.

अध्यक्ष, पारितोषिक वितरण हस्ते — प्राचार्य. प. स. चिरपुटकर

सूत्रसंचालन — डॉ. मेधा सिधये.

विशेष सहकार्य — प्रा. राजीव कुलकर्णी, प्रा. मधु साटम, प्रा. विनिता कुलकर्णी, प्रा. वाणी.

सहकार्याबद्दल सर्व प्राध्यापकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार.

**प्रा. व्ही. जी. जोशी**

अध्यक्ष, साहित्य संघटना

# वक्तृत्व व वादविवाद मंडळ

या वर्षी वादविवाद मंडळाचे उद्घाटन लो. टिळक पुण्यतिथीनिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानाने झाले. व्याख्याते व उद्घाटक होते. प्रा. डॉ. अरविंद देशपांडे, डायरेक्टर, स्पर्धा परीक्षा केंद्र, पुणे विद्यापीठ. विषय होता 'लोकमान्यांचे गीतारहस्य'.

आपल्या महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन स्तरावरील वक्तृत्व, वादविवाद, सामान्यज्ञान, निबंधलेखन, काव्यवाचन-लेखन, प्रश्नमंजुषा, कथाकथन या स्पर्धात उत्साहाने भाग घेतला. या स्पर्धांमधील आपल्या स्पर्धकांचा सहभाग निश्चित स्पृहणीय होता.

कलामंडळातील सर्व सहकारी प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी वर्ग, ग्रंथालय विभाग यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

- नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे आयोजित आंतरमहाविद्यालयीन गोखले करंडक वाद स्पर्धा –

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. अनघा कोलासकर | द्वितीय वर्ष, शास्त्र | द्वितीय क्रमांक व मानचिन्ह |
| २) | श्री. विशाल सिंग | द्वितीय वर्ष शास्त्र | |

- प्रज्ञाभारती कॅम्लिन पुरस्कृत वाग्भट, पुणे आयोजित वाग्भट वक्तृत्व स्पर्धा

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सोपान गाडे | द्वितीय वर्ष, कला |
| २) | कु. संगीता घुले | द्वितीय वर्ष, कला |

- महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे आयोजित हिंदी वक्तृत्व स्पर्धा –

  १) श्री. आनंद फुगजी
  २) श्री. निलेश अग्रेसर
  ३) श्री. शिवलाल पुरोहित
  ४) कु. स्वाती जाधव
  ५) श्री. अमित दळवी
  ६) कु. मिनल गिरमकर
  ७) श्री. संतोष पाध्ये
  ८) कु. मारिया गायकवाड

- महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे आयोजित महाराष्ट्र - गुजरात ३३ वी संयुक्त हिंदी वक्तृत्व स्पर्धा –

| | | |
|---|---|---|
| १) | कु. मारिया गायकवाड, | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| २) | श्री. विशाल सिंग, | द्वितीय वर्ष शास्त्र |

- रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५ आयोजित आंतरमहाविद्यालयीन वाद स्पर्धा –

| | | |
|---|---|---|
| १) | कु. स्वाती कदम | तृतीय वर्ष शास्त्र |
| २) | कु. प्रतिमा डहाळे | तृतीय वर्ष शास्त्र |

- तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती आयोजित आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व वादस्पर्धा –

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सोपान गाडे, | द्वितीय वर्ष कला |
| २) | श्री. अजय अडसुळ, | द्वितीय वर्ष कला |

- अविनाश प्रकाशन, पुणे आयोजित निबंध लेखन स्पर्धा –

| | | |
|---|---|---|
| १) | कु. कांचन देशपांडे | द्वितीय क्रमांक |

- नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे आयोजित सुवर्ण महोत्सव आंतर महाविद्यालयीन वाद स्पर्धा –

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. विशाल सिंग, | द्वितीय वर्ष शास्त्र |
| २) | कु. मारिया गायकवाड, | द्वितीय वर्ष वाणिज्य |

- सासवड आश्रम ट्रस्ट आयोजित, कै. शंकरराव देव साहित्य वक्तृत्व स्पर्धा –

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. सोपान गाडे, | द्वितीय वर्ष कला | द्वितीय क्रमांक |
| २) | श्री. अजय अडसुळ, | द्वितीय वर्ष कला | उत्तेजनार्थ |

- श्री. ना. दा. ठाकरसी मानव्य आणि वाणिज्य महिला महाविद्यालय, पुणे आयोजित वामन मल्हार आंतरमहाविद्यालयीन वाङ्मयीन वक्तृत्व स्पर्धा –

| | | |
|---|---|---|
| १) | कु. प्रतिभा भालेराव, | द्वितीय वर्ष क |
| २) | कु. संगीता घुले, | द्वितीय वर्ष क... |

- श्री. अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर आयोजित आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व व वाद स्पर्धा –

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. महेश शिंदीकर, | प्रथम वर्ष शास्त्र |
| २) | श्री. रोहित चौधरी, | प्रथम वर्ष शास्त्र |

- फ्रान्सिस हास स्मृती प्रतिष्ठान व मराठवाडा मित्र मंडळाचे वाणिज्य महाविद्यालय, पुणे आयोजित आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा –

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. विशाल सिंग | द्वितीय वर्ष शास्त्र | |
| २) | कु. अनघा कोलासकर, | द्वितीय वर्ष शास्त्र | द्वितीय क्रमांकाचे मानचिन्ह |

- स्वदेशी जागरण मंच, पिंपरी-चिंचवड शहर, पुणे आयोजित वक्तृत्व स्पर्धा –

| | | |
|---|---|---|
| १) | कु. कावेरी थोरात, | द्वितीय वर्ष शास्त्र |

- वाणिज्य संघटना, मॉडर्न महाविद्यालय, पुणे - ५, आयोजित वक्तृत्व स्पर्धा –

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. मारिया गायकवाड, | द्वितीय वर्ष वाणिज्य | प्रथम क्रमांक |
| २) | कु. शिल्पा कुलकर्णी, | एम. कॉम. भाग १ | द्वितीय क्रमांक |
| ३) | श्री. मिलिंद गुळवणी, | द्वितीय वर्ष वाणिज्य | द्वितीय क्रमांक |
| ४) | कु. अर्चना हडप, | द्वितीय वर्ष वाणिज्य | तृतीय क्रमांक |
| ५) | कु. सुजाता गराडे, | प्रथम वर्ष वाणिज्य | उत्तेजनार्थ |
| ६) | कु. लीना घोडेकर, | द्वितीय वर्ष वाणिज्य | उत्तेजनार्थ |
| ७) | कु. अरुणा नारायणस्वामी, | द्वितीय वर्ष वाणिज्य | उत्तेजनार्थ |
| ८) | कु. अर्चना पासलकर, | द्वितीय वर्ष वाणिज्य | उत्तेजनार्थ |

- हुंडाविरोधी चळवळ, मुंबई आयोजित आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा –

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सोपान गाडे, | द्वितीय वर्ष कला |
| २) | कु. प्रतिभा भालेराव, | द्वितीय वर्ष कला |

- एस. एन. डी. टी. महाविद्यालय, पुणे आयोजित निबंध लेखन स्पर्धा –

| | | |
|---|---|---|
| १) | कु. संगीता घुले, | द्वितीय वर्ष कला |
| २) | कु. ज्योती नानगल, | द्वितीय वर्ष कला |
| ३) | कु. प्रतिभा भालेराव, | द्वितीय वर्ष कला |

- ३ (महा) नाव्हल युनिट (3 Mah Naval Unit) आयोजित सद्‌भावना प्रश्नमंजुषा आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा – द्वितीय क्रमांक विजेता संघ –

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. रोहित चौधरी, | प्रथम वर्ष शास्त्र |
| २) | श्री. योगेश देसाई, | द्वितीय वर्ष शास्त्र |

- फोरम ऑफ फ्री एंटरप्राइझेस पुरस्कृत सेठ वालचंद हिराचंद स्मृती वक्तृत्व स्पर्धा –

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. सोपान गाडे, | द्वितीय वर्ष कला | प्रथम क्रमांक |
| २) | कु. माया काकडे, | द्वितीय वर्ष कला | द्वितीय क्रमांक |

- सैनिकी वैद्यकीय महाविद्यालय, पुणे आयोजित आंतर महाविद्यालयीन श्याम भट प्रश्नमंजुषा स्पर्धा –

१) कु. मुग्धा सिधये
२) कु. शलाका देशपांडे
३) कु. अर्चना सातपुते
४) श्री. सौरभ भिडे
५) श्री. यशोमती कोल्हटकर
६) श्री. मिलिंद डांगले
७) श्री. हरिश कुलकर्णी
८) श्री. निखिल बांदिवडेकर
९) श्री. देवदत्त कुलकर्णी

- पुणे विद्यापीठ व राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा –

१) श्री. अजय अडसुळ
२) श्री. सोपान गाडे
३) कु. मनस्विनी प्रभुणे
४) कु. नितीन डुबळे

**प्रा. गीताराम गायकवाड**
कार्याध्यक्ष

## नाट्य-प्रशिक्षण शिबीर

पुणे विद्यापीठाने या वर्षीचे नाट्य-प्रशिक्षण शिबीर २ ते ७ जानेवारी या कालावधीत अहमदनगर येथे आयोजित केले होते. या शिबिरात अहमदनगर, पुणे व नाशिक या जिल्ह्यांमधील एकूण चोवीस विद्यार्थी सहभागी झाले होते. मॉडर्न महाविद्यालयातून मी, महेश शिंदीकर - प्रथम वर्ष शास्त्र व संदिप गोरे -तृतीय वर्ष कलाशाखा यांची निवड झालेली होती. या शिबिरात जे काही घडले त्याचा थोडक्यात सारांश :

दि. २ जानेवारी रोजी अहमदनगरचे नगराध्यक्ष श्री. अरुण जगताप यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. प्रसिद्ध ज्येष्ठ समीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात मराठी रंगभूमीच्या इतिहासाचा थोडक्यात आढावा घेतला. १८४३ ते आजतागायत या कालवधीतील पौराणिक व ऐतिहासिक रंगभूमीचा सोदाहरण उल्लेख डॉक्टरांनी केला. गिरीश कर्नाड यांचे 'तलेदंड', गडकऱ्यांचा 'एकच प्याला' यासारख्या नाटकांची समीक्षा डॉ. वि.भा. देशपांडे यांनी केली.

अनेक आंग्लदेशीय व इतर नाटकांची मराठीत केली गेलेली भाषांतरे हाही मुद्दा डॉक्टरांनी विद्यार्थ्यांपुढे सोदाहरण मांडला. उदा. खानोलकरांनी 'कॉकेशन चॉक सर्कल' वरून लिहिलेले 'अजब न्याय वर्तुळाचा', मराठी नाटक हे कोणत्याही विशिष्ट अशा विचारसरणीशी बांधील नसते. नंतर डॉक्टरांनी व्यावसायिक रंगभूमीचाही आढावा घेतला. नाटकाशी संबंधित काही संकल्पना डॉ. देशपांडे यांच्या केल्या गेलेल्या प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पूर्णपणे समजल्या. उदा. - फार्स म्हणजे असे नाटक की ज्यात तत्त्वज्ञान नसते.

दि. ३ जानेवारी रोजी सकाळच्या सत्रात डॉ. दिनानाथ टाकळकर यांनी 'वाचिक अभिनय' या अभिनयाच्या अंगाची माहिती दिली. नाटकात नाटकाचा संदर्भ, हेतू महत्त्वाचा असतो. अभिनेत्यात प्रथम वस्तुबोध होतो, त्यावर तो चिंतन करतो. नंतर त्याच्याकडून भावनिर्मिती केली जाते व सर्वात शेवटी त्याच्या तोंडून उद्‌गार बाहेर पडतात व अभिनय केला जातो. अभिनयाचे १) अनुकरण व २) अवलोकन (निरीक्षण) हे दोन मूलभूत सिद्धांत आहेत. अभिनय हा कृत्रिम असूनही तो वास्तवाच्या जवळपास जाणारा असावा लागतो, तरच तो सार्थ ठरतो. नाटक करताना नाटकाची आकृती, प्रकृती, अलंकृती, अभिव्यक्ती व स्वीकृती या गोष्टी लक्षात घेतल्या गेल्या पाहिजेत. दुपारच्या सत्रात 'शेवंता जित्ती हाय' या नाटकाचे दिग्दर्शक श्री. जोशी यांनी 'नाटकाबद्दलचा दिग्दर्शकांचा दृष्टिकोन' या विषयावर शिबिरार्थींशी चर्चा केली. यात त्यांनी नाटकातील पात्रांचा, व्यक्तिरेखांचा, कलाकारांच्या व्यक्तिमत्त्वाचा एकमेकांवर पडणारा प्रभाव या विषयी विद्यार्थ्यांना कल्पना दिली.

चार तारखेच्या सकाळच्या सत्रात, डॉ. टाकळकरांनी 'संवाद' या नाटकाच्या सर्वात दमदार अंगाविषयी शिबिरार्थींशी चर्चा केली. 'संवादाचे घटक' या विषयी बोलताना त्यांनी स्वर, ताल, लय, शब्दांवरचा जोर, शब्दांमधले पॉझेस, या घटकांचे महत्त्व सोदाहरण पटवून दिले. दुपारच्या सत्रात डॉ. श्रीधर राजगुरू यांनी नेपथ्य व प्रकाशयोजना याविषयी माहिती दिली. त्या नाटकाची तालीम, नेपथ्य, रंगमंचाचा भूगोल व इतर घटकांचा समावेश होता.

पाच तारखेला पुण्याच्याच श्री. भावे यांनी रंगभूषेची जवळून ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. सहा तारखेस सुप्रसिद्ध संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याकडे व्हायोलिन वाजविणारे श्री. माणिक हाथीदारू यांनी पार्श्वसंगीताबद्दल, अनिल क्षीरसागर यांनी संवादफेकीबद्दल तर डॉ. लीला गोविलकर यांनी नाट्य समीक्षेबद्दल आपली मते मांडली. त्यानंतर दुपारी चार वाजता सुबोध राजगुरु यांनी प्रकाशयोजनेवर सप्रयोग व्याख्यान दिले. नंतर 'शेवंता जित्ती हाय' या नाटकाचा प्रयोग शिबिरार्थींना दाखविण्यात आला. त्याच वेळेस नगरच्या उपनगराध्यक्षा लता बोरा यांच्या हस्ते शिबिरार्थींना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. याशिवाय शिबिरात रोज सकाळी योगासने व संध्याकळी विविध स्पर्धा, विविध गुणदर्शन हे कार्यक्रम झाले. नगरच्या 'गीतगंधा' या समूहाच्या सुगमसंगीताचा कार्यक्रमही चार तारखेस झाला.

पुणे विद्यापीठाने आयोजिलेल्या या शिबिराने नाट्य-प्रशिक्षणार्थींचा मोठा फायदा झाला. नाटकाची विविध अंगे, पार्श्वसंगीत, संवादफेक, वाचिक अभिनय या सर्व गोष्टींशी विद्यार्थ्यांची जवळून ओळख झाली. पुणे विद्यापीठाचे हार्दिक आभार.

**— बिपिन इनामदार**

(तृतीय वर्ष, कला विद्यार्थी)

# पदभ्रमण आणि पर्यावरण अभ्यास मंडळ

पदभ्रमण आणि पर्यावरण अभ्यास मंडळाने पुढील कार्यक्रम आयोजित केले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | तुंगार्ली - खंडाळा | — | ८ जून १९९४ |
| २) | पानशेत - लव्हार्डि | — | १४, १५ ऑगस्ट १९९४ |
| ३) | राजगड/लोहगड - विसापूर | — | १८, १९ सप्टेंबर १९९४ |
| ४) | रायरेश्वर - केंजळगड | — | ३१ डिसेंबर व १ जानेवारी १९९५ |
| ५) | हरिश्चंद्रगड - जुन्नर - शिवनेरी | — | २५ ते २८ फेब्रुवारी १९९५ |

या पदभ्रमणात प्रामुख्याने खालील विद्यार्थ्यांचा समावेश होता.

सुजीत जोशी, मनोज फुलसुंगे, कुलदिप हंस, मीनल नाईक, शिवाजी पानसे, मुग्धा वागळे, खलीद मुल्ला, माधुरी पाठक, राहुल बहुलीकर, स्वाती चिटणीस व इतर, तसेच संयोजक व सहाय्यक म्हणून श्री. व्ही. आर. चिटणीस, श्री. व्ही. बी. अल्हाट, श्री. आर. पी. काळे, श्री. जगताप के. एस., श्री. कवडे एस. बी., श्री. हजारे एस. एम., श्री. नरवडे बी. एस., सौ. साळुंके एम. पी. यांनी पुढाकार घेतला.

रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त दोन महत्त्वाचे कार्यक्रम करावेत असा मंडळाचा विचार असून सदर कार्यक्रम जिमखाना विभाग, कार्यालय व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने पार पाडायचे आहेत. त्यात प्रथम शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी एक-दोन दिवसांचा पदभ्रमणाचा कार्यक्रम आयोजित करणे व दुसरा कार्यक्रम म्हणजे १५ दिवसांचा राज्याबाहेरील विद्यापीठ व आय. एम. एफ. यांचे सहकार्य व संमतीने विद्यार्थ्यांसाठी पदभ्रमणाचा कार्यक्रम आयोजित करणे. त्या योगे महाविद्यालयात काही महत्त्वाच्या व आवश्यक साधन सामुग्रीत भर पडावी अशी अपेक्षा आहे.

कार्यक्रम पार पाडण्यासाठी सर्वांचे जे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य लाभले, त्या सर्वांचे मंडळ आभारी आहे. असेच सहकार्य या पुढेही सातत्याने लाभत राहवे ही सदिच्छा !

**प्रा. महेंद्र गोहेल**

चिटणीस,

पदभ्रमण आणि पर्यावरण अभ्यास मंडळ

## ICFAI Accredited Study Centre

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड फायनान्शिअल अॅनॅलिस्ट ऑफ इंडिया (ICFAI) हैद्राबाद, या वित्तीय क्षेत्राशी निगडीत असलेल्या अग्रगण्य संस्थेने मॉडर्न महाविद्यालयास संलग्न अभ्यास केंद्र म्हणून मान्यता दिली आहे. या संस्थेतर्फे घेतल्या जाणाऱ्या DBF, D.B.F.-B.E Joint Programme आणि C.F.A. या परीक्षांसाठी आवश्यक असणारे मार्गदर्शन वर्ग वाणिज्य विभागाच्या वतीने घेतले जातात. या केंद्रास पुणे शहरातील व्यवस्थापन व अभियांत्रिकी विषयाच्या विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. (ICFAI) ने आयोजित केलेल्या विविध विशेष प्रशिक्षण वर्गात सहभागी झालेले प्राध्यापक या वर्गांना प्रामुख्याने शिकविण्याचे काम करतात.

या वर्षीची उल्लेखनीय बाब म्हणजे महाविद्यालयातील केंद्रातून DBF परिक्षेस बसलेली विद्यार्थीनी कु. स्मिता चिरपुटकर Beta Group या परिक्षेत संपूर्ण भारतात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली व तिला इन्स्टिट्यूटमध्ये सुवर्णपदक मिळाले. अभ्यास केंद्र चालविण्यास वाणिज्य व संख्याशास्त्र विभागातील प्राध्यापकांचे व तज्ञ व्यक्तींचे आणि कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळाले. तसेच प्राचार्य प. स. चिरपुटकर व उपप्राचार्य अ. गो. गोसावी यांचे मार्गदर्शन लाभले.

**प्रा. यशवंत वाघमारे**
समन्वयक

## SCIENCE ASSOCIATION

Inauguration at the hands of : Dr. Dilip Joag, Reader, Dept. of Physics, University of Pune.

Topic : 'Looking at atoms : Microscopy to Nanoscopy'

Activities during the year :

1. Wall papers containing articles and posters on various science subjects.
2) Essay competition :

Topics :
a. ISO-9000 and statistical quality control
b. Ozone depletion
c. LIving fossils
d. Scope of electronics in agriculture

First Prize : Kishori Kasat, S. Y. B. Sc. 'A'
Second Prize : Manisha Sahasrabudhe, S. Y. B. Sc. 'B'
Third Prize : Madhura Patwardhan, S. Y. B. Sc. 'B'

Prize distribution at the hands of : Prof. R. V. Saraf, Consulting environmental engineer.

Prof. Saraf delivered a talk on this occasion : Development and environment.

3) Participation of students in the activities.

a. Three teams from junior wing took part in the Shyam Bhat Memorial Quiz Competition.

b. Two teams from senior college participated in 'Chem-Quiz 95' – organised by Chemistry Association, IIT Bombay

c. Nomination of two students
Paradeshi V. R. and Dasgupta S. were nominated to take part in Prashna Manch organised by Indian Meterological Society, Pune on 28th February '95 – a science day.

4) Organisation of 'Electronic Project Competition' – in association with the Department of Electronic Science – Inter-collegiate competition – entries for the project competition – 60.

| | |
|---|---|
| First Prize : | Kamalapurkar S., Rs. 800/– Fergusson College. |
| Second Prize : | Patil, Rs. 500/– Bharati Vidyapeeth |
| Third Prize : | Ashwini Kodgule, Rs. 300/– Bharati Vidyapeeth |

A good co-operation from all faculty members.

**Dr. Vidya Prayag**

Chairperson of Science Association

# ग्रंथालय

मार्च १९९५ अखेर ग्रंथालयातील ग्रंथांची संख्या ५७३८७ इतकी झाली. वरील ग्रंथांशिवाय एकूण ४४ नियतकालिके, मुंबई आणि पुणे येथून प्रसिद्ध होणारी प्रमुख वर्तमानपत्रे घेतली जातात.

या वर्षी नव्यानेच सुरू करण्यात आलेल्या पदव्युत्तर विभागात पदार्थविज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, भूगोल, मराठी, इंग्रजी ह्या विषयांचा समावेश करण्यात आला. त्यासाठी लागणाऱ्या क्रमिक आणि संदर्भ ग्रंथ निवडीस विभागप्रमुखांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. पदव्युत्तर विभागासाठीही आवश्यक ग्रंथ या वर्षी खरेदी केले. तसेच वरील विषयांसाठी त्या त्या विषयांची २३ शोधनिबंध मासिके सुरू करण्यात आली.

चालू शैक्षणिक वर्षात नव्यानेच निर्माण करण्यात आलेल्या **प्रोफेसर-इन-चार्ज, लायब्ररी** या पदावर प्राध्यापक डॉ. मुकुंद महाजन यांची नियुक्ती करण्यात आली.

ग्रंथालय समितीत या वर्षी खालील सभासद होते –

| | |
|---|---|
| १) प्रा. डॉ. मुकुंद महाजन (कार्याध्यक्ष) | २) प्रा. डॉ. पुंडे डी. डी. |
| ३) प्रा. कुलकर्णी पी. डी. | ४) प्रा. डॉ. भारती डोळे |
| ५) प्रा. मधु साटम | ६) श्री. चंद्रचुड ए. एस. (निमंत्रक) |

या शिवाय खालील प्राध्यापकांना स्वीकृत सदस्यत्व देण्यात आले.

१) प्रा. रायकर एस. आर. २) प्रा. डॉ. घाटे एच. व्ही. ३) प्रा. चिंचोरे जे. पी.

ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथाचा उपयोग अनेक लेखक-प्राध्यापकांनी त्यांच्या लेखनासाठी वेळोवेळी करून घेतला.

विद्यापीठ अनुदान पुस्तक-पेढी योजनेत या वर्षी ६७ विद्यार्थ्यांना पुस्तकांचे संच वर्षभर वापरण्यास देण्यात आले.

या वर्षी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी सेवक सहकारी पतपेढीच्या झालेल्या निवडणुकीत ग्रंथालय विभागाचे श्री. सु. बा. कवडे यांची महाविद्यालयात सर्वाधिक मतांनी संचालक मंडळावर तिसऱ्यांदा निवड झाली. विद्यमान संचालक मंडळाने त्यांची एकमताने अध्यक्ष म्हणून दुसऱ्यांदा निवड केली. याबद्दल त्यांचे अभिनंदन.

या वर्षी महाविद्यालयाचे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले होते. जागेअभावी बरेच कार्यक्रम ग्रंथालयाच्या अभ्यासिकेतच पार पाडण्यात आले. त्या वेळी शिक्षक आणि शिक्षकेतर सेवक यांचे बहुमोल सहाय्य झाले, त्यांचे आभार. तसेच विद्यार्थीवर्गानेही आपली अभ्यासाची गैरसोय होऊनही कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यास सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही आभार.

दरवर्षी प्रमाणे यंदाही ग्रंथालयाला मान्यवर संस्था आणि व्यक्ती यांजकडून भेटीदाखल ग्रंथ मिळाले. याबद्दल या मान्यवर संस्था व व्यक्तींचे आभार.

**डॉ. मुकुंद महाजन**
प्रोफेसर-इन-चार्ज, लायब्ररी

**ए. एस. चंद्रचूड**
सहाय्यक ग्रंथपाल

## मराठी विभाग

मराठी विभागातील प्राध्यापकांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली.

डॉ. वि. भा. देशपांडे, विभागप्रमुख यांची नव्या विद्यापीठ कायद्यानुसार झालेल्या विद्यापीठ मंडळावर 'मराठी अभ्यास मंडळ' आणि 'कला व ललित कला विद्याशाखा' या विभागात सदस्य म्हणून पाच वर्षाकरिता निवड झाली. दिल्लीच्या संगीत-नाटक अकादमीच्या त्रैमासिकात 'मराठी नाट्यसमीक्षा परंपरा आणि वर्तमान' या विषयावर इंग्रजीतून लेख प्रकाशित, कोथरुड साहित्य संमेलन, स्वागताध्यक्ष म्हणून निवड. महाराष्ट्र मंडळ - कलकत्ता येथे तीन व्याख्याने. बडोदा साहित्य परिषदेत

अध्यक्ष, इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन (पुणे) यांच्या वतीने निर्माण झालेल्या चित्रफितीचे निर्मिती सूत्र संचालन (विषय - महिला धोरण). जबलपूर, नागपूर, भोपाळ, नगर, लोणावळा, इत्यादी ठिकाणी विविध विषयांवर व्याख्याने. २१ ते २३ एप्रिल ९५ रोजी होणाऱ्या महाराष्ट्रव्यापी नाट्य-समीक्षक मेळाव्याच्या संयोजन समितीचा अध्यक्ष. ७ आणि ८ एप्रिल ९५ या दोन दिवशी मराठी विभागाच्या वतीने '१९७० ते ९५ मधील मराठी कादंबरी' या विषयावरचे चर्चासत्र, संयोजन आणि सहभाग. दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केन्द्राच्या वतीने होणाऱ्या मराठी रंगभूमी शतकोत्तर सुवर्ण महोत्सव चर्चासत्र कार्यक्रमाचे संयोजन आणि सहभाग.

डॉ. मेधा सिधये यांची पुणे विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण मंडळाची व्याख्याती म्हणून निवड झाली. प्रा. स्वाती कर्वे यांनी नगरवाचन मंदिराच्या 'श्री. ज. जोशी पुरस्कार समितीवर' परीक्षक म्हणून काम केले. याशिवाय 'स्वातंत्र्योत्तर मराठी कन्नड चर्चासत्र' गुलबर्गा येथे चर्चासत्रास उपस्थिती. इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन यांच्या साक्षरोत्तर कार्यक्रमासाठी आयोजित लेखक कृतिसत्रात कृतिशील सहभाग, 'एकनाथांची भारुडे' या छोट्या पुस्तिकेचे लेखन, वृत्तपत्रांतून लेख व परीक्षणे प्रसिद्ध.

# हिन्दी विभाग

दरवर्षीप्रमाणे यंदाहि विभागाने वक्तृत्त्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व कथाकथन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. स्पर्धेला विद्यार्थ्याकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धांच्या व्यवस्थेची जबाबदारी हिंदी मंडळाच्या विद्यार्थी सभासदांनी पार पाडली. विजेत्या स्पर्धकांना समारंभपूर्वक पारितोषिक वितरण करण्यात आले. महाविद्यालयेतर विविध हिंदी स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचा सहभाग होता आणि यशस्वितेची प्रमाणपत्रे मिळविली. हिंदी दिवस राज्य शासनाच्या कार्यालयातील हिंदीच्या व्यवहाराबद्दलच्या स्थितीच्या पहाणी रुपाने आणि त्यावरील चर्चेच्या रुपाने साजरा करण्यात आला.

**प्रा. वाणी**
हिंदी विभाग प्रमुख

# मानसशास्त्र विभाग

मानसशास्त्र विभागाने नित्य उपक्रमांबरोबरच रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त वेगवेगळे उपक्रम आयोजित केले होते. रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त केलेल्या उपक्रमांचा अहवाल त्या विभागात समाविष्ट केलेला आहेच. विभागाने केलेले अन्य उपक्रम —

१. 'स्त्री मुक्ती समज - गैरसमज' - भाषण - प्रा. आशा परुळेकर

२. 'लॉगटेबलचा वापर कसा करावा' - तृतीय वर्ष मानसशास्त्र विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक आणि भाषण — प्रा. धर्माधिकारी.

३. १२ वी वाणिज्य शाखेतील हुशार विद्यार्थ्यांसाठी व्यक्तीमत्त्व विकास शिबिर आयोजित करण्यात आले. त्यात प्रा. अमृता ओक यांनी 'परिणामकारक अभ्यासाच्या सवयी' या विषयावर आणि प्रा. आशा परुळेकर यांनी 'मानसिक आरोग्य' या विषयावर प्रात्यक्षिकासह भाषण दिले.

४. ३/२/९५ रोजी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची 'कामायनी विद्यामंदिरास' भेट. ही शैक्षणिक भेट प्रा. अमृता ओक यांनी आयोजित केली होती.

५. विभागातर्फे चालविण्यात येणाऱ्या मार्गदर्शन केंद्राचा सुमारे ५० जणांनी लाभ घेतला. यात विभागातील सर्व प्राध्यापकांचा मोलाचा वाटा आहे.

६. 'सामाजिक - आर्थिक स्तर व व्यक्तिमत्त्वाची घडण आणि अध्यापनाच्या आधुनिक पद्धती' या दोन निबंधावर चर्चा, सहभाग — मंजुळा गायकवाड आणि लिना हजारे, संयोजक — प्रा. सुधा शाळिग्राम.

सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

**प्रा. सुधा शाळिग्राम**
मानसशास्त्र - विभागप्रमुख

# भूगोल विभाग

भूगोल विभागामध्ये दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षीही 'पर्यावरण जागृती' या सदराखाली वर्तमानपत्रातील आणि वेगवेगळ्या मासिकातील भौगोलिक माहिती देणारी कात्रणे काचफलकात लावण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना चालू घडामोडी आणि भूगोल या विषयांचे महत्त्व पटले. याचे आयोजन प्रा. विलास आल्हाट आणि प्रा. मानसिंग साळुंके यांनी केले होते.

द्वितीय वर्ष साहित्य, शास्त्र आणि तृतीय वर्ष साहित्य आणि पदव्युत्तर विभाग या वर्गाची अभ्यास-सहल श्रीवर्धन, हरिहरेश्वर, शेरवाडी, मुरुड जंजिरा, केळशी येथे नेण्यात आली होती. समुद्रातील लाटांमुळे समुद्राजवळील भू-आकार बदलतो का? जमिनीवर त्याचा काय परिणाम होतो, मासेमारीसारखे अनेक व्यवसाय सागरी उत्पादनावर किती अवलंबून आहेत याचाही अभ्यास, निरीक्षणे आणि काही पारदर्शिकाही काढण्यात आल्या. याशिवाय विद्यार्थ्यांना सागरी पर्यावरणाविषयीची माहिती देण्यात आली. पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी या प्रदेशाचे आर्थिकदृष्ट्या असलेले महत्त्व, प्राचीन काळी असलेल्या एका बाजारपेठेच्या काही अवशेषांचा भौगोलिक दृष्टीने अभ्यास केला. या तिन्ही अभ्यास सहलींचे संयोजन प्रा. सौ. व्हेगास, डॉ. देसवंडीकर आणि प्रा. अहिरराव यांनी केले होते.

बारावी कला शाखेतील विद्यार्थ्यांची अभ्यास सहल पाचगणी, महाबळेश्वर येथे नेण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी या

परिसरातील मध, जेली, सॉस यांचे उत्पादन करणाऱ्या 'मधुसागर' या कंपनीचा अभ्यास केला, तर अकरावी कला शाखेतील विद्यार्थ्यांनी या परिसरातील भू-वैशिष्ट्यांचा अभ्यास केला. अकरावी आणि बारावी शास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास सहली भूगाव आणि निरनिराळे साखर कारखाने येथे नेण्यात आल्या होत्या.

भूगोल विभागाने एक 'भूगोल प्रदर्शन' आयोजित केले होते. यात नवीन साहित्य, उपकरणे, नकाशे, मॉडेल्स, छायाचित्रे यांचा समावेश होता. यात पारदर्शिकाही दाखविण्यात आल्या. शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनास प्रा. पी. डी. आपटे, उपप्राचार्य, विभागप्रमुख यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. या प्रदर्शनाचे आयोजन प्रा. आल्हाट, प्रा. साळुंके आणि डॉ. देसवंडीकर यांनी केले होते.

**प्रा. विलास आल्हाट**
संकलक

# रसायनशास्त्र विभाग

१९९४-९५ या वर्षी शैक्षणिकवर्षाचा बी. एस्सी. (रसायनशास्त्र) या वर्गाचा निकाल समाधानकारक लागला. या परीक्षेसाठी बसलेल्या ७८ विद्यार्थ्यांपैकी १५ विद्यार्थी विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण झाले; तर ४५ विद्यार्थ्यांना प्रथमवर्ग मिळाला. अभिजीत पापळकर हा विद्यार्थी ८० टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम आला. अविनाश आढाव व सचिन पोंक्षे या दोन विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाच्या बी. एस्सी. टेक या अभ्यासक्रमास प्रवेश मिळाला.

पुणे विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाने जानेवारी १९९५ मध्ये आयोजित केलेल्या "केमियाड-९५" या स्पर्धेमध्ये २० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. ज्ञानेश्वर ठकार या विद्यार्थ्यास प्रशस्तीपत्रक व रु. ६० चे पारितोषिक मिळाले. मॉडर्न महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातर्फे पाच उत्तेजनार्थ रु. २१ ची पारितोषिके देण्यात आली. ती परितोषिके ए. व्ही. दांडगे, एस. जी. येडे, डी. पी. सावंत, एम. आर. शिंदीकर, एस. आर. काटे व एस. एन. बजाज यांना देण्यात आली.

आय. आय. टी. पवईच्या रसायनशास्त्र विभागाने 'केम क्विज - ९५' ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये दासगुप्ता, योगेश महाजन (द्वितीय वर्ष शास्त्र) भिसे व बांगर (तृतीय वर्ष शास्त्र) यांनी भाग घेतला. योगेश महाजन व दासगुप्ता यांच्या गटास चौथा क्रमांक मिळाला.

वरील सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

**प्रा. आर. जी. लिमये**
रसायनशास्त्र विभाग प्रमुख

## DEPARTMENT OF BOTANY

The department of Botany started Post Graduate in Botany from this academic year. 14 students enrolled for M. Sc. I.

Courses conducted by the department : Gardening, tissue culture and fruit preservation. Donation from Shri. Shankarlal Pokarna Charitable Trust, Pune - 2 for tissue culture.

**Research Projects –**

1) 'Use of banana rhizome as a cattle feed' by Dr. T. D. Nikam (Principal Investigator) and Dr. Kanchanganga Gandhe (Co-investigator)

   Financial assistance of Rs. 1,04,200/– by Department of Science and Technology, New Delhi.

2) 'Tissue Culture on capsicum, potato, banana and Strawberry' by Dr. A. K. Pande and Dr. R. S. Zunjarrao.

   Financial assistance donation of Rs. 1,50,000/– by Shri Pokarna.

**Research Papers Published –**

1) 'Smut fungi' – by Dr. R. V. Gandhe a contributory paper with Dr. Kalmon Vanky in Mycotaxon.

2) 'Cellulolytic activity of some aquatic fungi' - abstract in National Seminar on applied Mycology organised by Department of Botany, University of Pune, Pune - 7, by Dr. R. V. Gandhe and Shri. M. J. Desale.

3) 'Seasonal occurence and distribution of aquatic fungi as affected by water, temperature, PH and dissolved oxygen of river Mutha, Pune' - paper presented and abstract published in State level seminar on environmental pollution organised by P. V. P. College, Pravaranagar by Dr. R. V. Gandhe and Shri. M. J. Desale.

4) 'In vitro propagation of 'Agave sisalana' - abstract published and presented a paper at Indian Science congress, Calcutta by Dr. T. D. Nikam and Shri M. J. Desale.

   Dr. R. V. Gandhe and Shri M. J. Desale participated in the seminar on water pollution in pune at Pune-Bremen (Indo-German) joint workshop at University of Pune. The Director of Academic staff college, University of Pune invited Dr. Kanchanganga Gandhe as a 'Resource Person' for delivering a lecture on 'Environmental Education' during the refresher course. Dr. R. V. Gandhe and Dr. Kanchanganga Gandhe are invited by the School of Environmental Sciences, University of Pune for lectures to M. Sc. I Students.

**Dr. A. K. Pande**

Head of the Deptartment

# DEPARTMENT OF ZOOLOGY

The department of Zoology started Post-Graduate Courses from this academic year. 15 students enrolled for M. Sc. I.

Dr. H. V. Ghate, Head of Zoology department presented a synopsis on water pollution in Pune at Pune-Bremen (Indo-German) joint workshop at the University of Pune, and is also invited as a resource person to give a lecture at the refresher course in the University of Pune, also in the orientation course for XII Science Biology Teachers, invited to participate in discussion on F. Capra's Book 'The Turning Point'. He is invited by the School of Environmental Sciences, University of Pune for lectures to M. Sc. I students. He also published four research papers during the current academic year in the Journal of Bombay Natural History Society, Bombay and in India Journal of Experimental Biology, CSIRR, New Delhi. Dr. Ghate elected as a B.O.S. member of the University of Pune.

Amruta Satbhai and Charulata Butala taught for scholar Batch - Std. XII for 1994-95.

**Dr. H. V. Ghate**

Head of the department

# DEPARTMENT OF ELECTRONIC SCIENCE

Dr. Sulabha Deuskar, Head of the Department got one year extension for the major research project funded by U.G.C. She also presented a research paper at the National Seminar on Physics and Technology of Sensors, at Department of Electronic Science, University of Pune, on 2/2/95. Prof. Kashikar also presented a research paper at the same Seminar.

Department had arranged 'Simppex-95'. The department has also started the Post-Graduate wing.

**Dr. Sulbha Deuskar**

Head of the Department

# DEPARTMENT OF COMPUTER SCIENCE

The Department of Computer Science started functioning from the 1st JUly 1994. This year we started Post-Graduate course in Computer Science i.e. Master of Computer Science. We developed a new laboratory which included one Pentium Machine with 1.2 GB HDD, with 16 MB RAM, Two 486 machines and Three 386 machines in the Network environment. We also purchased licensed Software worth 1.25 Lakhs for this purpose. This has made us possible to provide the most suitable working environment for the students.

We organize a Software competition Exhibition named COMP-SHOW as a part of Silver Jubilee Celebration. Our results were very encouraging. 30 students got the admission to Post Courses like MCS and MBA. Nearly 25-30 of our past students have settled in the companies abroad. The major countries being USA, UK and MALESIA.

Prof. S. Chandrashekhar was nominated as the member of the advisory committee for Bachelor of Computer Science at the University level.

Past student Mr. Jayant Gokhale got the rank of International Master in the field of chess.

MCS students' group Kadam Akshay, Joshi AJit, Melinkeri Nivedita, Deshmukh Manav, Gujar Kirti won the second prize at ("SYSTEM ANALYSIS GROUP") contest organized by MIT school Management. The prize carries a trophy and cash worth Rs. 500/-.

Navendu Ramsing a TYBCS student won a prestigious prize of "Best Programmer of the Year" organised by SAKAL Papers. Amount of Rs. 1500/-.

Amit Bhangay (T.Y.B.C.S.) got the prize for Best Programmer of the Year sponsored by Prof. M. R. Marathe. The programme was Devanagri Font Editor. Anand Kelkar (T.Y.B.C.S.) secured a prize at under graduate level. Ajit Joshi (M.C.S.I.) secured a prize at Post Graduate level in COMP-SHOW 95 project competition.

**S. Chandrashekhar**

Head of the Department

# DEPARTMENT OF MATHEMATICS

The department conducted an 'Objective Test in Mathematics' related to competative examination. 120 students participated in the test prize winners First Prize - Ambrish Pathak Second prize - Mandar Sardeshapande.

Prize distribution of the hands of Sameer Mahajan, Engineer in C-DAC.

Miss. Seema Date a students of our department secured highest number of marks in Mathematics at the B. Sc. examination held in April May 1994. Hearty congratulation to Seema.

**Pramila Chikate**

Head of the Department

## DEPARTMENT OF POST-GRADUATE SECTION

The University of Pune granted permission to our college to start post graduate courses in Botany, Zoology, English, Geography, Marathi, Electronic Science and Computer Sciences from the current academic year. Our college is, perhaps, the only college affiliated to the University of Pune to start on many as seven courses at the post graduate level. The formalities to start the courses were completed only in July and it was only in late August that the teaching got underway. The courses were inaugurated by Dr. Patangrao Kadam, Minister of Education, Maharashtra State. Enrollment in most of the subjects was satisfactory and the results of the term end examination held in November 1994 have been quite encouraging. The details of these courses are :

1) English : No. of students enrolled 39
   Head : Prof. S. R. Raikar
   Newly appointed member of the staff : Miss Chitra Iyer

2) Marathi : No. of students enrolled 13.
   Head : Dr. V. B. Deshpande
   Newly appointed member of the staff : Dr. Madhura Koranne

3) Botany : No. of students enrolled 14.
   Head : Dr. A. K. Pande
   Newly appointed members of the staff : Manisha Mandhare, Seema Wavare

4) Zoology : No. of. students enrolled 16.
   Head : Dr. H. V. Ghate
   Newly appointed members of the staff : Mrs. S. V. Pathak, Mrs. S. S. Eddy

5) Geography : No. of students enrolled 6
   Head : Prof. P. D. Apte
   Newly appointed member of the staff : Dr. A. K. Deshwandikar

6) Electronic Science : No. of students enrolled 22
Head : Dr. Sulbha Deuskar
Newly appointed members of the staff : Dr. Mrs. S. S. Ghaisas

7) Computer Sciences : No. of Students enrolled 23
Head : Prof. S. Chandrashekhar
Newly appointed members of the staff : Prof. A. G. Kulkarni.

The laboratories for the science subjects were expanded and equipment worth about Rs. 15 lakhs has been purchased, so for books worth about Rs. 1,00,000/– have been purchased for the subjects. It is expected that the courses which have got a flying start this year will give a yet better account next year.

We wish to thank the Prin. P. S. Chirputkar for his keen interest in the starting and running of these courses.

**S. R. Raikar**

Co-ordinator, P. G. courses

# रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त साजरे केलेले विविध उपक्रम

१९९४-९५ हे वर्ष आपल्या महाविद्यालयाचे रौप्यमहोत्सवी वर्ष, रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विविध विभागांतर्फे व्याख्याने, चर्चासत्रे, प्रदर्शने, स्पर्धा, शिबिरे आयोजित केलेली होती. महाविद्यालयातर्फेही काही कार्यक्रम आयोजित केले होते. नियतकालिकाच्या पानसंख्या मर्यादेमुळे प्रत्येक कार्यक्रमाचा सविस्तर आढावा येथे घेता येत नाही, परंतु प्रत्येक कार्यक्रमाची महत्त्वाची पण संक्षिप्त नोंद आम्ही येथे घेत आहोत. सर्व कार्यक्रमांचे संयोजक आमच्यावर नाराज होणार नाहीत अशी आशा आहे.

- दि. १५ जून १९९४ रोजी कॉलेजच्या रौप्यमहोत्सवी वर्षाची सुरवात वेदाचार्य घैसास गुरुजी यांच्या वेदमंत्रपठणाने झाली. या समारंभास भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराचे प्रमुख डॉ. रा. ना. दांडेकर, प्रमुख पाहुणे म्हणून तर डॉ. वि. रा. करंदीकर आणि श्री. विघ्नहरी देव अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

- प्रसिद्धी विभागाच्या वतीने मा. प्राचार्य प.स. चिरपुटकर यांची आकाशवाणीवर मुलाखत आयोजित केली होती. महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी सीमा देशपांडे आणि गिरीश कानिटकर यांनी ही मुलाखत घेतली. ही मुलाखत आकाशवाणीवर ६ सप्टेंबर रोजी प्रसारित करण्यात आली.

- महाविद्यालयाच्या वतीने काही प्रसिद्ध व्यक्तींची भाषणेही आयोजित केली होती. २८-१०-९४ रोजी प्रसिद्ध, सकाळ

व वृत्तपत्र लेखक **राजीव साबडे** यांनी 'उत्तराखंड मते निरीक्षणे' यावर अतिशय सुलभ भाषेत भाषण दिले. दिनांक ७-१२-९४ रोजी प्रसिद्ध वक्ते **प्रा. शिवाजीराव भोसले** यांचे 'विद्यार्थी जीवन - काल, आज आणि उद्या' या विषयावर भाषण झाले.

- दिनांक ११-१२-९४ रोजी कलामंडळाने आंतरवर्गीय **संगीत स्पर्धा** आणि **मेंदी स्पर्धा** आयोजित केली होती. ह्या दोन्ही स्पर्धांना विद्यार्थ्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. दिनांक १३-१२-९४ रोजी १२ वी स्कॉलर बॅचसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबीर आयोजित केले होते.

- दिनांक १७-१२-९४ रोजी प्लॅनिंग फोरम आणि अर्थशास्त्र विभागातर्फे 'कमर्शियल बँकिंग बदल आणि आव्हाने" हे एक दिवसाचे चर्चासत्र आयोजित केले होते.

- दिनांक ३०-१२-९४ रोजी नियतकालिक विभागातर्फे **निबंध स्पर्धा** आयोजित केली होती. वरिष्ठ आणि कनिष्ठ विभागातल्या एकूण २४ जणांनी भाग घेतला.

**निबंध विषय - कनिष्ठ महाविद्यालय**

१) स्वच्छ पुणे ! सुंदर पुणे ! २) कोचिंग क्लास : गरज की टूम

३) पुणे उत्सव ४) दूरदर्शनचा प्रभाव

**वरिष्ठ महाविद्यालय**

१) टेलिव्हिजनवरील बहुवाहिन्या २) सरदार सरोवर - शाप की वरदान ?

३) भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न ४) पर्यावरणविषयक शिक्षणाची आवश्यकता

पारितोषिक वितरण : हस्ते : प्राचार्य प.स. चिरपुटकर

परीक्षक : स्वाती कर्वे आणि मधुरा कोरान्ने (मराठी) प्रा. डोईफोडे (हिन्दी), प्रा. प्रधान (इंग्रजी)

**स्पर्धेचा निकाल**

**कनिष्ठ महाविद्यालय –**

१) प्रथम क्रमांक मुग्धा सिधये रु. १००/– पुस्तक कुपन.

२) द्वितीय क्रमांक (विभागून). निवेदिता देशमुख, विद्या झाडे - प्रत्येकी रु. ७५ पुस्तक कुपन.

३) तृतीय क्रमांक समीर घुर्ये रु. ५० पुस्तक कुपन

४) उत्तेजनार्थ वर्षा शिंदे- पेन सेट

**वरिष्ठ महाविद्यालय -**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रथम क्रमांक | आरती राव - रु. १००/— पुस्तक कुपन |
| २) | द्वितीय क्रमांक | सुचेता वकील रु. ७५/— पुस्तक कुपन |
| ३) | तृतीय क्रमांक (विभागून) | गीता जोगळेकर, विद्या कुदळे- प्रत्येकी रु. ५०/— पुस्तक कुपन |
| ४) | उत्तेजनार्थ | मनीषा सहस्रबुद्धे - पेन सेट |

- दिनांक १-१-९५ ते ५-१-९५ पर्यंत पूना बाटलीबॉय कंपनी आणि यंग पायोनियर चेस असोसिएशन यांच्या सहकार्याने **'लिम्का इंटरकॉलेजिएट बुद्धिबळ स्पर्धा'** आयोजित केली होती. या स्पर्धेचा बक्षीस समारंभ पूना बॉटलिंगचे एक्झिक्युटिव्ह श्री. आसवडेकर यांच्या हस्ते झाला. या समारंभास कायनेटिक इंजिनियरिंगचे मा. कोटेचा हे प्रमुख पाहुणे होते.

**स्पर्धेचा निकाल-**

**सांघिक -**

१) लिम्का फिरता चषक - सिम्बॉयॉसिस पारितोषिक — कॉमर्स कॉलेज, २) मॉडर्न कॉलेज,

**वैयक्तिक पारितोषिके -**

१) अभिजीत कुंटे, २) चंद्रशेखर गोखले ३) अमोल फणसळकर

याशिवाय पंचवीस खेळाडूंना ३०० रुपयांची पारितोषिके विभागून देण्यात आली.

- १२-१०-९५ रोजी आंतरमहाविद्यालयीन **वादस्पर्धा** आयोजित केली होती.

विषय : 'स्त्रीची प्रतिमा उद्ध्वस्त करण्यास प्रसार माध्यमेच जबाबदार आहेत.'

उद्घाटन : हस्ते- कमल पाध्ये

परीक्षक : रविबाला काकतकर, सुनंदा महाजन,

पारितोषिक वितरण : हस्ते- प्राचार्य प.स. चिरपुटकर

**पारितोषिके -**

**सांघिक -** १ टिळक आयुर्वेद महाविद्यालय.

प्रथम बक्षिस - चारुदत्त देशपांडे, टिळक आयुर्वेद महाविद्यालय, रु. ५००/— रोख व प्रशस्तिपत्रक

दुसरे बक्षिस - गंधाली पानसे, स.प. महाविद्यालय, रु. ३००/- रोख व प्रशस्तिपत्रक

तिसरे बक्षिस विभागून - नितीन ब्रह्मे, हरिभाई देसाई महाविद्यालय आणि दिपा सडेकर आय. एल. एस्. विद्यी महाविद्यालय, रु. २००/- रोख व प्रशस्तिपत्रक

उत्तेजनार्थ - श्रीपाद बिनीवाले, नू. म. वि. क. म. पुणे, क्षमा धुपकर - हरिभाई देसाई महाविद्यालय,

अमोल भिंगे - अभियांत्रिकी पुणे
श्रीपाद महामुनी- टिळक आयुर्वेद

- दिनांक १३-१-९५ रोजी आंतरमहाविद्यायीन **द्वंद्वगीत स्पर्धा** आयोजित केली होती.

सहभाग - २० आंतरमहाविद्यालयीन संघ,

उद्घाटन पारितोषिक वितरण - प्राचार्य. प. स. चिरपुटकर

प्रमुख पाहुणे - अजय पराड

परिक्षक - मोहनकुमार भंडारी, सुनीती केळकर आणि सुरेश देवळे.

**पारितोषिके –**

प्रथम क्रमांक - बी.एम्.सी.सी. कॉलेज, पुणे

द्वितीय क्रमांक - चांदमल बोरा कॉलेज, घोडनदी

तृतीय क्रमांक - मॉडर्न महाविद्यालय, पुणे

- १४-१-९५ आणि १५-१-९५ रोजी **हिवाळी पुष्प स्पर्धा** प्रदर्शनाचे आयोजन केले होते. विविध प्रकारची दोन हजार फुले प्रदर्शनात मांडली होती. विविध १२० गटात स्पर्धा घेण्यात आली.

उद्घाटन हस्ते - विजय पोकर्णा 'खुशबू' नर्सरीचे मालक, गुलाबतज्ज्ञ.

परीक्षक - सुरेश पिंगळे, मोना पिंगळे, डुंबरे पाटील, देवकर, फडणीस, नागरे, इराणी, शिरोळे, पुरंदरे, चौगुले.

पारितोषिक वितरण समारंभ : हस्ते : नानासाहेब जोशी आणि सुधा जोशी, गुलाबतज्ज्ञ.

सर्वाधिक पुरस्कार - महाराष्ट्र राज्याच्या 'उद्याने आणि उपवने' विभाग (पार्कस ॲण्ड गार्डन्स)

किंग ऑफ द शो - जॉन.एफ. केनेडी गुलाब - जवाहर साखर कारखाना, कोल्हापूर

क्वीन ऑफ द शो - 'शेवंती' - सौ. लोणकर, पुणे

उत्तम मांडणी - सिरम इन्स्टिट्यूट

● १५-१-९५ रोजी **कॉमर्स विभागातर्फे** एक दिवसाचे चर्चासत्र आयोजित केले होते.

विषय - इंडियन कॅपिटल ॲण्ड मार्केट - ट्रेन्डस् ॲण्ड प्रास्पेक्टस

उद्‌घाटन - हस्ते - निळकंठ कल्याणी, भारत फोर्ज चेअरमन, प्रा. अ.गो. गोसावी, डॉ. माधवी मित्र यांनी शोध निबंध वाचले. कॉमर्स विभागातील अनेक अभ्यासकांनी चर्चासत्रात भाग घेतला.

● २४-१-९५ आणि २५-१-९५ रोजी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी समितीने **'माजी विद्यार्थी स्नेहमेळावा'** आयोजित केला होता.

| | |
|---|---|
| सहभाग - | महाविद्यालयाचे आजी, माजी प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी - सुमारे १२०० ते १३०० |
| उद्‌घाटन : हस्ते - | विलास आणि मेखला सातभाई, आणि मोहनकुमार भंडारी |
| औपचारिक उद्‌घाटन : हस्ते - | प्राचार्य प.स. चिरपुटकर, प्रा. ज. चिंचोरे |

उद्‌घाटन समारंभाचे सूत्र संचालन - प्रा. अमृता सातभाई, डॉ. पी.डी. कुलकर्णी

कार्यक्रम - १) 'स्वरसंध्या' माजी विद्यार्थी, शास्त्रीय गायन आणि नृत्याचा कार्यक्रम.

२) निळू फुले लिखित, 'येरा गबाळ्याचे काम नोहे' हे विनोदी वगनाट्य, कलाकार - माजी विद्यार्थी.

२५-१-९५ रोजी गुणवान माजी विद्यार्थ्यांचा सत्कार.

| | |
|---|---|
| हस्ते - | प्राचार्य, उपप्राचार्य आणि सर्व विभाग प्रमुख |
| स्पर्धा - | 'मॉडर्न दाम्पत्य स्पर्धा' |
| स्पर्धा निरीक्षक - | डॉ. वि.भा. देशपांडे, प्रा. अ.गो. गोसावी आणि अनुराधा कुलकर्णी |
| गुण नोंदविणाऱ्या प्राध्यापिका - | प्रेमा आगाशे आणि कांचन राजाध्यक्ष |
| प्रथम क्रमांक - | यशोधन, नमिता बाळ |
| द्वितीय क्रमांक - | शेखर, अमला पाटील |
| तृतीय क्रमांक - | रवींद्र, लता गुर्जर |

प्रा. रायरीकर (गणित विभाग) यांनी पहिल्या तीन क्रमांकांना खास पारितोषिके जाहिर केली; विलास सातभाई यांनी प्रथम क्रमांकास 'तिरुपती एम्पायर्स'तर्फे व्हॅक्यूम क्लीनर भेट दिला. याशिवाय श्री. मोकाशी, श्री. जोगदेव आणि श्री. आवटे यांनीही खास पारितोषिके जाहीर केली.

रात्री स्नेहभोजन आणि विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम, ध्वनी व्यवस्था - मोहनकुमार भंडारी

विद्युत व्यवस्था - सचिन नाईक, मंडप व्यवस्था - संजय दाते

भोजन आणि व्हिडिओ व्यवस्था - संजीव वेलणकर. याशिवाय प्रा. गीताराम गायकवाड, संदेश काशीकर, कॉसमॉस बँक, रुपी बँक, विद्या सहकारी बँक, मकरंद गोवर्धन, उदयन भागवत, पूना बॉटलिंग कंपनी यांचे विशेष अर्थसहाय्य.

- ४-२-९५ रोजी **'सचिन संगीत रजनी'** हा कार्यक्रम बालगंधर्व रंगमंदिरात महाविद्यालयातर्फे आयोजिला होता.
- ४-२-९५ आणि ५-२-९५ रोजी संगणक विभागातर्फे **'कॉम्प शो ९५'** प्रदर्शन आयोजित.

| | |
|---|---|
| उद्घाटन : हस्ते - | वृन्दा बल्लाळ, प्रमुख सी. एस्. आय. पुणे विभाग |
| स्पर्धा - | 'सॉफ्टवेअर' |
| निकाल - | महाविद्यालयीन स्तरावर |
| प्रथम क्रमांक - | आनंद केळकर रु. ७५०/- रोख |
| द्वितीय क्रमांक - | अमित भणगे रु. ५००/- रोख |

**पोस्ट ग्रॅज्युएट स्तरावर**

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक - | कोणासही नाही. |
| द्वितीय क्रमांक - | अजित जोशी. |
| उत्तेजनार्थ - | स्वामीनाथन, स्वाले, रायचौधरी, सुजीर, कुकरेजा आणि पांडुरंग. |
| परीक्षक - | एन्.आय.सी., सी-डॅक, के ॲन्ड पी. सीड प्रायव्हेट लिमिटेड, भारती विद्यापीठ, पी.आय.सी.टी. नौ. वाडिया कॉलेज मधील विषय तज्ज्ञ. |
| पारितोषिक वितरण : हस्ते - | डॉ. शंकर - चेअरमन ॲडव्हान्स ग्राफिक सिस्टीम |

- १८-२-९५ रोजी इलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे **'सिम्पेक्स ९५'** हे प्रदर्शन आणि विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या.

| | |
|---|---|
| उद्घाटन : हस्ते- | रवींद्र गुर्जर, मॉरिस इलेक्ट्रॉनिक्स प्रमुख, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी. |
| स्पर्धा - | 'प्रोजेक्ट कॉम्पिटिशन' ४७ जणांचा सहभाग. |
| स्पर्धा आयोजन - | प्रा. डॉ. सुलभा देऊस्कर |
| परीक्षक - | श्री. शिंदे (फिलिप्स), श्री. देवीचरण (फिलिप्स), श्री. धनेश्वर (टेल्को), प्रा. कारेकर (पुणे विद्यापीठ), प्रा. घैसास (पुणे विद्यापीठ), प्रा. गांगल (पुणे विद्यापीठ), डॉ. लेले (फर्ग्युसन महाविद्यालय), प्रा. वारशने (डायरेक्टर, सी. ए. एस्. एम. ए.) |

**स्पर्धा निकाल -**

प्रथम क्रमांक - दर्शना कमलापूरकर - फर्ग्युसन महाविद्यालय रु. ८००/- रोख

द्वितीय क्रमांक - अश्विनी पाटील - भारती विद्यापीठ रु. ५००/- रोख

तृतीय क्रमांक - कौडगुले - भारती विद्यापीठ रु. ३००/- रोख

उत्तेजनार्थ - पाच पारितोषिके

**वॉल पेपर्स आणि व्यंगचित्रे स्पर्धा**

प्रथम क्रमांक - प्रतिभा कुदळे - मॉडर्न महाविद्यालय

द्वितीय क्रमांक - मिलींद कुलकर्णी - मॉडर्न महाविद्यालय

पारितोषिक वितरण : हस्ते - ए.एम.अभ्यंकर, डायरेक्टर ॲप्रोप्रिएट इलेक्ट्रॉनिक्स

- २-३-९५ आणि ३-३-९५ रोजी प्राणीशास्त्र विभागाने **'झू-व्हिजन ९५'** हे 'प्राणी आणि पर्यावरण' विषयक प्रदर्शन आयोजित केले.

संस्था सहभाग - NFATCC, NCL, ZSI, NIV, NART, Modern College

प्रदर्शन प्रमुख - डॉ. हेमंत घाटे, प्रमुख प्राणीशास्त्र विभाग

उद्घाटन : हस्ते - प्राचार्य प. स. चिरपुटकर

प्रदर्शनात अमिबापासून माणसापर्यंतचे विविध स्तरांवरील प्राणी, फोटो, चार्ट्स मांडले होते. प्रदर्शनाला मोठ्या संख्येने प्रतिसाद मिळाला.

- ६-३-९५ आणि ७-३-९५ रोजी **मानसशास्त्र विभागातर्फे 'स्पर्धा परीक्षांना तोंड कसे द्याल ?'** या विषयी विविध तज्ज्ञांकडून विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन.

तज्ञ - डॉ. सुधाकर देशपांडे, डॉ. भरत देसाई, प्रा. राम गायकवाड, प्रा. तनुजा खेर,
श्री, खिरे, श्री. टिळक, प्रा. अ.गो.गोसावी

उद्घाटन - प्राचार्य प. स. चिरपुटकर

सूत्र संचालन- प्रा. सुधा शाळिग्राम, मानसशास्त्र विभाग प्रमुख. हा उपक्रम साहित्य संघटनेतर्फे आयोजित केला होता.

- १८-३-९५ आणि १९-३-९५ मॉडर्न महाविद्यालयाने **'आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा'** भरत नाट्य मंदिरात आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत एकूण सात एकांकिका सादर झाल्या.

परिक्षक - श्रीराम खरे, सुधीर मुंगी, शोभा पत्की,

**एकांकिका पारितोषिके**

प्रथम क्रमांक - 'दुकान कुणी मांडू नये' - मॉडर्न महाविद्यालय - रु. १०००/- रोख

द्वितीय क्रमांक - 'बळी', टिळक आयुर्वेद महाविद्यालय, रु. ७५०/- रोख

**अभिनय पारितोषिक -**

**पुरुषगट -**

प्रथम क्रमांक - दत्ता लिमये - मॉडर्न कॉलेज

द्वितीय क्रमांक - शंतनू कुलकर्णी - टिळक आयुर्वेद महाविद्यालय

**स्त्री गट -**

प्रथम क्रमांक - मधुरा पटवर्धन - टिळक आयुर्वेद महाविद्यालय

द्वितीय क्रमांक - संगीता मांडके -मॉडर्न महाविद्यालय

- ७-४-९५ आणि ८-४-९५ रोजी मराठी विभागातर्फे 'मराठी कादंबरी १९७० ते १९९५' याविषयी चर्चासत्र आयोजित केले होते. कादंबरी विषयक ६ निबंधाचे तज्ज्ञांनी वाचन केले.

उद्‌घाटन : हस्ते - डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर

अध्यक्ष - प्राचार्य प.स. चिरपुटकर

दि. ८-४-९५ रोजी प्रा. गो.म. कुलकर्णी यांच्या हस्ते मराठी कादंबरी क्षेत्रातील नामवंत कादंबरीकारांचा गौरव करण्यात आला. शिवाजी सावंत, विश्राम बेडेकर, मालतीबाई बेडेकर, भा.द. खेर, जोत्स्ना देवधर, आदी नामवंत उपस्थित होते.

समारोप हस्ते - प्रा. म. द. हातकणंगलेकर

चर्चासत्र आयोजन - डॉ. वि. भा. देशपांडे, प्रा. स्वाती कर्वे, डॉ. द. दि. पुंडे आणि विभागातील इतर प्राध्यापक

# रौप्यमहोत्सवी वर्षातील विविध स्मृतीनिधी कार्यक्रम

महाविद्यालयाकडे स्मृतीप्रित्यर्थ आलेल्या निधीतून पुढील कार्यक्रमांचे आयोजन केले होते. कै. आश्विन पुंडलिक कविता लेखन स्पर्धा (आंतर महाविद्यालयीन), कै. फुलचंद वालचंद कर्नावट स्मृती वादविवाद स्पर्धा, कै. जठार स्मृती व्याख्यान.

१) **कै. फुलचंद वालचंद कर्नावट स्मृती वादविवाद स्पर्धा -**
या कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध विद्वान आणि वक्ते मा. प्रा. शिवाजीराव भोसले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. ७ डिसेंबर १९९४ या दिवशी दुपारी ४.३० वाजता मॉडर्न हायस्कूलच्या सभागृहात या कार्यक्रमाचे

आयोजन करण्यात आले. व्याख्यानाचा विषय होता 'विद्यार्थी जीवन - काल, आज आणि उद्या' समारंभाचे अध्यक्षस्थान मा. श्री. स. मा. गर्गे यांनी भूषविले.

२) **कै. अश्विन पुंडलिक आंतरमहाविद्यालयीन कविता लेखन स्पर्धा -**

या कार्यक्रमात १५ महाविद्यालये आणि ५३ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. पहिल्या पाच विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके आणि प्रशस्तिपत्रके देण्यात आली. या वर्षापुरती ही रोख पारितोषिकाची रक्कम वाढविली होती. त्यासाठी रौप्यमहोत्सव निधीचे सहाय्य लाभले.

परिक्षक — डॉ. मेधा सिधये, डॉ. मधुरा कोरान्ने

पारितोषिक वितरण : हस्ते - प्रा. केशव मेश्राम, मान्यवर कवी.

३) **जठार स्मृती -**

कै. जठार स्मृती निधीतून अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित केलेल्या 'बँकिंग' विषयावरील परिसंवादाच्या पहिल्या सत्राला अर्थसहाय्य देण्यात आले. परिसंवादाचा विषय होता "व्यापारी बँका - बदल व आव्हाने"

सर्व सहकारी प्राध्यापकांचे आभार.

**प्रा. अ. गो. गोसावी**
प्रमुख

# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, सेवक सहकारी पतपेढी मर्यादित

३१ मार्च १९९४ अखेर संस्थेची सभासद संख्या १९४ असून, संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. १५, ००, ०००/— आहे. या आर्थिक वर्षात संस्थेकडे जमा भाग भांडवल रु. १०, ००, ९६०/— आहे. सभासदांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी दीर्घ मुदत आणि तातडी कर्जापोटी रक्कम रु. २०, ५१, ६८०/— कर्जवाटप केले. व्याज दर रु. १६ टक्के आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून मुदत कर्ज रु. ९, ००, ०००/—, १४ टक्के व्याज दराने घेतले आहे. मार्च १९९४ अखेर सभासदांकडून कर्ज येणे बाकी रु. १७, ११, ७८०/— आहे.

पतपेढीने या आर्थिक वर्षाअखेर गंगाजळी रक्कम रु. ८३, १८०/— पी. डी. सी. सी. बँकेत गुंतवणूक केली. तसेच डी. सी. सी. बँकेकडून रक्कम रु. १, १२, ९५०/— चे बँक भाग खरेदी केले.

पतपेढीच्या स्थापनेचे दशवार्षिक वर्षानिमित्त सभासदांना संचालक मंडळाने ४० ग्रॅम, २० ग्रॅम, १५ ग्रॅम वजनाचे लक्ष्मीचे चांदीचे नाणे सभासदांच्या जेष्ठतेप्रमाणे भेट वस्तू स्वरूपात दिले.

डिसेंबर १९९४ रोजी मागील संचालक मंडळाची मुदत संपल्यामुळे १९९५-१९९९ सालाकरिता नवीन संचालक

मंडळाची निवडणूक डिसेंबर ३० रोजी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. त्यामध्ये खालील संचालक निवडून आले —

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. कवडे एस. बी. | — | अध्यक्ष |
| २) | प्रा. अहिरराव डब्ल्यू. आर | — | उपाध्यक्ष |
| ३) | प्रा. सौ. साटम एम. एम. | — | कर्ज समिती अध्यक्षा |
| ४) | श्री. दळवी आर. एस्. | — | सचिव |
| ५) | श्री. जगताप के. एस. | — | उपसचिव |
| ६) | श्री. कदम व्ही. एस. | — | खजिनदार |
| ७) | प्रा. गोहेल एम. जी. | — | कर्ज समिती उपाध्यक्ष |

सन १९९५-१९९९ च्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी प्रा. लाळे टी. पी., श्री. खरे व्ही. के., मनोळी एस. जी., कामठे एस. एस., श्री. इनामदार एस. एन. यांची निवडणूक समिती नेमली होती. या समितीने निवडणुकीचे काम उत्तम प्रकारे पार पाडले याबद्दल संचालक मंडळाचे वतीने त्यांचे आभार.

सभासदांना आर्थिक सुविधा उपलब्ध करून देण्यामध्ये पी. डी. सी. सी. बँकेचे विद्यमान संचालक मंडळ आणि बिगरशेती विभागाचे व्यवस्थापक मा. श्री. भोसले आर. सी., त्यांचे सहकारी या सर्वांचे बहुमोल सहकार्य लाभले.

संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम प्रा. मेहंदळे ए. ए. यांनी केले. सन १९९४ चे आर्थिक वर्षाचे कामकाज पाहून शासकीय लेखापरीक्षक मा. व्ही. के. बक्षी यांनी संस्थेला 'अ' दर्जा दिला.

**दळवी आर. एस.**
सचिव

**ए. बी. कवडे**
अध्यक्ष

# कनिष्ठ महाविद्यालय

**अंतर्गत व्यवस्थापन समिती –**

| | |
|---|---|
| प्राचार्य प. स. चिरपुटकर | अध्यक्ष |
| प्रा. जे. पी. चिंचोरे | कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख |
| प्रा. जयश्री कुलकर्णी | पर्यवेक्षिका |
| प्रा. आशा परुळेकर | समिती सदस्य |
| प्रा. सुजाता गायतोंडे | समिती सदस्य |
| प्रा. जे. बी. दशपुत्रे | समिती सदस्य |

**प्रास्ताविक –**

कनिष्ठ महाविद्यालयात तिन्ही विद्याशाखांमध्ये मिळून अकरावी, बारावीच्या वीस तुकड्या आहेत. त्यांची विभागणी पुढीलप्रमाणे –

| | |
|---|---|
| कला शाखा | चार तुकड्या |
| शास्त्र शाखा | आठ तुकड्या |
| वाणिज्य शाखा | आठ तुकड्या |

**माध्यमिक शालांत परिक्षेतील यश**

**शास्त्र शाखा -**

| | | |
|---|---|---|
| १) | विक्रम गोडबोले | बोर्डाच्या सर्वसाधारण गुणवत्ता यादीत द्वितीय क्रमांक (५६७/६००, ९४.५ टक्के) |
| २) | अनुराधा दाते | बोर्डाच्या सर्वसाधारण गुणवत्ता यादीत बारावा क्रमांक (५५५/६००, ९२.५० टक्के) |
| ३) | मनीषा बांगर | मागासवर्गीय मुलीत प्रथम (५१७/६००, ८६.१७ टक्के) |

**गणित विषयात पारितोषिके - प्रथम क्रमांक**

| | | |
|---|---|---|
| १) | विक्रम गोडबोले | १००/१०० |
| २) | शीतल पुसाळकर | १००/१०० |
| ३) | मकरंद कुलकर्णी | १००/१०० |

या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन ! या सर्व यशवंत-गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाने घडवून आणला. या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून दै. सकाळचे संपादक श्री. विजय कुवळेकर हे उपस्थित होते.

शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांनी अधिकाधिक चांगली कामगिरी करावी, यासाठी बारावी शास्त्र व बारावी वाणिज्य या वर्गातील निवडक विद्यार्थ्यांच्या 'स्कॉलर बॅच'चा उपक्रम महाविद्यालय राबवीत असते. या खास मार्गदर्शन वर्गांचा उपक्रम १२ एप्रिल ९४ ते १२ जून ९४ या कालावधीत सकाळी ८.३० ते दुपारी २.३० या वेळात पार पडला. या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या प्रश्नपत्रिकांच्या धर्तीवर प्रश्नपत्रिका काढून चाचण्या घेण्यात आल्या.

**या उपक्रमात सहभागी झालेले प्राध्यापक –**

**शास्त्र शाखा -**

| | | |
|---|---|---|
| प्रा. कांचन राजाध्यक्ष | प्रा. रंजना देव | प्रा. सुजाता गायतोंडे |
| प्रा. इंगोले | प्रा. लिमये | प्रा. अमृता सातभाई |
| प्रा. दशपुत्रे | प्रा. चारुलता बुटाला | प्रा. गोखले |
| प्रा. भोमे | प्रा. डॉ. दांडेकर | प्रा. लिखिते |
| प्रा. मंगल शिंदे | प्रा. भिडे | प्रा. सौ. पेठे |
| प्रा. दातरंगे | प्रा. जयश्री कुलकर्णी | प्रा. खंडागळे |
| प्रा. मखळे | प्रा. आपटे | |

**वाणिज्य शाखा -**

| | | |
|---|---|---|
| प्रा. प्रेमा अगाशे | प्रा. सौ. नरगुंद | प्रा. सुनिता गोसावी |
| प्रा. कांचन राजाध्याक्ष | प्रा. लीना पाटणकर | प्रा. संजीवनी कुवळेकर |
| प्रा. सुजाता गायतोंडे | प्रा. जे. पी. चिंचोरे | प्रा. आर. व्ही. कुलकर्णी |
| प्रा. सी. टी. प्रधान | प्रा. डोईफोडे | प्रा. डी. एल. लिमये |

वरील सर्व प्राध्यापकांचे मनःपूर्वक आभार.

या वर्षी अकरावी (शास्त्र) या वर्गातील देवदत्त कुलकर्णी याने इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मीटिऑरॉलॉजी तर्फे शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या प्रश्नमंच स्प्रधेत तृतीय क्रमांक मिळविला. या यशाबद्दल देवदत्त कुलकर्णी याचे अभिनंदन !

या वर्षीच्या बारावी (वाणिज्य) स्कॉलर बॅचसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबिर डिसेंबर ९४ मध्ये आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयातील व बाहेरील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या शिबिरात पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली –

| | |
|---|---|
| डॉ. राजीव शारंगपाणी | फिजिकल डेव्हलपमेंट |
| डॉ. एस. जी. बापट | कॉमर्स पर्सनॅलिटी |
| प्रा. आशा परुळेकर | मेंटल हायजीन |
| प्रा. अमृता ओक | स्टडी हॅबिट्स |
| प्रा. सीताराम रायकर | रोल ऑफ लँग्वेज इन पब्लिसिटी डेव्हलपमेंट |

हे शिबिर आयोजिक करण्यात प्रा. सुनीता गोसावी, प्रा. रेखा आगाशे व प्रा. वंदना नरगुंद यांनी पुढाकार घेतला. वाणिज्य स्कॉलर बॅचला शिकविणारे सर्व प्राध्यापक या शिबिरास आवर्जुन उपस्थित होते.

**प्रा. जयश्री कुलकर्णी**
पर्यवेक्षिका

**प्रा. जे. पी. चिंचोरे**
प्रमुख, कनिष्ठ महाविद्यालय

- सेवानिवृत्त

प्रा. एस्. जी. दातार – वाणिज्य विभाग प्रमुख

1970-95 Silver Jubilee

**Modern College, Pune - 5.**

ORGANISES

COMP - SHOW 95 : SOFTWARE EXHIBITION / COMPETITI

On Sat. Feb

## ज्ञानाला विज्ञानाबरोबर शीलसंवर्धनाची जोड हवी

डॉ. रा. ना. दांडेकर यांचे विचार

पुणे, ता. १५ - "ज्ञानाला जशी विज्ञानाची जोड हवी, तसेच शीलसंवर्धनही होणे आवश्यक आहे. शील ... ज्ञान, विज्ञान आणि ... शिक्षणाचे अंतिम

अभावानेच आढळतात. अशा परिस्थितीत प्रत्येक शिक्षकाने व्यक्तिशः आपल्या कर्तृत्वाचा आदर्श निर्माण करून तो विद्यार्थ्यांपुढे ठेवला, तर शिक्षण ... "

या प्रसंगी प्रभारी प्राचार्य प. स. चिपळूणकर यांनी महाविद्यालयाच्या २४ वर्षांतील ...

मॉडर्न

## मॉडर्न महाविद्यालयात आज पदव्युत्तर वर्गांचे उद्‌घाटन

पुणे, ता. १६ - रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त येथील मॉडर्न महाविद्यालयाने सुरू केलेल्या सात विषयांतील पदव्युत्तर वर्गांचे ... डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते ... (१७) उद्‌घाटन ... प्राचार्य ...

## प्राध्यापकांसाठी एकांकिका स्पर्धा

पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयाने आपल्या रौप्यमहोत्सवानिमित्त प्राध्यापकांसाठी एकांकिका स्पर्धा आयोजित केली आहे ...

१९९४-९५



## संगणक प्रदर्शनात ६० विद्यार्थ्यांचा सहभाग

पुणे दि. (लो. प्र.) - मॉडर्न महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त ... विभागाने 'कॉम्प शो ९५' ... प्रदर्शन आ...

मॉडर्न

मॉडर्न

## सिम्पेक्स - ९५ प्रदर्शनाचे आयोजन

पुणे : मॉडर्न महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स विभागाने नुकतेच 'सिम्पेक्स ९५'चे आयोजन केले होते.

यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनात विविध ...

प्रदर्शनात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. भारती विद्यापीठाच्या कु. पाटील हिने द्वितीय, तर अश्विनी कोहगले ... क्रमांक ...

व्ही. घैसास, (इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख पुणे विद्यापीठ) ...

## मॉडर्न महाविद्यालयाचे उद्या रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण

(आमच्या प्रतिनिधीकडून)

## झू - व्हिजन - ९५

अमिबापासून माणसापर्यंत ... सजीव प्राण्यांसंबंधी ... मनोरंजक ...

मॉडर्न

## प्राध्यापकांच्या एकांकिका स्पर्धेत 'मॉडर्न' प्रथम

पुणे, दि. २४ (लो. प्र.) येथील मॉडर्न महाविद्यालयाने ...

## रौप्यमहोत्सवी वर्ष

## मॉडर्न महाविद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

पुणे, ता. २९ - येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न महाविद्यालय यंदा आपले रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करीत असून त्यानिमित्त ... विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आ...

## महाविद्यालय रौप्यमहोत्सवी वर्षात वेगळेपणाचा स्वतंत्र ठसा

१९९४-९५